2) अमर्यादित प्लास्टिकचा वापर: गेल्या अनेक वर्षापासून प्लॅस्टिक पिशव्या व प्लॅस्टिक पासून बनविण्यात येणार्‍या विविध वस्तूंचा वापर सामानी जनतेच्या रोजच्या जीवनात सातत्याने वाढत आहे. यात प्लॅस्टिक वस्तूंचा एक वेळ वापर करून त्याचे कचर्‍यात रूपांतर होण्याचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे सार्वजनिक ठिकाणे, पर्यटन स्थळे, समुद्र किनारे, चौपट्या, एस टी व रेल्वे स्थानके, ड्रेनेज लाइन या ठिकाणी

प्लॅस्टिक कचरा मोठ्या प्रमाणात टाकला जातो.एकट्या महाराष्ट्रात प्लॅस्टिक कचर्‍याचे प्रमाण 5 ते 6 टक्के आहेत त्यामुळे 1200 मे. टन प्रतिदिनं एवढा प्लॅस्टिक कचरा महाराष्ट्र राज्यात निर्माण होतो अशा प्रकारच्या कचरा उघड्यावर किवा घन कचरा विल्हेवाटीच्या ठिकाणी जाळल्याने मानवी आरोग्यावर व जंगली प्राण्यावर विपरीत परिणाम होवून विविध आजारांना सामोरे जावे लागते त्याचे दुष्परिणाम जनतेच्या दररोजच्या जीवनावर व पर्यावरणावर मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून आले आहे.

3) शहरीकरणामुळे उद्भवणार्या समस्या: शहरीकरणाची प्रक्रिया ही स्थलांतरची प्रक्रिया असते.ग्रामीण भागातील लोक रोजगारासाठी शहराकडे स्थलांतरित करतात. शहरीकरणा मुळे पायाभूत सुविधेत वाढ,बाजारपेठांचा विस्तार व तांत्रिक क्षेत्रात बदल होतात. शहरीकरणा मुळे सार्वजनिक सोईसुविधांवर ताण येतो त्यामुळे झोपडपट्टयात वाढ होते शहरीकरणा मुळे शहरामध्ये वाढती दर्दी,वाहतूक कोंडी,अपघात,चोरया,गुन्हेगारी,विविध रोगांचा प्रादुर्भाव यासारख्या अनेक समस्या निर्माण होतात शहराचा संपूर्ण विकास होत नाही मात्र खेड्यांचे विघटन होवून खेडी भकास झालेली दिसतात. शहरीकरणा मुळे भारतापुढे विकासाचा प्रादेशिक समतोल राखणे हे एक मोठे आव्हान आहे.

4) आम्ल पर्जन्य: आम्ल पर्जन्य मुळे वनस्पति, उभी पिके, जंगले, जलचर प्राणी आणि मानवी आरोगी इ. वर विपरीत परिणाम दिसून येतो. इंधनाचे ज्वलन व कारखान्यातून बाहेर पडणारे वायु यांचा संपर्क पावसाचे पाणी, हिम, बर्फ आणि धुके यांच्या सोबत येतो आणि आम्ल वृष्टी होते. मुंबईच्या चेंबुर परिसरात आम्ल वृष्टी ची गंभीर समस्या बनत चालली आहे तसेच पश्चिम युरोप, कॅनडा, अमेरिका, थायलंड इ. देशांमध्ये ही समस्या तीव्र रूप धारण करीत आहे त्यामुळे पर्यावरणाची हानी मोठ्या प्रमाणात होत आहे.

5) क्षारपीडित जमिनीचा प्रश्न: पुरामुळे शेतीमध्ये येणारे अतिरिक्त पाणी व अंदाधुंद वापरला जाणारा रासायनिक खतांच्या व कीटक नाशकाच्या वापराने जमिनीतील उपजत घटक नष्ट होतात त्यामुळे मातीतील क्षार भुपृष्टावर येतात असेंद्रिय करबानचा साठा वाढतो, जमीन नापीक बनते. भारतातील बहुसंख्य राज्यामध्ये क्षार पीडित जमिनीची समस्या गंभीर रूप धारण करीत आहे. क्षारयुक्त प्रदूषित जमीन 7.5 दशलक्ष हेक्टर असून एवढी जमीन आपणाला पीक पाणी देत नाही यामुळे शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञान वापरत असतांना विकासाचे विकृतीकरण व नैसर्गिक सं साधनाचे विद्रूपिकरण होतांना दिसते.

पर्यावरण संवर्धनासाठी शाश्वत उपाय योजना:

1. कमीत कमी कार्बन उत्सर्जन करणार्‍या साधंनांचा वापर करणे
2. गैर परंपरागत ऊर्जा साधंनाच्या वापरासाठी लोकांना प्रोत्साहन देणे.
3. ग्रीन हाऊस वायूचे प्रमाण कमी करणे.
4. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी कडक कायदे करून त्याची कठोर अमलबजावणी करणे.
5. ईकोफ्रेंडली पध्दतीने सण व उत्सव साजरे करणे.
6. ग्रामीण पर्यावरण रक्षणासाठी स्थानिक लोक सहभाग वाढविणे.
7. शाश्वत विकास व पर्यावरण पूरक जीवन शैलीचा स्वीकार करून त्या आधारे पर्यावरण संवर्धन करणे.
8. आधुनिक तंत्र ज्ञान व कच्चा मालाचा कमीत कमी वापर करणार्‍या धोरणाची अमलबजावणी करणे.
9. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विकास करून त्यामध्ये शाश्वत संशोधन करणे.
10. शेतकर्‍यांना जैविक शेती करण्यासाठी प्रोत्साहित करून त्यासाठी त्यांना अनुदान देणे.
11. प्रदूषण मुक्त शहराच्या विकासासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करणे.
12. समाजात नैतिक मूल्याची जपवणूक करण्यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे.
13. स्वच्छ व शुद्ध पाणी आणि आधुनिक सांडपाणी व्यवस्था संशोधन गुंतवणुकीत वाढ करणे.
14. शाश्वत विकासासाठी शिक्षणात शाश्वत संकल्पना अभ्यासक्रमात सक्तीचा करावा.

निष्कर्ष:

पर्यावरण हा नैसर्गिक ससाधनाचा खजिना आहे.शुद्ध हवा, जल, सुपीक जमीन, वने, जैवविविधता, प्राकृतिक सुंदरता इ. सर्व घटक टिकवून ठेवण्यासाठी ईको सिस्टमचे सं रक्षण महत्वाचे आहे.पर्यावरणीय संसाधनाचे रक्षण आणि संवर्धन यासाठी शाश्वत विकास महत्वाचा आहे "जो विकास चालू पिढीच्या गरजा पुढील पिढीच्या गरजा धोक्यात न आणता पूर्ण करतो". शाश्वत विकास हा

मानवाच्या सध्याच्या व भविष्यातील गरजांची संतुलित पूर्तता करतो. शाश्वत विकास भारतासारख्या विकसनशील देशाला अंगीकारणे आवश्यक आहे.जलद आर्थिक विकासाचा मार्ग अवलंबतांना होणारा पर्यावरणीय संसाधनाचा –ह्रास देशाला धोकादायक ठरू शकतो. त्यासाठी शाश्वत विकासात पर्यावरणीय संसाधनाला धोका न पोहचवणे हे अपेक्षित आहे त्यासाठी सर्व संपूर्ण मानव जातीने पुढे येवून सहकार्याची भूमिका दाखविणे गरजेचे आहे.भारतात शाश्वत विकासाच्या दृष्टीकोणातून अनेक प्रयत्न केले जातात परंतु सामूहिक स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यासाठी दृष्टिकोन, विचारधारा, शिक्षण, प्रशिक्षण यात बदल आवश्यक आहे. त्यासाठी पर्यावरण संवर्धनातून शाश्वत विकासाला हातभार लागेल व त्यातून शाश्वत विकासाचे उद्दीष्ट गाठता येईल.

संदर्भ:

1. पाटील व्ही. जे, पाटील संभाजी, शाश्वतता आणि विकास.
2. “पर्यावरण शास्त्र” सेठ प्रकाशन, मुंबई
3. ढमढेरे एस.व्ही. शाश्वत विकास आणि भारत
4. कदम. प (2021) शाश्वत विकास ध्येय्य ओळख
5. घारपुरे विठ्ठल, “पर्यावरण शास्त्र” पिंपळपुरे प्रकाशन नागपुर, जून 2005.
6. Environmental studies by Dr. S. Phule.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

आजादी की लड़ाई में आधुनिक हिंदी साहित्यकारों की भूमिका

डॉ. राखी. के. शाह
सहायक आचार्या, हिन्दी विभाग, जैन मानद विश्वविद्यालय,
एस. ओ. एस, जे. सी. रोड, बेंगलोर, कर्नाटक |
Corresponding Author- डॉ. राखी. के. शाह
DOI- 10.5281/zenodo.11178137

Abstract:

हिन्दी साहित्य के इतिहास में आधुनिक काल का आरंभ भारतेंदु युग से माना जाता है। भारतेंदु युग (सन् 1850 -1900 ई) आधुनिक कविता का प्रथम चरण था। आधुनिक काल की कविता अनेक चरणों से होकर गुजरती है, जिसमें भारतेंद्र युग, द्विवेदी युग, छायावाद, प्रयोगवाद, नई कविता, अकविता तथा समकालीन कविता आदि चरण प्रमुख हैं। मानव के इतिहास का साहित्य के साथ प्रगाढ़ संबंध है। इतिहास की हर एक घटना, साहित्य को प्रभावित करती है। इसी कारण समाज की परिवेशजन्य स्थितियों का साहित्य में महत्वपूर्ण स्थान होता है। उन्नीसवीं सदी के आरंभ में ही भारत में अंग्रेजी विरोधी भावना प्रबल रूप धारण कर चुकी थी। देश में सर्वत्र असंतोष और क्रोध का वातावरण बन रहा था। उसी के भयंकर विस्फोट का परिणाम स्वरूप हमें सन् 1857 सिपाही विद्रोही प्रथम राज्य क्रांति के रूप में दिखाई पड़ा था। तब तक भारतीय जनता समझती थी कि अंग्रेज भारत आकर अराजकता को दूर कर शांति स्थापित कर रहे हैं। राष्ट्रीय भावना को जन्म दे रहे हैं, भारत के कल्याण में काम हो रहा है। इस संदर्भ में राजनाथ शर्मा कहते हैं "उन्नीसवीं शताब्दी के अंत तक अथवा प्रथम महायुद्ध तक भारतीय राजनीतिक चेतना ब्रिटिश राज्य को वरदान समझती रही।"1 इस के कारण अनेक आलोचकों को भारतेंदु कालीन साहित्य में अंग्रेजों के प्रति राजभक्ति का स्वर सुनाई पड़ता रहा है। अतः साहित्य एक पकड़ है जो राजनीति के गुण-दोषों की आलोचना करने के साथ-साथ सुधारवादी दृष्टिकोण अपनाते हुए आगे का मार्ग भी दिखाता है। साहित्य न केवल राजनीति के साथ है बल्कि उसके कई कदम आगे भी है। ऐसे तो हर काल खंड के साहित्य पर राजनीति का और युगीन राजनीति पर साहित्य का प्रभाव अवश्य पड़ता है। अतः निर्विवाद सत्य यह है कि आजादी की लड़ाई के समय की कविता का प्रमुख स्वर देशभक्ति का ही रहा है। इस समय के हिन्दी साहित्यकारों की कविताओं में एक ओर ऐतिहासिक-गौरव भाव द्वारा तत्कालीन जनमानस में व्याप्त हीन और दौर्बल्य भाव का निर्मूलन तथा देश प्रेम और देशभक्ति की प्रतिष्ठापना का सफल प्रयास है तो, दूसरी ओर तत्कालीन परतन्त्रताजन्य सामाजिक संस्कृतिक दुर्दशा को प्रस्तुत कर समुन्नत भविष्य निर्माण के लिए त्याग और बलिदान की अनिवार्यता भी प्रतिपादित हुई है।

Keywords: आजादी की लड़ाई, आधुनिक हिंदी साहित्यकार,देश भक्ति, राष्ट्रीयता आदि ।

Introduction:

भारतेन्दु के परिवार को अंग्रेजों की राजभक्ति विरासत में मिली थी किन्तु भारतेन्दु स्वयं अंग्रेजों के कुशासन व्यवस्था और नीतियों के विरुद्ध जनमानस में अपनी रचनाओं द्वारा राष्ट्रीय चेतना को जागृत करते थे । अंग्रेजों की शासन व्यवस्था का विरोध और जनता में राष्ट्रीयता जगाने में भारतेंदु कालीन कविता का उल्लेखनीय योगदान रहा है। इस संदर्भ में भारतेंदु की 'विजयी विजय वैजयन्ती', प्रेमधन की 'आनंद अरुणोदय' प्रतापनारायण मिश्र की 'महापर्व' और 'नया संवत्' तथा राधा कृष्ण दास की 'भारत बारहमासा' और 'विनय' शीर्षक कविताएँ उल्लेखनीय है। विमल देश, अमला भारतीय, वीर भारत, वीर प्रसू भारत, शिक्षित भारत, आर्त भारत, तेजस्वी भारत, स्वाधीन हिंदू आदि विशेषण उस समय की नवीन राष्ट्रीय स्तर से संबंध रखते हैं। राष्ट्रीयता और देशभक्ति की अभिव्यक्ति के लिए तथा तत्कालीन राजनीति से मुक्ति पाने के लिए तत्कालीन कवियों ने एक ओर क्षत्रीयों का परंपरागत शौर्य, भारत की गौरवपूर्ण प्राचीन संस्कृति, मर्यादाओं आदि का अंकन कर वीर भावना का आह्वान

किया है तो दूसरी ओर विदेशी सत्ता से शोषित प्रताड़ित भारतीय समाज तथा संस्कृति का करुण अंकन भी किया है।

Review of Literature:

अतीत के प्रेरणादायी प्रसंगों, वर्तमान करुण दशा का अंकन के माध्यम से देश वासियों को पुनर्जागरण का मंत्र देना इन कवियों का प्रमुख मंतव्य रहा है। 'प्रेमधन' ने 'ईर्ष्यादर्श' कविता में भारतीय दुर्दशा के लिए ईस्ट इंडिया कंपनी को दोषी ठहराया है। पराधीन भारत की दुर्दशा को अभिव्यक्त करते हुए भारतेंदु इस प्रकार लिखते हैं-

रोवदु सब मिली के आवहु भारत भाई,
हा हा भारत दुर्दशा न देखी जाई ।
सोई भारत भूमि भई सब भाँति दुखारी
रह्यो न एक हूँ वीर सहस्रान कोस मझारी ।
होत सिंह का नाद जॉन भारत बन नाही,
तँह अब ससक सियार स्वयं खर आदि लहाही ।2

स्वतंत्रता आंदोलन के दौरान साहित्य के क्षेत्र में भारतेन्दु हरिश्चंद्र के योगदान अतुलनीय है । मूलतः भाषा को लेकर उनकी राष्ट्रीय चेतना प्रखर थी । वे केवल अंग्रेजी जाति और अंग्रेजों को रोकने तक सीमित नहीं थे बल्कि अपनी मातृभाषा का सम्मान और अंग्रेजी का विरोध करते हुए लिखते हैं –

अंग्रेजी पढ़ि जदपि सब गुन होत परबीन ।
पै निज भाषा ज्ञान बिना राहत हीन के हीन ।3

अंग्रेजी राज़ एवं शासन व्यवस्था के प्रति तीव्र असंतोष व्यक्त करने वालों में बालमुकुंद गुप्त का स्वर भी अधिक मुखर था। सन् 1900 से 1918 ई तक का समय हिंदी साहित्य के इतिहास में द्विवेदी युग, जागरण सुधार युग्, पूर्व स्वच्छंदतावादी युग, राष्ट्रीय काव्य धारा का युग आदि नामों से जाना जाता है। अतः इस काल के साहित्य की प्रमुख प्रवृत्ति जागरण और सुधार की थी। यह जागरण और सुधार एक ओर राजनीतिक सामाजिक और सांस्कृतिक क्षेत्र में था तो दूसरी ओर साहित्य के क्षेत्र में भी। इस समय की राजनीतिक परिस्थिति भयंकर थी। अंग्रेज राज़ कठोर से कठोरता की ओर जा रहा था। जनता की पीड़ा बढ़ रही थी और स्वाधीनता संग्राम की सख्त जरूरत थी। इस समय महावीर प्रसाद द्विवेदी, मैथिली शरण गुप्त, सियाराम शरण गुप्त, नरेश अयोध्या सिंह उपाध्याय हरिऔध, राय देवीप्रसाद, गया प्रसाद शुक्ल सनेही, राम नरेश त्रिपाठी, रूपनारायण पांडेय, माखनलाल चतुर्वेदी, सुभद्रा कुमारी चौहान, बालकृष्ण शर्मा आदि के नाम उल्लेखनीय हैं, जिन्होंने एक ओर सामाजिक बुराइयों को दूर करने का प्रयत्न किया और दूसरी ओर समसामयिक राजनीतिक चेतना की अभिव्यक्ति कर संपूर्ण राष्ट्र को जगाया। गुप्त जी के 'भारत भारती' में तत्कालीन राष्ट्रीय चेतना, वर्तमान की हीन भावना के संदर्भ में अतीत का गौरव और प्रकारांतर से भविष्य का संकेत चित्रण है।

हा ! निष्ठुरों के हाथ से सुर-मूर्तियाँ खंडित हुई,
बहु मंदिरों की वस्तुओं से मसजिदें मंडित हुई !
जाजिया-सरीखे कर लगे, यह बात सिद्ध हुई सही-
जो प्राप्त हो परतंत्रता में दुःख थोड़ा है वही ।। 4

'हिंदू केशो की कथा' और' स्वर्ग सहोदर' आदि रचनाएं गुप्तजी की भारत भारती की अगली कड़ियाँ है। श्रीधर पाठक के काव्य में देशभक्ति और समाज सुधार के स्वर मुखरित है यदि 'भारतोत्थान', 'भारत प्रशंसा' जैसी कविताओं में उनकी देशभक्ति मुखरित होती है तो 'जार्ज वंदना' जैसी कविताओं में भारतेंदु कालीन कवियों के समान राजभक्ति भी प्रकट होती है।

नवीन जी कवि होने के साथ साथ राष्ट्रीय आंदोलन के प्रमुख कार्यकर्ता भी रहे थे। राष्ट्रीय जीवन का क्रियात्मक और मार्मिक अनुभव होने के कारण उनके काव्य में राष्ट्रीय भावनाओं की बड़ी मार्मिक अभिव्यक्ति दिखाई पड़ी। 'कवि ऐसी तान सुना दें जिससे उथल पुथल मच जाए' कहकर उन्होंने तत्कालीन व्यवस्था को उखाड़ फेंकने की प्रेरणा भी दे दी। माखनलाल चतुर्वेदी साहित्य के क्षेत्र में एक भारतीय आत्मा के नाम से प्रसिद्ध रहे हैं। वे राष्ट्रीय आंदोलन के एक प्रमुख स्तंभ और क्रांतिकारी वीर थे। इन्होंने अत्यंत ओजस्वी स्वर में एक ओर नाश और विध्वंस के गीत गाए हैं तो दूसरी ओर उनका हृदय, करुणा से आंदोलित भी होता रहा है। इनकी कविता 'पुष्प की अभिलाषा' राष्ट्रीयता और आत्मबलिदान का प्रतीक है । फूल देश प्रेमियों के पैरों से कुचल जाने में ही अपने जीवन की सार्थकता मानता है। अतः फूल वनमाली से कहता है-

मुझे तोड़ लेना वनमाली,
उस पथ पर देना तुम फेंक
मातृभूमि पर शीश चढ़ाने
जिस पथ जाए वीर अनेक । 5

श्याम नारायण पांडेय की प्रसिद्ध कृति 'हल्दीघाटी' वीर रस पूर्ण रचना है जिस के प्रथम सर्ग में राष्ट्रीयता का भाव इस प्रकार परिलक्षित होता है।

आज उसी की अमर-वीरता व्यक्त कारूँगा गानों में ।
आज उसी के रणकौशल की कथा कहूँगा कानों में।6

सियाराम शरण गुप्त गाँधीवादी कवि कहलाते हैं। विशाद, बापू, उन्मुक्त आदि उनके प्रसिद्ध काव्यसंग्रह है। इन्होंने नोआखली हत्याकांड पर अनेक मार्मिक कविताएं लिखकर देशवासियों के हृदय में राष्ट्रीयता जगाने का सफल प्रयास किया है। इनकी 'हम सैनिक हैं' कविता की पंक्तियाँ निम्नलिखित है-

आओ वीरों ! आज देश की कीर्ति बढ़ा दें,
सब के सम्मुख मातृभूमि को शीश चढ़ादें ।
शत्रु जनों को मार यहाँ से अभी हटा दें;
उनका घोर घमंड सदा के लिए घटादें ।
संसार देख ले फिर हमें, तुच्छ नहीं हैं हम कभी;
निज भारतीय बल-वीर्य का आओ, परिचय दें अभी ।।7

सुभद्रा कुमारी चौहान की अधिकांश कविताएँ राष्ट्रीय भावना से ओतप्रोत है। इनकी 'झांसी की रानी, 'जालियावाला बाग में बसंत' आदि कविताएँ राष्ट्रीय परक रचनाएँ हैं। 'जालियावाला बाग में बसंत' कविता की कुछ पंक्तियाँ स्मरणीय हैं –

तड़प तड़प कर वृद्ध मरे हैं गोली खा कर,
शुष्क पुष्प कुछ वहाँ गिरा देना तुम जाकर ।
यह सब करना, किन्तु यहाँ मत शोर मचाना,
यह है शोक- स्थान बहुत धीरे से आना ।8

सन् 1918 से सन् 1920 ईसवी तक आते आते हमारा राजनीतिक सामाजिक परिवेश गांधीमय हो गया। इस काव्यधारा में एक ओर तो कवियों ने भारत की आंतरिक विसंगतियो और विषमताओं को दूर करने के लिये देश का आह्वान किया है तो दूसरी ओर जनता को विदेशी शासन से मुक्ति दिलाने के लिए स्वाधीनता संग्राम में कूदकर आत्म बलिदान करने की प्रेरणा भी दी है। माखनलाल चतुर्वेदी, सियाराम शरण गुप्त, बालकृष्ण शर्मा नवीन, सुभद्रा कुमारी चौहान, रामधारी सिंह दिनकर आदि कवि शुद्ध छायावादी नहीं रहे हैं, पर उसी समय सीमा के अंतर्गत उन्होंने राष्ट्रीय

काव्य धारा को विकसित किया है। चतुर्वेदी जी अपने आप को एक सैनिक मानते हुए स्वतंत्रता संग्राम के दोहरे मोर्चे पर लड़ते रहे। एक ओर सत्याग्रह कर के जेल जाते थे, तो दूसरी ओर जेल से बाहर आते ही कलम संभाल लेते थे। वे एक सक्रिय योद्धा और संवेदना संपन्न कवि थे। आरंभ में ये क्रांति दर्शन से प्रभावित हुए थे किंतु बाद में गांधीदर्शन से प्रेरित हुए। उनकी कविताओं में देश के प्रति गंभीर प्रेम और आत्मोत्सर्ग का उत्कृष्ट भाव प्रकट हुआ है। इनकी 'कैदी और कोकिल' कविता स्वतंत्रता सेनानी में अधिक प्रिय रही है। सियाराम शरण गुप्त के 'आत्मोत्सर्ग' खण्डकाव्य में जहाँ एक ओर अमर शहीद गणेश शंकर विद्यार्थी की बलिदान गाथा है, वहाँ दूसरी ओर सांप्रदायिक सद्भाव का पुनीत उद्घोष भी है। बालकृष्ण शर्मा 'नवीन' 1920 में गाँधी जी की आह्वान पर राजनीति में सक्रिय हुए और गणेश शंकर विद्यार्थी के संपर्क में रहे।

'नवीन' जी का कवि व्यक्तित्व 'विद्रोही विप्लवी' रूप में प्रख्यात रहा है। 'विनोबा स्वप्न', 'हम विशपायी जनम के' आदि कविताएं तत्कालीन जन उत्पीड़न को स्पष्ट करती है। दिनकर जी राष्ट्रकवि के बराबर माने जाते हैं। उनकी कविता में वीरभाव की प्रधानता रही है। उनका काव्य संग्रह 'रेणुका' इसी कालखंड की बहुमूल्य निधि हैं।

Conclusion:

प्रसाद, पंत, निराला और महादेवी वर्मा छायावाद के चार प्रमुख स्तंभ माने जाते हैं। वैसे तो छायावादी काव्य में प्रत्यक्ष रूप से राजनीतिक चेतना पर्याप्त रूप से परिलक्षित नहीं होती पर व्यक्तिवादी चेतना में व्यक्तिगत स्वाधीनता और व्यक्ति के स्वत्व के प्रति विश्वास देखा जा सकता है। इस कालखंड की कविताओं में प्राचीन रूढ़ित्वबद्धता, थोथी नैतिकता और जर्जरित परंपरा के विरोध और इससे भी आगे बढ़कर जगत कल्याण की कामना देखी जाती है। सन् 1936 से 1950 ई तक के कालखंड के साहित्य में प्रमुखतः निषेध और विद्रोह की प्रवृत्ति रही है। जो स्वतंत्रता आंदोलन, अंग्रेजी सत्ता का दमन तथा विश्व साहित्य की चेतना के अभाव स्वरूप पाई जाती है। प्रगतिवादी और प्रयोगवादी साहित्य आंदोलन की बाह्य विचारधारा में पर्याप्त अंतर होने के बावजूद निषेध और विद्रोह उसकी आंतरिक प्रवृत्ति रही है। अंत में यही कहा जा सकता है कि राजनीति और साहित्य का हमेशा से ही अविनाभाव संबंध रहा है। भारतीय राजनीति ने जहाँ एक ओर साहित्य को प्रभावित किया है, वहीं दूसरी ओर साहित्य से प्रभावित भी हुआ है।

References:

1. राजनाथ शर्मा, हिन्दी साहित्य का विवेचनात्मक इतिहास, पृ. सं -516
2. भारतेन्दु हरिश्चंद्र, भारत दुर्दशा, पृ. सं-25
3. रामवीर सिंह, आधुनिक काव्य संग्रह, पृ. सं-02
4. https://www.hindi-kavita.com/HindiBharatBhartiGupt.php
5. माखनलाल चतुर्वेदी, पुष्प की अभिलाषा, हिमकिरीटीनी, पृ. सं-09
6. हल्दीघाटी /प्रथम सर्ग/श्याम नारायण पाण्डेय - कविता कोश www.kavitakosh.org
7. https://www.hindwi.org/kavita/ham-sainik-hain-siyaramsharan-gupt-kavita
8. https://hindionlinejankari.com/subhadra-kumari-chauhan-poems-in-hindi/

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

मराठी कवितेवर जागतिकीकरणाचा परिणाम

प्रा. डॉ. माधव मारुती भोसले
तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नेसरी,
मु. पो. नेसरी, ता - गडहिंग्लज, जि. कोल्हापूर, महाराष्ट्र
Corresponding Author- प्रा. डॉ. माधव मारुती भोसले
DOI- 10.5281/zenodo.11178151

प्रस्तावना:

जागतिकीकरण ही संकल्पनाच मुळात बहुआयामी बहुधर्मी स्वरूपाची अशी आहे. आज जागतिकीकरणाचा प्रभाव संपूर्ण भारतभर नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पडला आहे. किंबहुना जीवनाच्या सर्व क्षेत्रावर पडला आहे. याला साहित्यक्षेत्र अपवाद नाही कारण साहित्य हा समाज मनाचा आरसा आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे. जागतिक वाङमयीन आदान प्रदान वाढले. याचा परिणाम सामाजिक,सांस्कृतिक,राजकीय,आर्थिक स्तरावर झाला. त्यामुळे साहित्याच्या कक्षा रुंदावल्या आपल्या मराठी साहित्याला फार मोठी परंपरा आहे. संतांनी प्राचीन व अर्वाचीन साहित्यिकांनी आपापल्या पद्धतीने मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. कालांतराने औद्योगीकरणाने यांत्रिकीकरण आधुनिकीकरण आणि आता जागतिकीकरणाने मानवी मन ढवळून निघाले याचाच परिणाम म्हणून मराठी साहित्यात कथा कादंबरी बरोबर कवितेनेही आपले रूप पालटले आणि एक नवी दिशा घेऊन कवितेत अमुलाग्र बदल होत गेले.

जागतिकीकरणाचा परिणाम साधारणपणे १९८० नंतरच्या कवितेत प्रामुख्याने दिसू लागला. तो पुढे पुढे अगदी पक्व प्रमाणात विकसित होऊ लागल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन लोकसाहित्यातून ओवी भारुड पोवाडा इत्यादीतून प्रकटले आहे. पुढे प्राचीन कवितेने त्यामध्ये मोलाची भर घातली पुढे अर्वाचीन कवितेने कविता या वा•डमय प्रकाराला आणखीन प्रगल्भ केले आणि वेगवेगळ्या आशय अभिव्यक्ती आणि विषयाच्या दृष्टिकोनातून एक प्रकारची समृद्धता आली. १९८० नंतर मराठी कवितेवर जागतिकीकरणाचा प्रभाव वाढला आणि एक वेगळी अशी कविता रसिक वाचकांच्या समोर आली. प्रस्तुत शोधनिबंधाकरिता जागतिकीकरण आणि मराठी कवितेतील परिणाम हा विषय निवडला आहे.

आर्थिक राजकीय आणि सांस्कृतिक अशा भिन्न भिन्न प्रवाहाना सामावून घेणारी जागतिकीकरण ही संज्ञा आहे. जागतिकीकरणाच्या संकल्पनेचा विचार फक्त आर्थिक संदर्भात केला जात असला तरी या संकल्पनेचा संबंध साहित्य, कला, विज्ञान, संस्कृती, धर्म यांच्याशी जोडला गेला आहे.त्यामुळे मानवी जीवनावर त्याचा प्रभाव आहे या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात माणसाबरोबर साहित्यही जागतिकीकरणात पोहोचले आहे. कागदावरून ते इ-कागदावर इ-कादंबऱ्या, इ-कथा इ-कविता मोठ्या दुकानातून संगणकाच्या ब्लॉगवर आता साहित्य पोहोचले आहे. जागतिकीकरणातून आलेल्या तंत्रज्ञानातूनच हे शक्य झाले आहे. १९९० नंतर मराठी साहित्य जगतात जागतिकीकरणाच्या बदलाची एक नवी संवेदना घेऊन एक पिढी अवतिर्ण झाली जागतिकीकरण खाजगीकरण उदारीकरण तसेच सेझसारखे प्रकल्प व त्याचा परिणाम साहित्यातून चित्रित होऊ लागला आणि त्याचा परिणाम मराठी साहित्यातील कवितेवर झाला. वीरधवल परब, उत्तम कांबळे, अरुण काळे, अविनाश सालपुरीकर, अजय कांडर, उत्तम कोलगावकर, लक्ष्मण महाडिक, चंद्रशेखर मलकमपटटे, महेंद्र भवरे, सुनील अवचार, इंद्रजीत भालेराव इत्यादी कवींवर हा परिणाम अधिक प्रमाणात झालेला दिसतो. या कवींनी आपापल्या क्षमतेनुसार मराठी कवितेवर जागतिकीकरणाचा परिणाम कसा आहे याचे चित्रण केले आहे जागतिकीकरणामुळे माणसाची मुंग्याप्रमाणे झालेली अवस्था गरीब श्रीमंत अशी विभागणी, ओस पडणारी खेडी बकाल शहरे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे माणसांचे माणूसपण हरवत चाललेली प्रक्रिया आपापल्या कवितेतून व्यक्त केली अशीच एक भावना व्यक्त करताना कवी उत्तम कांबळे म्हणतात.....

सारं जग जवळ आलयं म्हणतात
पण माणसं माणसापासून दूर धावतहेत
रोबोटच्या गळयात गळा घालताहेत
कॅरीबॅगमधून प्रश्न वाहून नेत आहेत

इथले लोक

दुधाच्या पिशव्याप्रमाणे

अश्रूंच्या पिशव्याही

फ्रिजमध्ये ठेवताहेत लोक.....

जागतिकीकरणाच्या या कोलाहलात माणसाच्या अस्तित्वाचेच प्रश्न उपस्थित केले आहेत. माणसाच्या मेंदूतून बाहेर पडलेला संगणक महत्त्वकांक्षी होतो आहे तो माणसालाच यांत्रिकमानव करण्याच्या प्रयत्नात आहे. भावनेला शून्य किंमत येऊ पाहतेय. आजकालची लोक पूजा अर्चा विधी सुद्धा संगणकाच्या माध्यमातून व्यक्त करू लागलेत आणि आजचे हायटेक भड्जी तशा प्रकारच्या विधी सुद्धा इंटरनेटच्या माध्यमातून करू लागले आहेत. याचाच परिणाम म्हणून की काय उत्तम कांबळे एका कवितेत म्हणतात ....

कोणी सांगावं

नव्या शतकातला माणूस

कदाचित संगणकाच्या खांद्यावर

मान ठेवून शेवटचा श्वास घेईल

दयाळू संगणक अंतराळात

माणसाच्या थडग्या शेजारी

शोकसभा घेतील.....

जागतिकीकरणाच्या रेटयात बड्या राष्ट्राच्या हस्तक्षेपाने आंतरराष्ट्रीय राजकारणाने शेतकऱ्यांसमोर अनेक प्रश्न निर्माण केलेले आहेत. त्याचे चित्र इंद्रजीत भालेराव यांच्या कवितेत प्रकटताना दिसते त्यांच्या टाहो या कवितासंग्रहात हा आकांत प्रकट झाला आहे ते म्हणतात...

जागतिकीकरणाच्या एंड्रिनचा डबा

कुणी धुतला माझ्या निर्मळ गंगेत

निरागस विहार करणाऱ्या नौकात

कुणी आणून कोंबला आकांत.....

इंद्रजीत भालेरावांनी पीकपाणी, आम्ही काबाडाचे धनी, दूर राहिला गाव, पेरा इत्यादी कविता संग्रहातून शेतीचे प्रश्न त्यांच्या समस्या आणि शेतकऱ्यांच्या जीवन जाणिवांना वाचा फोडली आहे. खेळखंडोबाच्या नावानं या दीर्घ कवितेत जागतिकीकरणाच्या काळात आपल्या वाट्याला आलेल्या करंट्या वर्तमानाचे चित्रण केले आहे हे चित्रण करताना प्रवीण बांदेकर म्हणतात जागत्या वर्तमानावर बागुलबुवाची पावलं वाजताहेत ती भयानक आहेत हे सांगताना ते म्हणतात....

....एखादं ईमेल इंटरनेट वेबसाईट डब्ल्यू डब्ल्यू

पिता -पुत्र संवाद डॉट कॉम

किंवा तसलच एखादं यंत्र

ज्यात फक्त शब्दच असतील कोरडे

काना मात्रा हरवलेले

नि थुकल्या जातील भावना

टेक्निकली आऊटडेटेड म्हणून.....

गावची होत असलेली अवकळा सदानंद देशमुख आपल्या गावकळा या संग्रहातून जिवंतपणे मांडताना म्हणतात....

हा गँट करार म्हणजे काय आस्ते बाबा?

अन जागतिकीकरणाचं वारं कसं असतं?

कसा वास येतो त्या वाऱ्याले?

ब्लडाखालच्या पांदीसारखा

का कणग्यात बुडी लागल्या आंबूस गव्हासारखा?

महेश मोरे तर शेतकऱ्यांच्या फसगती विषयी आपल्या कवितेचा सूर आपल्या कुणब्यावर जागतिकीकरणाचा किती प्राण घातक हल्ला आहे याची साक्षच देतात ते म्हणतात...

किती उल्लू बनवण्याचे

धंदे निघालेत निरर्थकच

त्यातल्या त्यात कुणब्याला

कोण येऊन काय सल्ला देईल

याचा काहिच नेम नाही ...

.....

आता तांदूळ हायब्रीड मक्यापासून

बनते दारू आम्हाला आयुष्यभर

नशेत ठेवण्यासाठी.....

पुन्हा पाच वर्षांनी

मताचा हंगाम घेण्यासाठी.....

ते दाखवतात इस्तराईलच्या विदेशी

शेतीची चित्रफीत

आम्हाला फितवण्यासाठी....

आता तर पाऊसच पडत नाही...

खरवाडी जमिनीत काय पिकणार.....

नेट इंटरनेटवरील चित्रफीत पाहून

अजूनही बळी पडतो न्याहारीच्या आमिषाला...

मग अडकला जातो गळाला मासा

त्याहीच्या या इंटरनेटनं

मारला पक्का बैलफासा

अरुण काळे यांची कविता जागतिकीकरणात अत्यंत मोलाची अशी आहे. त्याचा सायरनचे शहर हा कवितासंग्रह म्हणजे जागतिकीकरणामुळे महानगराची काय अवस्था झाली आहे याचा एक जीवनपटच होय. महानगराचे आक्राळ विक्राळ रूप सायरनचे शहर मधून अधोरेखित झाले आहे. जागतिकीकरणात माणसाच्या वसाहती ऐवजी साईटला महत्त्व आलं आहे. जागतिकीकरणाच्या या महाजालामध्ये गरिबाला जागा नाही. साईटवाले श्रीमंत साईट शोधणारे चतुर मग बिनसाईटवाल्यांनी जायचं कुठं ? काल-परवापर्यंत भाकरीचा तुकडा मागणारे भिकारी उद्या साईटची भिक मागतील अशी त्यांनी जागतिकीकरणामुळे आलेली परिस्थिती नोंद केली आहे ते म्हणतात....

हरेक किस्म का पुण्य है बाबाऽऽऽ

स्टोरीची मांग आहे बाबा

एक वेबसाईट हमारा भी डालो बाबा

हे विश्वची माझा कटोरा

असे म्हणून जीवनातील अस्वस्थता त्यांनी नेमकेपणाने टिपली आहे शहरी संस्कृतीतला विशेषता फ्लॅट मधील बंद दार संस्कृतीतला बदल कवी अरुण काळे यांनी नंतर आलेले लोक या कवितासंग्रहातून अत्यंत वेधकपणे मांडला आहे.ग्रामीण जाणिव आणि महानगरीय जाणिवा मधील फरक स्पष्ट केला आहे. आता लोक अन्नही खूप फेकतात आणि दारेही कायम बंद ठेवतात ही महानगरातील बाब कवीला मानवी संवेदना बोथट झाल्याचे प्रतीक वाटते. हे सर्व आता मुके प्राणीसुद्धा ओळखू लागले तसे सांगताना ते म्हणतात....

माझ्या लहानपणी सगळी संध्याकाळ
गोळा होईल जेवणाभोवती
चूल आणि दिव्याच्या उजेडाची तिरीप धरून
उभं असायचं दारात एखादा कुत्रं हमखास
आई त्याला खंडेराव म्हणायची
अर्धी भाकर सर्वांच्या आधी
त्याला मिळायची
आता लोक अन्न खूपच फेकतात
आणि दारही कायम बंद ठेवतात
असल्या दारासमोर कुत्रही उभं नसतं.....

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे घडून आलेला प्रचंड सामाजिक बदल आणि त्याचे प्रतिबिंब कवितेत उमटलेले दिसते. बदलत्या राजकीय सामाजिक आणि सांस्कृतिक दर्जाचा कवितेवरती झालेला परिणाम हा आहे जागतिकीकरणाच्या प्रभावाने उद्ध्वस्त होणारा गाव प्रामुख्याने एकनाथ पाटील, सदानंद देशमुख, श्रीकांत देशमुख, यांच्या कवितेतून प्रकटतो. साहित्याच्या या वेगवेगळ्या प्रकारांमध्ये इतर साहित्य प्रकाराच्या तुलनेने मराठी कवितेवर जागतिकीकरणाचा परिणाम जास्त झालेला आढळतो. तो आपण इतर काही कवींच्या आणि कविताद्वारे अभ्यासांती आपल्याला समजते समाज स्थित्यंतराचे वर्णन मराठी कवितेने अधिक उत्तमरित्या केल्याचे आपल्या निदर्शनास येते. संपूर्ण जगाच्या चित्रणाबरोबर आपल्या भावभावनांशी निगडित असलेल्या विषयाचेही चित्रण अत्यंत सखोल करते. पारंपरिक शब्द, विचार, आशय, अभिव्यक्ती यांच्या पलीकडे जाऊन ही कविता आपल्याला विचार करायला लावते एवढे मात्र निश्चितपणे आपल्याला सांगता येते.

संदर्भसूची:

1. करंदीकर गो. वि. परंपरा आणि नवता, पॉप्युलर प्रकाशन मुंबई.
2. जाधव रा. ग. मराठी वा•डमय स्वातंत्र्योत्तर संदर्भ, प्रतिमा प्रकाशन पुणे.
3. संपादकीय प्रतिष्ठान मराठी कविता आणि आजचे कवी, परिसंवाद विशेषांक
4. रवींद्र ठाकूर, प्रवाह आणि प्रतिक्रिया १९७५ नंतरची मराठी कविता, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद.
5. डॉ.कोत्तापल्ले नागनाथ, मराठी कविता आकलन आणि आस्वाद, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद.
6. संपा बी रंगराव, मराठी दलित कविता, साहित्य अकादमी प्रकाशन

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

निवडक ग्रामपंचायतीमधील महिला प्रतिनिधीत्व व त्यांच्यासमोरील आव्हानांचे समाजशास्त्रीय विश्लेषण: विशेष संदर्भ गडहिंग्लज तालुका

प्राचार्य डॉ. दामावले डी. एन.[1], श्री. ससाणे जे. के.[2]
[1]सहयोगी प्राध्यापक समाजशास्त्र विभाग, पं. दीनदयाळ उपाध्याय कॉलेज, देवणी.
[2]सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, तू. कृ. कोलेकर महाविद्यालय, नेसरी
Corresponding Author- प्राचार्य डॉ. दामावले डी. एन.
DOI- 10.5281/zenodo.11178162

प्रस्तावना:

स्त्रियांना समान अधिकार या नात्याने महाराष्ट्रात प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांना समान अधिकार देण्यात येत आहेत. सनदशीर मार्गाने त्यांना अधिकाधिक अधिकार प्रदान करण्यात महाराष्ट्र कायमच अग्रेसर राहिला आहे. महाराष्ट्राला स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व अधिकार दिले आहेत. राजकीय क्षेत्रही त्याला अपवाद नाही. महिला आरक्षणाचा मुद्दा संविधान सभेच्या चर्चेतही आला होता, पण तो अनावश्यक असल्याने फेटाळला गेला. असे गृहीत धरले गेले की लोकशाही सर्व गटांना प्रतिनिधित्व देईल. संविधानातील ७३ व्या आणि ७४ व्या दुरूस्तीचा ऐतिहासिक कायदा करण्याचा मार्ग मोकळा झाला. ज्यामध्ये सर्व राज्य सरकारांना पंचायती राज संस्थांमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश जागा आणि सर्व स्तरावरील अध्यक्षांच्या कार्यालयांमध्ये एक तृतीयांश जागा राखीव ठेवण्याचा आदेश देण्यात आला आहे. पंचायती राज संस्था आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक तृतीयांश जागा अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी राखीव आहेत. २०१४ मध्ये, भाजपने आपल्या जाहीरनाम्यात महिलांसाठी 33% आरक्षणाचे वचन दिले होते आणि २०१९ च्या अजेंड्यात या वचनाची पुनरावृत्ती केली. मात्र याबाबत शासनाकडून कोणतीही हालचाल झालेली नाही. ग्रामपंचायती या गाव पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. ते पंचायतीराजचे कोनशिला आहेत. पाचशेहून अधिक लोकसंख्या असलेल्या गावात ग्रामपंचायत स्थापन करता येते. या गावांची लोकसंख्या पाचशेपेक्षा कमी असल्यास दोन किंवा अधिक गावांसाठी एक सामाईक ग्रामपंचायत असते, तेव्हा तिला गट-ग्रामपंचायत म्हणतात. पंचायत सदस्य गावातील मतदारांद्वारे निवडले जातात परंतु जागा वेगवेगळ्या प्रवर्गासाठी राखीव असतात. ३३% जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), आणि इतर मागासवर्गीय (OBC) यांना गावात त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा वाटप केल्या जातात. पदाधिकारी पदे (सरपंच आणि उपसरपंच पदे) महिला, SC, ST अशा विविध लोकसंख्येमध्ये फिरवली जातात.

कोल्हापूर जिल्ह्यात एकूण १२ तालुके आहेत. तर कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यात एकूण ९२ खेडी असून लोकसंखेच्या प्रमाणात ग्रामपंचायती आहेत. यातील काही ग्रामपंचायती ग्रुप ग्रामपंचायती आहेत. गडहिंग्लज तालुक्यातील एकूण गावामधून निवडक ग्रामपंचायती व त्यात महिलांचे संख्याबळ, तसेच बिनविरोध ग्रामपंचायती, महिला सरपंच तसेच त्यांच्या पुढील आव्हाने यांचे अध्ययन करण्यात आहे. संशोधनासाठी गडहिंग्लज तालुक्यातील १८ ग्रामपंचायती निवडल्या आहेत. प्रस्तुत शोधनिबंध २०२२-२३ या वर्षातील माहिती संकलनावर आधारित आहे. तसेच हि माहिती संकलित करण्यामध्ये आमचे स्नेही श्री. दिनकर पाटील (सकाळ बातमीदार, तारेवाडी) व आमचे सहकारी मित्र प्रा. अनिल गुरव (बिद्रेवाडी) यांचेही मोलाचे सहकार्य तसेच इतर घटकांचेही सहकार्य लाभले आहे.

उद्देश-

प्रस्तुत शोधनिबंधात पुढील उद्देशांचा समावेश करण्यात आला आहे.

१. गडहिंग्लज तालुक्यातील निवडक ग्रामपंचायतीचे अध्ययन करणे.

२. ग्रामपंचायतीतील महिला सरपंचासमोरील अडचणी व आव्हाने अभ्यासणे.

३. ग्रामपंचायत महिला सदस्यासमोरील अडचणी व समस्या अभ्यासणे.

गृहीतकृत्ये-

प्रस्तुत शोधनिबंधात पुढील गृहीतकृत्यांचा समावेश करण्यात आला आहे.

१. निवडलेल्या ग्रामपंचायतीत महिलांचे संख्याबळ योग्य आहे.

२. लिंगभेदाला ग्रामपंचायतीत महिलांना सामोरे जावे लागते.

३. अपुऱ्या निधीमुळे ग्रामपंचायत महिला प्रतिनिधीना विकास कामे करताना अनेक अडचणींना येतात.

संशोधनपद्धती-

शोधनिबंधात तथ्यसंकलानातील पुढील प्राथमिक स्त्रोत व द्वितीयक स्त्रोतांचा समावेश करण्यात आला आहे.

प्राथमिक स्त्रोत- प्राथमिक संकलनात प्रामुख्याने गडहिंग्लज तालुक्यातील निवडलेल्या दहा ग्रामपंचायतीला, महिला सरपंचाला, ग्रामपंचायत महिला सदस्यांना तसेच निवडलेल्या गावातील काही लोकांशी प्रत्यक्ष भेट देऊन, ओपचारिक व अनौपचारिक चर्चा करून तसेच प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली आहे. संकलित केलेली माहिती कुठे प्रसारित न करता, तसेच त्याचा गैरवापर केला गेला नाही, तसेच गोळा केलेली माहिती अत्यंत गुप्त ठेवण्यात आली आहे.

द्वितीय स्त्रोत- द्वितीयक स्त्रोतात न्यूजपेपर, मासिके, साप्ताहिके, सोसीअल मिडिया, संदर्भग्रंथ ई. चा उपयोग संशोधन अधिकाधिक शास्त्रीय व दर्जेदार होण्याच्या अनुषंगाने उपयोग करण्यात आला आहे.

व्याप्ती-

प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्ती हि कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यातील निवडक १८ ग्रामपंचायतीपुरती मर्यादित आहे. तसेच गडहिंग्लज तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीचा अभ्यास करणे खूप वेळ खाणारे आणि खर्चिक असल्याने तसेच अध्यानाचे क्षेत्र खूप व्यापक झाले असते म्हणून तालुक्यातील फक्त १८ ग्रामपंचायती निवडल्या आहेत, जेणे करून संशोधन, व अध्ययन करणे अधिक सोपे होईल. तसेच शोधनिबंधातील निष्कर्ष इतर ग्रामपंचायतीस कमी अधिक प्रमाणात लागू पडतील.

विश्लेषण-

राज्यघटनेतील ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्तीने महत्वपूर्ण बदल घडवून आणले आहेत जे समान प्रवेशास प्रोत्साहन देतात आणि राजकारणात महिलांचा सहभाग वाढवतात. एकूण मतदारसंघांपैकी एक तृतीयांश मतदारसंघ महिलांसाठी राखीव आहेत. हे सार्वजनिक जीवनात महिलांचा सहभाग सुनिश्चित करते आणि वाढवते. पायाभूत स्तरावर महिलांसाठी राष्ट्रीय धोरण साध्य करण्यासाठी ते प्रयत्नशील आहे. पंचायती राज संस्थांमध्ये आरक्षण प्रणाली सुरू केल्याने महिलांचे सक्षमीकरण होते आणि समाजात महिलांची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्थिती उंचावते. हे पारंपारिकपणे पुरुषप्रधान समाजापासून उदारीकरण सक्षम करते आणि सुशासनात नवीन दृष्टीकोन आणते. आरक्षण प्रणाली राजकीय चौकटीत महिलांच्या सहभागास प्रोत्साहन देते. यामुळे शिक्षण, आरोग्य, कौटुंबिक उत्पन्न वाढीमध्ये काही सकारात्मक परिणाम आणि चांगले परिणाम दिसून आले आहेत. ग्रामपंचायत मग ती कोणतीही असो, आज त्यात महिला मोठ्या प्रमाणात संधी मिळत आहे. केवळ ग्रामपंचायत सदस्य म्हणून नाही तर सरपंचपदाचा मानही त्यांना मिळत असून त्या अत्यंत जबाबदारीने आणि पूर्ण कार्यक्षमतेने कार्य करत आहेत. शोधनिबंधासाठी निवडलेल्या १८ ग्रामपंचायतीचा अभ्यास करण्यापूर्वी प्रत्येक गावाची लोकसंख्या पाहणे गरजेचे आहे.

गडहिंग्लज तालुक्यातील निवडक ग्रामपंचायतीअंतर्गत लोकसंख्या

अनु.क्र.	ग्रामपंचायत	एकूण लोकसंख्या	पुरुष	स्त्री
१	नेसरी	६९९३	३४३५	३४५८
२	अर्जुनवाडी	१७१३	८२६	८८७
३	हेळेवाडी-शिप्पूर तर्फ नेसरी	३६३+९७३=१३३६	१८६+४४५=६३१	१७६+५२८=७०४
४	तारेवाडी	६८८	३०८	३८०

५	तळेवाडी	८३१	४०४	४२७
६	बिद्रेवादी	९२२	४२८	४९४
७	सरोळी	१४२७	६६६	७६१
८	कुमरी	१२७९	६१०	६६९
९	काळामवाडी	८००	३८७	४१३
१०	जांभूळवाडी	५४२	२३६	३०६
११	बटकणंगले	२,१२९	९७३	११५६
१२	वाघराळी	१४११	६३४	७७७
१३	यमेहट्टी	८४१	४२०	४२१
१४	हेब्बाळ-जलद्याळ	१६५३	७४७	९०६
१५	सांबरे	२०४७	१०२७	१०२०
१६	डोणेवाडी	६३२	३२१	३११
१७	हडलगे	२२९७	१०८८	१२०९
१८	तावरेवाडी	६०५	२९४	३११

टेबल क्र. १, स्त्रोत- २०११ ची जनगणना

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते कि, सर्वात जास्त लोकसंख्या नेसरी गावची असून सर्वात कमी लोकसंख्या जांभूळवाडी गावची आहे. निवडलेल्या गावांपैकी फक्त एके ठिकाणी हेळेवाडी –शिप्पूर तर्फ नेसरी ग्रुप ग्रामपंचायत आहे. १७ गावामध्ये पुरुषांपेक्षा महिलांची संख्या जास्त आहे, ही एक खूप समाधान देणारी बाब आहे. फक्त डोनेवाडी गावात पुरुषांची संख्या महिलापेक्षा जास्त आहे.

ग्रामपंचायतीतील महिला सरपंचाची संख्या

अनु.क्र.	ग्रामपंचायत	ग्रामपंचायत सदस्य संख्या	सरपंच	ग्रामपंचायत महिला सदस्य संख्या
१	नेसरी	१५	महिला	५
२	अर्जुनवाडी	९	पुरुष	४
३	हेळेवाडी-शिप्पूर तर्फ नेसरी	७	पुरुष	४
४	तारेवाडी	७	महिला	४
५	तळेवाडी	७	पुरुष	३
६	बिद्रेवादी	७	पुरुष	४
७	सरोळी	७	महिला	३
८	कुमरी	७	महिला	३
९	काळामवाडी	७	महिला	३
१०	जांभूळवाडी	७	महिला	४
११	बटकणंगले	९	पुरुष	५
१२	वाघराळी	७	महिला	३
१३	यमेहट्टी	७	महिला	४
१४	हेब्बाळ-जलद्याळ	८	महिला	५
१५	सांबरे	९	महिला	६
१६	डोणेवाडी	७	पुरुष	४
१७	हडलगे	७	महिला	४
१८	तावरेवाडी	७	महिला	४

टेबल क्र. २, स्त्रोत- प्राथमिक तथ्य संकलन

गडहिंग्लज तालुक्यातील निवडक १८ ग्रामपंचायतीचे अध्ययन केल्यास असे दिसेन येते कि निवडलेल्या ग्रामपंचायतीपैकी १२ ग्रामपंचायतीमध्ये महिला सरपंच पद भूषवत आहेत. तर उरलेल्या ६ ग्रामपंचायतीमध्ये पुरुष सरपंचपद भूषवत आहेत. म्हणजेच महिला सरपंचाची संख्या पुरुष सरपंचापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. यावरून असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो कि महिलांचा ग्रामपंचायतीतील सरपंच म्हणून सहभाग वाढला आहे.

त्याचबरोबर महिलांना आरक्षणाप्रमाणे सरपंचपद भूषवता येत आहे हे खालील तक्त्यावरून दिसून येईल.

आरक्षणाप्रमाणे प्राप्त महिला सरपंचपद

अनु.क्र.	ग्रामपंचायत	सरपंच	गट
१	नेसरी	महिला	सर्वसाधारण
२	अर्जुनवाडी	पुरुष	ओबीसी
३	हेळेवाडी-शिप्पूर तर्फ नेसरी (ग्रुप ग्रामपंचायत)	पुरुष	ओबीसी
४	तारेवाडी	महिला	सर्वसाधारण
५	तळेवाडी	पुरुष	सर्वसाधारण
६	बिद्रेवादी	पुरुष	ओबीसी
७	सरोळी	महिला	एस.सी.
८	कुमरी	महिला	सर्वसाधारण
९	काळामवाडी	महिला	सर्वसाधारण
१०	जांभूळवाडी	महिला	सर्वसाधारण
११	बटकणंगले	पुरुष	ओबीसी
१२	वाघराळी	महिला	सर्वसाधारण
१३	यमेहट्टी	महिला	सर्वसाधारण
१४	हेब्बाळ-जलद्याळ	महिला	सर्वसाधारण
१५	सांबरे	महिला	सर्वसाधारण
१६	डोणेवाडी	पुरुष	ओबीसी
१७	हडलगे	महिला	सर्वसाधारण
१८	तावरेवाडी	महिला	सर्वसाधारण

टेबल क्र. ३, स्त्रोत – प्राथमिक तथ्य संकलन

वरील तक्त्यावरून असे दिसून येते कि सरपंच पद भूषवताना आरक्षणाप्रमाणे महिलांना सरपंच पदाचा मान मिळाला आहे. एकूण १८ ग्रामपंचायती पैकी १० ग्रामपंचायतीमध्ये महिला सरपंच आहेत. त्यापैकी ८ गावात महिला सरपंचपद सर्वसाधारण गटातून जनतेद्वारे निवडले गेले आहे. तर केवळ १ महिला सरपंच अनुसूचित जातिमधून सरपंचपद भूषवित आहे. एवढेच नाही तर काही गावात गावकऱ्यांनी महिलांना ग्रामपंचायतीत जाणीवपूर्वक प्रतिनिधित्व दिले आहे.

महिलांचा अलीकडच्या काळात ग्रामपंचायतीमधील प्रवेश खुच्प्च समाधानकारक आहे. त्यातच आरक्षणामुळे त्यांना राजकारणाची दारे खुली झाली आहेत. घरदार सांभाळून त्या राजकारण करताना दिसत आहेत. भलेही त्या अजून फारश्या परिपक्व नसतील मात्र हि त्यांच्या स्वातंत्र्याची, राजकीय प्रवेशाची सोनेरी सकाळ ठरली आहे. ग्रामपंचायतीमधील महिलांचा वावर, त्यांची कार्यक्षमता निश्चितच दाखल घेण्याजोगी आहे. घरदार, शेती, आणि इतर सामाजिक जीवन सांभाळून त्या यशस्वीपणे राजकीय वर्तुळात आपला ठसा उमटवत आहेत. महिला सरपंचाबरोबरच ग्रामपंचायतीमधील महिला सदस्यांचे संख्याबळ पाहणे क्रमप्राप्त ठरते.

निवडक ग्रामपंचायतीमधील महिला सदस्यांचे संख्याबळ

अनु.क्र.	ग्रामपंचायत	ग्रामपंचायत महिला सदस्य संख्या	गट
१	नेसरी	५	सर्वसाधारण-४, ओबीसी-१
२	अर्जुनवाडी	४	सर्वसाधारण-३, ओबीसी-१
३	हेळेवाडी-शिप्पूर तर्फ नेसरी (ग्रुप ग्रामपंचायत)	४	सर्वसाधारण-३, ओबीसी-१

४	तारेवाडी	४	सर्वसाधारण-३, ओबीसी-१
५	तळेवाडी	३	सर्वसाधारण-२, ओबीसी-१
६	बिद्रेवादी	४	सर्वसाधारण-२, ओबीसी-२
७	सरोळी	३	सर्वसाधारण-२, एस.सी.-१
८	कुमरी	३	सर्वसाधारण-३
९	काळामवाडी	३	सर्वसाधारण-१, एस.सी.-१, ओबीसी-१
१०	जांभूळवाडी	४	सर्वसाधारण-३, व्ही.जे.एन.टी-१
११	बटकणंगले	५	सर्वसाधारण-४, ओबीसी-१
१२	वाघराळी	३	सर्वसाधारण-३
१३	यमेहट्टी	४	सर्वसाधारण-३, ओबीसी-१
१४	हेब्बाळ-जलद्याळ	५	सर्वसाधारण-३, ओबीसी-२
१५	सांबरे	६	सर्वसाधारण-४, अ.जा.-१, ओबीसी-१
१६	डोणेवाडी	४	सर्वसाधारण-३, ओबीसी-१(रिक्त)*
१७	हडलगे	५	सर्वसाधारण-४, अ.जा-१
१८	तावरेवाडी	४	सर्वसाधारण-४

टेबल क. ४, स्त्रोत- प्राथमिक तथ्य संकलन

वरील टेबलवरून लक्षात येते कि, निवडलेल्या १८ ग्रामपंचायतीमध्ये महिलांना योग्य ते आरक्षणानुसार प्रवेश मिळाला आहे. सर्वसाधारण, ओबीसी, अनुसूचित जाति, अनुसूचित जमाती अशा सर्व स्तरातील महिलांना राजकीय प्रवेश मिळाला आहे. प्राप्त परिस्थिती आणि प्राप्त आरक्षण यानुसार महिला राजकीय क्षेत्रात प्रवेश करत आहेत. तक्ता नं. २ व ३ चे काळजीपूर्वक निरीक्षण केले असता निवडलेल्या ग्रामपंचायतीत महिलांना योग्य ते संख्याबळ मिळाले आहे.

दृष्टीक्षेपात महिला सरपंच व महिला सदस्यांचे संख्याबळ

निवडलेली एकूण गावे	महिला सरपंचाची संख्या	एकूण महिला सदस्यांची संख्या
१८	१२	७३

ग्रामपंचायतीतील महिलांचे आरक्षण व संख्याबळ पाहण्याबरोबरच त्यांची शैक्षणिक गुणवत्ता पाहणे आवश्यक ठरते. एखाद्या महिला सरपंचाचे गावासाठीचे योगदान हे तिच्या शैक्षणिक गुणवत्तेवरून ठरत नाही. ती कितीही शिकलेली असुदेत, तिला व्यवस्थापन व्यवस्थित जमते. शैक्षिणिक गुणवत्तेमुळे त्यांना कमी लेखणे हे खूपच चुकीचे आहे.

महिला सरपंचाची शैक्षणिक गुणवत्ता

अ. क्र.	शैक्षणिक गुणवत्ता	एकूण संख्या
१	प्राथमिक शिक्षण	-----
२	माध्यमिक शिक्षण	८
३	उच्च माध्यमिक शिक्षण	३
४	उच्च महाविद्यालयीन शिक्षण	१

टेबल क्र. ५ , स्त्रोत- प्राथमिक तथ्य संकलन

वरील तक्त्यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि प्राथमिक शिक्षण घेतलेल्या महिलांचे प्रमाण शून्य आहे तर माध्यमिक शिक्षण घेतलेल्या महिलांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ८ इतके आहे. उच्च माध्यमिक शिक्षण शिक्षण

घेत्लेल्या महिला सरपंचाची संख्या ३ तर महाविद्यालयीन शिक्षण घेतलेली महिला सरपंच केवळ १ असल्याचे आढळून आले आहे. पण वर सांगितल्याप्रमाणे शैक्षणिक गुणवत्तेवरून महिलांची राजकीय कार्यशक्ती ठरवणे चुकीचे आहे. आपल्या कुटुंबात आपली आई फारशी शिकलेली नसली तरीही तिचे कौटुंबिक नियोजन शिकलेल्या व्यक्तीपेक्षाही सरस आणि अचूक असते. त्याचप्रमाणे एखादे गाव हि कुटुंबाप्रमाणेच असते.

ग्रामपंचायतीसमोरील सर्वसामान्य प्रश्न आणि आव्हाने –

प्रत्येक ग्रामपंचायतीसमोर काही न काही प्रश्न असतातच तसेच ते प्रश्न समान स्वरूपाचेही असू शकतात. मात्र त्याची तीव्रता व संख्या भिन्न भिन्न असू शकते. जसे प्रश्न तसे आव्हानेही ग्रामपंचायतीसमोर आहेत. असे प्रश्न सोडवताना पुरुष सरपंचाना फारश्या संकटाना सामोरे जावे लागत नाही, मात्र स्त्रियांना अनेक समस्या व संकटाना सामोरे जावे लागते. बऱ्याचदा ज्या ग्रामपंचायतीमध्ये महिला सरपंच आहेत, तिथला कारभार त्यांचे पती तरी पाहतात किंवा पुरुष उपसरपंच कारभार पाहताना दिसून येतात. याविषयी फारशी कोणी चर्चा केली नाही मात्र हे उघड गुपित असल्याचे सांगितले जाते. याठिकाणी महिला सरपंचपद भूषवत असलेल्या ग्रामपंचायतीसमोरील प्रश्न आणि आव्हाने पुढीलप्रमाणे पाहता येतील..

अंतर्गत व बहिर्गत रस्त्यांची समस्या –

बहुतेक सर्व गावे बहिर्गत रस्त्यांनी जोडले आहेत. हे रस्ते पक्या सडकानी बनले आहेत. रस्ते अरुंद असले तरीही वाहतुकीसाठी पुरेसे वाटतात. कारण अश्या गावांना जोडणारे रस्त्यावरून फारशी अवजड वाहतूक हो नाही तसेच गाड्यांची वर्दळी खूप कमी असते. एक मात्र खरे कि गावांना जोडणारे रस्ते अरुंद आहेतच तसेच रस्ता खराब झाला किंवा त्यावर खड्डे पडले कि त्यांची दुरुस्ती तत्काळ केली जात नाही. बऱ्याच काळाच्या प्रतीक्षेनंतर त्याकडे शासनाचे लक्ष जाते. ८०% गावांचे रस्ते 'प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेतून' निर्माण झाले आहेत. गडहिंग्लज ते चंदगड या तालुक्यांना जोडणारा राज्यमार्ग मार्ग मोठा असून या मार्गावर बटकणंगले, शिप्पूर, नेसरी, तळेवाडी अर्जुनवाडी तिट्टा येत असल्याने हे रस्ते मोठे आहेत. अशा रस्त्यावर वाहनांची वर्दळही मोठी असते.

अंतर्गत रस्ते म्हणजे गल्याना जोडणारे रस्ते शासनाच्या योजनेतून, निधीतून निर्माण झालेले असतात. हे रस्ते सिमेंटचे कॉन्क्रेटचे बनलेले असतात. हे रस्ते फारकाळ टिकत नाहीत. कारण एकतर हे रस्ते मजबूत बनवलेलेनसतात आणि दुसरे म्हणजे त्याची फारशी देखभाल करणे म्हत्वाचे मानले जात नाही. एकदा असे रस्ते बनवले कि ते पूर्ण उखडून जाईपर्यंत त्यकडे पहिले जात नाही. अशा रस्त्यांच्या देखभालीसाठी कसलाही निधी उपलब्ध नसतो. परिणामी ग्रामपंचायत निवडणूक लागल्यावर उमेदवाराकडून नवीन रस्ते बनवण्याचे आश्वासन दिले जाते, मात्र ते पूर्ण केले जातातच असे नाही. गावकर्यांनी मागणी केल्यास सरपंचासमोर त्यासाठी निधी उपलब्ध करण्याचे मोठे संकट असते. पंचायत समितीच्या व जिल्हा परिषदेच्या त्यांना अनेक चकरा माराव्या लागतात. गावकऱ्याकडून जेव्हा त्यबाबत विचारणा होते तेव्हा प्रत्यन सुरु आहेत, निधी उपलब्ध नाही, लवकरच होणार आहेत अशी उत्तरे द्यावी लागतात. गावच्या कामासाठी, विकासासाठी, तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी वारंवार चकरा माराव्या लागतात. महिला सदस्य किंवा महिला सरपंचाना घरातली कामे आवरून, बऱ्याचदा शेती सांभाळून तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी चकरा मारणे शक्य होत नाही. परिणामी जनतेचा त्यांच्यावरचा विश्वास ढळू लागतो. काम वेळेत होत नसेल तर पुढच्या वेळेस लोकांसमोर काय तोंड घेऊन जायचे हा प्रश्न त्यांना सतावतो.

गटारींची समस्या –

हि ग्रामीण भागातली सर्वत्र आढळणारी सर्वसाधारण समस्या आहे. बहुतेक ग्रामपंचायतीमध्ये सफाई कामगार नसल्याचे दिसून आले आहे. तर काही ठिकाणी पाणीपुरवठा करण्यासाठी तसेच ग्रामपंचायतीची स्वच्छता करण्यासाठी रोजंदारीवर कामगार ठेवलेले असतात. तसेच काही ठिकाणी ते कंत्राटी पद्धतीने कामावर असल्याचे दिसून आले आहे. त्यांचा पगार ग्रामपंचायतीना स्वखर्चाने द्यावा लागतो. त्यामुळे ग्रामीण भागात अस्वच्छतेचे वातावरण दिसून येते. रस्ते झडलेले नसतात. गावात गटारी असतात पण त्यातील कचरा व घन कधीच काढली जात नाही. पावसाळ्यात पाण्याबरोबर ते वाहून जातात. मात्र गटारी तुंबलेल्या असल्याने घाण पाणी साचणे, दुर्गंदी पसरणे, रोगराई पसरणे ई. समस्या दिसून येतात. काही काही गावात तर गटारी असूनही त्यांची अवस्था नसल्यासारखी आहे. केवळ दुरुस्ती व देखभाल नसल्याने तसेच त्यासाठी

विशेष निधी नसल्याने ग्रामपंचायती समोर मोठा प्रश्न निर्माण होतो. लोकही गटारी स्वच्छ ठेवण्याकडे फारसे लक्ष देत नाहीत. कचऱ्याची विल्हेवाट व्यवस्थित न लावता तो बऱ्याचदा गटारीत टाकला जातो. धुणे-भांडी, आंघोळीचे पाणी गटारीत सर्रास सोडले जाते. मात्र ते गटार स्वच्छ करण्याबाबत लोक कमालीचे उदासीन असल्याचे दिसून आले आहे. शोषखड्डे फारसे दिसून येत नाहीत. काही महिला सदस्यांच्या घरासमोरच गटार नसल्याचे पाहणीत दिसून आले आहे.

पिण्याच्या पाण्याची समस्या –

स्वच्छ पिण्याचे पाणी हा नागरिकांचा अधिकार आहे तसेच पाण्याची व्यवस्था करणे हे ग्रामपंचायतीचे कर्तव्य आहे. ग्रामीण भागात पाण्याचे मुख्य स्त्रोत म्हणजे विहीर, ओढा, तलाव, बोअरवेल, आणि नदी हे आहेत. निवडलेल्या गावांपैकी जांभूळ वाडी गावात विहिरीचे पाणी मोठ्या टाकीत आणि मग ते पाणी गावाला पुरवले जाते. तर बटकणंगले, शिप्पूर, वाघराळी, बिद्रेवादी या गावांना विहीर, तारओहोळ, बोअरवेल, यातून पाणी पुरवठा होतो. तर इतर गावांना नदी, बोअरवेल याद्वारे पाणी पुरवठा होतो. असे पाणी फिल्टर केलेले नसते तर त्यात TCL टाकून ते पाणी पुरवठा केला जातो.. क्वचित प्रसंगी, म्हणजे, मोटरबंद पडल्यास, दुरुस्तीला दिल्यास किंवा काही बिघाड झाल्यास पाण्याची तात्पुरती व्यवस्था केली जाते. आजहि काही गावातील महिला व पुरुष कपडे धुनेसाठी, गुरांना अंघोळीसाठी, पोहण्यासाठी तारओहोळ, नदी, ओढा यांचा आधार घेतात. बहुतेक सर्व गावांना पाण्याची उत्तम व्यवस्था असल्याचे दिसून आले आहे. पाणी उपलब्ध नसल्यास त्याची विचारणा सरपंच व सदस्यांना केली जाते. बऱ्याचदा सरपंच व सदस्य वेळ मारून नेण्यासाठी काहीतरी उत्तरे देत असल्याचे गावकरी सांगतात.

आरोग्यविषयक समस्या –

आरोग्यविषयक जनजागृती हा हि ग्रामीण भागातील महत्वाचा मुद्दा आहे. गटारीची व्यवस्था नसणे, असल्या तरी त्या स्वच्छ नसणे, कचऱ्याची विल्हेवाट व्यवस्थित न लावणे, पिण्याचे स्वच्छ पाणी नसणे, स्वच्छ रस्ते नसणे, शौचालयाचा वापर न करणे, वैयक्तिक स्वच्छता नसणे, त्यातून आजार जडणे अशा आरोग्यविषयक समस्या गावात पाहायला मिळतात. ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने स्वच्छतेविषयी अनेक मोहिमा राबवल्या जातात. त्यात सरपंच व ग्रामपंचायत सदस्य हिरीरीने भाग घेतात. आपले गाव सुंदर व स्वच्छ ठेवण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करतात. त्यासाठी गावसभेत तसेच मोक्याच्या प्रसंगी आणि शासनाचा आदेश आल्यावर तसे निर्णय घेतले जातात. काही काळाकरिता रस्ते, गटारी, वैयक्तिक स्वच्छता याकडे लक्षही दिले जाते मात्र त्यानंतर ये रे माझ्या मागल्या अशीच गावाची अवस्था होते. महिला सरपंच व महिला सदस्य यांच्या सांगण्याकडे फारसे गांभीर्याने लक्ष देले जात नाही. आजारी पडल्यास दवाखान्यात जाण्यापेक्षा आजार अंगावर काढणे, मनाने औषधं घेणे, देव-देव करणे, घरगुती इलाज करणे ई. गोष्टी आजही लोक करत असल्याचे पाहणीत निदर्शनास आले आहे. आजार फारच जास्त झाल्यास दवाखाना गाठला जातो. नेसरीसारखे एखादे गाव सोडल्यास इतरत्र कोठेही घंटागाडी दिसून आली नाही. त्यामुळे कचऱ्याची विल्हेवाट व्यवस्थित लावली जात नाही.

डिजिटल बोर्ड/फ्लेक्सची समस्या –

गावात कोणत्याही प्रकारचा कार्यक्रम असो, तिथे आता शहराप्रमाणेच डिजिटल बोर्डाने प्रवेश केला आहे. ग्रामपंचायत निवडणूक असो, संघाची निवडणूक असो, एखाद्या मंडळाची निवडणूक असो, नेत्यांच्या जयंत्या-मयंत्या असो, भजन कार्यक्रम असो, वाढदिवस असो, कोणताही धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम असो, महत्वाच्या जागी आता असे बोर्ड लावले जात आहेत. शहराच्या सौंदर्यास ज्याप्रमाणे अशा बोर्डाने विद्रूप केले आहे, त्याचप्रमाणे गावाचेही सौंदर्य विद्रूप होत आहे कि काय असा प्रश्न होतो आहे. गावास एखादा निधी मंजू झाला किंवा एखाद्या योजनेचे उद्घाटन करायचे असल्यास मोठे मोठे फ्लेक्स लावले जातात. असे बोर्ड किती दिवस ठेवायचे याचा अवधी ठरलेला असला तरी अनेक दिवस ते बोर्ड तसेच लटकलेल्या स्वरुपात दिसतात. असे बोर्ड लावण्यापासून ग्रामपंचायतीला उत्पन्न मिळत असले तरी ते अतिशय तुटपुंजे असते असे सर्वच महिला सरपंच सांगतात. काही काही गावात तर त्यासाठी ग्रामपंचायत पैसेही आकारत नाही. नेसरी गावात मोठ्या प्रमाणात बसथांब्याच्या परिसरात असे फ्लेक्स कायम स्वरूपी पाहायला मिळतात. फ्लेक्स लावण्यावरूनही गावात भांडणे होत असल्याचे ऐकायला मिळते.

लिंगभेद व जातीभेदाची समस्या –

घटनेने लिंगभेद व जातीभेद केव्हाच हद्दपार केले आहे. पण ग्रामीण भागात अजूनही लिंगभेद व काही प्रमाणात जातीभेद पाहायला मिळतो. मुलींना ग्रामीण भागात लिंगभेदाचा सामना करावाच लागतो आहे. आजही तिची आवड-निवड लक्षात घेतली जात नाही. तीच स्थिती ग्रामपंचायत निवडणूक व निवडून आल्यावर महिला सरपंच व महिला सदस्यांच्या बाबतीत पाहायला मिळते. निवडून आलेल्या महिला सरपंचापैकी फक्त १% महिला या उच्च शिक्षित आहेत. तर महिला सदस्यापैकी फक्त ५% महिला या उच्च माध्यमिक शिक्षित आहेत. उरलेल्या महिलांनी फक्त माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आहे. ज्याठिकाणी महिला सरपंच आहेत त्याठिकाणी त्यांचे पती गावचा कारभार चालवताना दिसून येतात. तीच अवस्था महिला ग्रामपंचायत सदस्यांची आहे. काही ठिकाणी तर पुरुष उपसरपंच आहेत त्या ठिकाणी ग्रामपंचायतीचा कारभार तेच पाहतात. महिला सरपंच व सदस्यांकडून त्याबद्दल माहिती घेतली असता त्यांनी या गोष्टीचे खंडन केले. याबाबत उघड कोणी सांगत नाहीत पण गावकऱ्यांशी केलेल्या चर्चातून या गोष्टीची माहिती मिळते. ज्या ठिकाणी आरक्षणातून महिला सदस्य निवडून आल्या आहेत त्यांना जातीभेदास सामोरे जावे लागत असल्याचे तसेच लिंगभेदाला सामोरे जावे लागते. काही महिला सदस्यांनी हि गोष्ट केवळ मानेने होकार देत मान्य केली आहे. यात प्रामुख्याने त्यांचे म्हणणे न ऐकणे, पुरेसा निधी त्यांच्या प्रभागास उपलब्ध करून न देणे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे अशा समस्यांना त्यांना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

वृक्ष लागवड व संवर्धन –

शासनाची वृक्ष लागवड किंवा वृक्ष संवर्धनासंदर्भात कोणतीही योजना असो, सुरवातीला त्यची जोरदार तयारी करून वृक्षावरोपण केले जाते, त्याचे फ्लेक्स झळकतात, फोटो सेशन होतात, पेपरला बातमी दिली जाते. सुरवातीला रोपाभोवती कुंपण केले जाते. असे चित्र रस्त्याच्या दुतर्फा पाहायला मिळते. पण काही कालावधीनंतर मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जाते. केलेले कुंपण मोडून पडते. मग मोकाट जनावरे रोपे खून टाकतात. परत त्याचजागी दुसऱ्यावर्षी वृक्षावरोपण केले जाते. फक्त २०% ग्रामपंचायतीनी वृक्षावारोपानंतर त्याची जोपासना केली आहे. गावकरीही वृक्षांची जोपासना करणे आपली जबाबदारी नसून ग्रामपंचायतीची जबादारी आहे असे मानून त्याकडे दुर्लक्ष करतात. बऱ्याच ठिकाणी पाण्याच्या अपुरवठ्यामुळे झाडे जाळून गेली आहेत तर काही ठिकाणी अशी झाडे कोणीतरी उपसून नेल्याचे गावकरी सांगतात आणि प्रत्यक्षपणे पाहणीत आढळून आले आहे.

निधींची समस्या –

घरफाळा (घरपट्टी), पाणीपट्टी आणि इतर विविध मार्गांनी ग्रामपंचायतीस निधी मिळत असतो. शासनाच्या विविध योजना गावात राबवण्यासाठी त्यांना निधी प्राप्त होतो. गावास आलेला निधी हा गावाच्या विकासाठी खर्च होणे गरजेचे आहे. तसा खर्च होतोही. गावात डांबरीकरण, सिमेंटचे रस्ते, सार्वजनिक नळ, पाण्याची व्यवस्था, खांबावरील लाईट बसवणे व दुरुस्ती, दलित वस्ती सुधार, घरकुल, शौचालय बांधणी, आरोग्य ई. साठी राज्य व केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध होतो. बऱ्याचदा हा निधी वेळेत मिळत नाही, मिळाला तर अत्यल्प, कमी निधी मिळतो, किंवा मिळतच नाही. असा निधी मिळवण्यासाठी तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी चकरा माराव्या लागतात. बऱ्याचदा हे महिला सरपंचाना शक्य होत नाही तेव्हा पुरुष उपसरपंच किंवा पुरुष सदस्य हि कामे करताना दिसून आली आहेत. बऱ्याचदा इच्छा असूनही महिला सरपंचाना गावात काही विकासाच्या गोष्टी राबवता इतर नाहीत. तीच अवस्था महिला सदस्यांची असल्याचे त्या मान्य करतात. वरील विवेचनावरून असे दिसून येते कि अपुऱ्या निधीमुळे महिला सरपंच व महिला सदस्यांना विकास कामात अडचणी येतात. काही विकास कामासाठी गावातून निधी गोळा केला जातो.

गावसभा/ग्रामसभा –

ग्रामसभा हि ग्रामपंचायतीची परीक्षाच म्हणावी लागेल. कारण आपण केलेल्या कार्याचा लेखाजोखा जनतेसमोर मांडावा लागतो. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ७ व सभा नियम १९५९ प्रमाणे ग्रामपंचायतीला ग्रामसभा घ्याव्या लागतात. ग्रामसभांच्या संदर्भात बैठक नियम १९५९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे किमान चार ग्रामसभा घेणे आवश्यक आहे. मात्र कलम ७ (१) मधील तरतुदीनुसार दोन ग्रामसभांमधील अंतर ४ महिन्यांपेक्षा अधिक असता कामा नये. याशिवाय आवश्यकतेनुसार चारपेक्षा जादा ग्रामसभा आयोजित करण्याचा अधिकार सरपंच व ग्रामसेवकांना आहे.

विशेष ग्रामसभा:

ग्रामस्थांनी अथवा ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी अथवा जिल्हा परिषद व पंचायत समितीने लेखी मागणी केल्यास ग्रामपंचायतीच्या वतीने विशेष ग्रामसभेचे आयोजन केले जाते. या सभा कधी व केव्हा, किती घ्यावयाच्या यांचे बंधन ग्रामपंचायतीला नाही, मात्र महाराष्ट्र ग्रामपंचायत नियम १९५९ च्या पोटनियम ३ नुसार प्रत्येक वित्तीय वर्षातील ग्रामसभेची पहिली सभा त्या वर्षाच्या सुरवातीनंतर दोन महिन्यांच्या आत भरविणे गरजेचे आहे. १५ ऑगस्ट, २ ऑक्टोबर व २६ जानेवारीला ग्रामसभा घेणे ग्रामपंचायतीच्या सरपंच व ग्रामसेवकांकावर बंधनकारक आहे.

ग्रामसभेचा कोरम:

ग्रामपंचायतीने आयोजित केलेल्या ग्रामसभेसाठी ग्रामपंचायतीच्या कायद्यातील १९५९ च्या पोटनियम १० नुसार मतदार यादीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदार संख्येच्या १५ टक्के किंवा १०० मतदार यापैकी जी संख्या कमी असेल, तेवढ्या ग्रामस्थांची उपस्थिती आवश्यक असते. आवश्यक गणपूर्ती नसेल, तर ग्रामसभा तहकूब केली जाते. तहकूब ग्रामसभा पुन्हा आयोजित केल्यानंतर त्या ग्रामसभेस मात्र गणपूर्तीचे बंधन नसते; मात्र पूर्वीच्या सूचनापत्रावरील विषयांवरच या ग्रामसभेत चर्चा केली जाते. निवडलेल्या १८ गावात नियमितपणे ग्रामसभा घेतल्या जातात. महिला सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व गावकर्यानीही त्यास दुजोरा दिला आहे. मात्र बऱ्याचदा गावातील सर्वच ग्रामस्थ उपस्थित राहत नाहीत. महिलांची संख्या तर अतिशय तुटपुंजी असते. तसेच काही गावामध्ये महिला सरपंच व महिला सदस्या एवढ्याच महिला ग्रामसभेला पाहायला मिळतात. काही सरपंच व महिला सदस्यांनी गावकरी फक्त ग्रामसभेला चहापाणी पिण्यासच येतात असे भाष्य केले आहे. गावकऱ्यांनी प्रश्न विचारल्यास पन्ना टक्के महिला सरपंचाना उत्तरे देता येत नाहीत किंवा त्यांना त्यातले फारसे काही माहित नसते असे ग्रामस्थांशी चर्चा केल्यानंतर समजते. महिला सदस्यांची स्थिती यापेक्षा फारशी वेगळी नाही. गावसभा तहकूब करून परत गावसभा घेण्याची वेळ मात्र एकाही ग्रामपंचायतीवर आलेली नाही असे अभ्यासांती दिसून आले आहे.

निष्कर्ष –

वरील विश्लेषणावरून पुढील निष्कर्ष काढता येतात.

1. ग्रामपंचायतीवर महिला सरपंचाचे वर्चस्व दिसून येत आहे.
2. शासनाच्या आरक्षणानुसार ग्रामपंचायतीमध्ये महिलांना आरक्षण दिले जाते. लोकसंख्येच्या प्रमाणात महिलांना आणि मागास्वर्गीयाना आरक्षण दिले जाते.
3. अनेक प्रकारच्या समस्या ग्रामपंचायतीसमोर उभ्या टाकल्या आहेत.
4. शासनाकडून पुरेसा निधी मिळवण्यासाठी ग्रामपंचायती धडपडत असतात.
5. महिला सरपंच व महिला सदस्यांना पुरुष सरपंच व पुरुष सदस्यापेक्षा जास्त अडचणींना सामोरे जावे लागते.
6. अनेक गावाची कामे जसे, घरकुल, शौचालय, स्वच्छ पाणी, अंतर्गत रस्ते, आजही शासकीय निधीच्या प्रतीक्षेत आहेत.
7. महिला अतिशय जिद्दी व चिकाटीने ग्रामपंचायतीमध्ये आपली भूमिका व काम करताना दिसून येतात..
8. स्वच्छता व आरोग्य या बाबतीत गावात फारसी जनजागृती दिसून येत नाही.
9. गावसभा किंवा ग्रामसभा नियमितपणे गावात घेतल्या जातात. त्यातील निर्णय ग्रामस्थांना मान्य असतात.
10. सरपंचपद व सदस्यपद भूषविताना महिलांच्याप्रती एक वेगळाच अंड , उत्साह व विश्वास दिसून येतो.

समारोप –

ग्रामपंचायत हि महिला राजकारणाची पहिली पायरी मानली जाते. ग्रामीण भागातील महिला या ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आपली नवीन ओळख निर्माण करत आहेत. मात्र या नवीन ओळखीत त्यांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागते आहे. घरदार सांभाळून, लोकांच्या वाईट नजरापासून स्वतःचा बचाव करत, नवीन ओळखी आणि नाती सांभाळत ग्रामीण राजकारणात सक्रीय होत आहेत. ग्रामीण भागात हेवा, मत्सर, द्वेष निवडणुकीच्या वेळी मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो. यातूनच गावात असलेले सौहार्दपूर्ण वातावरण काहीकाळ काअसेना तणावग्रस्त बनते. महिलांना तर अशा गोष्टींची फारशी सवय नसते. त्यामुळे गावासाठी काम करताना त्यांची मानसिकता बऱ्याचदा चांगली राहत नाही. शिवाय जाति-पातीचा प्रश्न, ग्रामपंचायतीतील असलेले पुरुषी वर्चस्व, गावाच्या विकासात बाधा आणणारे घटक, आर्थिक निधींची चणचण, गावातील अनेक प्रश्न सोडवताना झालेली दमछाक, विकास कामे झाली नाहीत तर पुढील निवडणुकीचा निर्माण होणारा प्रश्न, कौटुंबिक जबाबदारी, सामाजिक भान व जबाबदारी, अशा कितीतरी समस्यांना महिलांना सामोरे जावे लागते. त्यातूनही त्या स्वतःला सावरत, मार्ग काढत, गावचे प्रश्न सोडवत मार्गक्रमण करत आहेत. पुढील निवडणुकीत आपण निवडून येऊ कि नाही हे माहित नाही परंतु ग्रामपंचायतीत काम करण्याची संधी व जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि ग्रामविकासासाठी केलीली धडपड याचे एक आत्मिक सुख मिळते अशी भावना महिला सरपंच व महिला सदस्य यांनी व्यक्त केली आहे. एकंदरीत महिला सरपंच व ग्रामपंचायत महिला सदस्य यांच्या पुढे अनेक प्रश्न, समस्या व आव्हाने असले तरी त्या त्यातून मार्ग काढत एक शक्तिशाली भारत निर्माण करण्यात त्यांचे मोलाचे योगदान असणार आहे हे मात्र निश्चित.

संदर्भग्रंथ:

1. महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिका, संकलन,राजेश चौधरी, चौधरी लॉ पब्लिशर्स पुणे.
2. ग्रामीण समाजशास्त्र- गुरुनाथ नाडगोंडे
3. भारतीय समाजशास्त्र – जैन लवानिया
4. भारतीय समाज- ए. वाय. कोंडेकर
5. ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास- प्रा. रा. ना. घाटोळे
6. सामाजिक संशोधन पद्धती- बोधनकर, अलोणी, कुलकर्णी
7. सामाजिक संशोधन पद्धती- डॉ. सुनील मायी
8. Rural sociology in India- Dr. A. R. Desai
9. women and society in India, Desai Meera & Maithreyi Krishnaraj

प्राचार्य डॉ. दामावले डी. एन., श्री. ससाणे जे. के.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

विकास कार्यो में नवीनकरणीय ऊर्जा की बढती भूमिका

डॉ. सुधीर कुमार
सहायक प्रोफेसर, अर्थशास्त्र, सेठ तारीफ सिंह जैन डिग्री कॉलिज खट्टा
प्रहलादपुर, बागपत, उ. प्र.
Corresponding Author- डॉ. सुधीर कुमार
DOI- 10.5281/zenodo.11178177

विकास कार्यो में ऊर्जा की बढती भूमिका तथा जलवायु परिवर्तन के प्रभाव ने ऊर्जा उत्पन्न करने के लिए नवीनकरणीय संसाधनों के उपयोग को बढावा दिया है। भारत इसमें सफल रहा हैं तथा एक मिशाल कायम कर रहा हैं। गो हलैम ब्रण्टलैड की अध्यक्षता में संयुक्त राष्ट्र के पर्यावरण एवं विकास पर गठित विश्व आयोग (1987) की रिपोर्ट के अनुसार, सतत विकास वह विकास है, जो भावी पीढियों की जरुरतों को पूरा करने की क्षमता से समझौता किए बिना वर्तमान की जरुरतों को पूरा करता है। विश्व में लगातार बढती विकास की गतिविधियाँ तथा जीवाश्म ईंधन के दोहन ने स्वास्थ्य सम्बन्धी समस्याएँ तथा जलवायु परिवर्तन को बढावा दिया हैं। ''लैसेण्ट काउण्टडाउन ऑन हेल्थ एण्ड क्लाइमेट चेन्ज : हेल्थ एट द मर्सी ऑफ फॉसिल फ्यूल'' की वर्ष 2022 की रिपोर्ट के अनुसार, जलवायु परिवर्तन संक्रामक रोगों के प्रसार को प्रभावित करता है।

नवीनकरणीय ऊर्जा:

'सतत विकास लक्ष्यों'' को ध्यान में रखते हुए भारत बिजली उत्पादन संसाधनों में नवीनकरणीय ऊर्जा को बढावा दे रहा है। आज भारत विभिन्न प्रयोजनों के लिए लगभग 9000 बिलियन यूनिट ऊर्जा खपत कर रहा है, जिसमें कुल ऊर्जा का लगभग 47% कोयला और लिग्नाइट से, 31% कच्चे तेल से, 15% बिजली (हाइड्रो परमाणु तथा अन्य नवीनकरणीय स्रोतों) से तथा 8% प्राकृतिक गैस से प्राप्त करता है। वर्तमान में भारत वर्ष 2005 के स्तर से अपने परम्परागत ऊर्जा को सकल घरेलू उत्पाद की उत्सर्जन तीव्रता को वर्ष 2030 तक 45% तक कम करने तथा 2030 तक ही गैर – जीवाश्म आधारित ऊर्जा संसाधनों से लगभग 50% संचयी विद्युत शक्ति की संस्थापित क्षमता प्राप्त करने के लिए प्रतिबद्ध है। भारत की अनुमति नवीनकरणीय ऊर्जा क्षमता (बडे हाइड्रो के अलावा) लगभग 15% मिलियन मेगावाट है, जिसमें 50% सौर से, 46.7% पवन से तथा शेष छोटे–हाइड्रो, बायोमॉस एवं कचरे से आता है।

नवीकरणीय ऊर्जा की आवश्यकता

वर्तमान में विश्व की लगभग 80% ऊर्जा जीवाश्म ईंधन से प्राप्त की जाती है। जो जलवायु परिवर्तन के प्रमुख कारण हैं। वैश्विक जनसंख्या की 80% आबादी उन देशों में है, जो जीवाश्म ईंधन के शुद्ध आयातक हैं। विश्व स्वास्थ्य संगठन (WHO) के अनुसार, विश्व की लगभग 99% आबादी जिस हवा में सांस लेती है, उस वायु की गुणवत्ता निम्नस्तरीय है। जिसका स्वास्थ्य पर प्रतिकूल प्रभाव पडता है। विश्व की 13 मिलियन से अधिक मौतें प्रतिवर्ष वायु प्रदूषण से होती हैं। जीवाश्म ईंधन के अत्यधिक प्रयोग ने देशों को जीवाश्म ईंधन उत्पादित करने वाले देशों पर निर्भर बनाया है।

नवीकरणीय ऊर्जा के प्रमुख स्रोत

सौर ऊर्जा केन्द्रीय नवीन और नवीकरणीय ऊर्जा मन्त्रालय के अनुमान के अनुसार, भारत की भूमि को प्रति वर्ष 5000 ट्रिलियन किलोवाट ऊर्जा प्राप्त होती है, इसे फोटोवोल्टिक सेल से विद्युत ऊर्जा में परिवर्तित किया जाता है।

पवन ऊर्जा भारत के सात राज्यों गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, तमिलनाडु, मध्य प्रदेश, कर्नाटक तथा आन्ध्र प्रदेश में पवन से बिजली उत्पादन की महत्वपूर्ण क्षमता है। भूमि सतह से 100 मी ऊपर इन राज्यों की पवन ऊर्जा क्षमता 293 गीगावाट है तथा 120 मी (AGL) पर क्षमता 652 गीगावाट है।

पवन बिजली केन्द्रीय विद्युत प्राधिकरण के अनुसार, भारत में 148700 मेगावाट की जल विद्युत क्षमता है। यदि इसमें छोटे, लघु तथा सूक्ष्म जल विद्युत को मिला दिया जाए, तो यह 250000 मेगावाट हो जाएगी।

जैव ईंधन इथेनॉल और बायोडीजल दो महत्वपूर्ण जैव ईंधन हैं। वर्ष 2018 में घोषित जैव ईंधन नीति के अन्तर्गत सरकार का वर्ष 2030 तक पेट्रोल में 20 इथेनाल मिश्रण तथा डीजल में 5 इथेनाल मिश्रण करने का लक्ष्य रखा है।

हरित हाइड्रोजन राष्ट्रीय हरित हाइड्रोजन मिशन के अनुसार, वर्ष 2030 तक 5 मिलियन टन हरित हाइड्रोजन ईंधन उत्पादन की क्षमता का लक्ष्य हैं।

महासागर और भू– तापीय ऊर्जा ज्वारीय तथा तरंग ऊर्जा के लिए अनुमानित ऊर्जा क्षमता क्रमश 12455 मेगावाट और 41300 मेगावाट है। भू–वैज्ञानिक सर्वेक्षण के अनुसार भू–तापीय ऊर्जा से 10 गीगावाट विद्युत उत्पादन सम्भव हैं।

भारत ने जलवायु प्रतिबद्धताओं के साथ कार्बन उत्सर्जन के दृढ संकल्प का संकेत दिया है। विश्व की अनिश्चित आपूर्ति श्रंखला, बिजली की बढती माँग और ऊर्जा आपूर्ति में भू–राजनीतिक जोखिमों ने लक्ष्यों की प्राप्ति पर प्रकाश डाला है। ऐसे में भारत के पास अवसर भी विद्यमान हैं। भारत स्वच्छ ऊर्जा के क्षेत्र में रणनीतिक रूप से काम कर रहा है। पिछले दशक में भारत में ऊर्जा की खपत 6% बढी है। वर्ष 2035 तक इसमें तीव्र वृद्धि की सम्भावना है।

भारत ने सौर ऊर्जा के उपयोग को प्रभावशाली ढंग से बढाया है। भारत वर्ष 2030 तक अपनी अर्थव्यवस्था से 40% कार्बन उत्सर्जन कम करेगा। हालाँकि स्वच्छ प्रौद्योगिक के लिए भारत को अगले 20 वर्षों में $ 1.4 ट्रिलियन की जरूरत होगी। भारत में वर्ष 2032 तक आवासीय और वाणिज्यिक क्षेत्रों में बिजली की माँग क्रमश

5 गुना तथा 3 गुना बढने का अनुमान है, हालाँकि इलेक्ट्रॉनिक वाहनों में भारत के लिए विकास के व्यापक अवसर हैं। बिजली मन्त्रालय के अनुसार, भारत की योजना वर्श 2030 तक प्रति वर्ष 50 लाख टन हरित हाइड्रोजन का विनिर्माण करने की है। भारत को ऊर्जा के क्षेत्र में आत्मनिर्भर बनने के लिए अनुसंधान एवं प्रौद्योगिकी की आवश्यकता है। भारत ने ऊर्जा से सम्बन्धित निर्माण में कई कदम उठाए हैं। इसमें भी वर्ष 2030 तक लगभग 80 बिलियन निवेश की आवश्यकता होगी।

भारत में स्वच्छ ऊर्जा की स्थिति

30 जून, 2022 तक भारत की स्थापित नवीकरणीय क्षमता 159 गीगावाट थी, जो कुल संस्थापित क्षमता की 39.70% है। इसमें पवन ऊर्जा (40.1 GW), सौर ऊर्जा (57.9 GW), जैव ऊर्जा (10.61GW), लघु पन बिजली (48.3 GW) तथा दीर्घ पनबिजली (46.51 GW) है। भारत अपने पेट्रोल में 10 इथेनॉल मिला रहा है। इसे वर्ष 2025 तक 20% तक करने का लक्ष्य है। भारत विश्व में नवीकरणीय ऊर्जा और पवन ऊर्जा में चौथे स्थान पर तथा सौर ऊर्जा में पाँचवें स्थान पर है

भारत में स्वच्छ ऊर्जा क्षेत्र के समकक्ष चुनौतियाँ

भारत को स्वच्छ ऊर्जा को बढावा देने में कुछ प्रमुख चुनौतियाँ का सामना करना पड़ रहा है; जैसे बिजली वितरण कम्पनियों की खराब वित्तीय स्थिति, ट्रांसमिशन ग्रिड की समस्या, प्राकतिक संसाधनों पर निर्भर बिजली उत्पादन, स्थापना की लागत तथा ऊर्जा उत्पादन में राज्यों में परिवर्तन शीलता आदि।

भारत सरकार की कुछ महत्वपूर्ण पहलें

पीएम कुसुम योजना का क्रियान्वयन, सोलर ट्रांसफिगरेशन ऑफ इण्डिया सृष्टि योजना के लिए सतत रूफटॉप कार्यान्वयन, राष्ट्रीय अपतटीय पवन ऊर्जा नीति 2015 बायोमास पावर और कोजेनरेशन प्रोग्राम आदि का क्रियान्वयन भारत सरकार कर रही है। ये सभी सतत विकास लक्ष्यों के अनुरूप हैं। इस प्रकार भारत नीतिगत व रणनीतिक उपायों के साथ कुशल प्रौद्योगिकीय क्षेत्र में बदलाव लाकर नवीकरणीय ऊर्जा में आत्मनिर्भर बन सकता हैं।

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय सौर मिशन

सौर ऊर्जा के विकास हेतु जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय सौर मिशन की शुरूआत 11 जनवरी, 2010 को की गई थी। इसके तहत ग्रिड से जुडी सौर ऊर्जा क्षमता को 100000 मेगावाट का लक्ष्य रखा गया हैं। सौर ऊर्जा क्षमता विकास हेतु सोलर रूफटॉफ कार्यक्रम, ऑफ ग्रिड और विकेन्द्रीकत सौर कार्यक्रम, प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एंव उत्थान महाभियान पीएम–कुसुम, सौर उत्पादकता से जुडी प्रोत्साहन योजना, सौर पार्क तथा अल्ट्रा मेगा सौर परियोजना आदि का विकास किया जा रहा है।

अन्तर्राष्ट्रीय सौर गठबन्धन

यह सौर ऊर्जा पर आधारित 123 देशों का एक सहयोग संगठन है। इसका मुख्यालय हरियाणा के गुरूग्राम है। यह विश्व भर में सौर ऊर्जा की पहुँच और सुरक्षा में सुधार के लिए सरकारों के साथ कार्य करता है और पर्यावरण अनुकूलता के लिए सौर ऊर्जा को बढावा देता है।

बायो ऊर्जा कार्यक्रम

देश में बायो ऊर्जा हेतु 10000 मेगावाट कुल क्षमता 42310 मेगावाट का लक्ष्य निर्धारित किया गया है। इसके तहत 30 नवम्बर, 2022 तक स्थापित क्षमता 10726 मेगावाट है। इसके विकास हेतु नया राष्ट्रीय बायोगैस तथा जैविक खाद्य कार्यक्रम चलाया जा रहा है।

पवन ऊर्जा कार्यक्रम

देश में अनुमानित कुल पवन ऊर्जा क्षमता 997000 मेगावाट है। 30 नवम्बर 2022 तक कुल पवन ऊर्जा की संचयी स्थापित क्षमता 41895 है। इस दिशा में उत्पादन आधारित प्रोत्साहन योजना का क्रियान्वयन किया जा रहा है।

लघु जलविघुत कार्यक्रम

देश में लघु जल विद्युत क्षमता 21130 मेगावाट है। 30 नवम्बर, 2020 तक कुल 4924 मेगावाट लघु जलविद्युत ऊर्जा की स्थापना हो गई है।

हरित ऊर्जा गलियारा

इस परियोजना का उददेश्य ग्रिड में पारम्परिक बिजली स्टेशनों के साथ सौर और पवन जैसे नवीकरणीय स्रोतों से उत्पादित बिजली को प्रसारित (सिंक्रोनाइज) करना है। इसे तमिलनाडु, राजस्थान, कर्नाटक, आन्ध्रप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, हिमाचल प्रदेश और मध्य प्रदेश के द्वारा क्रियान्वित किया जा रहा है।

राष्ट्रीय हरित हाइड्रोजन मिशन

इस मिशन को 4 जनवरी 2023 को कैबिनेट की मजदूरी दी गई। इसका लक्ष्य हरित हाइड्रोजन के व्यावसायिक उत्पादन को प्रोत्साहित करना और भारत को हाइड्रोजन ईंधन का शुद्ध निर्यातक बनाना है। इसके तहत वर्ष 2030 तक भारत में लगभग 125 गीगावाट की नवीकरणीय ऊर्जा क्षमता विकसित करने तथा प्रति वर्ष 5 मिलियन मीट्रिक टन की हरित हाइड्रोजन उत्पादन क्षमता का विकास करना है। इस मिशन के लिए **स्ट्रैटेजिक इण्टरवेंशन्स फॉर ग्रीन हाइड्रोजन ट्रांजिशन प्रोग्राम** तैयार किया जाना है। वर्ष 2050 तक ग्रीन हाइड्रोजन की माँग को बढाकर इसकी हिस्सेदारी कुल ऊर्जा में 12 करना है।

मिशन के लाभ

- ग्रीन हाइड्रोजन और इसके सहायक उत्पादों के लिए निर्यात के अवसरों का सृजन।
- औद्योगिक, आवागमन और ऊर्जा क्षेत्रों में कार्बन उत्सर्जन में कमी।
- आयातित जीवाश्म ईधन और फीडस्टॉक पर निर्भरता में कमी व स्वदेशी विनिर्माण क्षमताओं का विकास।
- रोजगार के अवसरों का सृजन करना।
- अत्याधुनिक तकनीकों का विकास आदि।

अक्षय ऊर्जा के बढते कदम

भारत अक्षय ऊर्जा की स्थापित क्षमता में विश्व स्तर पर चौथे स्थान पर है, तथा सौर ऊर्जा एवं पवन ऊर्जा क्षमता में भी भारत विश्व में चौथे स्थान पर है। देश में अक्टूबर, 2022 तक गैर जीवाश्म ईधन स्रोतों से कुल 172.72 गीगावाट बिजली की क्षमता प्राप्त की जा चुकी है। जनवरी से अक्टूबर, 2022 कुल 14.21 गीगावाट अक्षय ऊर्जा क्षमता में बढोत्तरी हुई, जबकि जनवरी से अक्टूबर, 2021 में 11.9 गीगावाट की वृद्धि हुई थी। देश में कार्यान्वयन प्रक्रिया को सरल बनाने के लिए एक राष्ट्रीय पोर्टल को विकसित किया गया है, जिसमें देश के किसी भी हिस्से में कोई भी आवासीय उपभोक्ता डिस्कॉम द्वारा निविदा को अन्तिम रूप दिए जाने की प्रतिक्षा किए बिना रूफटॉफ सोलर के आवेदन कर सकता है।

अक्षय ऊर्जा से बदलता ग्रामीण महिलाओं का जीवन

ग्रामीण भारत में अक्षय ऊर्जा महिलाओं के लिए वरदान साबित हो रही है। सोलर लाइट्स उन्हें सुरक्षा प्रदान करने में महत्वपूर्ण भूमिका निभा रही है। कपडा उद्योग में धागा बनाने (थाई रीलिंग) के कठिन परिश्रम से बचाने वाले उपकरण, स्वंय सहायता समूहों के माध्यम से बिजली उपभोक्ताओं को ग्रिड से जोडकर रोजगार प्रदान कर, आदि में अक्षय ऊर्जा महत्वपूर्ण भूमिका निभा रही है। रोजगार को बढावा देने के लिए राष्ट्रीय सौर ऊर्जा संस्थान ने राज्य की नोडल एजेन्सियों से मिलकर सूर्य मित्र कौशल विकास कार्यक्रम शूरू किया है। अक्षय ऊर्जा आधारित प्रणाली DRE ग्रामीण महिलाओं की लघु उद्यमिता को बढा रही है। डेयरी और कृषि उत्पादन कम्पनी महिला मैत्री ने महिलाओं को सशक्त किया है। सौर ऊर्जा संचालित कताई, रीलिंग तथा बुनाई मशीनों जैसे उपकरण लोगों के जीवन को सरल बना रहे है। सोलर पम्प से ग्रामीण महिला किसान सशक्त हुई है। अक्षय ऊर्जा महिलाओं के स्वास्थ्य के लिए महत्वपूर्ण है। एक रिपोर्ट के अनुसार भारत में खाना पकाने में अस्वच्छ ईधन के उपयोग से प्रति वर्ष 5 लाख मौतें होती है। इस प्रकार अक्षय ऊर्जा ग्रामीण महिलाओं का सहारा बना है। किन्तु इसमें सरकार, निजी उद्योग दानकर्ताओं सामुदायिक संगठनो तथा प्रौद्योगिकी उद्यमो को मिलकर कार्य करने की जरूरत है, तभी सतत विकास के लक्ष्यों को प्राप्त किया जा सकेगा।

अक्षय संसाधनों के बारे में जागरूकता

वर्तमान में विश्व जीवाश्म ईधन आधारित ऊर्जा के उपयोग से नवीकरणीय स्रोतों से उत्पन्न स्वच्छ ऊर्जा स्रोतों के उपयोग में परिवर्तन के दौर से गुजर रहा है, ऐसे में लोगों को जागरूक होना महत्वपूर्ण है। जीवाश्म ईधन के उपयोग से ग्रीनहाउस गैस उत्सर्जन में भारी वृद्धि हुई है तथा वर्तमान में रूस – यूक्रेन युद्ध से तेल की कीमतों में वृद्धि हुई है। इस प्रकार जलवायु परिवर्तन के दुष्परिणामों को कम करने तथा नवीकरणीय ऊर्जा स्रोतों को अपनाने के लिए लोगों, परिवारों, समुदायों, संगठनों, सरकार तथा अन्य हितधारकों को प्रासंगिक स्तरों पर शामिल किया जाना चाहिए। नवीकरणीय ऊर्जा जागरूकता नीतियों का उद्देश्य नवीकरणीय ऊर्जा स्रोतों के उपयोग को बढ़ावा देना तथा लाभों के बारे में सार्वजनिक समझ को बढाना है। इसे शिक्षा और आउटरीच अभियानों, वित्तीय प्रोत्साहनों आदि से बढाया जा सकता है। नवीकरणीय ऊर्जा के उपयोग को बढावा देने के दो भाग हैं, जिसमें एक लोगों को नवीकरणीय ऊर्जा स्रोतों के उपयोग के लाभों को बताना तथा दूसरा नीतियों एवं वित्तीय निवेश सहायता के माध्यम से ऊर्जा स्रोतों को कार्बन युक्त करने के प्रति सरकार तथा अन्य संस्थानों की प्रतिबद्धता से अवगत कराना। इसी का परिणाम है कि लोगों की नवीकरणीय ऊर्जा में रूचि बढी है।

द्विपक्षीय सम्बन्धः चुनौतियाँ

भारत–नेपाल सम्बन्धों में कुछ चुनौतियाँ प्रकट हुई हैं। इसमें नेपाल का चीन के करीब आना, चीन के बेल्ट रोड इनिशिएटिव में नेपाल की भागीदारी का होना, काला–पानी विवाद का उत्पन्न होना, नेपाली क्षेत्र का भारतीय अतिक्रमण में आना, खुली सीमा से आतंकवाद को बढाने की आशंका का होना, सुस्ता क्षेत्र में विवाद का होना, नेपाल में भारत विरोधी गतिविधियों का होना आदि प्रमुख हैं। इसके अतिरिक्त भारत की अग्निपथ योजना ने भी नेपाल की परेशानी को बढाया है। इसके बावजूद भारत–नेपाल का सम्बन्ध वर्तमान में भी मजबूती से बना हुआ है।

निष्कर्षः

ग्रीनहाउस गैसों का उत्सर्जन, धरती का बढाता तापक्रम, जलवायु परिवर्तन, बढती बीमारियाँ, घटते संसाधन, कम व पिघलते ग्लेशियर, बाढ व सूखा आदि वैश्विक समस्याओं के जीवाश्म ईंधनों का उपयोग विशेष रूप से जिम्मेदार है। एक रिपोर्ट के अनुसार, वर्ष 2040 तक भारत की 60 जनता 'लू' का शिकार हो सकती है। इन सबके लिए अक्षय ऊर्जा का उपयोग ही वरदान साबित हो सकता है, जिससे धरती की सुरक्षा के साथ मानव–जाति को बचाया जा सकेगा। भारत इस दिशा में लगातार तेजी से बढ रहा है। भारत सरकार ने सोलर स्ट्रीट लाइट्स, सोलर पैनल, प्रधानमन्त्री कुसुम योजना आदि के माध्यम से लोगों के जीवन को सरल व युगम बना दिया है तथा जीवन को भी सुरक्षा प्रदान की है। इस प्रकार सौर ऊर्जा मानव जाति का भविष्य है।

सन्दर्भ ग्रन्थ सूचीः

1. **कुमार, राहुल** (समसामियिकी महासागर, मई 2023) "भारत में अक्षय संसाधन", अरिहन्त प्रकाशन, मेरठ, पृ. स. 140–141.
2. **सागर, डॉ. रामकिशोर** (समकालीन भारतीय परिदृश्यः मुद्धदे एंव चुनौतियाँ 2021) "भारत में अक्षय ऊर्जा स्रोतों की विद्यमानता तथा उपयोगिता पर विश्लेषणात्मक अध्ययन", श्रियांशी प्रकाशन, आगरा, प्र.सं. 197–198.
3. **मीणा,माली राम** (समकालीन भारतीय परिदृश्य; मुद्धदे एवं चुनौतियाँ 2021) "भारत में सौर ऊर्जा की संभावनाएं", श्रियांशी प्रकाशन, आगरा, प्र.सं. 203–206.
4. **चौहान, अमित** (समसामियिकी महासागर, जनवरी 2023) "ऊर्जा और समुद्री संघर्ष एवं सुरक्षा", अरिहन्त प्रकाशन, मेरठ, प्र.सं. 142–143.
5. **गोयल, योगेश कुमार,** (सक्सेस मिरर, मार्च 2024) "दैनिक व्यवहार में शमिल हो ऊर्जा संरक्षण की आदतें", उपकार प्रकाशन, आगरा, प्र. सं. 43.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानवी हक्क

डॉ. कैलाश व्हि. बिसांद्रे
अनिकेत समाजकार्य महाविद्यालय, वर्धा
Corresponding Author- डॉ. कैलाश व्हि. बिसांद्रे
Email: kbisandre81@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.11178194

सारांशः

'मानवी हक्क' या संकल्पनेचा विचार विविध देशात प्राचीन काळापासून केलेला आढळतो. तसेच या देशांनी आपआपल्या नागरीकांना काही हक्क दिल्याचेही आढळते. पण यामध्ये सर्व देशात, राज्यात समानता नव्हती. एखाद्या देशाने एखादा विशिष्ट हक्क 'मानवी हक्क' म्हणून दिला आहे व तोच हक्क दुसऱ्या एखाद्या देशाने नाकारलेला असेल असे चित्र होते. कारण जगातील या विविध देशांनी त्यांच्यावर ज्या परंपरांचा, विचारधारेचा प्रभाव आहे, त्यानुसार आपल्या देशासाठी, राज्यासाठी मानवी हक्कांची निश्चिती केली होती. साहजिकच त्यामुळे देशा-देशातील, राज्या-राज्यातील मानवी हक्कसंदर्भात एकवाक्यता नव्हती.

तथापि, संपूर्ण जगच दोन जागतिक महायुध्दांच्या भयावह व गंभीर परिणामांना सामोरे गेले. मानवी हक्कांच्या उल्लंघनाने परिसिमा गाठली होती. जागतिक शांतता व सुरक्षितता तसेच व्यक्तीस्वातंत्र्य व हक्कांची जागतिक स्तरावर पुर्नस्थापना करण्याची, यामध्ये एकवाक्यताआणण्याची गरज निर्माण झाली. याच उद्देशाने 1945 ला स्थापण झालेल्या संयुक्त राष्ट्रांनी मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेला सुरवात केली व तिचा विकास केला.त्याकरीता आयोग, विधेयके, विविध संस्था स्थापण केल्या. त्या माध्यमातून मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करणे, जाहिरनामा तयार करणे, आंतरराष्ट्रीय करारनामे तयार करणे व त्यांच्या अंमलबजावणीची यंत्रणा कार्यान्वित करणे हे कार्य मानवी हक्कांच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रांनी केले.

मानवी हक्क या संज्ञेतील अधिकार व हक्क या संज्ञेचा अर्थ समजून घेतला की, मानवाधिकार किंवा मानवी हक्क संज्ञेचा अर्थबोध होतो. 'ज्यांच्या शिवाय व्यक्तीचे परिपूर्ण अस्तित्व शक्य होणार नाही. अशा गोष्टी म्हणजे हक्क होय.' माणसाला अर्थपूर्ण जीवनजगण्यासाठी जी परिस्थिती हवी असते ती हक्कांमध्ये निर्माण होते. अमुक एक हक्क माणसाच्या परिपूर्ण जगण्यासाठी आवश्यक आहे. तो नसणे हे अन्यायकारक आहे. अशी भावना जेव्हा समाजात सर्वांगिक होतो तेव्हा त्या मागणीला व्यापक स्तरावर लोक समुदायाचा पाठींबा प्राप्त होतो. परिणामी ती मागणी मान्य करणे राजसत्तेला भाग पडते. मनुष्य हा बुध्दीमान व विचार प्रकट करणारा प्राणी आहे. तो आपल्या बुध्दीचा वापर करुन नवनविन शोध लावतो आणि जीवनमानात सतत बदल करुन ते अधिक समृध्द करण्यात गुंतलेला असतो. अशा या मानव प्राण्यांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे या दृष्टीने त्याला काही मूलभूत हक्क मिळणे आवश्यक आहे. त्यांनाच मानवी हक्क असे म्हणतात.

प्रास्ताविकः

प्राचीन काळापासुन 'मानवी हक्क' या संकल्पनेचा विचार झालेला आढळतो. भारतात ऋग्वेदातील काही ठिकाणी यासंदर्भाचे लिखाण दिसून येते. तसेच संत वाङ्मयातही विषमता संपवून समता प्रस्थापित करण्याचा विचारही दिसून येतो. परंतु **1878** मध्ये सापडलेली पर्शियन सम्राट सायरसच्या ख्रिस्तपूर्व ६ व्या शतकातील 'सायरस वृत्तचित्ती' त मानवी हक्कांबाबतची महत्वपुर्ण तत्वे अंतर्भूत केलेली आहेत. हिच 'सायरस वृत्तचित्ती' 'मानवी हक्काचा पहिला दस्तऐवज' म्हणून मानला जातो. भारतात ख्रिस्तपूर्व ३ ऱ्या शतकात सम्राट अशोक यांनी नागरी हक्काची तत्वे प्रस्थापित केली. तथापि मानवी हक्काच्या आधुनिक विचारसरणीची सुरवात स्टॉईस या ग्रीक तत्ववेत्याच्या 'नैसर्गिक कायद्याच्या सिध्दांता' पासून झाल्याचे मानले जाते. परंतु ग्रीक परंपरेचा हक्कांच्या संदर्भात विचार करता तेथे हक्कांची संकल्पना वर्गानुसार होती. कारण ग्रिकांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क व समतेचे हक्क यांना मान्यता दिली असली तरी स्त्रिया व गुलाम यांना मात्र ते हक्क नाकारण्यात आले होते. अशीच विसंगती जगातील अनेक परंपराच्यामध्ये 'हक्कांच्या' संदर्भात आढळते. त्यामुळे जगातील विविध देशांनी त्यांच्यावर प्रभाव असणाऱ्या परंपरा, विचारधारेनुसार आपल्या देशासाठी मानवी हक्कांची निश्चिती केली होती. त्यामुळे विविध देशातील मानवी हक्कां संदर्भात एकवाक्यता किवा समानता नव्हती. ही एकवाक्याता आणण्याची सुरवात संयुक्त राष्ट्रांकडून झाली. म्हणूनच मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणात व संयुक्त राष्ट्रांचे योगदान खूपच असाधारण आहे.

मानवी हक्काचे आंतरराष्ट्रीयीकरण व सयुक्त राष्ट्रे :

जागतिक शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी व त्याकरीता व्यक्तिस्वातंत्र्य व हक्काची पुर्नस्थापना करण्याच्या विचारातून २४ ऑक्टोबर 1945 ला 'संयुक्त राष्ट्रांची' स्थापणा झाली.

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत जे उद्देश अथवा भुमिका स्पष्ट केल्या गेल्या, त्यातील एक उद्देश म्हणजे, 'मुलभुत मानवी हक्क, प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा व महत्व यांच्या संरक्षण, संवधनासाठी आणि पुरूष व स्त्रिया तसेच लहान व मोठी राष्ट्रे यांच्या समान अधिकाराप्रती आस्था राखणे व ते बळकट करणे' हा होय. इथपासून आजपर्यंत मानवी हक्काच्या आंतरराष्ट्रीयीकरणाच्या प्रक्रियेत संयुक्त राष्ट्र सातत्याने महत्वाची भुमिका पार पाडत आहे. मानवी हक्काची यादी व नियमावलीबरोबर त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक यंत्रणाही निर्माण करण्यात आली.

मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय विधेयक :

मानवी हक्कांच्या प्रक्रियेचा भाग म्हणून मानवी हक्कांचा प्रसार व संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्रांकडून जे अनेक विध ठराव संमत करण्यात आले. त्यातील महत्वाच्या पाच ठरावांना एकत्रित करून, त्यांच्या संचास 'मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय विधेयक' असे म्हटले जाते.

संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोग : सन 1946 मध्ये संयुक्त राष्ट्रांनी स्थापण केलेला 'मानवी हक्क आयोग' हा मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयीकरणाच्या प्रक्रियेतील एक महत्वाचा टप्पा ठरला. या आयोगाने निश्चित केलेली उद्दिष्टे व कार्ये–

उद्दिष्टेः

१. संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रात मानवी हक्क संरक्षणाच्या स्थितीचा आढावा घेणे.
२. मानवी हक्क बाबत जाणिव जागृती व संरक्षण.
३. अल्पसंख्यांक, महिला, बालक व युध्दकैदी यांच्या हक्कासंदर्भात जाणीव – जागृती करणे.

कार्ये :

१. मानवी हक्काची यादी तयार करणे.
२. नागरी व राजकीय हक्क या करारनाम्याचा मसुदा तयार करणे.
३. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क या करारनाम्याचा मसुदा तयार करणे.
४. अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विशेष तरतुदी करणे.
५. वंश, धर्म, भाषा, लिंग इ. आधारावरील भेदभाव नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे.

मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा 1948 :

मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयीकरणाच्या प्रक्रियेतील पहिले महत्वाचे पाउल म्हणून 'संयुक्त राष्ट्राची सनद' म्हणून ओळखली जाते.कारण या सनदेत जो उद्देश किवा भुमिका निश्चित करण्यात आले. त्यापैकी एक उद्देश म्हणजे, 'मूलभूत मानवी हक्क, प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा व महत्व यांच्या संरक्षण, संवर्धनासाठी आणि पुरूष व स्त्रिया तसेच लहान व मोठी राष्ट्रे यांच्या समान अधिकाराप्रती आस्था राखणे व ते बळकट करणे' हा होता. तथापि या सनदेत मानवी हक्काबाबतच्या सुस्पष्टतेचा, नेमकेपणाचा अभाव होता.मानवी हक्काची सर्वसामावेशक यादी व त्यांच्या संरक्षणाकरिताच्या आवश्यक तरतूदी निश्चित व स्पष्ट होत नव्हत्या. म्हणूनच संयुक्त राष्ट्रांच्या अनेक सदस्य राष्ट्रांनी, मानवी हक्काची सर्वसमावेशक यादी तयार करावी व दुसरे म्हणजे या हक्कांच्या संरक्षणासाठीच्या तरतूदी निश्चित व स्पष्ट कराव्यात अशा दोन मागण्या संयुक्त राष्ट्रांकडे केल्या. या मागण्यांचा विचार करून संयुक्त राष्ट्रांने आपल्या 'मानवी हक्क आयोगा' कडे मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करण्याचे कार्य सोपविले. आयोगाने त्याकरीता, 'मानवी हक्काचा जाहिरनामा' तयार करून तो आमसभेपुढे ठेवला. १० डिसेंबर, 1948 ला आमसभेने हा जाहिरनामा स्विकारून, 'मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा 1948 म्हणून घोषित केला.

जाहिनाम्याचे उद्देश व भुमिकाः

१. मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करून त्यास आंतरराष्ट्रीय समुदायाची मान्यता प्राप्त करून घेणे.
२. जगातील प्रत्येक व्यक्तीला त्यांची जन्मजात प्रतिष्ठा व त्यांच्या समान, मूलभूत हक्कांना मान्यता देणे. या करिता जगात स्वातंत्र्य, न्याय व शांतता यांच्या प्रस्थापनेकरिता प्रयत्न करणे.
३. प्रत्येक व्यक्तीला भाषण, श्रध्दा इत्यादी स्वातंत्र्याची प्राप्ती झाली पाहिजे व भिती अभावग्रस्ततेपासून मुक्त असे जग साकार व्हावे ही लोकांची सर्वोच्च आकांशा पूर्ण करणे.
४. मानवी हक्कांना कायदेशिर संरक्षण प्राप्त करून देणे.
५. राष्ट्रा–राष्ट्रांत मित्रत्वाच्या नात्याचे संवर्धन करणे.
६. जास्तीत–जास्त मुक्त वातावरणात सामाजिक प्रगती आणि चांगल्या दर्जाच्या जीवनमानाचे संवर्धन करणे.
७. संयुक्त राष्ट्राच्या सहकार्याने मानवी हक्कांच्या आणि मुलभूत स्वातंत्र्याचा सार्वत्रिक सन्मान व आचरण यांचे संवर्धन करणे.

मानवी हक्कांचा जाहिरनामा (1948) मधील मानवी हक्कांची यादी–

संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्क आयोगाकडून तयार केलेला व संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १० डिसेंबर 1948 ला स्विकारलेल्या व घोषित केलेल्या मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा 1948 यामध्ये एकूण ३० कलमे आहेत. यातून मानवी हक्काबाबत आश्वासन, राजकीय व नागरी हक्क आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्पष्ट केलेले आहेत–

कलम १ : सर्व मानवी व्यक्ती जन्मतः स्वतंत्र असून त्यांना समान अधिकार/हक्क व समान प्रतिष्ठा आहे.

कलम २ : या जाहिरनाम्यातील सर्व हक्क व स्वातंत्र्य प्रत्येकास आहेत. वंश, लिंग, धर्म, वर्ण, भाषा, राजकीय अथवा इतर मतप्रणाली, राष्ट्रीय किवा सामाजिक मूलस्थान, संपत्ती, जन्म किवा इतर दर्जा इ. च्या आधारे कोणताही भेदभाव केला जाणार नाही.

कलम ३ : प्रत्येक व्यक्तीस स्वातंत्र्याचा, जिवीताचा व सुरक्षित राहण्याचा हक्क आहे.

कलम ४ : कोणत्याही व्यक्तीस गुलाम म्हणून ठेवता येणार नाही व गुलामगिरी तसेच गुलामांच्या व्यापारास प्रतिबंध केला पाहीजे.

कलम 5 : कोणत्याही व्यक्तीस अमानुष, अपमानास्पद, क्रूर व कमीपणा आणणारी वागणूक कोणीही देता कामा नये.

कलम ६ : प्रत्येक व्यक्तीस कायद्यासमोर माणूस म्हणून मान्यता मिळविण्याचा हक्क आहे.

कलम ७ : कायद्याच्या दृष्टिकोणातून प्रत्येक व्यक्ती समान आहेत व प्रत्येकाला कायद्याचे समान संरक्षण मिळविण्याचा हक्क आहे.

कलम 8 : मूलभूत हक्क जे घटनेने अथवा कायद्याने कायद्याने दिले आहेत. त्या हक्काचा भंग झाल्यास त्या विरोधात सक्षम राष्ट्रीय न्यायाधीकरणाव्दावरे परिणामकारक उपाययोजना करवून घेण्याचा प्रत्येकास हक्क आहे.

कलम 9 : कोणत्याही व्यक्तीस कोणीही मनमानी पध्दतीने हद्दपार, स्थानबध्द किवा अटक करता कामा नये.

कलम १० : कोणत्याही व्यक्तीस त्याचे हक्क, जबाबदाऱ्या व दंडनीय आरोप याबाबतचा निर्णयासाठी स्वतंत्र व निःपक्षपाती अधिकरणाव्दारे न्याय व जाहिर सुनावणीचा हक्क आहे.

कलम ११ : न्यायालयीन चौकशीत आरोप सिध्द होण्यापूर्वी संबंसधित आरोपीस निरअपराध गृहित धरण्याचा हक्क तसेच एखाद्या व्यक्तीने केलेले कृत्य हे कृत्य केले त्यावेळेच्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कायद्याने गुन्हा ठरत नसेल तर त्या व्यक्तीस दोषी धरता कामा नये तसेच गुन्हा

घडला, त्यावेळी त्या गुन्ह्याबाबत जी शिक्षा असेल तीच्या पेक्षा जास्त कडक शिक्षा करता येणार नाही.

कलम १२ : कोणाच्याही खाजगी जीवनात कोणालाही मनमानी पध्दतीने हस्तक्षेप करता येणार नाही. तसेच त्याच्या प्रतिष्ठेवर आघात करता कामा नये. यासाठी प्रत्येकास कायद्याने संरक्षण मिळविण्याचा हक्क आहे.

कलम १३ : प्रत्येकाला संचार व वास्तव्य यांच्या स्वातंत्र्याचा हक्क आहे.

कलम १४ : छळ होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस त्या छळापासुन स्वतःची मुक्तता करून घेण्याचा तसेच इतर देशात आश्रय मिळविण्याचा अधिकार आहे.

कलम 15 : प्रत्येकाला राष्ट्रीयत्व मिळविण्याचा हक्क आहे. तसेच कोणालाही कोणाचेही राष्ट्रीयत्व मनमानीपणे हिरावून घेता येणार नाही.

कलम १६ : सज्ञान स्त्री-पुरूषांना कोणत्याही बंधनाशिवाय परस्पर संमतीने विवाह करण्याचा व कौटुंबिक जीवन जगण्याचा हक्क आहे. तसेच वैवाहिक जीवन व विवाह विच्छेद याबाबत प्रत्येकास समान अधिकार आहे. तसेच कुटुंबाला समाज व शासनाकडून संरक्षण मिळवण्याचा हक्क आहे.

कलम १७ : प्रत्येकाला मालमत्ता धारण करण्याचा, मालमत्तेवर मालकी असण्याचा हक्क आहे. तसेच कोणाही व्यक्तीची मालमत्ता कोणीही मनमानी पध्दतीने हिरावून घेता कामा नये.

कलम 18 : प्रत्येकास विचार व आचार स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्याच्या अधिकारामध्ये व्यक्तीला आपला धर्म व श्रधा बदण्याचा हक्क तसेच आपण स्वीकारलेला धर्म व श्रधा जाहिरपणे अथवा खाजगीत व्यक्त करण्याचा अधिकार आहे.

कलम 19 : प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, माहिती व विचार प्राप्त करण्याचा व ती प्राप्त माहिती, विचार इतरांना देण्याचा अधिकार आहे.

कलम २० : प्रत्येकास संघटना व शांततापूर्ण सभा घेण्याचा हक्क असून कोणीही कोणासही कोणत्याही संघटनेचा सदस्य होण्याची सक्ती करता कामा नये.

कलम २१ : प्रत्येकाला स्वतःला किवा त्याने निवडलेल्या प्रतिनिधीमार्फत शासनात सहभागी होण्याचा हक्क आहे. तसेच शासकीय सेवेत प्रवेश मिळविण्याचा समान हक्क आहे. निवडणूका या गुप्त मतदान पध्दतीने व निर्बंधरहित पध्दतीने झाल्या पाहीजेत.

कलम २२ : प्रत्येक व्यक्तीला सामाजिक सुरक्षा प्राप्त करून घेण्याचा हक्क आहे व प्रत्येकास आपली प्रतिष्ठा, व्यक्तीमत्व यांच्या मुक्त विकासात आवश्यक आर्थिक, सामाजिक व सास्कृतिक अधिकार प्राप्त करण्याचा हक्क आहे.

कलम २३ : प्रत्येकास काम मिळविण्याचा, आपल्या इच्छेनुसार काम निवडण्याचाव बेकारीपासून मुक्त होण्याचा हक्क आहे. तसेच समान कामासाठी समान वेतन प्राप्त करण्याचा व व्यापारी संघ निर्माण करणे किवा अशा संघात सहभागी होण्याचा हक्क आहे.

कलम २४ : निश्चित केलेले कामाचे तास व पगारी सुट्टया या माध्यमातून प्रत्येकास विश्रांती मिळविण्याचा हक्क आहे.

कलम 25 : प्रत्येकास तो व त्याचे कुटुंबिय यांना आरोग्य व स्वास्थ यासाठी आवश्यक राहणीमान प्राप्त करण्याचा हक्क आहे. तसेच त्याला उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध नसेल तर सुरक्षितता प्राप्त करून घेण्याचा हक्क आहे. त्याच बरोबर माता व मुले यांना आवश्यक मदत मिळविण्याचा हक्क असून सर्व मुलांना सारखेच संरक्षण प्राप्त झाले पाहीजे.

कलम २६ : प्रत्येकास शिक्षण मिळविण्याचा हक्क असून प्राथमिक शिक्षण मोफत असले पाहीजे. उच्च शिक्षण गुणवत्तेनुसार सर्वांना समान उपलब्ध झाले पाहिजे. व्यावसायिक व तंत्र शिक्षणाची सोय उपलब्ध असली पाहीजे. आपल्या मुलांना कोणत्या प्रकारचे शिक्षण देण्यात यावे हे ठरवण्याचा अधिकार त्याच्या माता -पित्यांना आहे. तथापि, त्या शिक्षणातुन परस्पराप्रती सलोखा, सहकार्य, शांतता वृध्दिंगत झाली पाहीजे.

कलम २७ : प्रत्येकास समाजाच्या सांस्कृतिक जीवनात भाग घेण्याचा, वैज्ञानिक प्रगतीतून प्राप्त लाभ मिळविण्याचा व स्वनिर्मित गोष्टीतून निर्माण होणाऱ्या हितसंबंधाना संरक्षण प्राप्त करून घेण्याचा प्रत्येकास हक्क आहे.

कलम 28 : जाहिरनाम्यातील हक्क, स्वातंत्र्य प्राप्त होण्यासाठी सामाजिक व आंतरराष्ट्रीय लाभ घेण्याचा प्रत्येकास हक्क आहे.

कलम 29 : प्रत्येक व्यक्तीने इतरांच्या हक्कांचा व स्वातंत्र्याचा आदर राखावा. नितीमत्ता, सार्वजनिक सुव्यवस्था व लोकांचे कल्याण यासंबंधी न्याय गोष्टीचे आचरण करावे. तसेच कायद्याच्या चौकटीत राहावे.

कलम 30 : वरील पैकी कोणत्याही हक्कात ढवळाढवळ, हस्तक्षेप करण्यास, ते नष्ट करण्यास प्रतिबंध.

अशा प्रकारे जाहिरनाम्यातील कलम एक व दोन हे मानवी हक्कांबाबतचे आश्वासन सर्वांना देतात. तर मलम तीन ते एकवीस अशी एकोणीस कलमे नागरी व राजकीय हक्क स्पष्ट करतात. तसेच, कलम बावीस ते तीस मानवी हक्कांच्या सनदेतील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क स्पष्ट करतात.

मानवी हक्कांची व्याख्या :

मानवी हक्क या संज्ञेतील अधिकार व हक्क या संज्ञेचा अर्थ समजून घेतला की, मानवाधिकार किंवा मानवी हक्क संज्ञेचा अर्थबोध होतो.

'ज्यांच्या शिवाय व्यक्तीचे परिपूर्ण अस्तित्व शक्य होणार नाही. अशा गोष्टी म्हणजे हक्क होय.' माणसाला अर्थपूर्ण जीवनजगण्यासाठी जी परिस्थिती हवी असते ती हक्कांमध्ये निर्माण होते. अमुक एक हक्क माणसाच्या परिपूर्ण जगण्यासाठी आवश्यक आहे. तो नसणे हे अन्यायकारक आहे. अशी भावना जेव्हा समाजात सर्वांगिक होतो तेव्हा त्या मागणीला व्यापक स्तरावर लोक समुदायाचा पाठींबा प्राप्त होतो. परिणामी ती मागणी मान्य करणे राजसत्तेला भाग पडते. मनुष्य हा बुध्दीमान व विचार प्रकट करणारा प्राणी आहे. तो आपल्या बुध्दीचा वापर करुन नवनविन शोध लावतो आणि जीवनमानात सतत बदल करुन ते अधिक समृध्द करण्यात गुंतलेला असतो. अशा या मानव प्राण्यांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे या दृष्टीने त्याला काही मूलभूत हक्क मिळणे आवश्यक आहे. त्यांनाच मानवी हक्क असे म्हणतात.

1. ''सर्व मानवांना म्हणजे स्त्री आणि पुरुषांना वंश, रंग, लिंग, भाषा, प्रांत, धर्म, राजकीय मत, देश, जन्म, संपत्ती अशा कोणत्याही भेदभावाशिवाय असलेली आणि समानतेवर आधारलेले मूलभूत व जीवनावश्यक असे अधिकार आणि स्वातंत्र्य म्हणजे मानवी हक्क होय.''
2. ''जगातल्या प्रत्येक मानवाला तो केवळ मानवी कुटुंबाचा सदस्य आहे एवढ्याा एकाच कारणाने जे हक्क मिळायलाच पाहिजेत अशा हक्कांना मानवी हक्क असे म्हणतात.

3. हेरॉल लास्की : समाजाने अथवा राज्याने मान्यता दिलेल्या मागण्या म्हणजे हक्क होते. कोणत्याही राज्याचे स्वरुप त्या राज्याने मान्यता दिलेल्या मूलभूत हक्कांवरुन ठरत असते.
4. मानवी संरक्षण अधिनियम 1993 मधील व्याख्या पुढीलप्रमाणे. ''मानवी हक्क याचा अर्थ व्यक्तीचे जीवन स्वातंत्र्य, समता व प्रतिष्ठा या संबंधीचे व संविधानाचे हमी दिलेले किंवा आंतरराष्ट्रीय करारामध्ये समाविष्ट करण्यात आलेले आणि भारतातील न्यायालयांना अंमलबजावणी करता येईल असे हक्क होय.

समस्या निवड :

मानवी हक्कांची निर्मिती कशाप्रकारे झाली मानवी हक्कांच्या निर्मिती मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची काय भुमिका आणि योगदान आहे. या विषयी ग्रामिण लोकांना कीतपत माहीती आहे त्या बाबत जाणुन घेता यावे या हेतुने वर्धा जिल्हातील हिंगणघाट तालुक्यातील निवडक गावे घेवुन 'संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानवी हक्क' हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाचे उद्देश :

१. मानवी हक्कांविषयी ग्रामिण लोकांना कीतपत माहीती आहे या विषयी जाणुन घेणे.
२. मानवी हक्कांची निर्मिती कशी झाली या विषयी ग्रामिण लोकांकडुन जाणुन घेणे.

गृहीतके :

१. मानवी हक्कांविषयी ग्रामिण लोकांना खुप कमी प्रमाणात माहीती आहे.
२. मानवी हक्कांची निर्मिती विषयी ग्रामिण लोकांना खुप कमी प्रमाणात माहीती आहे.

संशोधन पध्दती :

'संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानवी हक्क' या विषयावर संशोधन करण्याकरीता वर्धा जिल्हयातील हिंगणघाट तालुक्यातील निवडक गावाची अध्ययन क्षेत्र म्हणून निवड करण्यात आली. संभाव्य नमूना निवड पध्दतीचा वापर करुन त्यात साधा यादृच्छिक नमूना मधील लॉटरी तंत्राचा वापर करुन ४० उतरदात्यांची संशोधनाकरीता निवड करण्यात आली. तथ्य संकलन करण्याकरीता मूलाखत अनुसूची आणि दुय्यम तथ्य संकलन (इंटरनेट, मासिक, संदर्भ ग्रंथ) यांचा वापर करण्यात आला.

निष्कर्ष आणि गृहीतकृत्याची पडताळणी :

१. मानवी हक्कांविषयी ग्रामिण लोकांना खुप कमी प्रमाणात माहीती आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये 'संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानवी हक्क' या विषयी जेव्हा उत्तरदात्याकडून तथ्यांचे संकलन करण्यात आले. त्याचप्रकारे द्वितीय तथ्य संकलन करण्यात आले. त्यावरुन असा निष्कर्ष निघतो कि, आजही मानवी हक्कांविषयी ग्रामिण लोकांना खुप कमी प्रमाणात माहीती आहे. यावरुन प्रस्तुत विषयाचे गृहीतके बरोबर सिध्द होते.

२. मानवी हक्कांची निर्मिती विषयी ग्रामिण लोकांना खुप कमी प्रमाणात माहीती आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये 'संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानवी हक्क' या विषयी जेव्हा उत्तरदात्याकडून तथ्यांचे संकलन करण्यात आले. त्याचप्रकारे द्वितीय तथ्य संकलन करण्यात आले. त्यावरुन असा निष्कर्ष निघतो कि, आजही मानवी हक्कांची निर्मिती विषयी ग्रामिण लोकांना खुप कमी प्रमाणात माहीती आहे. यावरुन प्रस्तुत विषयाचे गृहीतके बरोबर सिध्द होते.

समालोचन :

उपरोक्त शोध निबंधामध्ये प्राचीन काळापासुन 'मानवी हक्क' या संकल्पनेचा विचार झालेला आढळतो. भारतात ऋग्वेदातील काही ठिकाणी यासंदर्भाचे लिखाण दिसून येते. तसेच संत वाङ्मयातही विषमता संपवून समता प्रस्थापित करण्याचा विचारही दिसून येतो. परंतु **1878** मध्ये सापडलेली पर्शियन सम्राट सायरसच्या ख्रिस्तपूर्व ६ व्या शतकातील 'सायरस वृत्तचित्ती' त मानवी हक्कांबाबतची महत्वपुर्ण तत्वे अंतर्भूत केलेली आहेत. हिच 'सायरस वृत्तचित्ती' 'मानवी हक्काचा पहिला दस्तऐवज' म्हणून मानला जातो. भारतात ख्रिस्तपूर्व ३ ऱ्या शतकात सम्राट अशोक यांनी नागरी हक्काची तत्वे प्रस्थापित केली. तथापि मानवी हक्काच्या आधुनिक विचारसरणीची सुरवात स्टॉईस या ग्रीक तत्ववेत्याच्या 'नैसर्गिक कायद्याच्या सिध्दांता' पासून झाल्याचे मानले जाते. परंतु ग्रीक परंपरेचा हक्कांच्या संदर्भात विचार करता तेथे हक्कांची संकल्पना वर्गानुसार होती. कारण ग्रिकांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क व समतेचे हक्क यांना मान्यता दिली असली तरी स्त्रिया व गुलाम यांना मात्र ते हक्क नाकारण्यात आले होते. अशीच विसंगती जगातील अनेक परंपराच्यामध्ये 'हक्कांच्या' संदर्भात आढळते. त्यामुळे जगातील विविध देशांनी त्यांच्यावर प्रभाव असणाऱ्या परंपरा, विचारधारेनुसार आपल्या देशासाठी मानवी हक्कांची निश्चिती केली होती. त्यामुळे विविध देशातील मानवी हक्कां संदर्भात एकवाक्यता किवा समानता नव्हती. ही एकवाक्याता आणण्याची सुरवात संयुक्त राष्ट्रांकडून झाली. म्हणूनच मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणात व संयुक्त राष्ट्रांचे योगदान खूपच असाधारण आहे.

मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणात व संयुक्त राष्ट्रांचे योगदान आहे हे जरी सत्य असले तरीही विविध भागामध्ये आजही मानवी विषयी अतिशय कमी प्रमाणात माहिती आहे. जेव्हा पर्यंत लोकांमध्ये आपले मानवी हक्क विषयी जागृकता वाढणार नाही. तेव्हापर्यंत ग्रामिण लोक मानवी अधिकारापासून वंचित राहतील असे दिसुन येते.

संदर्भ ग्रथ सुची :

1. पाटील, व्ही. बी. (२०१२). मानवी हक्क, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
2. पांगुळ-बाराहाते, नंदा (२००९). समाजसुधारक आणि ग्रामिण विकास, आर. बी. प्रकाशन नागपूर.
3. पांगुळ-बाराहाते, नंदा (२०१०). समाजकार्य विचारधारा सिध्दांत आणि व्यवहार, आर. बी. प्रकाशन नागपूर.
4. कऱ्हाडे, बी. एम. (२०१०). समाजशास्त्रीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
5. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, 'मानवी हक्कांची ऐतिहासिक वाटचाल', नाशिक, २००९.
6. कोतापल्ले लक्ष्मण, भारतातील सामाजिक कल्याण, प्रशासन आणि समाजकार्य, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.
7. Patil, The Economicsof Social Welfare in India, Somayya, Bombay,1978.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

सेंद्रिय शेती काळाची गरज

भगवान ईश्वरलाल परदेशी
संशोधक, Assistant professor, इतिहास विभाग,
श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालय शिरपुर जि. धुळे
Corresponding Author- भगवान ईश्वरलाल परदेशी
Email: pardeshibhagwan@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.11178203

सारांश :

भारत हा एक खंडप्राय देश आहे, एवढेच नव्हे तर या देशात उष्ण हवामानापासून थंड हवामान पर्यंतचे प्रदेश अस्तित्वात आहेत. सिंधू नदी खोऱ्यातील शेतीच्या प्रारंभ स्थानाचा विस्तार बराच मोठा होता. उत्तरेकडे हिमालयाच्या पायथ्यापासून पूर्वेकडे यमुना नदी, दक्षिणेकडे नर्मदा नदी आणि पश्चिमेकडे मक्रान किनाऱ्यापर्यंत शेतीचे हे प्रारंभ स्थान पसरले होते. सिंधू नदी व तिच्या उपनदीच्या काठी वस्ती होत्या या भागातून पूर्वेकडे गंगा नदी खोऱ्यांकडे आणि नंतर द्विपकल्पीय भारताच्या दिशेने शेतीचा प्रसार झाला. जगामध्ये शेतीचा शोध लागून माणसाने शेती करायला सुमारे 12000 वर्षांपूर्वी सुरुवात केली असावी असा या विषयातील तज्ञांचा कयास आहे.

प्रस्तावना :

शेती उत्पादनात वाढ करण्याचे दोन मार्ग साधारणपणे विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत जगभर उपलब्ध होते. त्यातील पहिला आणि सापेक्षक सुलभ मार्ग म्हणजे लागवडीखालील क्षेत्राचा विस्तार करणे, दुसरा मार्ग म्हणजे शेती उत्पादनाची प्रक्रिया अधिक उत्पादक करणे. वनस्पतींची विविधता ही भारत वर्षासाठी नैसर्गिक देणगी होय. शेती करण्यासाठी पावसाचे वेळापत्रक जाणून शेतीची नियोजन करणे गरजेचे ठरते. यासाठी निसर्गचक्र जाणून पावसाचे भाकीत करण्याच्या कामाला गती मिळाली हे काम इसवी सन पूर्व 400 वर्षापूर्वी सुरु झाल्याचे 'कृषी-पराशर' या ग्रंथाद्वारे सूचित होते. पुढे इसवी सन 587 मध्ये ते पूर्णत्वाला पोहोचल्याचे 'बृहसंहिता' या ग्रंथाने निर्देशित केले आहे. आजही भारतातील बऱ्याच मोठ्या प्रमाणावर शेतकरी आपली शेतीची कामे ही पंचांग पाहून करतात. 'कृषी-पराशर' ग्रंथांमध्ये भरघोस कृषी उत्पादनासाठी सेंद्रिय खतांचे महात्म्य वर्णविलेले आहे. तसेच गायीच्या शेणापासून चांगले सेंद्रिय खत तयार कसे करावे हे देखील नमूद केलेले आहे. पुढील काळात कौटिल्याने गुरांचे शेण, गुरांची हाडे, माशांचे अवशेष आणि दूध यांच्या मिश्रणाचा खत म्हणून वापर करावा असा सल्ला शेतकऱ्यांना दिला आहे त्याचे पुढे जाऊन ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकामध्ये 'कुराल' या ग्रंथांमध्ये जमिनीची नागरट करण्यापेक्षाही सेंद्रिय खताचा वाढता वापर अधिक महत्त्वाचा असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे.

उद्देश : सेंद्रिय शेती काळाची गरज अभ्यास करणे

शेतकऱ्यांनी आपल्या फळबागांची वाढ जोमाने व्हावी यासाठी जनावरांची शेण मुत पशुंच्या हाडातील मगज, मेलेले मासे, तिळाची पेंड, मध भिजवलेले उडीद, तूप यांचा वापर करून द्रवरूप खताची निर्मिती कशी करावी याचे वर्णन कुराल या ग्रंथांमध्ये आहे. अशा रीतीने कृषीविषयक प्राचीन लिखाणाचा आढावा घेतला तर भारतामध्ये फार पूर्वीपासून सेंद्रिय शेतीच्या संदर्भात विचार आचार महत्त्व देण्यात आल्याचे आपल्या निदर्शनास येते.

"शेती म्हणजे विविध पिकांची लागवड केली जाणारी जमीन असे सर्वसाधारण म्हणता येईल" सेंद्रिय शेती म्हणजे नैसर्गिक साधनांचा वापर करून औषधे खते तयार करणे व पारंपारिक बियाणाचा वापर करून केलेली विषमुक्त म्हणजेच रसायनाचा वापर टाळून केलेली शेती म्हणजे सेंद्रिय शेती होय. सेंद्रिय शेती म्हणजे परंपरागत शेती होय. महात्मा गांधी म्हणतात "शेती हा लोकांच्या उपजीविकेचा प्रमुख साधन असल्यामुळे शेती हा भारताचा आत्मा आहे" सेंद्रिय शेती म्हणजे सजीव पर्यावरणीय रचना आणि जीवन चक्र समजून घेऊन व रसायनांचा वापर टाळून केलेली एकात्मीक शेती पद्धती होय. सिक्कीम सरकारने 2015 पर्यंत संपूर्ण राज्य सेंद्रिय शेती खाली आणण्याचे ध्येय ठरवले होते ते त्यांनी पूर्ण केले सिक्कीम संपूर्ण सेंद्रिय शेती करणारे प्रथम राज्य ठरले.

भारतातील सेंद्रिय शेतीची तत्वे :

1. **आरोग्याची तत्वे -** इकोसिस्टम लोक आणि समुदायांचे आरोग्य
2. **इकोलॉजीची तत्त्वे -** इकोसिस्टम आणि पर्यावरण किंवा नैसर्गिक निसर्ग यांच्यातील योग्य संतुलन
3. **निपक्षतेची तत्वे -** चांगले मानवी संबंध आणि जीवनाची गुणवत्ता
4. **काळजीची तत्त्वे -** भविष्यातील पर्यावरण आणि पर्यावरणाबद्दल विचार

सेंद्रिय शेतीचे प्रकार :

सेंद्रिय शेती दोन प्रकारचे आहे:

1. **शुद्ध सेंद्रिय शेती -** शुद्ध सेंद्रिय शेतीमध्ये सर्व नैसर्गिक रसायन टाळले जाते. शुद्ध शेतीच्या प्रक्रियेत खते आणि कीटकनाशके नैसर्गिक स्रोताकडून मिळतात. त्याला सेंद्रिय शेतीची शुद्ध स्वरूप म्हणतात. उच्च उत्पादकतेसाठी शुद्ध सेंद्रिय शेती सर्वोत्तम आहे.
2. **एकात्मिक सेंद्रिय शेती -** एकात्मिक सेंद्रिय शेतीमध्ये एकात्मिक पोषक व्यवस्थापन आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन यांचा समावेश होतो.

सेंद्रिय शेतीची उद्दिष्टे :

1. अनुवांशिक विविधता वाढवा
2. नैसर्गिक कीटकनाशकांच्या अधिक वापरास प्रोत्साहन देणे
3. योग्य वेळी योग्य माती मशागतीची खात्री करा
4. मातीची रचना आणि सुपीकता चांगली ठेवा आणि तयार करा
5. कीड, रोप तणावर नियंत्रण ठेवा

अलीकडच्या काळात शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला याशिवाय रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर ही वाढलेला आहे. त्यामुळे उत्पादनात वाढ जरी होत असली तरी मिळणारी उत्पादने ही रसायन युक्त मिळत आहे, त्यामुळे मानवामध्ये विविध आजारात वाढ झालेली आहे. त्यामुळे विषमुक्त व रसायन विरहित अन्नधान्य, भाजीपाला आणि फळ पिके घेणे आवश्यक झाले आहे, यासाठी सेंद्रिय शेती हाच एकमेव पर्याय आहे. भारतात शेती हा परंपरागत व्यवसाय आहे रासायनिक खतांची उत्पादन व वापर सुरू होण्यापूर्वी भारतीय शेतीत शेणखत, कंपोस्ट खत, हिरवळीचे खत वापरले जात असे. परंतु हरितक्रांतीची तत्व स्वीकारल्यानंतर अपेक्षित उत्पादन प्राप्त होण्यासाठी रासायनिक खतांचा पुरस्कार वाढत गेला. रासायनिक खतांच्या अविवेकी वापरामुळे त्याचे विपरीत परिणाम दिसू लागले आहेत. रासायनिक खतांना पर्याय नसल्याने त्याचा वापर कमी करून शेतीला सेंद्रिय व जैव खतांची जोड देणे आता आवश्यक मानले जात आहे. प्राणीजन्य व वनस्पतीजन्य टाकाऊ व विशेष व पदार्थ यापासून तयार होणाऱ्या खतांना सेंद्रिय खत म्हणतात.

वनस्पती व प्राणी यांचे अवशेष कुजविण्याच्या क्रियेतून प्राप्त होणाऱ्या मिश्रणात कंपोस्ट व मिश्र कचरा खत बनतात. भारतात 2010-11 मध्ये 3671 लाख मीटर सेंद्रिय खताचे उत्पादन झाले. वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. एस. राणा यांच्याशी मत आहे की हे सेंद्रिय खत 7.34 दशलक्ष टन NPK पोषणद्रव्या इतके आहे. कापूस, तेलबिया, बासमती तांदूळ, चहा या कृषी उत्पादनासाठी सेंद्रिय खते प्रामुख्याने वापरली जात आहेत सेंद्रिय खते वापरून संपूर्ण सेंद्रिय शेतीची सर्वाधिक क्षेत्र 82.5% मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान व गुजरात या चार राज्यात केंद्रीत झाले आहे. जागतिक पातळीवर विकसित देशांमधील सदन लोकांकडून सेंद्रिय शेती उत्पादनासाठी असणारी मागणी सतत वाढत आहे. भारतासारख्या उष्ण हवामान असणाऱ्या देशात सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची शेती रासायनिक शेतीशी स्पर्धा करू शकेल एवढी उत्पादक ठरू शकते. पंजाब, उत्तर प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र चार राज्यांमधील काही शेतकरी करीत असलेली तांदूळ, गहू आणि कापूस या उत्पादनाची शेती रासायनिक खताचा वापर न करताही रासायनिक शेती एवढीच उत्पादक ठरत आहे, क्युबा या शेतीप्रधान देशाच्या संपूर्ण शेतीचे रूपांतर अत्यंत समृद्ध सेंद्रिय शेतीमध्ये झाले आहे, सेंद्रिय शेतीचा मुलाधार म्हणजे हिरवळीचा खत म्हणून वापर करण्याची पद्धत होय. सेंद्रिय शेतीच्या संदर्भात दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे जमिनीचे तापमान साधारणपणे 25 ते 45 डिग्री सेल्सिअस यादरम्यान नियंत्रित करणे ही होय.

एकविसाव्या शतकामध्ये ब्राझील, चीन हे दोन देश रासायनिक शेतीला राम राम करून आधुनिक सेंद्रिय शेतीकडे वळण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असे दिसण्यात येते. केंद्र सरकारने सेंद्रिय शेतीची संकल्पना लोकप्रिय करण्यासाठी अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडामध्ये 101 कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली होती. सेंद्रिय शेती विकसित करण्याच्या प्रक्रियेला चालना द्यायची असेल तर शेताच्या मातीमध्ये पालापाचोळा, काडी कचरा कुजवण्याची गरज शेतकऱ्यांना पटवून द्यायला हवी. आज जगामध्ये क्युबाच्या पाठोपाठ अर्जंटीना, ब्राझील आणि चीन हे देश सेंद्रिय शेतीच्या संदर्भात आघाडीवर असणारे देश आहेत. या देशांच्या पंक्तीमध्ये भारताला स्थान मिळवायचे असेल तर आजपर्यंत सेंद्रिय शेतीच्या संदर्भात असणारी आपली अनावस्था दूर सारून आपल्याला नव्या जोमाने सेंद्रिय शेतीच्या प्रचाराचे काम हाती घेण्याची नितांत गरज आहे.

निष्कर्ष :

वरील अभ्यासावरून असे दिसून येते की सेंद्रिय शेती काळाची गरज आहे या संदर्भात जाणीव आणि जागृती निर्माण करणे गरजेचे आहे.

संदर्भसुची :

1. रमेश पाध्ये, शेती शेतकरी आणि अर्थकारण, द युनिक अकॅडमी पुणे, प्रथम आवृत्ती मार्च 2015
2. डॉ. विजया साळुंखे - कृषी भूगोल भारताच्या विशेष संदर्भसह - डायमंड पब्लिकेशन पुणे - प्रथम आवृत्ती जुलै 2015
3. mr.wikipedia.org
4. www.themightyearth.com - 29/3/2024 – 10:30 pm सेंद्रिय शेती फायदे आणि उद्दिष्टे
5. सेंद्रिय शेतीची वैशिष्ट्ये काय आहेत ? - 16/12/2022 – 2:32 pm – 29/03/2024 www.agrooneesakal.com

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

"गणपतरावजी देशमुख यांची विधिमंडळ कारकीर्द - एक विकासात्मक अभ्यास"

श्री. अशोक किसन वाकडे
संशोधक, सामाजिक शास्त्रसंकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापुर विद्यापीठ, सोलापुर
Corresponding Author- श्री. अशोक किसन वाकडे
ई-मेल: ashokwakade23@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.11178218

प्रस्तावना:

गणपतराव देशमुख हे पुणे येथे एल. एल. बी चे शिक्षण घेत असताना वसंतराव तुळपुळे व कमलाबाई भागवत यांच्या मार्क्सवादी विचारसरणीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. मार्क्सवादाचा अभ्यास करण्यासाठी गणपतराव देशमुख त्यांच्याकडे शिकवणीला जात असत. तत्कालीन काळात तुळशीदा जाधव, केशवराव जेधे व शंकरराव मोरे आदी नेत्यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवक म्हणून त्यांनी काम केले. कॉलेज मध्ये असतानाच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची चळवळ उभा करून लोकजागृतीसाठी त्यांनी सभा घेतल्या. शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत विद्यार्थी सभेचा कार्यकर्ता म्हणून १९५४ मध्येच संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात सहभाग घेतला. विद्यार्थी दशेतच चळवळीच्या माध्यमातून शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी व दीन दलित यांचे प्रश्न त्यांनी तळमळीने समजावून घेतले, ते तेव्हाच ! मार्क्स, लेनिन यांच्या विचारांचा पगडा त्यांच्या ठायी असून एका उदात्त ध्येयासाठी तरुण वयातच त्यांनी जे ध्येय ठरविले, त्याबाबतच्या निष्ठा इतक्या स्पष्ट आणि जबर होत्या की शेतकरी, दीन – दलित व सर्वसामान्य माणसांना न्याय द्यायचा असेल तर राज्य हे उपभोगायचे नसून तर ते जनतेच्या हितासाठी व समाज परिवर्तनासाठी चालवायचे असते. हा छत्रपती शिवाजी महाराज व अहिल्याबाई होळकर यांचा क्रांतीकारक वसा घेऊन आपल्या समाज कार्याची मुहूर्तमेढ विद्यार्थी दशेतच त्यानी रोवली. देशात, महाराष्ट्रात आलेला लोकशाही सत्येचा प्रयोग भांडवलदार आणि जमिनदार निश्चितपणे स्वत: च्या हितासाठी करतील आणि ज्या शेतकरी, कामगारांनी असिम त्याग करून प्रसंगी प्राणाची आहुती देऊन स्वातंत्र्य मिळविले. त्यांना वाऱ्यावर सोडतील अशी चिंता बाळगून समाजवादी भूमिका स्वीकारून गणपतराव देशमुख तेव्हा राजकारणाकडे ओढले गेले, ते आजतागायत !

सांगोला तालुक्याला सामाजिक व राजकीय चळवळींची पार्श्वभूमी आहे. १९२७ साली वाटंबरे, तालुका सांगोला येथे ब्राह्मणेत्तर चळवळ शामराव लिगाडे यांनी घेतली. त्या परिषदेस दिनकरराव जवळकर, कर्मवीर भाऊराव पाटील व अन्य पुढारी होते. २१ मे, १९६१ रोजी सांगोल्याच्या ओढ्यामध्ये गणपतराव देशमुख यांनी शेतकरी परिषद घेतली. त्यावेळी क्रांतीसिंह नाना पाटील उपस्थित होते. आबासाहेबांनी १९ ऑक्टोंबर, १९६१ रोजी दसऱ्याच्या म्हणजे विजया दशमीच्या दिवशी विधानसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला२०. त्यावेळी व पुढेही काही काळ गौडवाडीचे यशवंतराव सिदोजीराव देशमुख यांनी तन, मन व धनाने फारच मोलाची मदत केली. डॉ. व्यंकटेश केळकर यांना दादा या नावाने ओळखायचे. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते व स्वातंत्रवीर सावरकरांचे निस्सिम भक्त होते. परंतु गणपतराव देशमुख हे अभ्यासू व व्यासंगी व्यक्तिमत्त्व आहे, असं व्यक्तिमत्त्व आपल्या तालुक्याला लाभणं हे भाग्याचं आहे. म्हणून त्यांनीही आबांसाहेबांना मदत करायची ठरविली. इतकेच नव्हे तर दादांनी तालुक्यात प्रचंड दौरे काढले. खूप पैसाही खर्च केला की, त्यावेळी तीन मजली हॉस्पिटल बांधकाम झाले असते. परंतु त्या दोघांमध्ये निखळ प्रेम आणि एकमेकाविषयी विश्वास होता. एकमेकास ते भाऊ – भाऊ मानत होते. त्यावेळी नगराध्यक्षांची सूत्र दांदाच्या घरातून हालत असत. शहर दादांनी पाहायचं आणि तालुका आबासाहेबांनी. पण कधीही वाद झाला नाही. एवढा समजूतदारपणा दोघांमध्ये होता.

उद्देश:

1. गणपतरावजी देशमुख यांचा दुष्काळग्रस्त भागातील योजनांचा अभ्यास करणे.
2. कायमचा दुष्काळ हटविण्यासाठी गणपतरावजी देशमुख यांचे जलसिंचन विषयक विचार अभ्यासणे .
3. महाराष्ट्रातील विविध पाण्याची स्रोत धरणे यांची माहिती घेणे.
4. दुष्काळग्रस्त भागांसाठी पाण्यांच्या योजनांचा अभ्यास करणे उदाहरणार्थ टेंभू - म्हैसाळ योजना .
5. सिंचन क्षेत्रात ची वाढ करणे व विकास करणे यासंदर्भात सविस्तर अभ्यास करणे.

१९६२ ची पहिली विधानसभा निवडणूक:

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या काळात काँग्रेस पक्षाला सोलापूर जिल्ह्यात मोठा धक्का बसला होता. त्यावेळी शेकाप पक्षाचे भाई राऊळ निवडून आले .१९५७ च्या विधानसभा निवडणूकीत सोलापूर जिल्ह्यामध्ये काँग्रेस पक्षाची बरीच वाताहत झाली होती. म्हणून १९६२ च्या निवडणूकीमध्ये काँग्रेस रिस्क घ्यायला तयार नव्हते. महाराष्ट्र स्थापनेनंतर सोलापूर जिल्ह्यातून विधानसभेच्या सर्वच्या सर्व १३ जागा काँग्रेसला मिळाल्या पाहिजेत. असा काँग्रेस श्रेष्ठीचा आग्रह होता. पण एकच अडचण होती. ती सांगोल्याची. सांगोल्यात शेतकरी कामगार पक्षाचा उमेदवार निवडून येणार असे चित्र समोर दिसत होते. १९६२ साली सांगोल्यामधून गणपतराव देशमुख निवडून येणार ? हे काँग्रेसच्या नेत्यांना दिसत होते. गणपतराव देशमुख यांनी निवडणूकीची तयारी केली होती. तशी ती त्यांची पहिलीच निवडणूक होती. तरीही या तालुक्यात त्यांना पर्याय नाही, हे काँग्रेस नेत्यांना माहीत होते. त्यामुळे गणपतराव देशमुख यांना काँग्रेस मध्ये आणावे म्हणजे सारे काही ठीक होईल. अशी चर्चा काँग्रेस नेतेमंडळीत सुरू झाली. आणि गणपतराव देशमुख यांच्याशी खुद्द यशवंतराव चव्हाण यांनीच बोलावे, अशी चर्चा झाली. यशवंतरावांचा हात ज्यांच्या पाठीवर पडतो, तो त्यांना वश होतो. अशी ख्याती होती. यशवंतरावांनी आबासाहेबांच्या पाठीवर हात टाकण्याचा प्रयत्न केला. पण त्याला यश आले नाही. ते त्यांच्या अमिशाला भाळले नाहीत. वरिष्ठ काँग्रेस नेत्यानी त्यांना काँग्रेसमध्ये येण्याविषयी गळ घातली. त्याकाळात शेकापपक्षाचे अनेक नेते काँग्रेसमध्ये गेले होते. पण गणपतराव आपल्या राजकीय विचाराच्या भूमिकेवर ठाम राहिले. ज्या चळचळीने आपणास मोठे केले, ती चळवळ आणि त्या नेत्यांशी गद्दारी करणार नाही. असे गळ घालणाज्या नेत्यांना ठामपणे सांगितले. राज्यात निरनिराळया लाटा आल्या. अनेक जण आपला मूळ पक्ष सोडून त्या लाटेवर स्वार झाले. पण कितीही कठीण प्रसंग आले तरी गणपतरावांनी पक्षाशी बेइमानी केली नाही. त्याचीच एक लाट तयार झाली आणि पंचवीस मुख्यमंत्र्याच्या कार्यकाळात ५१ वर्षे विधिमंडळात राहिले.

१९६२ सर्वप्रथम आबासाहेब शेकाप पक्षाचे म्हणून निवडून आले. ज्या विचारांची बांधिलकी स्वीकारली आहे, तो विचार कधीच पायधळी पडू द्यायचा नाही. हे ठरवून राजकारणात आले होते. निवडणूकीनंतर विधानसभेत निवडणूका शांततेत पार पडल्याबद्दल शासनाचे आभार मानण्याचा असा ठराव सत्ताधारी पक्षाने आणला. तो सर्वानुमते मंजूर होईल अशी अपेक्षा होती. परंतु आबासाहेबांनी या ठरावाला ठाम विरोध केला. कुठे कुठे काय घडले हे त्यांनी उदाहरणासह सभागृहात दाखवून दिले. हे त्यांचे पहिलेच भाषण होते. पत्रकारासह सर्वांनीच त्या भाषणाची दखल घेतली. ते भाषण गाजले. तेथून पुढे ते सभागृहात गर्जत राहिले ते थेट २०१९ पर्यंच्या काळापर्यंत. त्यामुळे सुरूवातीपासूनच सर्व पक्षांना ते नेहमीच हवे आ असे वाटत राहिले आहेत. सुरूवातीच्या काळातील अनुभव सांगताना अनंतराव कुलकर्णी म्हणतात, घेरडी आणि परिसरात १९६२ पर्यंत ९० टक्के काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. रावसाहेब पतंगे, डॉक्टर व्यंकटेश केळकर व शिरूकाका देशपांडे १९६२ च्या विधानसभेच्या प्रभारासाठी घेरडीला आले केळकर डॉक्टरनी आग्रह धरला आणि गावची बैठक घेऊन एकमुखी गणपतराव देशमुख यांना पाठींबा द्या. राऊतांनी आश्वासन काय दिले. ते पाळले का ? हे लक्षात आणून दिले. म्हणून मौलासो पठाण व अनंतराव डोंगरे यांनी विस्तीर्ण बैठक घेतली. त्या बैठकित एकमुखी गणपतराव देशमुख म्हणजे शेकापला पाठिंबा द्यायचा निर्णय झाला. तेव्हापासून शेकापचा बालेकिल्ला म्हणून हा घेरडी भाग तालुक्यात प्रसिद्ध आहे. १९६२ पासून घेरडी परिसरातील व गावामधील जनतेने निवडणूकीचा खर्च, पोष्टर, बॅनरसह जीपभाडे, कार्यकर्त्यांची भोजन व निवास सोय, प्रचारयंत्रणा ही घेरडी येथील कार्यकर्त्यांकडून केली जात असे. यासाठी येणारा आर्थिक खर्च गावातील गणपतराव देशमुख १९६२ पासून शेतकरी कामगार पक्षाच्या मध्यवर्ती समिती व

चिटणीस मंडळाचे सदस्य कायमच राहिलेले आहेत. १९६२ मध्ये त्यांनी प्रथमच विधानसभेची निवडणूक लढवली. आणि १९५२ पासून सलग १० वर्षे सांगोला विधानसभा मतदार संघाचे आमदार असलेले केशवराव राऊत यांचा २०५७ मतांनी पराभव करून गणपतराव देशमुख प्रथमच विधानसभेत निवडून गेले. १९६७ साली काकासो साळुंखे यांच्याविरूद्ध ६७२ मतांनी विजयी होऊन पुन्हा विधान सभेत निवडून गेले. १९७४ साली राजाभाऊ झपके यांच्या विरोधात १२९०७ मतांनी विजयी झाले. १९७८ साली बबनराव (बाजीराव) घाडगे यांच्या विरोधात २१४५७ मतांनी, १९८० साली पांडुरंग भांबुरे १२५२३ मतांनी, १९८५ पांडुरंग भांबुरे यांच्या विरोधात ८८९३ मतांनी विजय मिळविला. १९९० साली शहाजी पाटील यांच्या विरोधात १६३१८, १९९९-४०३३४, २००४-२०५९६, २००९- ९८०४, २०१४-२५८२५ मतांनी गणनतराव देशमुख सातत्याने विजय मिळवून ११ वेळा विधान सभेमध्ये निवडून जाणारे भारतातील एकमेव आमदार आहेत, परंतु १९७२ मध्ये काकासो साळुंखे यांचेकडून १९५५ मतांनी व १९९५ मध्ये शहाजी पाटील यांचेकडून केवळ १९२ मतांनी त्यांना पराभवही पत्कारावा लागलेला आहे. सर्वांनाचा आश्चर्याचा धक्का बसला. वास्तविक पाहता खटारा हे चिन्ह नव्हते. सायकल हे चिन्ह बदलेले होते. कार्यकर्ते प्रचार करायला व चिन्ह समजून सांगायला कमी पडले. आबासाहेबांची गाडी कुठे दिसेना म्हणून लोकांनी मतपत्रिका कोऱ्या टाकल्या. त्या मतपत्रिका ३००० च्या आसपास होत्या. जीवनात आशा – निराशेचे क्षण येतच असतात. अस माणून मतदारांनी दिलेला कौल मान्य केला. वैचारिक विचारांच्या आबासाहेबांनी मोकळया मनाने स्वीकारला. जनतेने दिलेल्या निर्णयाने ते अंतर्मूख झाले. खरेतर कार्यकर्त्यांच्या गाफीलपणामुळेच पराभव झाला. पण पराभवाचे खापर कार्यकर्त्यांवर न फोडता पराभवाला मीच जबाबदार आहे. असे प्रसार माध्यमांपुढे जाहीर करून टाकले. कोणतेही आव्हान निधड्या छातीने स्वीकारण्याची ताकत त्यांच्यात ठासून भरली होती. त्याचबरोबर १५ एप्रिल १९९५ रोजी विधान परिषदेच्या निवडणूकीत ५ मतांनी पराभवाला सामोरे जावे लागले आहे. असे असले तरी गणपतराव देशमुख यांनी पराभवाचे खापर कार्यकर्त्यांवर न फोडता पराभवाची सर्व जबाबदारी स्वतः स्वीकारली. पराभवाने खचून न जाता दुसऱ्या दिवशी मुंबईला जाऊन कोणत्याही प्रकारचा विलंब न करता शासकीय आमदार निवासाची खोली तत्परतेने खाली करून आपले साहित्य घरी आणले. १९९५ च्या विधानसभेच्या पराभवानंतर ऐषआराम व धनतृष्णा दूर सारून सर्वसामान्य माणसांचे प्रश्न सोडवण्यासाठी अधिक जोमाने कार्य करीत राहिले हे करत असताना आपल्या राजकीय यशाच संपूर्ण धनीपण आबासाहेबांनी (गणपतराव देशमुखांनी) स्वत: कडे कधीही घेतलेलं नाही. १९६२ मध्ये शेकापच्या वतीने त्यांनी सांगोला तालुका विधानसभेची निवडणूक जिंकली आणि राजकारणात सक्रिय झाले. राजकारणाविषयी ते स्वतः म्हणतात, राजकारणात प्रवेशानंतर सुरूवातीपासूनच सरकारचा पैसा म्हणजे जनतेचा पैसा आहे, ही माझी धारणा राहिली आहे. जनतेने राजकर्त्यांना राजकरण्यांना विश्वासाने निवडून दिले आहे. त्यामुळे जनतेच्या पैशाची उधळपट्टी करणे चुकीचे आहे, असे मी मानतो. असा समाजवादी व लोकहितार्थ दृष्टिकोन ठेवून स्वातंत्र्यानंतरही शेतकरी, शेतमजूर सोशीकतेने जगतो आहे. कर रूपातून शासनाकडे जमा झालेला पैसा सर्वसामान्यांसाठी खर्च व्हावा असा आग्रह त्यांनी विधानसभेत सातत्याने धरलेला आहे. इतकेच नव्हेतर स्वतः मंत्री असताना वर्तमान पत्राची रद्दी विकून जमा झालेला पैसा शासनाकडे जमा करणारा विरळाच आमदार व मंत्री म्हणून गणपतरावांकडे पाहावे लागते.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूका (सन १९६२ ते सन २०१९) विधानसभा क्षेत्र – सांगोले

अ. क्र.	सार्वत्रिक विधानसभा निवडणूका सन	सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीतील उमेदवार	समाविष्ट राजकीय पक्ष	सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीतील मिळालेले मते	सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीतील मताधिक्य	सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीतील विजयी उमेदवार
०१	१९६२	१.गणपतराव देशमुख २.केशवराव राऊत ३.शिवाजी बनसोडे	१ शेकाप २ कॉंग्रेस ३ अपक्ष	१७८०० १५४७३ १६९२	२०५७	गणपतराव देशमुख

०२	१९६७	१.गणपतराव देशमुख २.बापूसाहेब साळुंखे	१ शेकाप २ कॉग्रेस	२६८४३ २६१७५	६६८	गणपतराव देशमुख
०३	१९७२	१.बापूसाहेब साळुंखे २.गणपतराव देशमुख	१ कॉग्रेस २ शेकाप	३३४४८ ३१७९३	१६६५	बापूसाहेब साळुंखे
०४	१९७४ (पोट.नि)	१.गणपतराव देशमुख २.राजाभाऊ झपके	१ शेकाप २ कॉग्रेस	३९५२९ २६६२२	१२९०७	गणपतराव देशमुख
०५	१९७८	१.गणपतराव देशमुख २.बाजीराव घाडगे	१ शेकाप २ कॉग्रेस	४७६२५ २६०६७	२१५५८	गणपतराव देशमुख
०६	१९८०	१.गणपतराव देशमुख २.पांडुरंग भामबुरे	१ शेकाप २ कॉग्रेस	४८२६२ ३५७३९	१२५२३	गणपतराव देशमुख
०७	१९८५	१.गणपतराव देशमुख २.पांडुरंग भामबुरे	१ शेकाप २ कॉग्रेस	५४८१६ ४५९२३	८८९३	गणपतराव देशमुख
०८	१९९०	१.गणपतराव देशमुख २.शहाजी पाटील	१ शेकाप २ कॉग्रेस	७२३४१ ५६०२३	१६३१८	गणपतराव देशमुख
०९	१९९५	१.शहाजी पाटील २.गणपतराव देशमुख	१ कॉग्रेस २ शेकाप	७३९१० ७३७१८	१९२	शहाजी पाटील
१०	१९९९	१.गणपतराव देशमुख २.शहाजी पाटील	१ शेकाप २ अपक्ष	९३८१९ ५३४८५	४०३३४	गणपतराव देशमुख
११	२००४	१.गणपतराव देशमुख २.शहाजी पाटील	१ शेकाप २ कॉग्रेस	१०००००० ७९४०४	२०५९३	गणपतराव देशमुख
१२	२००९	१.गणपतराव देशमुख २.शहाजी पाटील	१ शेकाप २ कॉग्रेस	८६५४८ ७६७४४	९८०४	गणपतराव देशमुख
१३	२०१४	१.गणपतराव देशमुख २.शहाजी पाटील ३.श्रीकांत देशमुख	१ शेकाप २ शिवसेना ३ भाजप	९४३७४ ६९१५० १४०७४	२५२२४	गणपतराव देशमुख

१९९९ ची विधानसभा व लोकसभा निवडणूक:

१९९५ च्या विधानसभा निवडणूकीत केवळ १९२ मतांनी पराजय पत्करावा लागला. यांचे शल्य आबासाहेबांपेक्षा कार्यकर्त्यांना फार होते. निवडणूकीनंतर आबासाहेब हेही स्वस्थ बसले नाहीत . अधिक जोमाने कामाला लागले. पिण्याचे पाणी असो, रोजगार हमीचे काम असो वा सर्वसामान्यांचे कोणतेही काम असो ते अगदी मनापासून करत असत. सर्व सामान्यांच्या सुखासाठी स्वत: ला झोकून दिले. नदीतील पाण्याला कितीही अडथळे आले तरी नदीच्या पाण्याचा प्रवाह थांबत नाही. वळसा घालून पाणी पुढे जाते. अगदी त्याप्रमाणे ते हताश न होता वा थांबून राहणे त्यांना कधीच जमले नाही. त्यांनी कुणावरही रोष धरना नाही, का आकस ठेवला नाही. तळपातळीवर काय प्रश्न आहेत ते समजून घेत राहिले. आव्हानांना हार जातील ते आबासाहेब कसले. सरकारच्या विरोधात अनेक लढे उभा केले, मोर्चे काढले. शेतकऱ्यांच्या, शेतमजूरांच्या व कामगारांच्या प्रश्नांसाठी प्रयत्नांची शिकस्त केली. एक काम संपले की दुसरं काम घ्यायचे. तेही तितक्याच उत्कंठतेने पूर्ण करायचे या त्यांच्या स्वभाववैशिट्यांमुळे कोणतेही काम करताना त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. १९९९ च्या लोकसभा निवडणूकीचे वारे वाहू लागले. लोकसभा निवडणूकीबराबरच विधानसभेच्या निवडणूका घेतल्या तर त्याचा फायदा होईल यामुळे युती सरकारच्या अशा पल्लवीत झाल्या. आणि लोकसभा व विधानसभा निवडणूका एकाच वेळी जाहीर झाल्या. आबासाहेबांच्या विधानसभा निवडणूकीसाठी तर सर्वसामान्य जनता व मतदार मतदान दिवसाची वाट पाहत होते. गावोगावी तसा प्रचार कार्यकर्त्यांनी केली होता. चांगल्या मताधिक्य घेऊन

आबासाहेब विजयी होणार अशा पैजाही गावोगावी लागल्या होत्या. त्याचे कारण १९९५ च्या विधानसभेच्या पराभवाचा वचपा लोकांना काढायचा होता. तेवढी जागृती मतदारांमध्ये झाली होती. मतदारांच्या अंतर्मनाचा ठाव घेण्याची क्षमता त्यांच्या अंगी होती. ' ओठात एक आणि पोटात एक ' असे कधीच त्यांनी केले नाही. आबासाहेब म्हणजे प्रेरणा देणारा अखंड स्फुर्तीचा झराच आहे. आबासाहेबांच्या कर्तृत्वामुळे त्यांच्या वक्तृत्वाला कमालीची धार आली होती. ती १९९९ च्या विधानसभा निवडणूकीच्या प्रचारा दरम्यान दिसून आली. १९९९ च्या विधानसभेची मतमोजणी सोलापूर येथे होती. गावोगावची लोक वाहणे करून होम मैदानावर थांबून होते. मतमोजणीला वेळ लागत होता. इकडे मतदारांचे ठोके वाढत होते. छातीत धडधड करीत होते. मतमोजणीच्या फेरीची आकडेमोड करत होते. पहिल्या फेरीपासूनच आबासाहेब आघाडीवर होते ते शेवटच्या फेरीपर्यंत आघडीवर राहिले. शेवटी ४०३३४ मतांनी विजया घोषित केल्यानंतर अनेकांनी अक्षरक्ष: आनंदोत्सव साजरा केला. त्यावेळी शरद पवार साहेबांनी कॉंग्रेस मधून बाहेर पडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला. १९९९ च्या विधानसभा निवडणूकीमध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला व भाजप शिवसेना युतीला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यावेळी शेतकरी कामगार पक्ष व डाव्या आघाडीचे ११ आमदार होते. त्यांना दोन्ही बाजूंनी आमंत्रणे होती. शिवसेना - भाजप युतीने तर आबासाहेबांना मुख्यमंत्री पदाची ऑफर दिली होती. परंतु त्यांनी ती धुडकावून लावली. आणि काँग्रेस व राष्ट्रवादी आघाडीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. अन् त्यावेळी आबासाहेब पणन व रोजगार हमी मंत्री पद घेतले. कारण आपल्या शक्यता व मर्यादा काय हे ओळखणारे होते. आपण काहीही करून चालणार नाही. १९९९ मध्ये मंत्री पदाची शपथ घेऊन आल्यानंतर प्रचंड जनसमुदाय त्यांच्या स्वागतासाठी सज्ज झाला होता. मेथवडे फाट्यापासून सांगोल्यापर्यंत रस्त्यांच्या दुतर्फा माणसेच माणसे होती. सांगोल्यामधून भव्य मिरवणूक काढून आनंद साजरा केला. तो हर्षाचा क्षण आजही मनाला व्यापून टाकतो. त्यावेळी लोकसभेला पंढरपूर मतदारसंघातून रामदास आठवले उभा होते. त्यावेळी चळवळीचा कार्यकर्ता म्हणून रामदास आठवले साहेबांना त्यांनी पाठिंबा दर्शविला. रामदास आठवले साहेबांकडून एक रूपयाही सांगोला मतदारसंघातील निवडणूकीचा खर्च म्हणून घेतला नाही. याउलट तालुक्यातील आपल्या कार्यकर्त्यांना स्वतः एक जीप भाड्याने करून प्रचार करावयास लावले. प्रचारा दरम्यान भाषणात आबासाहेब म्हणायचे माझ्यापेक्षा रामदास आठवले साहेबांना मते ज्यादा पडली पाहिजेत. आणि झालेही तसेच ! आणि विशेष म्हणजे आबासाहेबांपेक्षा रामदास आठवले साहेब यांना अधिकची मते मिळवून दिली. त्यावेळचा हा प्रसंग मनाला सुखद धक्का देणारा आहे.

निष्कर्ष:

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते गणपतराव देशमुख यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये फार मोठे योगदान आहे. १३ वेळा विधानसभेच्या निवडणूका त्यांनी लढवल्या पैकी ११ वेळा निवडून येण्याचा विश्वविक्रम त्यांना प्रस्थापित करता आला. एकच पक्ष, एकच मतदार संघ अन् एकच व्यक्ती तेही विरोधी पक्षात राहून लोकशाहीत सर्वाधिकवेळा निवडून येणारे माझ्या माहितीप्रमाणे देशात फक्त आबासाहेब एकमेव आहेत. ए. डी. पाटील यांच्या भाषेत सांगायचं म्हटलं तर तो त्यांच्या खिशातला (पॉकेटबरी, मनी) मतदारसंघ असल्याचं आबांनी सिद्ध केलं आहे. नातवांनी, वडिलांनी आणि आजोबांनी एकाच व्यक्तिला मतदान करणं ही एकमेवाद्वितीय घटना आहे. असा नेता महाराष्ट्रात सापडणे दुर्लभ आहे. हे सद्भाग्य जसे त्यांचे तसे मतदारांचेही ! सातत्याने विजयी होण्यासाठी कर्तव्य पार पाडत अनेक पिढ्यांचा दुवा ते मनापासून सार्थकी लावत आहेत. त्यांची विचारनिष्ठा, समाजाची बांधिलकी, संपर्कातील सातत्य, संवादातील शालीनता याबरोबरच निःस्वार्थी, निरपेक्ष व निःपक्ष जीवनाचा प्रभाव आजही जनमाणसांवर कायम आहे. २०१९ ची विधानसभा निवडणूक १९६२ पासून २०१९ पर्यंत ११ वेळा कार्यक्षम आमदार म्हणून कार्य केले. आपण आमदार व्हावे ही लालसा पूर्वीपासूनच नव्हती. लोककल्याणसाठी आपले सबंध आयुष्य त्यांनी झोकून दिले होते. २०१४ ची निवडणूक ही त्यांनी लोक आग्रहास्तव लढविली होती. परंतु विधानसभेच्या निवडणूका जवळ आल्या की, आबासाहेब तुम्हीच ! अशी सर्वसामान्य भाग्यवान जनता म्हणते. २०१९ च्या विधानसभा निवडणूकीचे ढोल वाज लागले. पुन्हा एकदा आबासाहेबांनी निवडणूक लढवावी अशी मतदार आणि कार्यकर्त्यांचीही अपेक्षा होती. त्यादृष्टीने कार्यकर्ते कामाला

लागले. जिल्हा परिषद गट निहाय कार्यकत्यांच्या बैठका घेऊन निवडणूकीची तयारी चालू केलेली होती. ते अनेक वेळा म्हणत माझ्या हयातीत शेतकरी कामगार पक्षाचा उमेदवार निवडून आणायचा. हा विचार ते प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीमध्ये सारखेच बोलून दाखव असत. शेका पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आपआपसातले मतभेद विसरून काम केले तर पुढील २५ वर्षे पक्षाचा आमदार राहणार, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. वय झाल्याने कोणत्याही परिस्थितीत आपण निवडणूक लढवावयाची नाही.

संदर्भसूची:

1. मा. आमदार गणपतराव देशमुख यांचे परिचय पत्रातून
2. पाणीदार - डॉ. सुधीर भोंगळे.
3. कृष्णकाठ- यशवंतराव चव्हाण.
4. पन्नालाल सुराणा, लिगाडे नानासो संपादकीय "झेपणारा ग्रामीण महाराष्ट्र"
5. राजकारणातील मापदंड भाई गणपतराव देशमुख- डॉ.किसन माने.
6. ठाकूर किरण- संपा तरुण भारत(दिवाळी विशेषांक 2014) आम्ही विक्रमवीर
7. माधवराव चितळे "पाणी आणि आपण" लोकराज्य ऑगस्ट 2011
8. www.electioncommission.Maharashtra.com

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत महिलांचे योगदान

योगेंद्र अशोक ठाकरे
राज्यशास्त्र विभाग, कळवण एज्युकेशन सोसायटी संचालित, कला,
वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कळवण (मानूर)
Corresponding Author- योगेंद्र अशोक ठाकरे
Email: yogen19thakare@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.11178228

गोषवारा :

भारतीय राज्यघटना जगातील सर्व लिखित राज्यघटनांपैकी सर्वात मोठी घटना आहे. ती एक विस्तृत ,सर्वसमावेशक व तपशीलवार दस्तऐवज आहे. भारतीय राज्यघटना भारतीय शासनसंस्थेचा 'मूलभूत कायदा' आहे. त्यात नागरिकांचे मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्ये आणि राज्य धोरणाचे मार्गदर्शक तत्वे, तसेच घटनात्मक आराखड्याची म्हणजेच विविध स्तरावरील शासकीय संरचनेची आणि अंगांची तरतूद केली आहे. त्यामुळे देशाच्या शासनांमध्ये राज्यघटना अत्यंत मूलभूत आहे.

भारतीय राज्यघटनेची निर्मिती प्रक्रियेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर,डॉ. राजेंद्र प्रसाद ,पंडित जवाहरलाल नेहरू आणि सरदार वल्लभाई पटेल यांच्यासह असलेल्या (सुरुवातीचे ३८९) २९९ सदस्यांपैकी १५ सदस्य या महिला होत्या. त्यांनी घटना समितीच्या सर्व चर्चांमध्ये अनेक विषयांवर सांगोपांग चर्चा करून निर्भीडपणे मते मांडली. त्यांनी मांडलेल्या अनेक सूचना पुढे जाऊन घटनेच्या कलमांमध्ये परावर्तित झाल्या. जरी संविधान सभेत त्यांचे प्रतिनिधित्व तुलनेने मर्यादित होते तरी राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये या महिलांचे योगदान महत्त्वाचे होते. या महिलांनी संविधानाला आकार देण्यात आणि महिलांच्या हक्कांसाठी वकिली करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.या शोधनिबंधात भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये महिलांच्या योगदानाबद्दल चर्चा करण्यात आली आहे.

की वर्ड: कर्तव्ये, संविधान सभा /घटना समिती, अल्पसंख्याक , महिलांचे राज्यघटना निर्मितीतील योगदान

प्रस्तावना :

भारतीय राज्यघटना जगातील सर्व ज्ञात घटना गुंडाळून तयार करण्यात आलेला महत्त्वाचा दस्तऐवज आहे. या संविधानाची निर्मिती करण्यासाठी संविधान सभेची मागणी स्वतंत्रपूर्व काळात करण्यात आली होती. त्याला अनुसरून कॅबिनेट मिशन प्लॅन (त्रिमंत्री योजना) मधील तरतुदींमध्ये संविधान सभेची रचना निश्चित करण्यात आली या रचनेत संविधान सभेत एकूण ३८९ सदस्य असतील त्यापैकी २९२ सदस्य ११ ब्रिटिश प्रांताकडून,४ सदस्य चीफ कमिशनरच्या प्रांतांकडून निवडून दिले जातील, तर ९३ सदस्य भारतीय संस्थानिकांचे प्रतिनिधी असतील असे निश्चित करण्यात आले. ब्रिटिश प्रांतांना देण्यात आलेल्या २९६ जागांसाठी निवडणूक जुलै-ऑगस्ट १९४६ मध्ये घेण्यात आली. हे सदस्य अप्रत्यक्षपणे प्रांतिक कायदे मंडळाच्या निर्वाचित सदस्यांकडून निवडून दिले गेले. संविधान सभा जरी प्रत्यक्ष प्रौढ मतदानाच्या आधारावर निवडण्यात आली नाही, तरी भारतीय समाजाच्या सर्व गटांना तिच्यात प्रतिनिधित्व मिळाले. भारताची फाळणी झाल्यानंतर संविधान सभेची सदस्य संख्या ३८९ वरून २९९ इतकी कमी झाली. ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. संविधान सभेत तत्कालीन भारतातील जवळजवळ सर्व प्रमुख, महत्त्वाचे व अनुभवी व्यक्तिमत्वे संविधान सभेचे सदस्य होते. या सर्वांमध्ये १५ महिला सदस्य होत्या. त्यांनी संविधान निर्मिती प्रक्रियेत महत्त्वपूर्ण योगदान दिले. महिला सदस्यांमध्ये काही महिला राजकन्या होत्या तर काहींनी परदेशात शिक्षण घेतले होते. काही शिक्षका तर काही वकील होत्या. संविधान सभेतील महिला त्या काळातील महिलांचे नेतृत्व करत होत्या. या महिलांच्या संविधान निर्मितीतील योगदानाचा अभ्यास प्रस्तुत संशोधन निबंधात केला आहे .

संविधान निर्मिती प्रक्रियेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या उल्लेखनीय महिला

१. अम्मुकुट्टी स्वामीनाथन: केरळमधील अम्मुकुट्टी स्वामीनाथन या मद्रास प्रांतातून संविधान सभेवर निवडून आल्या होत्या. १९१७ मध्ये मद्रास मध्ये त्यांच्या इतर सहकाऱ्यांसोबत त्यांनी 'वुमेन इंडिया असोसिएशनची' स्थापना करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.त्यांनी राज्यसभा सदस्य, 'भारत स्काऊट आणि गाईड'च्या अध्यक्ष,

फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीसच्या उपाध्यक्ष, सेंसर बोर्डाचे अध्यक्ष इत्यादी पदे भूषवली होती. १९७५ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला वर्षात त्यांना 'मदर ऑफ द इयर' म्हणून देखील निवडले गेले होते.

राज्यघटनेच्या विस्तृत स्वरूपावर त्यांनी आक्षेप घेतला होता. त्याचबरोबर खऱ्या अर्थाने लोकशाही येण्यासाठी राज्यघटनेची व्यवस्थित अंमलबजावणीची त्यांनी अपेक्षा व्यक्त केली होती.२४ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधानाचा मसुदा मंजूर करण्यावर झालेल्या चर्चेदरम्यान अम्मू यांनी म्हटले होते की, 'भारत आपल्याच स्त्रियांना समान अधिकार देत नाही, असे परकीयांचे मत आहे ,पण आपण आता असे म्हणू शकतो की जेव्हा भारतीय लोकांनी स्वतःची संविधान रचना केली.तेव्हा त्यांनी देशातील इतर नागरिकांसारखे स्त्रियांना पण अधिकार दिले आहेत'. संविधान सभेच्या समाप्तीनंतर सुद्धा राष्ट्रीय राजकारणात यांचा सक्रिय सहभाग होता.

२. ॲनी मास्करीन: स्वातंत्र्यसैनिक, राजकारणी आणि वकील असलेल्या ॲनी मास्करीन या त्रावणकोर-कोचीन या मतदारसंघातून संविधान सभेच्या सदस्य होत्या. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सामील झालेल्या त्रावणकोर राज्यातील पहिल्या महिलांपैकी त्या एक होत्या आणि त्रावणकोर राज्य काँग्रेस कार्यकारिणीचा भाग बनलेल्या त्या पहिल्या महिला होत्या. त्यांच्या राजकीय सक्रियतेमुळे त्यांना अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला होता. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात पण त्यांचा सहभाग होता, पहिल्या भारतीय सार्वत्रिक निवडणुकीत तिरुवनंतपुरम लोकसभा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आल्या होत्या, त्या केरळमधून लोकसभेवर निवडल्या गेलेल्या पहिल्या महिला खासदार होत्या.

केंद्र व प्रांत यांच्यातील सत्ता वाटपामध्ये संतुलन राखण्याची त्यांनी आवश्यकता व्यक्त केली होती ,तसेच केंद्रीकरण महत्त्वाचे आहे पण लोकशाहीच्या नंतरच्या टप्प्यावर करावे. असे मत त्यांनी संविधान सभेत मांडले होते.

३. बेगम एजाज रसूल: त्या मुस्लिम लिगच्या कार्यकर्त्या व राजकारणी होत्या. संयुक्त प्रांतातून त्या संविधान सभेवर निवडून आल्या होत्या. बेगम एजाज रसूल या घटना समितीतल्या एकमेव मुस्लिम स्त्री सदस्य होत्या. १९५० मध्ये भारतातील मुस्लिम लिग खारीज झाल्यानंतर त्यांनी काँग्रेस पक्षाचे सदस्यत्व स्वीकारले. १९५२ मध्ये त्या राज्यसभेवर निवडून आल्या १९६९ ते १९९० पर्यंत त्या उत्तर प्रदेश विधानसभेच्या सदस्या होत्या. १९६९ ते १९७१ या काळात त्या समाज कल्याण आणि अल्पसंख्याक मंत्री होत्या, त्यानंतर २००० साली त्यांना सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

संविधान सभेत त्या अल्पसंख्याकांचे अधिकार समितीच्या सदस्य होत्या. मुसलमानांना धर्माच्या आधारावर संसदेत राखीव जागा असू नयेत यासाठी त्यांनी आग्राह धरला कारण, धर्माच्या नावावर निवडणुका खेळल्या जातील अशी भीती त्यांना होती. तसेच धर्माच्या आधारावर एखाद्या व्यक्तीची देशनिष्ठा किंवा देशभक्ती या बाबी मोजल्या जाऊ नयेत त्यांचे मत होते. संसदेत जेव्हा ही एखादे विधेयक मंजूर होईल आणि मान्यतेसाठी राष्ट्रपतींच्याकडे जाईल, त्यावेळी राष्ट्रपतींच्या विवेकाधिकावर सुद्धा नियंत्रण असावे ही त्यांची सूचना मान्य केली गेली. अशा प्रकारच्या काही ठोस निर्णयांचे कायद्यात रूपांतर होण्यात बेगम रसूल यांच्या सूचनांचे फार मोठे योगदान आहे. त्याचबरोबर मंत्र्यांना आपल्या कार्यकाळात ठसा उमटविण्याचा अवकाश उपलब्ध होण्याइतपत कार्यकाळ मिळावा असे त्यांनी सुचवले. तसेच राष्ट्रकुल मधील भारताच्या सदस्यत्वाला त्यांनी पाठिंबा दर्शवला होता.

४. दक्षयानी वेलायुदन: कोचीन मतदारसंघातून संविधान सभेवर आलेल्या दक्षयानी वेलायुदन या संविधान सभेतील एकमेव दलित स्त्री सदस्य होत्या. त्या व्यवसायाने शिक्षिका होत्या आणि भारतातील पहिल्या अनुसूचित जाती पदवीधर आणि विज्ञान पदवीधर होत्या. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा त्यांच्यावर पगडा होता. त्यांनी नेहमी समतेचे विचार मांडले.

आपण फक्त संविधानाची निर्मिती करू नये तर सर्वसामान्यांना जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन बहाल करावा आणि संविधान निर्मिती बरोबरच समाज परिवर्तनाचे काम व्हावे असे त्यांचे मत होते. घटनेत अस्पृश्यता, सक्तीचे श्रम आणि वेठबेगारी यासारखे प्रकार गैरकायदेशीर ठरविण्यात यावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. दलितांना राजकीय क्षेत्रात आरक्षण दिले तर आपण वसाहतवादाप्रमाणे विभागले जाऊ व गुलामगिरीच्या शोषणातून मुक्तच होणार नाही असे त्यांचे मत होते. संविधानाचा मसुदा तयार झाल्यानंतर तो भारताच्या जनतेसमोर मांडावा सार्वत्रिक निवडणुकीद्वारे मंजुरी मिळाल्यानंतर संविधानाचा अंतिम मसुदा स्वीकारला जावा असेही त्यांनी सुचविले. संविधानाचा मसुदा चर्चेसाठी सादर केला तेव्हा त्यांनी प्रांतांना अधिकार असण्याचे समर्थन करत अधिक विकेंद्रीकरणाचे आव्हान केले. त्यांनी भारताच्या हंगामी संसदेच्या सदस्य म्हणून ही काम केले.

५. दुर्गाबाई देशमुख: भारतीय संविधान सभेवर त्यांची निवड मद्रास प्रांताच्या प्रतिनिधी म्हणून झाली होती. दुर्गाबाई देशमुख या भारतीय स्वातंत्र्यसैनिक, सामाजिक कार्यकर्त्या आणि वकील होत्या. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी गांधीजींचे अनुयायी म्हणून काम केले. मिठाच्या

सत्याग्रहात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. महिलांना संघटित करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. १९३६ मध्ये त्यांनी 'आंध्र महिला सभेची' स्थापना केली. सेंट्रल बोर्ड ऑफ सोशल वेलफेअर, नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन, मुली आणि महिलांच्या शिक्षणावरील राष्ट्रीय समिती आणि अंध मदत संघ अशा विविध केंद्रीय संस्थांच्या त्या अध्यक्षा होत्या. नामांकनाद्वारे त्या नियोजन आयोगाच्या सदस्या झाल्या होत्या. कौटुंबिक प्रकरणांमध्ये जलद न्यायासाठी स्वतंत्र कौटुंबिक न्यायालयांच्या गरजेवर चर्चा करणाऱ्या त्या पहिल्या होत्या. अनेक समाज कल्याण धोरणे पार पाडण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. १९७५ मध्ये त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

मसुदा समितीच्या अध्यक्ष मंडळावर त्या एकमेव स्त्री सदस्य होत्या. निराधार मुल आणि युवक यांचे संरक्षण व विविध प्रकारच्या शोषणातून मुक्ती याबाबतच्या तरतुदी राज्यघटनेत समाविष्ट करण्याबाबत त्या आग्रही होत्या. वनचर प्राणी आणि पक्षी यांच्या संरक्षणासाठी स्वातंत्र संवैधानिक कायदे असावेत, ही सूचना त्यांनी केली. त्यांच्या सूचनेचा प्रभाव ४२ व्या घटनादुरुस्तीनंतर कलम ३९(फ) दिसून येतो. राज्यपालांची निवड थेट निवडणूक पद्धतीने झाली तर ,या निवडीचे राजकारण होईल म्हणून राज्यपालांची निवड राष्ट्रपतींनी करावी. तसेच उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश हे स्वतंत्र भारताचे नागरिक असावेत. या बाबी त्यांच्या सूचनेनुसार संविधानात नमूद करण्यात आल्या. संविधानाच्या संरक्षणाची अंतिम जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाची असावी असे त्यांचे मत होते. नवीन राज्यांमध्ये उच्च न्यायालयाची स्थापना तसेच राज्यसभेच्या सदस्यतासाठी वयोमर्यादा ३५ वर्ष ऐवजी ३० वर्षे असावी इत्यादी मुद्दे त्यांनी उपस्थित केले.

दुर्गाबाई देशमुख यांचा राष्ट्रभाषेबाबतचा दृष्टिकोन देखील सर्व समावेशक होता. सर्वसामान्यांना समजेल अशी हिंदी आणि उर्दू भाषेचे मिश्रण असलेल्या 'हिंदुस्तानी' भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा देऊन, हिंदी भाषा कार्यालयीन कामकाजांमध्ये वापरली जावी. तसेच घटनेच्या कलमांमध्ये 'कोणत्याही' या शब्दाऐवजी 'सर्व' हा शब्द वापरावा असे त्यांचे मत होते.एकूणच काही कलामांबाबतची संदिग्धता व किचकटपणा कमी होऊन अधिकाधिक स्पष्टता आणण्यावर त्यांचा भर होता.

६. हंसा जीवराज मेहता : हंसा मेहता बॉम्बे प्रांतामधून घटना समितीवर पोहोचलेल्या एकमेव महिला होत्या. त्यांनी इंग्लंडमध्ये पत्रकारिता आणि समाजशास्त्राचे शिक्षण घेतले होते. त्या सामाजिक कार्यकर्त्या, शिक्षणतज्ञ आणि लेखिका होत्या त्यांनी मुलांसाठी गुजराती मध्ये अनेक पुस्तके लिहिली आणि गुलीव्हर ट्रॅव्हल्ससह अनेक इंग्रजी कथांचे भाषांतर केले. १९४५-४६ मध्ये त्या अखिल भारतीय महिला परिषदेच्या अध्यक्षा होत्या.

मूलभूत अधिकार उपसमिती , सल्लागार समिती, प्रांतिक संविधान समिती आणि राष्ट्रध्वज समितीच्या त्या सदस्य होत्या. १९४८ मध्ये त्यांनी भारतीय स्त्रियांचे अधिकार व कर्तव्ये यासंबंधी मसुदा तयार केला होता. या मसुद्याचा प्रभाव संयुक्त राष्ट्रसंघाने मंजूर केलेल्या १९४८ च्या मानवाधिकार जाहीरनाम्यावर दिसून येतो.

हंसाबेन मेहता यांची घटना समिती समोरील महत्त्वपूर्ण मागणी म्हणजे 'समान नागरी कायदा' हा मूलभूत अधिकाराचाच अविभाज्य भाग असावा ही होय. या मागणीला मूलभूत अधिकार समितीने दुजोराही दिला मात्र काही बड्या नेत्यांच्या विरोधामुळे व सल्लागार समितीने ठाम भूमिका न घेतल्यामुळे हंसाबेन मेहता यांची घोर निराशा झाली. त्यांनी स्त्री पुरुष समानतेच्या तत्त्वाला आपल्या भाषणात नेहमीच अग्रक्रम दिला होता. तसेच स्पष्टपणे महिला आरक्षणाचा विरोध केला त्याबाबत म्हणाल्या होत्या की, स्त्रियांना विशेष सवलती व आरक्षणापेक्षा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाची अपेक्षा आहे. अनुसूचित जातींचा अपवाद करून अल्पसंख्याकांच्या आरक्षणाला देखील त्यांचा विरोध होता. कोणत्याही प्रवर्गासाठी आरक्षणाची तरतूद ही लोकशाहीला मारक ठरेल असे त्यांचे मत होते. १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री भारताचा ध्वज राजेंद्र प्रसादांच्या हस्ते राष्ट्राला अर्पण करण्याची जबाबदारी हंसाबेन यांच्यावर सोपवण्यात आली होती. त्यांची निवड संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवाधिकार आयोगावर झाली होती पुढे त्या आयोगाच्या उपाध्यक्ष बनल्या तेथे त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

७. पूर्णिमा बॅनर्जी: पूर्णिमा बॅनर्जी या संयुक्त प्रांतातून संविधान सभेवर निवडून आल्या होत्या. त्या अलाहाबाद येथील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या सचिव होत्या. सत्याग्रह या तत्त्वावर त्यांचा गाढा विश्वास होता गांधीजींच्या सत्याग्रह आणि भारत छोडो आंदोलनात सहभागी झाल्याबद्दल त्यांना अटक करण्यात आली होती. पूर्णिमा बॅनर्जी या समाजवादी विचारसरणीच्या पुरस्कर्त्या होत्या.

शिक्षण आणि रोजगार या दोन गोष्टी मूलभूत अधिकारात समाविष्ट असाव्यात याबाबत त्या आग्रही होत्या. त्यांच्या प्रत्येक चर्चेत 'धर्मनिरपेक्षता' हा मुद्दा केंद्रस्थानी असे. त्यांच्या मते अनुदानित शाळांमधील अभ्यासक्रमात धर्माचा तुलनात्मक अभ्यास समाविष्ट केल्यास विद्यार्थ्यांना धर्माचे मूळ तत्वज्ञान माहित होईल आणि धर्माबाबतच्या संकुचित संकल्पनेला आळा बसेल, तसेच विद्यार्थी 'सर्वधर्मसमभाव' या मूल्याचा पुरस्कार करतील. शाळांमधील धार्मिक शिक्षणांवर राज्याचे नियंत्रण असावे तसेच राज्याचे अर्थसहाय्य मिळवणाऱ्या शाळांमध्ये धार्मिक भेदभाव नको असे त्यांचे मत होते. राज्यसभेची

भूमिका व उपयोगीता याबाबत त्या अधिक सजक होत्या. त्यांच्या मते राज्यसभेतील सदस्यांची नियुक्ती राजकीय संबंधांच्या बळावर व आर्थिक श्रीमंतीच्या आधारावर होऊ नये, यासाठी कायदेशीर तरतूद असावी. कारण अशा पार्श्वभूमीतून आलेले सदस्य राष्ट्रहितासाठी केलेल्या कायद्यांची मंजुरी व अंमलबजावणी मध्ये बाधा आणू शकतात. संविधान स्वीकृतीच्या वेळी त्यांनी केलेल्या भाषणात देशातील मौल्यवान खनिजे व महत्त्वपूर्ण उद्योगधंद्यांवर सरकारचे पूर्णतः नियंत्रण असावे, या क्षेत्राचे खाजगीकरण होऊ नये. तसेच या क्षेत्रात विदेशी संचार नसावा अशी त्यांची अपेक्षा होती. आजची परिस्थिती पाहता त्यांच्या विचारातील दुरदृष्टीची कल्पना येते. त्यांना प्रस्तावनेतून 'सार्वभौम' हा शब्दही वगळायचा होता. फक्त दर पाच वर्षांनी जनतेला मतदानाचा अधिकार देऊन सार्वभौम शब्द वापरणे योग्य नाही असे त्यांचे मत होते. लोकसेवकांना कार्यकाळाची हमी देणाऱ्या वैधानिक तरतुदी असू नयेत असे त्यांचे मत होते.

८. रेणुका रे (मुखर्जी): पश्चिम बंगाल प्रांताच्या प्रतिनिधी म्हणून रेणुका रे यांची संविधान समितीवर निवड झाली होती. त्या भारतीय सामाजिक कार्यकर्त्या व राजकारणी होत्या. त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून शिक्षण घेतले होते. भारतात आल्यानंतर त्या अखिल भारतीय महिला परिषदेमध्ये सामील झाल्या. १९३२ मध्ये त्या अखिल भारतीय महिला परिषदेच्या अध्यक्ष झाल्या. १९४३ ते १९४६ पर्यंत त्या केंद्रीय विधानसभेच्या सदस्य होत्या. त्या भारताच्या हंगामी संसदेच्याही सदस्य होत्या. तसेच १९५२ ते १९५७ पर्यंत पश्चिम बंगाल विधानसभेत मदत आणि पुनर्वसन मंत्री म्हणून त्यांनी काम केले. १९५८ साली त्या लोकसभेच्या सदस्य म्हणून संसदेत निवडून आल्या होत्या. नियोजन आयोगाच्या सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले होते.

शिक्षणामध्ये धर्मनिरपेक्षता असावी असे त्यांचे स्पष्ट मत होते कलम २८ च्या निर्मितीच्या वेळी चर्चेत भाग घेताना त्यांनी शिक्षण क्षेत्रात शासनमान्य अनुदानित संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षण घेण्याची शक्ती नसावी अशी सूचना मांडली व ती मान्य केली गेली. चीनप्रमाणे भारताने अर्थसंकल्पात शिक्षणावरील खर्चासाठी ठराविक रकमेची तरतूद करावी अशी त्यांनी सूचना केली होती. तसेच दुहेरी नागरिकत्वला त्यांचा विरोध होता. देशाची एकता व अखंडता अबाधित राखायची असेल तर एकल नागरिकत्वाचा स्वीकार करावा असे त्यांचे म्हणणे होते. कलम 23 वर चर्चेच्या वेळी त्या म्हटल्या होत्या की, देवदासी आणि वेश्यावृत्ती या देशातील अतिशय गंभीर समस्या आहेत, त्यांचे निर्मूलन करण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न झाले पाहिजेत. महिला व अल्पसंख्याकांच्या आरक्षणाला त्यांचा विरोध होता पण अल्पसंख्याकांना पुरेशी प्रतिनिधित्व मिळावे याबाबत त्या आग्रही होत्या. राज्याने मान्यता दिलेल्या संस्था देखील राज्याच्या नियंत्रणाखाली असाव्यात असे त्यांचे मत होते. पालकांच्या मालमत्तेमध्ये महिलांना वारसा हक्क मिळवा यासाठीही त्यांनी कठोर परिश्रम घेतले.

९. सरोजिनी नायडू: संविधान सभेत सरोजिनी नायडू बिहार प्रांताचे प्रतिनिधित करत होत्या. सरोजिनी नायडू या स्त्रीवादी आणि कवयित्री होत्या. त्या बुलबुल-ए-हिंद या नावाने ही ओळखल्या जातात. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. १९२५ मध्ये कानपूर अधिवेशनात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षपदी विराजमान झालेल्या त्या पहिल्या भारतीय महिला होत्या. तसेच सरोजनी नायडू यांची संयुक्त प्रांताच्या राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्या भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल होत्या. भारतीय राष्ट्रध्वज समितीच्या त्या सदस्य होत्या. राष्ट्रध्वज स्वीकृतीच्या वेळी त्यांनी केलेल्या भाषणात त्या म्हणाल्या होत्या की, जात-धर्म ,स्त्री-पुरुष या आधारे देशाचे प्रतिनिधित्व निवडले जाऊ नये.

१०. विजयालक्ष्मी पंडित: संयुक्त प्रांतातून त्यांची घटना समितीवर निवड करण्यात आली होती. त्या भारतीय मुसद्दी आणि राजकारणी होत्या. १९५३-१९५४ च्या काळात संयुक्त राष्ट्राच्या आमसभेच्या आठव्या अध्यक्ष आणि १९६२ ते १९६४ काळात महाराष्ट्राच्या सहाव्या राज्यपाल म्हणून त्यांनी काम केले होते. यापैकी कोणत्याही पदावर असणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या. स्वातंत्रपूर्व भारतात पण विजयालक्ष्मी पंडित या पहिल्या भारतीय महिला होत्या ज्यांनी मंत्री पद भूषवले होते. संयुक्त प्रांतात त्यांनी स्थानिक स्वराज्य आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री म्हणून हे काम बघितले होते. रशियातील भारतीय दूत म्हणून त्यांची नेमणूक झाल्यामुळे त्यांनी घटना समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. संविधान समिती समोर त्यांचे केवळ एकमेव भाषण झाले होते. या भाषणात 'वसाहतवादातून मुक्त होऊन इच्छिणाऱ्या अनेक देशांतील जनतेसमोर भारतीय संविधान प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरेल' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता.

११. सुचिता कृपलानी: संयुक्त प्रांतातून त्या संविधान सभेवर निवडून गेल्या होत्या. त्यांनी १९४० मध्ये काँग्रेस पक्षाच्या महिला शाखेची स्थापना केली होती.१९४२ च्या भारत छोडो आंदोलनातील त्यांच्या भूमिकेसाठी त्या विशेषतः लक्षात ठेवल्या जातात. फाळणीच्या दंगली दरम्यान त्यांनी महात्मा गांधींसोबत जवळून काम केले होते. स्वातंत्र्यानंतर कृपलानी यांच्या राजकीय कार्यकाळात नवी दिल्लीचे खासदार म्हणून आणि नंतर उत्तर प्रदेश राज्य सरकार मध्ये कामगार, समुदाय विकास आणि उद्योग मंत्री म्हणून काम केले. त्या उत्तर प्रदेशच्या चौथ्या मुख्यमंत्री होत्या तर स्वातंत्र्य भारतातील पहिल्या महिला मुख्यमंत्री होत्या.

त्यांनी घटना समितीत 'वंदे मातरम'चे ध्रुवपद, 'सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ताँ हमारा' या गीताच्या काही

ओळी आणि 'जनगणमन अधिनायक जय हे' या राष्ट्रगीताचे ध्रुवपद पहिल्यांदा गायिले. भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करणाऱ्या उपसमितीच्या त्या सदस्य होत्या. तसेच भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वांचा मसुदा तयार करणाऱ्या गटातही त्यासामील होत्या. भारतीय राष्ट्रध्वज निर्मितीतही त्यांनी सहकार्य केले होते.

१२. कमला चौधरी: कमला चौधरी संयुक्त प्रांतातून संविधान सभेवर निवडून आल्या होत्या. त्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सदस्या, राजकारणी आणि हिंदी लघुकथा लेखिकाही होत्या. १९३०मध्ये गांधीजींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. भारतीय स्वातंत्र्य चळवळ दरम्यान त्यांना अनेक वेळा तुरुंगवास भोगावे लागला. ५४ व्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाच्या उपाध्यक्षा म्हणूनही त्यांनी काम केले होते. त्या हंगामी संसदेच्या सदस्या होत्या. घटना समितीतील त्यांचे योगदान राष्ट्रध्वज समिती पुरतेच मर्यादित होते.

१३. लीला रॉय: त्या घटना समितीत पश्चिम बंगाल प्रांताचे प्रतिनिधी करीत होत्या. त्या भारतीय सामाजिक कार्यकर्त्या आणि पुरोगामी राजकारणी होत्या. त्यांनी सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला होता. त्यांना सहा वर्ष तुरुंगवास भोगावा लागला होता . १९३८ मध्ये त्यांनी बंगाल प्रांतिय काँग्रेस महिला संघटनेची स्थापना केली होती, त्यांची राष्ट्रीय काँग्रेस नियोजन समितीवर नियुक्ती करण्यात आली होती. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात ही त्यांचा सहभाग होता. घटना समितीत त्या फार काळ रमल्या नाहीत. भारत आणि पाकिस्तानच्या फाळणीमुळे त्यांनी उद्विग्नतेने आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता.

१४. मालती चौधरी: मालती चौधरी ओरिसा प्रांतातून संविधान सभेवर निवडून आल्या होत्या. त्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यकर्त्या आणि गांधीवादी होत्या. मिठाच्या सत्याग्रहात व भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्या होत्या . सत्याग्रहासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांनी शिक्षण आणि संवादाची तत्त्वे वापरली.१९३३ मध्ये आपल्या पतीसोबत त्यांनी उत्कल काँग्रेस समाजवादी कर्मी संघाची स्थापना केली होती. १९३४ मध्ये त्यांनी गांधीजींसोबत ओरिसातील पदयात्रेत भाग घेतला होता. स्वातंत्र्य चळवळीत त्यांना अनेकदा तुरुंगवास भोगावा लागला. स्त्रियांमधील अंधश्रद्धा व त्यामुळे त्यांना होणारा त्रास त्यातून त्यांची सुटका व्हावी यासाठी सामाजिक सुधारण्याचे कायदे व्हावे यासाठी त्या आग्रही होत्या. इतर देशांच्या राज्यघटनांचा आधार घेऊन आपली घटना तयार करण्याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली होती.

१५. राजकुमारी अमृत कौर: मध्य प्रांत आणि बेरार प्रांताच्या त्या प्रतिनिधी होत्या. त्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यकर्त्या आणि राजकारणी होत्या. त्या सोळा वर्ष महात्मा गांधींच्या सचिव होत्या. संविधान सभेतील मूलभूत अधिकार उपसमिती ,अल्पसंख्याक उपसमिती, वित्त आणि कार्मिक समिती, सल्लागार समिती, प्रांतिक घटना समिती आणि राष्ट्रध्वज समिती इत्यादी समितीच्या त्या सदस्य होत्या. आपला राष्ट्रध्वज फक्त खादी कापडाचा आणि हाताने विणलेल्या सुताचाच असावा हा त्यांचा आग्रह संविधान समितीने मान्य केला. पृथक निर्वाचन (सेपरेट इलेक्टोरेट) पद्धतीला त्यांचा विरोध होता. संविधान सभेच्या सदस्य या नात्याने त्यांनी भारतातील समान नागरी संहितेच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला. तसेच त्यांनी सार्वत्रिक मताधिकाराची वकिली केली होती. त्या भारताच्या पहिल्या आरोग्य मंत्री होत्या आणि त्यांनी दहा वर्ष हा पदभार सांभाळला, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (AIIMS) संस्थेची स्थापना त्यांनी केली होती.

समारोप :

भारतीय संविधान हे भारताच्या लोकशाही व्यवस्थेचा पाया आहे. ते मूलभूत हक्कांचे रक्षण करते. सामाजिक,आर्थिक आणि राजकीय न्यायाला चालना देते आणि सरकारच्या कामकाजाला मार्गदर्शन करते. त्याची व्याप्ती आणि महत्त्व शासन आणि नागरिक कल्याणाच्या सर्व पैलूंपर्यंत विस्तारित आहे. ज्यामुळे ते राष्ट्रातील न्याय, समानता आणि स्वातंत्र्याच्या आदर्शांचे समर्थन करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज बनते.

वरील माहितीच्या आधारे समारोपाच्या टिपण्यांमध्ये आपण असे म्हणू शकतो की, भारतीय स्वातंत्र्य चळवळीपासून भारताच्या संविधान निर्मितीमध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. संविधान सभेत महिलांच्या सहभागामुळे घटनेत समानता प्राप्त होण्यास मदत झाली आणि या १५ महिलांच्या सहभागामुळे भविष्यात महिलांना संधी आणि राजकीय स्थानाची समानता आली. महिलांवर होणारे अन्याय कमी झाले, त्यामुळे महिलांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून देशाला प्रगतीच्या मार्गावर नेले.

संविधान सभेच्या इतर सदस्यांसह या महिलांनी भारतीय राज्यघटनेतील महिलांचे हक्क, समानता आणि सामाजिक न्यायाशी संबंधित तरतुदींना आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी स्त्री-पुरुष समानतेचे समर्थन केले, महिलांच्या हक्कांसाठी लढा दिला आणि संविधानात सर्व नागरिकांसाठी न्याय आणि सर्वसमावेशकतेची तत्त्वे प्रतिबिंबित होतील याची खात्री केली.

भारतीय राज्यघटना निर्मितीत महिलांचे योगदान ओळख व त्याच्या सहभाग महत्त्वाचा आहे. कारण त्यांच्या प्रयत्नांनी भारतातील महिलांच्या हक्कांच्या प्रगतीचा पाया घातला गेला आणि पुढील पिढ्यांना राजकारण व समाजकारणातील सहभाग वाढीबाबत व सामाजिक न्यायासाठी प्रयत्नांची प्रेरणा मिळाली .

संदर्भ:

1. नारायण लक्ष्मी (2015), महिलांचे मानवी हक्क, समस्या आणि दृष्टीकोन, डीएनडी पब्लिशर्स, जयपूर.
2. अनुराधा बिस्वास (2013), वुमन राइट्स अँड प्रिव्हिलेजेस इन इंडिया, आराइज पब्लिशर्स आणि डिस्ट्रिब्युटर्स, नवी दिल्ली.
3. कौर मनमोहन, भारतातील स्वातंत्र्य चळवळीत महिलांची भूमिका, प्रकाशन विभाग, दिल्ली.
4. जाधव तुकाराम व पाटील मल्हार, प्रथमावृत्ती (जानेवारी २०११), भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतिबंध, खंड -१ भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, द युनिट ॲकॅडमी, पुणे.
5. लक्ष्मीकांत एम. (गोखले श्रीकांत यांनी केलेले भाषांतर) पहिली आवृत्ती (2017), भारतीय राजकारण, के. एस. सागर
   पब्लिकेशन्स, पुणे.
6. कोळंबे रंजन, तृतीय आवृत्ती (मार्च, २०२२), भारतीय राज्यघटना आणि प्रशासन, भगीरथ प्रकाशन, पुणे.
7. www.indianexpress.com
8. www.indiatoday.in

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

स्त्रीवाद

अश्विनी भाऊरावजी चौधरी
राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर,
नागपूर विदयापिठ नागपूर, महाराष्ट्र
Corresponding Author- अश्विनी भाऊरावजी चौधरी
Email: chaudharipuja027@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.11178237

सारांशः

स्त्रीवाद म्हणजे काय आणि काय नाही, या बद्दलच्या संकल्पना स्पष्ट असल्या तरीही स्त्रीवादी असल्याचे अभिमानाने सांगता येईल. स्त्रियांचे आंदोलन म्हणजे पुरूषांविरूध्द सुड उगवणे नाही, तर स्त्रियांना न्याय हवा आहे. पण अन्यायाचा प्रतिकार अन्यायाने करता येणार नाही यांची त्यांना जाणीव आहे. एका दमनचक्राचे उत्तर दुसरे दमनचक्र असू शकत नाही. स्त्रीवाद पुरूषांना दोष देत नाही, तर पुरूषत्ताक व्यवस्थेला दोष देतो. पुरूषसत्ताक व्यवस्थेमुळे पुरूष हा स्त्रीपेक्षा श्रेष्ठ आहे, स्त्री ही खालच्या स्तरांवर आहे, आणि स्त्रीही एक उपभोग्य वस्तु आहे, अशी शिकवण पुरूषांच्या मनात बिबवली जाते. स्त्रीवाद म्हणजे काय, स्त्रीवादाची व्याख्या, अर्थ तसेच स्त्रीवादाचे सिध्दांत कोणत्या आधाराने तयार झालेत व त्या सिंध्दाताचा आधार काय आहे. व त्यांना या सिंध्दाताव्दारे नेमके काय ध्येय प्राप्त करायची आहे हे आपण प्रस्तृत निबंधात पाहणार आहोत.

किवर्ड : सामाजिक भेद, स्त्रीवाद, उपभोग्य वस्तु, माक्सवादी स्त्रीवाद स्वातंत्र्य, समान दर्जा.

उद्दीष्टेः

१) स्त्रीवादाचा अर्थ समजुन घेणे. २) स्त्रीवादी चळवळीचे उद्दीष्टे ३) लिंगामधील समानतेला प्रोत्साहन देणे आणि सक्षम करणे हे आहे.

प्रस्तावनाः

स्त्री व पुरूष दोघे मिळून एकत्र येऊन समाज तयार झाला. अर्थातच दोघांचेही महत्त्व समानच असायला हवे पण पुरूसत्ताक अवस्थेमध्ये स्त्रीला मिळणारे स्थान, तिचा दर्जा, तिला प्राप्त होणारे स्वातंत्र्य, अधिकार यामध्ये असमानता आढळून येते, एकंदरीतच स्त्रीला निव्वळ ती स्त्री आहे, म्हणून कमी लेखणे ही प्रवृत्ती समस्या निर्माण करणारी आहे. या समस्येचा तिच्या सर्वागिण विकासाच्या दृष्टीने अभ्यास होणे गरजेचा आहे.

महिलांच्या व्यक्तिमहत्वाला मान्यता मिळावी यासाठी अनेक चळवळी सुरू आहेत. या संपूर्ण संघर्षाचा एकमेव मुख्य उद्देश महिलांचे सुखी भविष्य घडवणे हा आहे. महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्याकडे निरोगी दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी या विविध चळवळीत अंर्तगत समाजात प्रचलित असलेल्या लिंगभेद संपविण्याचे काम सुरू झाले. स्त्रीच्या दर्जामागचे एकमेव कारण म्हणजे तिचा स्त्री म्हणून जन्म स्त्रीला जन्मतःच स्त्रीत्वाची अनुभूती येत नाही, तर तिच्या आजुबाजुचे वातावरण तिला या मानसिकतेत बदलते. डॉ. प्रतिभा पाठक यांच्या मते, ‘स्त्रीया आणि पुरूषांमधील मानसिक फरकांचे अनेक प्रकारे विश्लेषण केल्यावर हे स्पष्ट होते की स्त्रीची मानसिकता पुरूषांपेक्षा वेगळी नसते केवळ तिच्या विशेष शारीरिक रचनेमुळे, सामाजिक वातावरण, कौटूबिक आणि वैयक्तिक परिस्थिती, संस्कार आणि मुल्ये या सर्व गोष्टी मिळून स्त्रीची मानसिकता निर्माण होते. जन्मापासून बाल्यवस्थेपर्यत स्त्री पुरूषांच्या मानसिकतेत फरक नसतो. ‘‘समाजाच्या या मानसिकतेतील बदलाच्या प्रक्रियेचा साहित्यावर खोलवर परिणाम होतो.

मुळात अमेरिकेत निर्माण झालेल्या ‘स्त्रीवादाचा प्रसार’ 1960 नंतर लक्षणीय वाढला. 1976 च्या आंतराष्ट्रीय महिला वर्ष नंतर स्त्रीमुक्ती चळवळ आणि स्त्रीवादी विचारसरणीला नवी दिशा मिळाली. सामाजिक व्यवस्थेत लिंगाच्या आधारावर महिलांना दिलेल्या कनिष्ठ स्थानावर सखोल विचार विनिमय झाला. सुरूवातीला सर्व अधिकार स्त्रियांच्या हातात केंद्रीत होते. पण जेव्हा मात्रसत्ताक कुटूबपध्दती पितृसत्ताक कुटूंब पध्दतीत बदलली, तिला धार्मिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक कार्यात सहभागी करून घेतले तेव्हा तिच्या आयुष्याची उजळ बाजू भुतकाळातच उरली. स्त्रीच्या या बदलत्या स्थितीच्या संदर्भात एंगेल्सने म्हटले आहे की, मातृसत्ताक कडून पितृसत्ताकडे आलेला वंश हा खरे तर स्त्रीजातीच्या सर्वात मोठा पराभव होता. सत्य हे आहे की स्त्रियासाठी असा सुवर्णकाळ प्रत्यक्षात एकनियक आहे. स्त्री आहे असे म्हणणे म्हणजेच स्त्री-पुरूषांचे परस्पर संबंध नाहीत हे सिध्द होते.

स्त्रीवादाचा अर्थः

प्राचीन समाजातील स्त्रीयाचा दर्जा दुय्यम, कनिष्ठ प्रतिचा होता. स्त्री व पुरूष यांची शारीरिक व मानसिक भिन्नता हा जरी जीवनशास्त्रीय स्वरूपाची असली तरी सामाजिक स्तरांवर तिला या लिंगभेदांवर आधरित वागणूक मिळू लागली. स्त्री-पुरूश समानता हा मूळ मुद्दाधरून तिला सर्वच क्षेत्रात कमीपणा प्राप्त

झाला. दुय्यम स्थान हे अन्यायी विषमतेवर आधारित असल्याने याविरूध्द स्त्रीत्वाचे दुय्यम स्थान नाकारून माणूस म्हणून व्यक्ति म्हणून समाजात स्थान मिळवण्यासाठी तिचा प्रयत्न सुरू झाला. या अवस्थेमध्ये तिला तिचे स्वःचे स्थान निर्माण करण्याची गरज भासू लागली व यातूनच स्त्रीवादाचा जन्म झालेला दिसतो.

स्त्रीवादाचा अर्थात या शब्दाची व्युत्पति लॅटिन भाषेतील शब्दापासून झाली आहे. फेमिनाचा अर्थ स्त्री असा असून फलिस रासी यांनी फेनिनिझम हा शब्द प्रथम 1895 साली या नियतकालिकेत प्रथम वापरला.

एकुणच स्त्रीवादी संकल्पना स्पष्ट करताना तिला तिच्या अस्तित्वाचा, समानतेचा, स्वातंत्र्याचा, अधिकाराचा हक्क प्राप्त करण्यासाठी तिने उभी केलेली व्यवस्था म्हणजे स्त्रीवाद.

स्त्रीला गुलाम म्हणूनच वागवीणे कसे योग्य आहे याचे उदात्तीकरण करण्यात आले आहे, स्त्री शोषनास अनुकूल अशी व्यवस्था समाजात निर्माण करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या लिंगभेदाच्या विरूध्दची कृतिशील चळवळ म्हणजे स्त्रीवाद.

स्त्रीवाद म्हणजे स्त्री पुरूष समानतेसाठीचा लढा स्त्रीला तिचे गरजेचे, विकासाचे स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठीचा लढा.

१) सुमित्रा भावे –

''स्त्रीवाद हा वाद शब्दामुळे बंदीस्त होतो. त्यामुळे स्त्रियांच्या समानतेसाठी केलेली चळवळ हा स्त्रीवाद होय.

२) सुमिती लांडे –

''स्त्री पुरूषांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व समाजिक संस्थांचा केलेला पुर्नविचार आणि पुर्नरचना म्हणजे स्त्रीवाद होय.

स्त्रीवादाविषयीचे सिध्दांतः

आधुनिक काळात समाजासमोर नवनवीन प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रश्नांना तोड देत आजही जनता विविध सामाजिक चळवळी निर्माण करत आहे. या सामाजिक चळवळीचा प्रभाव स्त्रीवादाच्या विचार सरणीवर दिसून येतो. प्रा.यशवंत सुमन यांच्या मते, मार्क्सवादी स्त्रीवाद, समाजवादी स्त्रीवादी, गांधीवादी स्त्रीवाद अशा अनेक भांडवलशाही विरोधी स्त्रीवाद स्त्रीयांच्या चळवळीतून निर्माण झाले.

1. स्त्रीवादाचा उदारमतावादी सिध्दातः

1960 नंतर प्रबळपणे उदयास आलेली विचारधारा म्हणजे उदारमतावादी स्त्रीवाद. मुळात उदारमतावादी सिध्दांत व्यक्तिला केंद्रस्थानी मानतो. व्यक्ति हितातून समाजविकास आपोआपच घडतो. मात्र सार्वजनिक जीवन जगतांना राज्यसंस्थेने आपली सत्ता मर्यादित ठेवून व्यक्तिवर किमान निर्बंध घालावेत व व्यक्तिच्या खाजगी जीवनात पूर्ण स्वातंत्र दयावे ही भूमिका उदारमतावाद मांडतांना दिसतो. उदारमतावादाची ही वैचारिक मांडणी विविध उदारमतावादी विचारवंतानी मांडलेली दिसते. 1781 मध्ये जेरेम बथम यांनी स्त्रियांना मतदानाचा अधिकार, सत्तेमध्ये सहभागी होण्याचा अधिकार असे प्रेरक विचार मांडले. नंतर सन 1792 मध्ये मेरी वोल्स्टन क्राफटने ए विंडिकेशन ऑफ वि राईड्स ऑफ वुमन या ग्रंथात स्त्री–स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. स्त्रीला पुरूषांप्रमाणे शिक्षण मिळावे जर तिला शिक्षण प्राप्त झाले तर ती पुरूषाप्रमाणे स्वतःच्या विचारक्षमतेच्या आधारावर आपले हक्क उपभोगेल. पुरूषांप्रमाणेच ती नागरी जीवनात आत्मविश्वासाने सहभागी होईल आपली जबाबदारी पारा पाडेल अशी स्त्रिविषयक प्रखर भुमिका मेरी वोल्स्टने क्रोफटने मांडली.

उदारमतावादी स्त्रीवादाचा मुख्य हेतू हा की, स्त्रियांना राजकीय व कायदेशीर क्षमता प्राप्त करून देणे, एकदा समाजात स्त्री–पुरूष समानता प्रस्थापित झाली की, स्त्री तिच्या क्षेत्रात किंबहुना तिला हव्या त्या क्षेत्रात संधीच्याव्दारे स्वतःची कुवत, क्षमता सिध्द करेल. विवेकवाद, समता, स्वातंत्र्य व्यक्तिवाद या मुल्यांचा स्वीकार करून स्त्रिसुध्दा विवेकशीर व्यक्ति असल्यानं त्यांना पुरूष या व्यक्तिप्रमाणेच सर्व अधिकार, स्थान दर्जा प्राप्त व्हावा व तो विवेकावर व सामाजिक न्यायावर आधारित कायदे, वैचारिक प्रबोधन या माध्यमातून लैगिक व सामाजिक विषयता नष्ठ करून प्राप्त व्हावा अशा पध्दतीची भूमिका उदारमतावादी स्त्रीवादी सिध्दांत मांडतांना दिसतो.

2. मार्कसवादी/समाजवादी स्त्रीवादी सिध्दांतः

मार्कसवादी स्त्रीवाद म्हणजे स्त्रीयांच्या स्थितीचा विचार करतांना मार्क्सच्या विचार सरणीच्या आधारे स्त्रीयांचे सर्वहारा व्यक्तिमहत्त्व प्रतिबिबित करणारी कल्पना.

कार्ल मार्क्सने शोषितांच्या स्थितीवर आपले मत मांडले आहे. इथे एक गोष्ट महत्त्वाची आहे की, मार्क्स हा स्त्रीवादी नव्हता पण समाजातील स्त्रियांच्या प्रतिकुल परिस्थितिचा विचार त्यांनी नक्कीच केला. सरला माहेश्वरी यांच्या म्हणण्यानुसार माक्सने अनेक ठिकाणी समाजातील स्त्रियांची स्थिती समाजिक प्रगतीचा निर्देशांक म्हणून पाहण्याविषयी सांगितले होते यावरून ते स्त्रीवादी नसले तरी स्त्रीमुकतीच्या विरोधात नव्हते असे दिसून येते. म्हणून स्त्रीवादी विचारसरणीत मार्क्सच्या विचारांत वेगळे महत्त्व आहे.

मार्क्स वादी स्त्रीवादात एंगेल्सच्या विचारांची महत्त्वाची भुमिका आहे. या निबंधात एंगेल्सचे द ओरिजिन ऑफ द फॅमिली, प्रायव्हेर प्रापर्टी ॲड द स्टेट हे पुस्तक विशेषतः स्त्रीवादी प्रवचनात अतिशय महत्त्वाचे योगदान म्हणून पाहिले जाऊ शकते. स्त्रियांच्या स्थितीवर वैज्ञानिक आधारावर प्रकाश टाकणे त्याच्या मते आर्थिक विषयतेमुळे महिला गुलामगीरीचे जीवन जगत आहे. स्त्रीची स्थिती कुटूंबातील मजुरासारखी आहे. कुटूंबातील पुरूष सदस्यांच्या हातात सर्व अधिकार सुत्रे केंद्रीत झाल्यामुळे कुटूंबात स्त्रीला कनिष्ठ स्थान प्राप्त झाले.

मार्क्स आणि एंगेल्स व्यतिरिक्त मार्क्सवादी स्त्रीवादाला इतर विचारवंताच्या विचारांची दीर्घ परंपरा आहे. फोरियन, सन सिमॅनिष्ठ, रॉबर्ट ओवेन, विल्यम थॉमसन या मार्क्सवादी विचारवंतांनी स्त्रियांच्या प्रश्नांचा सवतंत्रपणे विचार केला आहे. फोरियर आणि सेंट सिमोइस यांनी स्त्रीयांची सामाजिक स्थिती सुधारने आवश्यक मानले. 1992 मध्ये विल्यम

थॉम्पसन यांनी स्त्री-पुरूषांसाठी समानहक्क आणि कामकारांची पारंपारिक विभागणी नष्ठ करण्याची गरज यासारख्या महत्त्वाच्या गोष्टी स्पष्ठ केल्या.

आर्थिक विषमता दूर करूनच स्त्रियांची स्थिती सुधारू शकते, असे मत मार्क्सवादी स्त्रीवादाने व्यक्त केले. जोपर्यंत भांडवलशाही व्यवस्था आहे तोपर्यंत महिलांना शोषित जीवन जगावे लागेल. 'मार्क्सवादाने स्त्रीमुक्तीच्या प्रश्नाला सामाजिक उत्पादन संबंध आणि स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या प्रश्नांशी समाजाच्या अत्यंत सुसगत वैज्ञानिक विश्लेषणाव्दारे जोडले. जेव्हा स्त्रीया आर्थिक गुलामगिरीतून मुक्त होतील तेव्हा जीवनातील विविध बंधने आपोआपच नष्ठ होतील. मार्क्सवादी स्त्रीवादाच्या मते स्त्री-पुरूष असमानतेचा प्रश्न महत्त्वाचा आहे, पण स्त्री-पुरूष असमानता नष्ठ करायची इच्छा करून ही विषमता नष्ठ होणार नाही. त्यासाठी इतिहासातील ज्या क्रमाने स्त्रिया आर्थिक विळख्यात अडकल्या होत्या, त्याच क्रमातून स्त्रीयांची मुक्तता करणे आवश्यक आहे.

मार्क्सवादी स्त्रीवादाने स्त्रियांच्या शोषनाच्या आर्थिक पैलुवर प्रकाश टाकला. आज मोठया प्रमाणात लोक आर्थिक दृष्टया स्वालंबी होत आहेत पण त्याच्या शोषनाच्या प्रक्रियेत कोणताही बदल झालेला नाही तो सतत लैगिंक छळाची शिकार होत आहे. हे नष्ठ करण्यासाठी पुरूषप्रधान व्यवस्थेत बदल आवश्यक आहे. मार्क्सवादी स्त्रीवाद हा पुरूषविरोधी नसला तरी तो पुरूषांच्या सत्तेच्या आणि वर्चस्वाच्या विरोधात आहे. स्त्री - पुरूषांच्या समानता ठेवून स्त्रीमुक्तीसाठी लढा दिला तर स्त्रीमुक्ती शक्य आहे.

3. जहालवादी स्त्रीवादः

स्त्रीची मानसिक गुलामगिरी नष्ठ करायची असेल तर कुटुंबसंस्था मोडली पाहीजे या विचारांवर आधारित जहालवादी विचार पुढे आला. शूलमिथ फायरस्टोन या जहाल स्त्रीवादी स्त्रीने हा विचार मांडला त्यामागील कारणांची मिमांसा करतांना मी म्हणते की, कुटूंबात स्त्रियांचे लैगिंक अविष्कार दडपले जातात. याशिवाय पत्नी व मुले कायम पुरूषी वर्चस्वाखाली असतात व त्यांच्या स्वतंत्र्य व्यक्तिम्हणून विकास हात नाही. मार्क्स,एंगेल्स यांच्या भौतिकतेवर आधारित व फ्राईडच्या मनोविश्लेषनावर आधारित या विचारांची मांडणी फायरस्टोन यांनी केली. हा विचार भांडवलशाही विरोधी आहे. पुरूषी सत्तेचा प्रखरतेने विरोध या विचारसरणीत आढळतो. कुटूंब, संस्था, मातृत्वाची सक्ती, बिनमोबदलयाचे कुटूंबातील श्रम हे सर्व शोषनाला जन्म देतात असे जहाल स्त्रीवाद मानतो. जहाल स्त्रीवाद असे मानतो की, जमा झालेले सर्व मानवी ज्ञान, बहुतांश पुरूषांनी घडविलेले आणि म्हणून शंकास्पद आहे. मानवाची जागविषयी, स्वतः विषयी अशी संपूर्णच समजच, स्त्री-केंद्री ज्ञाननिर्मिती व्दारे बदलनार आहे. या भुमिकेशी मी असमत आहे. कारण स्त्री-पुरूषात भेद आहे हे खरे असले तरीही सामायिक-मानवीही बरेच काही आहे. त्यामुळे ज्ञानशास्त्रच वेगळे असेले हे शक्य नाही. जहाल स्त्रीवाचे दुसरे एक टोक असे की, सर्व मानवी दुर्गूणाचे मुळ हे नर असण्यात आणि सदगुणांचे मूळ मादी असण्यात शोधने राजीव सानेंचे मत त्यांच्या सखोल चिंतनाची ओळख करून देते.

4. उत्तर आधुनिकतावादी व स्त्रीवादः

उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवादी विचार 1980 च्या दशकात तीव्रतेने पुढे आले उत्तर आाधुनिकतावादात भाषेला महत्त्व आहे.च उत्तर आधुनिकतावादात वंश, धर्म,लिंग, राष्ट्रीयत्व भिन्न वांशियता यांचा समावेश होतो. इतिहासातील स्त्रियांचे विषय मुददाम दर्शविले गेले असल्याने तिकडे लक्ष देण्याची गरज उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवादी स्पष्ट करते. आधुनिकतावादात कायदा, बुध्दीस महत्त्व,सुव्यवस्था अशा गोष्टींना प्राधान्याने महत्त्व देते. मात्र या सर्वाचा शेवट म्हणजे उत्तर आधुनिकतावाद होय.

उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवादयांची परंपरागत पुरूसत्ताक पध्दतीच्या सत्तेत विरोध दर्शविला आहे. धर्मशास्त्र व निसर्ग यांना हा सिध्दांत विरोध करतो. ज्ञानाचा संबंध हा सत्तेशी येतो. त्यामुळे त्याचे मुल्यमापन झालेल्या परिणामांच्या विशिष्ठ धारणा, त्यांना मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्याची पध्दती यातूनच स्त्रीमुक्ती करण्याची भूमिका उत्तर आधुनिक स्त्रीवाद करतांना दिसतो.

इरीगॅर यांनी पुरूषसत्ताक संस्कृती व 'इतर' म्हणून उल्लेखलेल्या स्त्रियांवर आपले विचार व्यक्त केले तर ग्रोस यांनी स्त्री शरीराच्या भौतिकवादी उपयोगावर भर दिला. तर उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवादी विचारक बटलर यांनी स्त्री शरीराचा भौतिकवादी सिध्दांत मांडून एक वेगळा विषय स्त्रीवादी अभ्यासात दिला. एकुनच उत्तर आधुनिक स्त्रीवाद हा विषय थोडासा वेगळा मांडण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो.

5. ब्रिटीश स्त्रीवादः

ब्रिटीश स्त्रीवाद हा राजकीय स्वरूपाचा आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन हे या विचारसरणीचे ध्येय आहे. डॉ. मंगला वानखेडे यांच्या म्हणण्यानुसार अमेरिका खिवड प्रामुख्याने तेथील विदयापीठाच्या इंग्रजी साहित्य विभाग आणि सेटंर फॉर वुमेन्स प्रॅक्टीसमधुन तयार करण्यात आला आहे. याउलट ब्रिटीश स्त्रिवाद मास मिडीया, राजकीय गट इत्यादीनी निर्माण केलेले आहे. त्यानी लिंग आणि वर्ग यांच्यातील परस्परसंबंधाचे विश्लेषण केले आहे. पुरूषशक्तीचा समाजाच्या जडणधडणीवर काय परिणाम होतो, हे स्पष्ट करतानाच या परिणामामुळे महिला कशा दडपणाखाली येतात हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

6. भारतीय स्त्रीवादः पाश्चात देशाच्या प्रभावामुळे भारतात स्त्रीवादी विचारांचा प्रसार झाला. भारत स्वतंत्र होताच भारतीय महिलांना कोणताही संघर्ष करता मतदानाचा अधिकार मिळाला. पण आज भारतीय महिलांचा संघर्ष समाजिक, राजकिय जैविक आणि आर्थिक पातळीवर व्यापक आहे. ही केवळ उच्च किंवा उच्च मध्यवर्गीय स्त्रियांची चळवळ नसून प्रत्येक धर्माच्या आणि प्रत्येक जातीच्या मजुर, शेतकरी आणि स्त्रियांच्या मुक्तीचा अभ्यास आहे. पारंपारिक

चालिरीती आणि धार्मिक नियमांचा सखोल अभ्यास करून महिलांचे शोषण संपवणे हा त्यांचा उद्देश आहे. भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरूष समानतेसाठी अनेक कायदे केले आहेत. त्यांचे सामाजिकरण करणे मुख्य उद्देश आहे. राजकारण, प्रशासन, अर्थकारण, आदी क्षेत्रात प्रचलित असलेले पुरूषी वर्चस्वे संपवून महिलांना या क्षेत्रात स्थान मिळवून देणे हा येथे निर्माण झालेल्या स्त्रीचळवळीचा मुख्य उद्देश आहे.

निष्कर्षः

1. 'स्त्रीवाद' ही एक मानवीय जाणीव आहे. स्त्रीला मानुसपणांचा हक्क मिळवण्यासाठी केलेला तो प्रयत्न आहे.
2. स्त्रीवादाला हिंदीत 'नारिवाद' इग्रंजीत 'फेमिनिझम' तर मराठी 'स्त्रीवाद' हा शब्द वापरला जातो.
3. स्त्री – पुरूष सन्मानाचे, बरोबरीचे, मैत्रीपूर्ण नातेच जीवन सुखी करीन. त्यासाठी स्त्री आणि पुरूष या दोघांच्याही प्रयत्नांची गरज आहे.

समारोपः

स्त्रीवाद ही मानवीय जाणीव आहेत. स्त्रीच्या दृष्टीकोनातून जीवनाच्या विविध पैलुंवर टाकलेला तो दृष्टी क्षेप आहे. स्त्रीला माणुसपणाचा हक्क मिळवण्यासाठी केलेला तो प्रयत्न आहे. स्त्री-पुरूष यांच्यातील भेदांना श्रेष्ठ, कनिष्ठ न मानता त्यांच्यातील वैविध्य, वैशिष्टय मानले जाणे महत्त्वाचे आहे. अर्थात त्यासाठी सामाजिक, राजकीय, आर्थिक बदलांची आवश्यकता आहे. एकुणच स्त्रियांच्या हक्कांचे आणि अधिकारांचे समर्थन करणारे हे विचार सुत्र आहे. या विचार सुत्राची जाणीव समाजातील सर्व घटकांना होणे महत्त्वांचे आहे.

संदर्भः

1. डॉ. वदंना प्र. पळसापुरे – स्त्रीवाद
2. समकालिन राजकीय समस्या–2019,
3. कु. वैशाली वि. देशपांडे – स्त्रीवाद आणि हिंदी महिला कादंबरीकार, २००४
4. डॉ. रीना अविनास पिंतळे पुराडकर – स्त्रीवाद. एक समाजनिष्ठीत तात्विक विवेचन
5. विभा सिह – मार्क्सवादी नारीवाद
6. प्रा. रमेश शिंदे – स्त्रीवादी कथालेखन : एक दृष्टीक्षेप
7. डॉ. वासंती रासम – स्त्रीवाद आणि स्त्रीवादी चळवळ
8. वी. एन. सिह, जनमेजय सिह – नारीवाद
9. विमल थोरात – दलित साहित्य का स्त्रीवादी स्वर
10. स्त्रीवादी समीक्षा – संकल्पना व उपायोजना – डॉ. मंगला वानखेडे
11. उषा शिंडे – स्त्रीवादी आकलन
12. सरला महेश्वरी – नारी प्रश्न.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्य में भारत की महिलाओं के मानवाधिकार

Mrs. Sunanda Anshul Raut
Research Scholar, Politics Science Department,
The Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University Nagpur, Maharashtra, India
Corresponding Author- Mrs. Sunanda Anshul Raut
Email: rautanu0@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.11178244

सारांश:

मानवाधिकार मूलतः मानव जाति को दिए या मिलने वाले अधिकारों से संबंधित है। प्राचीन भारतीय ग्रंथों में भी इनका प्रमाण मिलता है। अधिकार से उत्पन्न होने वाली कठिनाइयों का शास्त्रकारों ने पूर्वानुमान कर लिया था और इसी कारण उन्होंने त्याग, तपस्या, सहयोग, परोपकार जैसे सद्गुणों के आधार पर अधिकार की अपेक्षा कर्तव्य को अति महत्वपूर्ण बताया। प्रत्येक व्यक्ति को सभी प्रकार के अधिकार देने के लिए अपने कर्तव्यों का उचित निर्वाह करना आवश्यक है। मानवीय संवेदना में आज निरंतर कमी आ रही है जिसे वैश्विक स्तर पर भी अनुभव किया जा रहा है। मानवाधिकारों के प्रति वैश्विक स्वीकृति को लुइस टेनकिन नामक विद्वान ने स्वीकार किया है। मानवाधिकारों का विकास और उसकी पृष्ठभूमि पर दृष्टिपात करने पर यह स्पष्ट होता है कि- "मानव अधिकार वे अधिकार हैं जो व्यक्ति को मानव होने के कारण प्राप्त हैं। इनका आधार मानव स्वभाव में ही निहित है।" मानवाधिकारों के प्रति सम्मान का भाव विकसित करने के लिए वैश्विक स्तर पर कर्तव्यों की व्याख्या करते समय प्राचीन भारतीय संदर्भ सदैव प्रांसगिक रहे हैं। समता और स्वतंत्रता को कायम रखना कर्तव्य होना चाहिए तथा मानवाधिकारों के संरक्षण हेतु धर्माचरण भी कर्तव्य होना चाहिए। वर्तमान व भावी जीवन के कर्तव्यों को उचित रूप से समझने तथा पालन करने के लिए इनकी शिक्षा देनी जरूरी है। वैश्विक स्तर पर कर्तव्य बोध को जागृत करने के लिए व्यक्ति के अस्तित्व की गरिमा का बोध कराया जाना चाहिए। साथ ही, समाज के सभी वर्गों का विकास जैसे कर्तव्य स्तर पर मानवाधिकारों की दशा बदलने में सक्षम हो सकते हैं। मानवाधिकारों के संरक्षण एवं संवर्धन के लिए सभी राष्ट्र सामूहिक सत्य मार्ग पर चलते हुए सामाजिक कल्याण के कर्मों में लग जाएं तो विश्व का संपूर्ण परिदृश्य ही बदल जाएगा और मानव की कल्पना साकार हो जाएगी।

मानवाधिकार पृष्ठभूमि:

संसार में ईश्वर की अनुपम कृति मानव है। मानव की उत्पत्ति का इतिहास अति प्राचीन है। इसका विकास विभिन्न चरणों में हुआ। मानव के विकास के साथ ही उसे अधिकारो की आवश्यकता महसूस हुई। इस आवश्यकता को ही मानव अधिकार कहा जाता है। मानव को अपनी गरिमा बनाये रखने के लिए मानवाधिकारों की आवश्यकता होती है। मानव के जीवन की कल्पना अधिकारों के बिना नहीं की जा सकती है। वस्तुतः किसी व्यक्ति के मानव होने और मानव बने रहने के लिए अधिकार अनिवार्य है। मानवाधिकारों को स्वीकार करने से मानव सभ्यता का विकास सम्भव हुआ है। मानवाधिकारों की संकल्पना उतनी ही पुरानी है जितनी प्राकृतिक विधि है। प्रकृति पर निवास करने वाले सभी जीव स्वतन्त्रता की इच्छा रखते है। मानव को अपने सर्वांगीण विकास व अस्तित्व की रक्षा की स्वतन्त्रता की आवश्यकता होती है जिसका दूसरा रूप अधिकार है। मानव के आपसी अधिकार के हनन को देखते हुए संयुक्त राष्ट्र संघ ने 10 दिसम्बर 1948 को सभी के लिए उपलब्ध का समान स्तर निर्धारण करने वाला मानवाधिकार की वैश्विक घोषण को पारित किया है। इसी कारण 10 दिसम्बर को सम्पूर्ण विश्व मानव अधिकार दिवस मनाया जाता है। मानव अधिकार आयोग U. N. C. H. R. की घोषणा पत्र में अनुच्छेद 30 है। इसमें मानव समाज के गरिमामय जीवन के सभी बिन्दुओं का समावेश किया गया है, लेकिन यू. एन. ओ. ने 10 दिसम्बर 1990 को मानव अधिकारों के प्रशासन को सार्वभौमिक के लिए प्रत्येक नागरिक मानवाधिकारों का सम्मान करें, अधिकारों राजनीतिक, सामाजिक, सांस्कृतिक उन्नति के सहयोग करें।

मानवाधिकार का इतिहास:

इतिहास तथा प्राचीन धर्मग्रन्थों में मूल मानव अधिकारों का दर्शन किया गया है। आधुनिक इतिहासकार मानवाधिकार के विकास का श्रम मैग्नाकार्टा को देते हैं। अंग्रेज सागतो ने 15 जून 1215 को इंग्लैण्ड के राजा हॉन को एक चार्टर पर हस्ताक्षर करने के लिए विवष किया। मैग्नाकार्ता के द्वारा ही जनता को कुछ अधिकार हस्तान्तरित हुए यह मानवाधिकारों के लिए संघर्ष के इतिहास में सम्भवतः पहली सबसे बड़ी एवं महत्वपूर्ण घटना है। 1028 1880 के अधिकार पत्रों में सम्राट के हस्ताक्षर संसद ने करवाये और ये अधिकार ही बाद में मानव अधिकार के रूप में विकसित हुए। सन् 1679 में बंदी प्रत्यक्षीकरण अधिनियम पारित हुआ, जिसके द्वारा प्रत्येक व्यक्ति की वैयक्तिक स्वतन्त्रता स्वीकार की गई। सन् 1776 में संयुक्त राज्य अमेरिका के स्वतन्त्रता सम्बन्धी घोषणापत्र ने जहरणीय मानवाधिकारों को शामिल किया गया। इनमें जीवन, स्वातन्त्रता और खुषी की तलाष के अधिकार शामिल थे।

सन् 1789 में में फ्रांसीसी क्रांति के दौरान मनुष्य तथा नागरिकों के अधिकारों से सम्बन्धित घोषणापत्र तैयार किया गया। सन् 1833 में सभी ब्रिटिष क्षेत्र में दास प्रथा की समाप्ति के लिए ब्रिटिष संसद ने एक विधेयक पारित किया और दास व्यापार की समाप्ति के लिए अन्तर्राष्ट्रीय समझौते हुए। सन् 1917 को कस क्रांती को पश्चात ही सर्वहाराओं द्वारा मौलिक अधिकार प्राप्त किए गये। सन् 1920 में अन्तर्राष्ट्रीय विधि सस्थान, न्यूयार्क, संयुक्त राज्य अमेरिका ने मानव अधिकारों तथा कर्तव्यों का एक घोषणा पत्र तैयार किया। तत्पश्चात् सन् 1945 में इंटर अमेरिकी कांग्रेस ने मानव जाति के अधिकार की संकल्पना को बढ़ावा देने के लिए अनतर्राष्ट्रीय फोरम तैयार करने का प्रयत्न किया।

1946 में विधिवत् मानवाधिकार आयोग बना एवं मानवाधिकार घोषणापत्र का प्रारूप तैयार किया गया तथा संयुक्त राष्ट्र महासभा को सौंपा गया। प्रारूप में कुछ संवोधनो वो बाद महासमा ने 10 दिसम्बर 1948 के मानवाधिकारों के विष्व घोषणापत्र की घोषणा की। प्रारम्भ में मानवाधिकार प्राकृतिक नियम के रूप में विद्यमान थे परन्तु 10 दिसम्बर 1948 के बाद इसे व्यावहारिक रूप प्राप्त हुआ। संयुक्त राष्ट्र मानव अधिकार घोषणा पत्र मानव सभ्यता के इतिहास में पहला दस्तावेज है जिसमें अधिकारी की न सिर्फ विस्तृत व्याख्या की गई है, अपितु इसे नई विश्व व्यवस्था के आदर्ष व अन्तर्राष्ट्रीय मान्यता प्राप्त नृत्य रूप में स्थापित भी किया गया। मानव अधिकारों की सार्वभौन घोषणा में तीस चाराएँ है जिनमे नागरिक और राजनीतिक अधिकारों के साथ ही आर्थिक, सामाजिक एवं सांस्कृतिक अधिकार भी सम्मिलित है। इस घोषणा में यह स्वीकार किया गया है कि मनुष्य स्वतन्त्र जन्म लेते हैं तथा गरिमा, सम्मान और विचारों में समान होते हैं। मनुष्य को समाज एवं राष्ट्र का सदस्य होने के नाते मानवाधिकार उसे अनतर्राष्ट्रीय न्याय व्यवस्था द्वारा मान्य होते हैं। इन अधिकारों का राष्ट्रीय स्तर में हनन होने पर अन्तर्राष्ट्रीय न्यायिक संस्थाओं में अपील करने का भी प्रावधान दिया गया है।

मानवाधिकार घोषणा पत्र में विभिन्न नागरिक और राजनीतिक अधिकारों का समावेष है. जिनमें प्रमुख है जीवन स्वतन्त्रता और सुरक्षा का अधिकार, आत्याचार और उत्पीडन से रक्षा का अधिकार, कानून के समक्ष समता का अधिकार, मनमाने रूम से बदी बनाए जाने और देश निकाले से रक्षा का अधिकार सार्वजनिक एवं महत्तवपूर्ण मुकदमों सम्बन्धी अधिकार प्रमाणित न होने तक निर्दोष समझे जाने का अधिकार राज्य के बाहर आने-जाने का अधिकार, विवेक और धर्म की स्वतन्त्रता का अधिकार राष्ट्रीयता का अधिकार, परिवार की सुरक्षा का अधिकार, पति-पत्नी का अधिकार, सहमति के आधार पर विवाह करने का अधिकार, सम्पत्ति पर अभिकार, शांतिपूर्वक ढंग से एकत्र होने और संघ बनाने का अधिकार, इच्छानुसार सरकार बनाने का अधिकार सार्वजनिक कार्यों और राजनीति में भाग लेने का अधिकार सरकारी नौकरी करने का अधिकार, आदि-आदि।

इसके आसया समय-समय पर मानव के चतुर्मुखी विकास के लिए मानवाधिकार सम्बन्धी अनेक घोषणाएँ की गई, जिसमे दिसम्बर 1948 की जाति संहार के विरुद्ध कार्यवाही का अधिकार, नवम्बर 1950 की बच्चों को अधिकार, नवम्बर 1963 को नस्लीय भेदभाव के विरुद्ध कार्यवाही का अधिकार को संस्कृति के अधिकार दिसम्बर 1966 को आर्थिक, सामाजिक, और सास्कृतिक अधिकार तथा नागरिक और राजनीतिक अधिकार, नवम्बर 1967 को महिलाओं से भेदभाव को विरुद्ध कार्यवाही अधिकार, फरवरी 1991 को अल्प संख्यकों के अधिकार आदि प्रमुख है।

परम्परागत भारतीय समाज में महिलाओं की प्रस्थिति:

समूचे विषम इतिहास के असंख्य पृष्ठ महिलाओं के प्रति हृदयहीन अत्याचारों और अधिकार वर्जना से भरे हैं।

सभी महिलाओं को एक समूह में देखे तो संसार के लगभग सभी देशो में वे समाज का कमजोर हिस्सा रही है। मानव जाति का समूचा इतिहास इसकी गवाही देता है। प्राचीन काल से ही महिलाओं को पुरुषों की बराबरी का दर्जा देना अस्वीकार किया जाता रहा है। वैदिक काल में महिलाओं को बराबरी का दर्जा दिया जाता रहा है। पुत्र और पुत्री दोनों के लिए उपनयन संस्कार अनिवार्य था। शिक्षा के क्षेत्र में भी इन्हें पुरुषों के समान अधिकार प्राप्त थे। इस युग में बालविवाह का प्रचलन नहीं था एवं महिलाओं को अपनी इच्छानुसार जीवनसाथी चुनने का अधिकार था। पर्दा प्रथा का प्रचलन नहीं था तथा महिलाओं के अपमान को पाप समझा जाता था। इस युग में महिलाओं की प्रस्थिति सभी क्षेत्रों में सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजनैतिक में समानता पर आधारित थी। वेदो की रचना में अगभग 200 लोकों का योगदान महिलाओं का माना गया है।

उत्तर वैदिक काल में भी महिलाकों की प्रस्थिति अच्छी थी परन्तु इस काल में महिलाओं के लिए कार्मिक कार्यों में लेना सम्भव नहीं रहा, इनके वेद के अध्ययन में भी रोक लगा दी गयी। इस युग में बालविवाह एवं बहुपत्नी विवाह का प्रचलन बढ़ा, विभवा विवाह पर भी प्रतिबन्ध लगे एवं अन्य स्वतन्त्रता पर भी बबन लगा दिये गये।

धर्मशास्त्र काल सामाजिक और धार्मिक संकीर्णता का युग था। इस युग में महिलाओं की स्थिति में काफी गिरावट आई। इस काल में महिलाएं गृहलक्ष्मी से बालिका के रूप में दिखाई देने लगी एवं अत्यन्त निर्बल, असहाय तथा पराधीन हो गई। महिलाओं के लिए एकमात्र विकास सरकार डी नह गया है और उनके सम्पत्ति के अधिकार भी छीन लिये गये। मात्र हितगाह का प्रचलन बढ़ा, जीवनसाथी चुनने का अधिकार छीना गया एवं पुरुष बहुपत्नी विवाह करने लगे। इस युग में महिलाओं की प्रस्थिति बहुत ही तिम्न स्थिति में पहुँच गई थी।

मध्यकाल में हिन्दु धर्म व संस्कृति की रक्षा के नाम पर महिलाओं पर कई तरह के प्रतिबंध लगा दिए गये जिससे उनकी स्थिति में और विपरावट आई। सामाजिक संरचना में जटिलता, कठोरता, संकीर्णता, अपारदर्शी व्यवस्थाओं का उद्‌भव हुआ एवं महिलाओं की स्वतन्त्रता का गनःषने हनन् प्रारम्भ हुआ। महिलाओं की भूमिका को प्रजनन एक पारिवारिकता तक सीमित किया जाने लगा। इस युग में पर्दाप्रथा, बालविवाह, धर्म परिवर्तन, विधवा उत्पीडन, सती प्रथा, बहेज आदि कुरीतियों का प्रचलन बढ़ा। इन सभी के लिए यदि जिम्मेदार पुरुष थे तो स्वयं महिलाएं भी थी जो प्रतिद्वन्द्वी बनकर दूसरी महिला के दोहन और शोषण का का युग था एवं उनकी निम्न दया की चरम सीमा थी। कारण बनी। इस प्रकार सत्यकार महिलाओं के ब्रिटिश शासन काल में भारतीय सामाजिक संरचना में बाहरी प्रभावी का सूत्रपात एप दाल प्राहम्ण हुआ. भी प्रभावित किया। इस काल में महिलाओ की दया में कुछ सुधार हुआ और उनहें आर्थिक क्षेत्र में समान अधिकार दिये गये, विधवा पुनर्विवाह कानून एवं विवाह विच्छेद हेतु कानून लागू किये गये। बाल विवाह और सती प्रथा को रोकने हेतु कानून बनाये गये। पर्दाप्रथा समाप्त होने लगी। महिलाओं का उनके अधिकार दिलाने के अनेक महापुरुषों को संघर्ष जानना पढ़ा। राजा राम मोहन राय, स्वामी दयानन्द सरस्वती, ईश्वरचन्द्र विद्यासागर एवं महात्मा गाँधी आदि ने पूरी शक्ति से महिलाओं की समानता का प्रचार किया, जिससे महिलाओं को बहुत सी सामाजिक और परम्परागत दासताओं और बन्धनों से छुटकारा मिला।

स्वतन्त्रता के पश्चात महिलाओं की स्थिति में काफी सुधार हुआ है। पश्चिमीकरण, लौकिकीकरण तथा जातीय गतिशी लता ने महिलाओं की सामाजिक, आर्थिक स्थिति को उन्नत करने में काफी योगदान दिया है। परिणामस्वरूप अधिकाधिक परम्परागत निर्योग्यताएँ धीरे धीरे समाप्ति की ओर अग्रसर होती चली गई और महिलाओं को विवाह सम्पत्ति, संरखाता और विवाह विच्छेद के क्षेत्र में पुरुषों के समान अधिकार प्राप्त होने तथा सामाजिक सदियों से छुटकारा पाने का अवसर मिला।

वर्तमान परिदृश्य:

महिलाओं योन प्रति शोषण, आत्याचार तथा उत्पीडन वर्तमान परिप्रेष्य में एक सार्वभौमिक तथ्य है आज सार्वभौमिक मानवाधिकार घोषणापत्र को लगभग 60 वर्ष पूरे होने को हैं, फिर भी मानवाधिकारों का उल्लंघन समाज में प्रतिदिन दिखाई देता है. विशेष तौर पर महिलाओं के प्रति। महिलाओं को सदा से ही सामाजिक, धार्मिक विधिक, शैक्षणिक, आर्थिक व सास्कृतिक क्षेत्र में उपेक्षा सहनी पड़ी एवं उन्हें समाज में सदैव दोयम दर्जा ही प्राप्त हुआ। शारीरिक रूप से कमजोर और आर्थिक रूप से पुरुषों पर निर्भर होने के कारण सदियों से महिलाओं के साथ दोयम दर्जा, शोषण और यौन उत्पीठन होता रहा है। और यही

कारण है कि उन्हें अपने मानवाधिकारों के लिए अधिक सघर्ष करना पड़ता है।

संवैधानिक प्रावधानों और कानूनी वो बावजूद महिलाओं के उत्पीडन की घटनाओं की सख्या दिन प्रतिदिन बढ़ रही है। यह अपने आप को पहले से भी कहीं ज्यादा असुरक्षित महसूस करती है। महिलामों में षिक्षा प्राप्ति के अधिकार भी पुरुषों की अपेक्षा न्यून हैं। हालांकि गहरों में तो स्थिति प्रुधर रही है परन्तु गाँवों में अभी भी महिला शिक्षा में भेदभाव किया जाता है। महिलाओ के प्रति शिष्टता का हनन आधुनिक समाज में खुलेआम हो रहा है. फिल्मी और विज्ञापनों में महिलाओं की देह को उमभोग कीसामग्री की तरह बेचा जा रहा है।

आज वर्तमान में घर के बाहर एवं अन्दर महिलाओं को शोषण तथा दनन का सामना करना पड़ता है। घर की चार दीवारी के अन्दर दमन अधिकतर गुप्त होता है तथा परिवार के अंदर महिलाओं की समस्याएँ बढ़ जाती है। महिलाओं एवं पुरुषों के बीच असमान शक्ति सम्बन्धों की अभिव्यक्ति जीवन के अनेक क्षेत्रों में प्रतिबिम्बित होती है और महिलाओं को हिंसा, भ्रूण हत्या, पिषु हत्या, दहेज प्रतावना, मारपीट, यौन शौषण, शारीरिक एवं भावनात्मक दुर्व्यबहार आदि का सामना करना पड़ता है।

यूनीसेफ के एक अनुमान के अनुसार भारत में प्रतिवर्ष 50 लाख भ्रूण हत्याएँ होती है जिनमें अधिकतर मादा भ्रूण हत्या है। महिलाओं की आर्थिक गतिविधि खुल आर्थिक गतिविधि का लगभग 50 प्रतिषत है. किन्तु आमदनी में उनका हिस्सा 34 प्रतिपत से अधिक नहीं है। असमानता के आंकटे हर क्षेत्र में देखे जा सकते है। महिलाओं पर बढ़ती हिंसा और भी अधिक शोचनीय है। षिक्षा के अवसर निरन्तर बड़े है किन्तु बहुसंख्यक बालिकाओं को लाभ नहीं मिल पाया है। विडम्बना है कि विकास की गति के बावजूद महिलाओं की प्रस्थिति में आषानुकूल सुधार नहीं हुआ है, बरिक कुछ क्षेत्रों में तो स्थिति बदतर हुई है। महिलाएं जो देश की आबादी का आधा हिस्सा है और जिनका समाज निर्मान में योगदान पुरुषों से किसी भी प्रकार कम नहीं है. पुरुष प्रधान समाज में कभी भी अपना न्यायोचित स्थान प्राप्त नहीं कर पाई।

भारतीय महिलाओं के संवैधानिक और कानूनी अधिकार:

भारत में मानवाधिकारों की संविधान के तीसरे और चौथे अनुच्छेद में संवैधानिक स्थिति प्राप्त है। संविधान में महिलाओं के साथ होने वाले अन्यायों और विषेषताओं को समाप्त करने का लक्ष्य रखा गया है। महिलाओं के अधिकारों को संरक्षण प्रदान करने के लिए राष्ट्रीय एवं अनार्राष्ट्रीय स्तर पर असंख्य प्रावधान कर रखे है। संविधान में महिलाओं को पुरुषों के समान ही अधिकार दिए है. अत्याचारी से दबी उनकी दयनीय जीगन स्थितियों को रूपांतरित करने और सामाजिक, आर्थिक तथा विधिक पहचान बनाने के लिए कई कल्याणकारी मान्यताएँ दी है लेकिन उनकी विकास की स्थिति और दथा आज मी चिंतनीय है। अतः महिलाओं की अभाव, अत्याचार, घुटन कुरीतियों तथा पशुओं से भी बदतर जीवन स्थितियों को आजादी प्राप्ति के बाद बदलने का सिलसिला प्रारम्भ अन्य हुजा है।

भारतीय संविधान में महिलाओं की पुरुषों के समान सुरक्षा प्रदान की गई है एवं सामाजिक आर्थिक तथा राजनीतिक न्याय देने का आश्वासन दिया गया है। भारतीय संविधान की प्रस्तावाला में ही सामाजिक न्याय, समान अवसर तथा समान श्रेणी देने की बात कही गई है।

संविधान के विभिसा अनुच्छेदों में महिला अधिकारों को अप्राविधिक क्रिया गया है। उनमे से मुख्य प्राविधित अधिकार इस प्रकार है-अनुच्छेद 14 में कानून के समया बराबरी कर प्रावधान है, अनुच्छेद 15 में लिंग जाति बर्म व जन्म स्थान आदि किसी भी आधार पर भेदभाव पर रोक, अनुच्छेद 16 में लोकसेवाओं में बिना भेदभाय अबसर की समानता, अनुच्छेद 19 में समान रूप से अभियाक्ति की स्वतन्क्ता, अनुच्छेद 21 में जीवन एवं व्यक्तिगत स्वतन्त्रता की सुरक्षा अनुच्छेद 23-24 में शोषण के विरुद्ध अधिकार अनुच्छेद 25 में विवार, अतःकरण एवं धर्म की समानता, अनुच्छेद 29 में आर्थिक सामाजिक, सास्कृतिक अधिकार अनुच्छेद 30 में पिक्षा सम्बकियत अधिकार अनुच्छेद 31 में सम्पत्ति स्वाने का अधिकार, अनुच्छेद 30 में काम का अधिकार समान कार्य समान वेतन संघ बनाने का अधिकार, अनुच्छेद 40 में पंचायती राज संस्थाजों में 73 वे 74 वे संविधान संशेधन के माध्यम से आरक्षण, अनुच्छेद 41-42-43 में नीति निर्देषक तत्य के तहत नारी को विषेष सामाजिक सुखका अनुछेद 41 में नारी को काम का अधिकार, षिक्षा अधिकार, बेरोजगारी व अपाहिज होने पर सुरक्षा अनुच्छेद 42 में महिलाओं को प्रसूति सहायता की व्यवस्था, अनुच्छेद 43 में कामकाजी के जीने के लिए अच्छा वेतन

महिला मानवाधिकारों के संदर्भ में किए गए विश्व सम्मेलन:

संयुक्त राष्ट्र संघ द्वारा वर्ष 1975 को अंतर्राष्ट्रीय महिला वर्ष के रूप में मनाया गया तथा इसके उपलक्ष्य में महिलाओं पर प्रथम विश्व सम्मेलन मैक्सिको में आयोजित किया गया। इसके पश्चात् तीन और विश्व सम्मेलन कोपनहेगन (1980), नैरोबी (1985) तथा बीजिंग (1995) में किए गए। इन्हें इस प्रकार देखा जा सकता है।

प्रथम विश्व महिला सम्मेलन, 1975 (मैक्सिको सम्मेलन):

प्रथम अंतर्राष्ट्रीय विश्व महिला सम्मेलन संयुक्त राष्ट्र संघ का महिला कल्याण के लिए प्रथम प्रयास था। मैक्सिको सिटी में वर्ष 1975 में 19 जून से 2 जुलाई के बीच हुई।"

प्रथम अंतर्राष्ट्रीय महिला सम्मेलन में अनेक देशों के सरकारी प्रतिनिधियों ने भाग लिया। इस सम्मेलन की महत्त्वपूर्ण उपलब्धि यह रही कि संयुक्त राष्ट्र की महासभा द्वारा वर्ष 1976 को अंतर्राष्ट्रीय महिला वर्ष और 1975-85 के दशक को अंतर्राष्ट्रीय महिला दशक घोषित किया गया एवं महिलाओं के कल्याण के लिए प्रथम पंचवर्षीय योजना बनाई गई। इस सम्मेलन में स्त्री शिक्षा, महिलाओं के लिए रोजगार के अवसर बढ़ाने, लिंग आधारित भेदभाव मिटाने, नीति निर्धारण में महिलाओं को शामिल करने, समान राजनीतिक, सामाजिक एवं नागरिक अधिकार देने आदि के लिए घोषणाएँ की गई साथ ही संचार व सूचना के प्रचार माध्यमों द्वारा स्त्री की बदलती और विस्तृत होती भूमिका को सकारात्मक रूप से प्रयुक्त किए जाने पर बल दिया गया।"

द्वितीय विश्व महिला सम्मेलन, 1980 (कोपेनहेगन सम्मेलन):

प्रथम अंतर्राष्ट्रीय महिला सम्मेलन में बनाई गई प्रथम पंचवर्षीय योजना के मूल्यांकन के लिए तथा अगली पाँच वर्षों की योजना बनाने के लिए कोपेनहेगन में वर्ष 1980 में 14 जुलाई से 31 जुलाई तक द्वितीय विश्व महिला सम्मेलन आयोजित हुआ। इस सम्मेलन में महिलाओं के लिए तीन उप-विषय शिक्षा, नियोजन एवं स्वास्थ्य जोड़े गए। मैक्सिको में घोषित उद्देश्य कोपेनहेगन के लिए सार्थक माने गए और शेष दशक के कार्यान्वयन कार्यक्रम का आधार भी बने। महिलाओं की स्थिति में सुधार के लिए पारिवारिक, स्थानीय, राष्ट्रीय व अंतर्राष्ट्रीय सभी स्तरों पर महिलाओं व पुरुषों दोनों में महिलाओं की भूमिकाओं से संबंधित दृष्टिकोण में परिवर्तन की बात कही गई।

तृतीय विश्व सम्मेलन, 1985 (नैरोबी सम्मेलन):

नैरोबी में वर्ष 1985 में 15 जुलाई से 26 जुलाई के बीच हुए तृतीय विश्व महिला सम्मेलन में महिलाओं को आगे बढ़ाने के लिए प्रतिनिधि मण्डलों ने नैरोबी, प्रगतिशील रणनीतियों" नामक दस्तावेज का प्रतिपादन किया। इस दस्तावेज में वर्ष 2000 तक महिलाओं की प्रगति के क्षेत्र में काम किए जाने की गतिविधियों व रणनीतियों का ढाँचा तैयार किया गया।

नैरोबी तृतीय विश्व सम्मेलन में महिलाओं के विकास एवं कल्याण हेतु निर्धारित उद्देश्य निम्न थे-

1. महिलाओं की सामाजिक एवं राजनैतिक स्तर पर पुरुषों के समकक्ष समान स्तर पर सहभागिता के लिए सभी सदस्य राष्ट्रों की सरकारो को अपने-अपने देशों में संवैधानिक व कानूनी आधारों पर समानता के प्रावधानों को लागू करने के निर्देश दिए गए।
2. कानूनी सुधारों के अंतर्गत महिलाओं को प्रसूति अवकाश की सुविधा, अपनी पसंद का विवाह एवं तलाक देने के अधिकारों को देने की बात की गई।
3. महिलाओं में अपने सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, पारिवारिक अधिकारों के प्रति जागरूकता पैदा की जाए तथा विकासशील देशों की महिलाओं को भी विकसित देशों की महिलाओं के उन्नत जीवन स्तर तक लाने के प्रयास किए जाए।
4. लड़कियों को लड़कों के समान शैक्षणिकता के स्तर पर लाने हेतु सुविधाएँ दी जाएं तथा रुढ़िबद्ध लिंग आधारित पाठ्यचर्या का उन्मूलन किया जाए।
5. महिलाओं की भागीदारी सुनिश्चित व सुदृढ़ करने के लिए उन्हें प्रशिक्षित व प्रोत्साहित किया जाना चाहिए एवं महिलाओं द्वारा कृषि कार्य एवं अर्थ व्यवस्था में दिए गए योगदान को मान्यता दी जानी चाहिए।
6. विज्ञान व प्रौद्योगिकी तथा अनुसंधान के लिए व बाह्य अंतरिक्ष के सभी शांतिपूर्ण कार्यों में सरकार द्वारा महिलाओं को सम्मानित किया जाना चाहिए।

चतुर्थ महिला सम्मेलन, 1995 (बीजिंग सम्मेलन):

बीजिंग में 4 से 15 सितम्बर तक चलने वाले चतुर्थ विश्व महिला सम्मेलन के मुख्य उद्देश्य थे।"-

1. प्रतिनिधि मण्डलों की प्रगतिशील रणनीतियों की उपलब्धियों का पुनरावलोकन करना।

2. समाज में ऐसी स्थिति पैदा करना जिससे महिलाओं को आगे बढ़ने का प्रोत्साहन मिले। 3 21वीं सदी की वैज्ञानिक, तकनीकी, आर्थिक एवं राजनीतिक विकास संबंधी चुनौतियों और जरूरतों का सामना

3. करने के लिए साधन उपलब्ध कराना।

4. महिलाओं को समर्थ बनाने के लए योजनाएँ बनाना।

मूल्यांकन:

बीसवीं शताब्दी मानवाधिकारों के क्षेत्र में सोच-विचार को नवीन आयाम प्रदान करने के लिए इतिहास में एक विशिष्ट स्थान रखती है। यद्यपि यह एक कटु सत्य है कि आज भी विश्व के अनेक देशों के नागरिको को पूर्ण मानव अधिकार प्राप्त नहीं हो सके है। महिला जनसंख्या के अधिकाष नाम के लिए भारत में ही नहीं वरन् सम्पूर्ण विश्व में मानवाधिकार आज भी निधाक है। आजादी के 75 वर्षों की विकास यात्रा में देष में महिलाओं उनकी षिक्षा, स्वास्थ्य, आर्थिक स्थिति और सामाजिक मान्यताओं के प्रति दृष्टिकोण में परिवर्तन की सुगबुगाहट अवष्य लक्षित हैं लेकिन इस विशाल और अनगिनत विविधताओं वाले देश में इस परिवर्तन का जप नगण्य ही है। लेकिन यह एकदम साय और प्रामाणिक तथ्य है कि देश में महिलाओं पर अत्याचारी की विविधता तथा गंभीरता भी बढ़ी है। महिलाओं से सम्बन्धित अपराधों के नये-नये विकृत रूप सामने आए है जो यह प्रमाणित करता है कि, संविधान, सामाजिक मर्यादा और नारी महाय के सारे प्रगतिपील कायों की बावजूद उन पर हो रहे आधाधारी में वृद्धि होती जा रही है। महिलाओं की स्थिति को सुधारने एवं उसके विकास हेतु उन्हें समाज व संविधान ने कई अधिकार तो दे दिए है. ताकि यह अपने हक को पा सके किन्तु क्या इन अधिकारों से बनने से ही उनकी स्थिति सुधर जायेगी, क्योंकि जो अधिकार उन्हें मिलने चाहिए थे आज भी वे उन अधिकारों से वचित है। उनके जीवन में तभी प्रसन्नता आयेगी जब उन्हें समाज में समानता का अधिकार प्राप्त होगा!

संदर्भ ग्रंथ सूची:

1. IJCRT1801221 इंटरनेशनल जर्नल ऑफ क्रिएटिव रिसर्च थॉट्स (IJCRT)www.ijcrt.orgwww.ijcrt.org
2. ©2018 आईजेसीआरटी | खंड 6, अंक 1 जनवरी 2018 | आईएसएसएन: 2320-2882
3. आहुजा, राम (1994) भारत में सामाजिक समस्याएँ, जयपुर, रायत पब्लिकेषन।
4. अंसारी एम ए. (2000) महिला और मानवाधिकार जयपुर, ज्योति प्रकाषन।
5. डॉ. पूरणमल (2003) मानवाधिकार, सामाजिक न्याय और भानत का संविधान, जयपुर, पोइन्टर पक्तिकेयन्स।
6. डॉ. राजकुमार (2006) नारी के बदलते आयाम, नई दिल्ली, अर्जुन पमित्रचिंग हाउस।
7. जाखड दिलीप (2001) मानवाधिकार जयपुर युनिवर्सिटी बुक हाउस प्रा. ति.।
8. कौषिक आगा (2004) नारी सपक्तिकरण विमर्ष एवं यथार्थ, जयपुर, पॉइन्टर पदिनवर्स।
9. शैतानी प्रकाश नारायण (2003) मानवाधिकार और कर्तव्य जयपुर अविस्कर पशिशेषाना और वितरक। रावत हरिकृष्ण (1998) इनसाइक्लोपीडिया ऑफ सोशियोलॉजी, जयपुर रावत पेस्टिश
10. सारस्वत अजेन्द्रनाथ (2002) सामाजिक न्याय मानवाधिकार और पुलिस, नई दिल्ली, राधा पक्तिकषन्स।
11. शर्मा प्रक्षः (2011) महिला विकास और सषक्तिकरण, जयपुर, आविष्कार पब्लियर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स।
12. सिंह राजबाला (2016) मानवाधिकार और महिलाएँ, जयपुर आविष्कारपब्लिकेपन्ना।
13. मिश्रा सरस्वती-भारतीय स्त्रियों की प्रस्थिति, शारदा पब्लिशिंग हाउस, दिल्ली संस्करण 1991 CR
14. उ.प्र. गजेटियर 2010 उ.प्र. सरकार लखनऊ 3-सिंह आर. मानवाधिकार एवं महिलाएं प्वाइंटर पब्लिशर्स जयपुर (सस्करण) 2008
15. शर्मा पी.-महिला लैंगिक असमानता एवं अपराध प्वांइण्टर पब्लिशर्स जयपुर सं. 2006 5-यादव सन्तोष-उन्नीसवी और बीसवी शताब्दी में स्त्रियों की स्थिति कामनवेल्थ पब्लिशर्स दरियागंज नई दिल्ली
16. जिला सांख्यिकी पत्रिका आजमगढ़ 2015-182008
17. आर्य साधना-नारीवादी राजनीति: संघर्ष और मुद्दे हिंदी माध्यम दिल्ली विश्वविद्यालय
18. कृष्णा राज-युमेन एण्ड डवलेपमेंट सुभद सुरावत प्रकाशन पूना संस्करण 1988
19. समाचार पत्र-पत्रिका योजना कुरुक्षेत्र लेख आदि
20. जिला महिला स्वास्थ्य चिकित्सालय आजमगढ़ 2015-17 11-मिश्र उर्मिला प्रकाशन प्राचीन भारत में नारी मध्य प्रदेश अकादमी भोपाल 1987

21. भारतीय संविधान की प्रस्तावना अनुच्छेद 42 वें संशोधन
22. IJCRT1801221 इंटरनेशनल जर्नल ऑफ क्रिएटिव रिसर्च थॉट्स (IJCRT) www.ijcrt.org 1622www.ijcrt.org
23. 2018 आईजेसीआरटी | खंड 6, अंक 1 जनवरी 2018 | आईएसएसएन: 2320-2882
24. IJCRT1801221 इंटरनेशनल जर्नल ऑफ क्रिएटिव रिसर्च थॉट्स (IJCRT) www.ijcrt.org 1624www.ijcrt.org
25. ©2018 आईजेसीआरटी | खंड 6, अंक 1 जनवरी 2018| आईएसएसएन: 2320-2882
26. IJCRT1801221 इंटरनेशनल जर्नल ऑफ क्रिएटिव रिसर्च थॉट्स (IJCRT) www.ijcrt.org 1624
27. www.ijcrt.org
28. ©2018 आईजेसीआरटी | खंड 6, अंक 1 जनवरी 2018| आईएसएसएन: 2320-2882

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

जागतिक तापमान वाढ

प्रा. डॉ. सूर्यकांत नागनाथ कळसकर
कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर कॉलेज, हणेगाव
Corresponding Author- प्रा. डॉ. सूर्यकांत नागनाथ कळसकर
Email: kalaskarsuryakant@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.11178260

प्रस्तावना:

जगाला भेडसावणाऱ्या ज्या काही अनेक समस्या आहेत, त्यातील एक समस्या म्हणजे जागतिक तापमान वाढ ही आहे. जागतिक तापमान वाढ ही एक अशी महाभयंकर समस्या आहे की, याचे संपूर्ण जगावर महाभयंकर परिणाम होतात. मानवाच्या पर्यावरणातील हस्तक्षेपमुळे आणि मानवाच्या सुखामय जीवन जगण्याच्या पद्धतीतून पर्यावरणातील साधनसंपतीचा अतिरेकी वापर झालेला आहे. मानवाच्या सुखमय जीवन जगण्याच्या पद्धतीतून निर्माण होणाऱ्या असंख्य गराजांची पूर्तता करण्यासाठी अनेक उद्योगांची निर्मिती करण्यात आली आहे. या उद्योगातून पर्यावरणात अनेक विषारी वायु वातावरणात मोठ्या प्रमाणात सोडले जातात. यातील काही वायु उष्णता धरून ठेवतात. उष्णता धरून ठेवणाऱ्या वायूचे वातावरणातील प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे पृथ्वीचे व पृथ्वीच्या सभोवती असलेल्या वातावरणाचे सरासरी तापमान वाढत आहे. पृथ्वीचे सरासरी तापमान वाढण्याच्या क्रियेस जागतिक तापमान वाढ असे म्हणतात. जागतिक तापमान वाढीस भूमंडळ तापमानवाढ किंवा पृथ्वीची तापमानवाढ असेही म्हणतात. पृथ्वीच्या तापमान वाढीसाठी कारणीभूत ठरणाऱ्या वायुना हरितगृह वायु असे म्हणतात. या हरितगृह वायूमध्ये सर्वात महत्वाची भूमिका बाजवणारा वायू म्हणून कार्बनडाय ऑक्साईड वायूकडे पहिले जाते.

उद्दिष्ट्ये: या संशोधन पेपरची उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

१. जागतिक तापमान वाढीच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.
२. जागतिक तापमान वाढीच्या कारणांचा अभ्यास करणे.
३. जागतिक तापमान वाढीच्या परिणामाचा अभ्यास करणे.

माहितीस्त्रोत : या संशोधन पेपरसाठी प्रकाशित पुस्तके, जर्नल्स, वर्तमानपत्रे आणि ऑनलाइन डेटाबेस आणि विविध लेखांमधील लेखकांची मते वापरली आहेत.

विषय विवेचन :

पृथ्वीभोवतालच्या वातावरणाच्या सरासरी तापमानवाढीची प्रक्रिया म्हणजे जागतिक तापमानवाढ होय. याचबरोबर हवामानातील आताचे बदल व त्यामुळे भविष्यात होणारे बदल यांचाही उल्लेख यासंदर्भात करण्यात येतो. सूर्यापासून सूर्यमालेतील ग्रहाना उष्णता मिळते. सूर्याकडून दर सेकंदाला सुमारे ३ लक्ष कि.मी. वेगाने प्रवास करणाऱ्या विद्युत चुंबकीय लघुलहरी द्वारे उत्सर्जित होणाऱ्या उर्जेला सौरशक्ती किंवा सौर ऊर्जा (Insolation) असे म्हणतात, या लहरी वातावरणाच्या बाह्य सीमेपाशी येतात तेंव्हा त्यांचा ४१% प्रकाशकिरणांचा (सूर्यप्रकाश), सुमारे ९% भाग अतिनिल किरणे (Ultra Violate Rays), गॅमा किरण व क्ष-किरणांचा असतो. हे सर्व किरण लघुलहरीच्या स्वरुपात असतात. सौरशक्तीचा उरलेला ५०% भाग उपाठन किंवा अवरक्त किरणांचा (Infra Red Rays) असतो. उपारुण किरणे दीर्घ लहरीच्या स्वरुपात असतात. ते वातावरणातच शोषले जातात. सामान्यपणे सूर्यापासून उत्सर्जित होणाऱ्या सौरशक्तीपैकी ज्या लघुलहरीची तरंग लांबी (Wave Length) ०.४ ते ०.७ मायक्रॉन (एक मायक्रॉन म्हणजे एका सें. मीटरचा दहा हजारावा भाग) असतो. त्या लहारी वातावरणातून पृथ्वीपर्यंत पोहोचतात त्यांच्यामुळे पृथ्वीच्या पृष्ठभाग तापतो.

पृथ्वीने सौरशक्तीचे केवळ शोषण केले असते तर पृथ्वीचे तापमान प्रचंड प्रमाणात वाढले असते. पृथ्वीने ग्रहण केलेली सौरशक्ती भौतिक उर्जेत रुपांतरीत केली जाते व भूपृष्ठावरुन वातावरणात दीर्घ लहरीच्या (Long Waves) स्वरुपात उत्सर्जित केली जाते. अशा प्रकारे पृथ्वीने ग्रहण केलेली सौरशक्ती व उत्सर्जित केलेली उष्णता यांचे प्रमाण समान असते. म्हणूनच पृथ्वीचे तापमान स्थिर राहते. पृथ्वीपासून उत्सर्जित होणाऱ्या उष्णतेमुळे वातावरण तापते. त्यामुळे वातावरणाच्या तपांबर थरात तापमान भूपृष्ठापासून जसजसे उंच जावे तसतसे कमी होत जाते. सूर्यापासून पृथ्वी व चंद्र समान अंतरावर आहेत. दोघानाही सूर्यापासून सारख्या प्रमाणात ऊर्जा मिळते. परंतु चंद्राच्या पृष्ठभागाचे तापमान ऋण म्हणजे (-) १८° से. आहे व पृथ्वीच्या पृष्ठभागाचे सरासरी तापमान १५° से. आहे. हा फरक असण्याचे कारण म्हणजे पृथ्वीभोवती वातावरण आहे. तसे चंद्राभोवती नाही. वातावरणामुळे पृथ्वीकडून उत्सर्जित होणारी भौतिक ऊर्जा आडवली जाते. वातावरण नसते तर

ती सर्व ऊर्जा अवकाशात उत्सर्जित झाली असती. वातावरणामुळे पृथ्वी व पृथ्वीलगतची हवा उबदार राहते.

हरितवायूंचे उत्सर्जन :

पृथ्वीवर अनेक वेळा जागतिक तापमान वाढ झाली होती. याचे पुरावे अंटार्क्टिकातील बर्फांच्या अस्तरात मिळतात. त्या वेळेसची तापमानवाढ ही पूर्णतः नैसर्गिक कारणांमुळे झाली होती व पृथ्वीच्या वातावरणात आमूलाग्र बदल झाले होते. सध्याची तापमानवाढ पूर्णतः मानवनिर्मित असून मुख्यत्वे हरितवायू परिणामामुळे होत आहे. जागतिक तापमानवाढीस मुख्यत्वे अमेरिकेची संयुक्त संस्थाने, यूरोपातील देश, चीन, जपान हे देश जबाबदार आहेत. याचे मुख्य कारण त्यांचा मोठ्या प्रमाणावरील ऊर्जेचा वापर व मोठ्या प्रमाणावरील हरितवायूंचे उत्सर्जन. यातील अमेरिका हा सर्वाधिक हरितवायूंचे उत्सर्जन करणारा देश आहे.

इतिहासातील तापमानवाढीच्या घटना :

गेल्या शंभर वर्षांत यापूर्वी कधीही झालेली नाही एवढ्या झपाट्याने तापमानवाढ झाली आहे. विषुववृत्तीय भागातील जी थोडी पर्वत शिखरे हिमाच्छादित आहेत, त्यातील किलिमांजारो हे पर्वत शिखर प्रसिद्ध आहे. या पर्वत शिखरावरील हिमाच्छादन १९०६ च्या तुलनेत २५ टक्केच उरले आहे. आल्प्स आणि हिमालयातील हिमनद्या मागे हटत चालल्या आहेत आणि हिमरेषा म्हणजे ज्या ऊंचीपर्यंत कायम हिमाच्छादन असते ती रेषा वर वर सरकत चालली आहे. एव्हरेस्टवर जाताना लागणारी खुंबू हिमनदी १९५३ ते २००३ या ५० वर्षांत पाच किमी. मागे सरकली आहे. १९७०च्या मध्यापासून नेपाळमधील सरासरी तापमान १०° से.ने वाढले, तर सैबेरियातील कायमस्वरूपी हिमाच्छादित प्रदेशात गेल्या ३० वर्षांत म्हणजे १९७५-७६ पासून १.५° से. तापमानवाढ नोंदवण्यात आली असून येथील हिमाच्छादन दरवर्षी २० सेंमी.चा थर टाकून देत आहे. इत्यादी जागतिक तापमानवाढीची अनेक उदाहरणे आहेत.

हरितगृह परिणाम :

सूर्यापासून पृथ्वीकडे येणारी ऊर्जा लघुलहरीच्या स्वरुपात असते. ती वातावरणाकडून पृथ्वीच्या पृष्ठभागाकडे येऊ शकते. तथापि पृथ्वीकडून उत्सर्जित होणारी ऊर्जा दीर्घ लहरींच्या स्वरुपात असते. त्यातील कांही ऊर्जा तपांबरातील खालच्या थरात शोषली जाते. हवेतील पाण्याची वाफ ४ ते ७ मायक्रॉन तरंग लहरीची ऊर्जा शोषून घेते. हवेतील कार्बनडाय ऑक्साईड वायू १३ ते १९ मायक्रॉन तरंग लहरीची ऊर्जा शोषून घेतो. सुमारे ६५% ऊर्जा वातावरणातून अवकाशात उत्सर्जित होते. परंतु पाण्याची वाफ व कार्बनडाय ऑक्साईड यांनी शोधून घेतलेली ऊर्जा तपांबराचे तापमान वाढविण्यास कारणीभूत ठरते. तपांबरातील हवा उपारुण किरणांच्या (Infra Red Rays) स्वरुपात उर्जेचे उत्सर्जन करते. त्यातील कांही ऊर्जा वातावरणाच्या वरच्या थरात जाते. परंतु काही ऊर्जा पृथ्वीच्या पृष्ठभागाकडे परत येते. या परत येणाऱ्या उर्जेमुळे पृथ्वीचे तापमान सरासरी पेक्षा जास्त वाढते. याला हरीतगृह परिणाम (Green House Effect) असे म्हणतात.



हरितगृह परिणाम:

हरितगृह हे खास प्रकारच्या वनस्पती वाढविण्यासाठी बनवलेले काचेचे घर असते. हे घर वनस्पतींना बाह्य हवामानाचा परिणाम होऊ नये म्हणून बंदिस्त असते व ऊबदार असते. हे घर काचेचे बनविलेले असते व त्यातून आत आलेली उष्णता बाहेर जाण्यास मार्ग नसल्याने आतील तापमान ऊबदार राहत असल्याच्या संकल्पनेमुळे ही संज्ञा जागतिक तापमान वाढीत वापरतात. काही वायूंच्या रेणूंची रचना अशा प्रकारची असते की ते अवरक्त लहरी (infra-red waves) परावर्तित करू शकतात. कार्बन डाय-ऑक्साइड, मिथेन, डायनायट्रोजन ऑक्साइड व पाण्याची वाफ हे प्रमुख वायू असे आहेत जे अवरक्त लहरी परावर्तित करू शकतात. सूर्यापासून पृथ्वीला मिळणाऱ्या ऊर्जेत या लहरींचा समावेश असतो. पृथ्वीवर येणाऱ्या बहुतेक अवरक्त लहरी व इतर लहरी दिवसा भूपृष्ठावर शोषल्या जातात. त्यामुळे पृथ्वीवर दिवसा तापमान वाढते. सूर्य मावळल्यावर ही शोषण प्रक्रिया थांबते व उत्सर्जन

प्रक्रिया सुरू होते व शोषलेल्या लहरी अंतराळात सोडल्या जातात. परंतु काही प्रमाणातील या लहरी वर नमूद केलेल्या वायूंमुळे पुन्हा पृथ्वीच्या वातावरणात परावर्तित होतात व रात्रकाळात पृथ्वीला ऊर्जा मिळते.खालील वायू मुख्यत्वे पृथ्वीवरील तापमान उबदार ठेवण्यास मदत करतात.

अ क्र.	वायू	तापमान वाढ
१	पाण्याची वाफ	२०.६
२	कार्बन डाय-ऑक्साईड	७.२
३	ओझोन	२.४
४	डायनायट्रोजन ऑक्साईड	१.४
५	मिथेन	०.८
६	इतर वायू	०.६
	एकूण सर्व एकत्रित हरितवायू	३३०

वरीलप्रमाणे वाफ, कार्बन डाय-ऑक्साइड हे प्रमुख वायू आहेत ज्यामुळे हरितगृह परिणाम पहावयास मिळतो. पृथ्वीवर पाणी प्रंचड आहे व त्यामुळे वातावरणातील वाफेचे प्रमाणदेखील खूप आहे व त्यामुळेच हरितगृह परिणामात वाफेचा मोठा वाटा आहे. परंतु वाफेचे अथवा बाष्पाचे प्रमाण हे वातावरणात निसर्गनिर्मित असते. सूर्य समुद्राच्या पाण्याची वाफ तयार करतो व त्या वाफेचा पाऊस पडतो. ही प्रक्रिया निसर्गात अव्याहतपणे चालू असते त्यामुळे वातावरणातील वाफेचे प्रमाण हे बऱ्यापैकी एकसारखे असते. तसेच वाफेची हरितगृह वायू म्हणून ताकद इतर वायूंपेक्षा कमीच असते. त्यामुळे सध्याच्या जागतिक तापमानवाढीमध्ये वाफेचा फारसा वाटा नाही.

कार्बन डाय-ऑक्साइड व तापमानवाढीचा संबंध :

वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे हरितगृह परिणामात दुसरा महत्त्वाचा वायू म्हणजे कार्बन डाय-ऑक्साइड हा आहे. जग विकसित देश व विकसनशील देश या प्रकारात विभागले आहेत. औद्योगिक क्रांतीनंतर विकसित देशात मोठ्या प्रमाणावर कोळसा व खनिज तेलावर आधारित ऊर्जेचा वापर सुरू झाला व ज्वलन प्रकियेमुळे कार्बन डाय-ऑक्साईडचे मोठ्या प्रमाणावर उत्सर्जन सुरू झाले. १९७०च्या दशकानंतर विकसनशील देशांनीही विकसित देशांच्या पावलांवर पाऊल टाकून ऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू केला. अति प्रमाणात कोळसा व पेट्रोल यांचा वापर व त्याचवेळेस कमी झालेली जंगले यामुळे वातावरणातील कार्बन डाय-ऑक्साइडचे प्रमाण अजून जोमाने वाढण्यास मदत झाली. औद्योगिक क्रांती यूरोपमध्ये १७६० च्या सुमारास झाली त्यावेळेस वातावरणातील कार्बन डाय-ऑक्साइडचे प्रमाण २६० पीपीएम (Parts per Million) इतके होते. १९९८ मध्ये हेच प्रमाण ३६५ पीपीएम इतके होते तर २००९ मध्ये ४०० पीपीएम च्या जवळ पोहोचले आहे. हे प्रमाण वाढण्यास केवळ मानव जवाबदार आहे. केवळ कार्बन डाय-ऑक्साइड नव्हे तर मानवी कृत्यांमुळे मिथेनचेही वातावरणातील प्रमाण वाढत आहे. मिथेन हा कार्बन डाय-ऑक्साइडपेक्षा २१ पटीने जहाल हरितवायू आहे. पृथ्वीवर मानवाद्वारे केले जाणारे विविध उद्योगधंदे, त्यामुळे कारखान्यातील वायू उत्सर्जनात Co2, co, N2O, CFCS हे वायू मिसळतात व हे वायू नीलकिरणांचे शोषण करतात, गेल्या दोन शतकात हे प्रमाण वाढत आहे व त्यामुळे पृथ्वीवरील उष्णतेत वाढ होत आहे.

जागतिक तापमान वृध्दीची कारणे (Causes of Global Warming):

कार्बन डाय ऑक्साईड, पाण्याची वाफ, मिथेन, नायट्रस ऑक्साईड, ओझोन आणि CFC यांचा हरितगृह परिणाम साधणाऱ्या वायूत समावेश होतो. या सर्वांना "हरिगृह वायू" (Green House Gases) असे म्हणतात.

हरितगृह वायूंचे वाढते प्रमाण : खालील हरितगृह वायूंच्या वाढत जाणाऱ्या प्रमाणामुळे पृथ्वीच्या तापमानात वाढ होते.

१. कार्बन डाय ऑक्साईड (CO_2): पृथ्वीवर गिरण्या, कारखाने व स्वंयचलीत वाहनात दगडी कोळसा खनिजतेल, नैसर्गिक वायू इत्यादी इंधनांचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे वातावरणात फार मोठ्या प्रमाणात कार्बनडाय ऑक्साईड वायू सोडला जातो. विविध मानवी क्रियामुळे वातावरणात मिसळणाऱ्या कार्बनडाय ऑक्साईडची उगमस्थाने पुढील प्रमाणे आहेत.

औष्णिक वीज निर्मिती केंद्रे : औष्णिक वीज निर्मिती केंद्रात इंधन म्हणून दगडी कोळशाचा व अन्य खनिज इंधनाचा वापर केला जातो. इंधन ज्वलनामुळे मोठ्या प्रमाणावर कार्बनडाय ऑक्साईड निर्माण होतो.

स्वंयचलीत वाहनातील इंधन ज्वलन : स्वंयचलीत वाहनात दगडी कोळसा डिझेल, पेट्रोल नैसर्गिक वायू इत्यादीचा इंधन म्हणून वापर केला जातो. रेल्वे इंजिनमध्ये दगडी कोळसा व डिझेल वापरले जाते. या स्वंयचलीत वाहनात इंधनाचे अपूर्ण ज्वलन होऊन कार्बनडाय ऑक्साईडची निर्मिती होते.

कारखाने : कारखान्यामधून जे इंधनाचे ज्वलन होते त्यातून वेगवेगळ्या प्रकारचे वायु निर्माण होतात. हे वायु कारखान्याच्या धुराडयातून बाहेर पडतात. त्यामध्ये कार्बनडाय ऑक्साईड मोठ्या प्रमाणात असतो.

वणवे : जंगलामध्ये नैसर्गिक व मानव निर्मित कारणांमुळे आगी लागतात. या आगीमळे कार्बन डाय ऑक्साईडची निर्मिती होते.

इतर कारणे : घरगुती इंधनाचा वापर, दगडी कोळशाच्या खाणीना लागणाऱ्या आगी, तसेच जंगल तोडीमुळे वनस्पतीकडून कार्बन डाय ऑक्साईड ग्रहणात घट व मानवाच्या व प्राण्याच्या श्वसन इत्यादी कारणामुळे वातावरणात कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण वाढते.

२. क्लोरोफ्ल्युरो कार्बन (CFC) : क्लोरोफ्लुरो कार्बन या द्रव्यांचा उपयोग शीत पेट्या (रिफ्रीजरेटर्स), एरोस्प्रे व अग्निशामक द्रव्यामध्ये केला जातो. CFC द्रव्ये भूपृष्ठावर निरुपद्रवी आहेत, ती स्वस्त सहज उत्पादन करुन साठवून ठेवता येण्याजोगी बिनविषारी व उपयुक्त आहेत. त्यांचा उत्कलन बिंदु ० ते (-) ४० आहे. रासायनिक दृष्ट्या ती स्थिर आहेत. इ.स. १९३० पासून फ्रेऑन-११ व १२ (Freon-11,12) या CFC द्रव्यांचा वापर रिफ्रेजरेटर व अग्नीशामक उपकरणात सुरु झाला. इ.सन १९५० मध्ये CFC युक्त हेअर स्प्रेचे उत्पादन सुरु झाले. आज एरोसोल स्प्रे उद्योगात प्रतिवर्षी सुमारे १ दशलक्ष टनापेक्षा जास्त CFC वापरला जातो. जगभर रासायनिक उद्योगात CFC चा वापर फार मोठ्या प्रमाणावर केला जातो. प्लास्टिक उद्योगापासून संगणक उद्योगापर्यंत, शीतकरण यंत्रापासून वातानुकुलन यंत्रणा व मोटार उद्योगापर्यंत सर्वत्र CFC चा वापर केला जातो. तपांबरामध्ये त्याचे रासायनिक अथवा जैविक विघटन होत नाही. त्यामुळे त्याचे वातावरणात प्रमाण वाढत जाते.

३. मिथेन (CH) : मिथेन वायूचा इंधनवायू म्हणून वापर केला जातो. औद्योगिक क्रांती पूर्वी त्याचे वातावरणातील प्रमाण नगण्य म्हणजे ०.७५PPM होते. इ.स. १९८६ मध्ये ते १६५ PPM झाले. बॅक्टेरियाच्या जैविक क्रियामुळे तसेच खनिज तेल व नैसर्गिक वायूच्या खाणी तेल शुध्दीकरण क्षेत्रातून मिथेन वातावरणात मिसळतो. मिथेनचे प्रमाणे प्रतिवर्षी १.२ टक्केनी वाढते. मिथेनची तापमान वृध्दी क्षमता CO२ च्या २० ते ३० पट जास्त आहे.

४. नायट्रस ऑक्साईड (N_2O) : नायट्रोजन युक्त रासायनिक खतांच्या वापरामुळे शेतातून वातावरणात मिसळणाऱ्या नायट्रस ऑक्साईड वायूचे प्रमाण सुध्दा वाढत आहे. औद्योगिक क्रांती पूर्वी ते २८० ppb Parts Per Billion (बिलीयन म्हणजे महापद्म) होते. इ.सन १९८९ मध्ये वातावरणातील नायट्रस ऑक्साईडचे प्रमाण ३०५ ppb झाले. या वायुच्या वार्षिक वाढीचा दर ०.२ आहे.

५. ओझोन वायू (0,) : ओझोनांबरात ओझोन वायूचा थर आहे. त्याच प्रमाणे तपांबरात सुध्दा अत्यल्प प्रमाणात ओझोनचे अस्तित्व आहे. सध्या हवेतील ओझोनचे प्रमाण ३५ ppb आहे.

जागतिक तापमान वृध्दीचे परिणाम : (Effects of Global Warming) : IPCC (Inter Governmental Panel on Climatic Change) च्या अंदाजानुसार दर दशकात ०.२° से. तापमान वृध्दी दराने २१व्या शतकाच्या मध्यावर १° ते १.५° से पृथ्वीच्या सरासरी तापमानातवृध्दी होईल. ती सुध्दा पृथ्वीवर अनिष्ठ परिणाम घडवून आणण्यास पुरेशी असेल. हे अनिष्ठ परिणाम पुढील प्रमाणे असतील.

१. ध्रुवीय प्रदेशातील व उंच पर्वतीय प्रदेशातील बर्फ वितळू लागेल.

२. पृथ्वीवरील हिम साठे वितळल्यामुळे इ.सन २१०० पर्यंत सागरांच्या पातळीत १५ ते ९० से.मी. ने वाढ होऊन सागरी किनारे व सखल प्रदेशात पाणी शिरेल. उत्तर व वायव्य युरोप, भूमध्य समुद्रकिनारी प्रदेश, बांगलादेश, उत्तरकॅनडा व उत्तर सैबेरिया इत्यादी प्रदेशातील सुमारे ९० लाख ते १ कोटी लोकसंख्या पूरग्रस्त होईल. या आपत्तीचा आरंभ काळ २१ व्या शतकाच्या मध्यावरच होईल.

३. उंच हिमाच्छादित पर्वतात उगम पावणाऱ्या नद्यांना बर्फ वितळून अधिक पाण्याचा पुरवठा होईल व त्यामुळे नद्यांना महापूर येतील नद्या काठच्या व मुखाशी असलेल्या प्रदेशात हानी होईल.

४. बर्फ वितळल्यामळे हिमप्रदेशाची उष्णता परावर्तकता कमी होऊन पृथ्वीच्या उष्णता ग्रहणात वाढ होईल.

५. पृथ्वीच्या तापमान वृध्दीमुळे भूप्रदेशाची शुष्कता वाढून पर्जन्याचे प्रमाण कमी होईल. शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट होईल.

६. तापमान वृध्दीचा प्राणी जीवनावर सुध्दा विपरीत परिणाम होईल. प्राणी वर्गाच्या रचनेत काही जीवजाती नष्ट होतील. त्यामुळे अन्य काही जीव जातीचे उर्ध्वस्तरण होईल. काही नवीन जीव जाती निर्माण होतील. कनिष्ठ स्तरीय जीवजाती बदलत्या परिस्थितीशी अनुकुलन करु शकतील. तथापि काही उच्च स्तरीय जीव जाती असे अनुकुलन व समायोजन करु शकणार नाहीत. त्या जीवजाती नामशेष होण्याचा धोका संभावतो.

७. पृथ्वीवर हवामान परिवर्तने, वनस्पती व प्राणी जीवनातील परिवर्तने व परिस्थतीकी परिवर्तने यांचा परिणाम म्हणून प्राण्यांच्या काही जाती स्थलांतरे करु लागतील.

८. हवेतील CO2 वायूच्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे पावसाच्या पाण्यात CO२ वायू मिसळून कार्बोनिक आम्ल निर्मितीचे प्रमाण वाढेल. याचा परिणाम म्हणून नद्या व जलाशयाची विशेषतः सागर जलाची आम्लता वाढेल त्यामुळे सागरी जीवसृष्टीवर विपरीत परिणाम होतील.

९. हिमाच्छादनाचा ऱ्हास, जमीनीवरील कुरणांचा नाश, भूप्रदेशाची वाढती शुष्कता, पर्जन्य प्रमाणातील घट, पर्यावरणीय बदल यामुळे उत्तरोत्तर पृथ्वीच्या तापमानात होणाऱ्या वृध्दीचे प्रमाण वेगाने वाढू लागेल.

१०. तापमानवृध्दी CO२ च्या प्रमाणातील वृध्दी व पर्यावरणीय बदल यांचे मानवी आरोग्यावर घातक परिणाम होतील. अनेक सुक्ष्म जीवाणू व विषाणूंचे प्रमाण वाढून

साथीच्या रोगांचे प्रमाण वाढेल. मानवाला अन्न धान्य टंचाई व पाणी टंचाई या समस्यांना तोंड द्यावे लागेल.

निष्कर्ष :

जागतिक तापमान वाढ ही एक अशी महाभयंकर समस्या आहे की, याचे संपूर्ण जगावर महाभयंकर परिणाम होतात. या समस्येच्या उपाययोजनेसाठी १९७५ च्या मध्ये यूनायटेड नेशन्स एनव्हायरनमेंट प्रोग्राम (UNEP), वर्ल्ड मेट्रोलॉजीकल ऑर्गनायझेशन (WMO), National Acadami of Science अशा अनेक संस्थानी पर्यावरणविषयक कार्य सुरू केले. जागतिक तापमान वाढ रोखण्यासाठी वृक्ष तोडण्यावर निर्बंध घालणे आवश्यक आहे. तसेच वृक्ष लागवडीचे प्रमाण वाढवून त्याचे संगोपन करणे. कार्बनडाय ऑक्साईड, CFC, नायट्रस ऑक्साईड, मिथेन सारख्या जागतिक तापमान वाढ करणाऱ्या वायूचे प्रमाण कमी करण्यासाठी सौर ऊर्जाचा जास्तीत जास्त वापर करावा, सौर उर्जेवर चालणाऱ्या वाहनाची निर्मिती करून या वाहनाच्या वापरासाठी नियम आणि कायदे करावेत.

संदर्भ:

१. प्रा. रजनी देशमुख, प्रा. कल्पना देशमुख, हवामान व सागरशास्त्र
२. प्रा. खतीब के. ए., हवामान परिचय
३. सारंग एस. पर्यावरण भूगोल
४. घरपुरे व्ही. टी., हवामानशास्त्र

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

जागतिकीकरण आणि मराठी भाषा

प्रा. विजया महादेव पाटील साळोखे
वडरगे रोड, गर्दे नगर गल्ली नं.१, गडहिंग्लज ता - गडहिंग्लज, जि - कोल्हापूर
Corresponding Author- प्रा. विजया महादेव पाटील साळोखे
DOI- 10.5281/zenodo.11178272

प्रस्तावना:

जागतिकीकरणामुळे संपूर्ण विश्वाला खेड्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. जग जवळ आले आहे . गगनचुंबी सिमेंटचे वाळवंट सर्वत्र पसरले आहे. पण माणसांची मने मात्र तितकीच संकुचित बनत गेल्याचे चित्र दिसते. जागतिकिकरणामुळे जगभरात अनेक बदल होत आहेत. या बदलांचा परिणाम जसा आपल्या जीवनाच्या आर्थिक आणि सामाजिक अंगांवर होत आहे तसाच तो सांस्कृतिक अंगांवरही होत आहे. मराठी भाषा आणि मराठी संस्कृती या बदलांना कशी तोंड देते यावर तिचे भविष्य अवलंबून आहे. आजच्या गुंतगुतीच्या काळात जगणाऱ्या माणसांचे जीवन दुभंगलेपन,आपापसातील जीवघेण्या स्पर्धा,बदलते समाजजीवन,वाढती ग्लोबल बेकारी अशा कितीतरी गोष्टीमुळे सामान्य माणसाची होणारी गळचेपी मराठी साहित्यात त्याचे प्रतिबिंब पहायला मिळते.जागतिकीकरणामुळे काही भाषा लोप होण्याच्या मार्गावर आहेत.

जागतिकिकरणामुळे लोकांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे. महाराष्ट्रातील लोकं मोठ मोठया ठिकाणी पोटापाण्यासाठी गेली आहेत. महाराष्ट्रामध्ये मुंबईसारख्या शहरात व्यापार असल्याने इतर प्रांतातील लोकं येऊन स्थानिक झाली आहेत. आईवडील मुंबईत आणि मुलं अमेरीकेत अशी उदाहरणे आपल्याला आजच्या समाजात सर्रास दिसतात. बदललेल्या काळात मराठी टिकवण्यासाठी आपण काय कले पाहिजे यावर गांभीर्याने विचार करणे गरजेचे ठरते.

१८ व्या आणि १९ व्या शतकात जेव्हा मराठे जेते होते तेव्हा त्यांनी आपल्या भाषेचा आणि संस्कृतीचा प्रसार आजच्या महाराष्ट्राबाहेर गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, तामिळनाडू आदी प्रदेशात केला. तेथील मराठी संस्कृती आजही थोड्या प्रमाणात का होईना टिकून आहे. आजच्या युगात जेतेपणाची व्याख्या बदलली आहे. तलवारीच्या बळाऐवजी आर्थिक बळाला महत्व प्राप्त झालं आहे. म्हणूनच मराठी समाजाने आर्थिक प्रगती करुन घेणे आवश्यक आहे. जेव्हा एखादा समाज समूह (आर्थिक वा इतर क्षेत्रात) लक्षणीय प्रगती करतो तेव्हा जगामध्ये या समाजसमूहाच्या संस्कृतीविषयी आदरभाव तयार होतो आणि त्याच्या भाषा-संस्कृती विषयी कुतूहल तयार होते. मराठी माणसाने आपआपल्या क्षेत्रात नवी शिखरे पादाक्रांत करणं आवश्यक आहे. त्याने स्वतःचे उद्योग काढून ते यशस्वी करुन दाखवणे आवश्यक आहे. नोकऱ्या करणारे न बनता आपण नोकऱ्या देणारे बनलं पाहिजे. काळावर मात करायची असेल तर मराठी माणसाने हे नीट समजून घेणं आवश्यक आहे.

मराठी भाषेमध्ये सतत नवनिर्मिती होणं आवश्यक आहे. साहित्यात काळानुसार बदल होणं आवश्यक आहे. आजच्या बदललेल्या अभिरुचीनुसार नवीन पिढीला आवडेल अशा कविता, अशा कथा किंवा असे विषय साहित्यातून हाताळणं आवश्यक आहे.वरीलप्रमाणे तयार झालेली निर्मिती नवीन माध्यमांतून - इंटरनेट आणि दृक्-श्राव्य माध्यमातून - लोकांपुढे आणली पाहिजे. अनेक जुन्या पिढीच्या साहित्यीकांनी विश्व मराठी साहित्य संमेलनात बोलताना नवीन माध्यमांबाबत साशंकता व्यक्त केली. इंटरनेटचा वापर बेकायदा नकला करण्यासाठी केला जाईल अशी भितीही त्यांनी व्यक्त केली. अशा प्रकारे भिती बाळगून आपल्या भाषेला आणि साहित्याला कुंपण पडेल. मराठी भाषा जागतिकीकरणाच्या रेट्यासमोर टिकवायची असेल तर कुंपणे काढून सर्वप्रथम भाषेला मुक्त करावे लागेल. एखादी कलाकृती उत्तम असेल तर लोकं ती काहीही करुन मिळवतील हा आत्मविश्वास आजकालच्या जगात - जिथे मनोरंजनासाठी अनेक सोयीस्कर माध्यमे उपलब्ध आहेत - तिथे फोल आहे. काही पुरोगामी प्रकाशकांनी मात्र इंटरनेट आणि दृक्-श्राव्य मांध्यमांना आधीच आपलेसे केले आहे. नवीन पीढीपुढे जर मराठी साहित्य नवीन माध्यमातून सहज उपलब्ध झाले तरच काळाचे हे आव्हान आपण समर्थपणे पेलु शकु.

साहित्यरुपाने मराठी बोली व प्रमाण भाषेने समृद्ध आहे. मराठी भाषेला मोठे करण्यात संत, पंत आणि तंत यांचे योगदान मोठे आहे. तसेच महाराष्ट्रातील साहित्यिकांचा जसा मोलाचा वाटा आहे तसाच सर्वसामान्यांचाही आहे. जागतिकीकरणात मराठी भाषा ताठमानेने कायम उभी राहील, यासाठी शासन स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे

आपण वर्षभरात भाषा संवर्धन पंधरवडा, भाषा दिन आणि महाराष्ट्र दिन साजरे करतो. जी भाषा 'अमृतातेही पैजा जिंके'अशी होती तिच्या शाळा आज बंद पडत आहेत. पदवी- पदव्युत्तरकडे मराठी विषय निवडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस उतरत्या

क्रमाकडे चालली आहे, ही नक्कीच चिंतनीय बाब म्हणावी लागेल. जागतिकीकरणात मराठी शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठातील मराठी विभागाची स्थिती कशी असेल, हा प्रश्न ओघाने पुढे येतोच. आज मराठी शाळेत असणारी विद्यार्थी संख्या पहिली तर जेमतेम आहे .मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा ही सकळ मराठीजनाची मागणीमराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा ही सकळ मराठीजनाची मागणी असली तरी सध्या ती धूसर आहे. मराठी भाषा शाश्वत राहणे हे निव्वळ मराठी भाषा शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या उदरनिर्वाहाकरिता अनिवार्य नाही तर मराठीला ज्ञानभाषा बनविण्याकरिता कोश, सूची तसेच अनुवाद, संपादन, भाषा- साहित्यविषयक संशोधन, भाषा आणि तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमं, मनोरंजनमाध्यमं आदी क्षेत्रांसाठी आवश्यक आहे. मराठी जगली तरच साहित्य, नाटक, चित्रपट, संगीत, मराठी

वर्तमानपत्रं, आकाशवाणी- दूरचित्रवाहिन्यांना वाचक, प्रेक्षक, श्रोते मिळतील अन्यथा जागतिकीकरणाच्या वादळात मराठी भाषेची परवड होईल हे मात्र नक्की!भाषा दिन आपण उत्साहात साजरा करतो; पण विशिष्ट वर्ग सोडला तर आपली भाषा सशक्त होईल याकडे वर्षभर डोकावून पाहत नाही. मराठीला ज्ञानभाषेचं वैभव प्राप्त व्हावं असं वाटत असेल, तर मराठी भाषकांनी वैश्विकता स्वीकारावी; पण आपली मुळं, आपली स्थानिक ओळख विसरु नये. त्यांनी आपापले ज्ञानविषय, संज्ञा- संकल्पना ही संपत्ती मराठीत आणावी. मराठी शिकावी लागेल अशी शासकीय धोरणं आखावीत आणि मराठी शिकावीशी वाटेल अशी व्यवस्था निर्माण करावी.

मराठी माणूस जगभर आहे; पण मराठी भाषा मात्र पोचली नाही मराठी माणूस व्यवसाय आणि नोकरीनिमित्त जगभर पोचला आहे; पण मराठी भाषा मात्र पोचली नाही, विस्तारला फक्त त्याचा व्यवसाय आणि त्याचे पद. त्यातील काही भारतीय अमेरिका, इंग्लंड, जर्मनी आदी देशांतून आपला पेशा सांभाळून आपल्या राज्यातील प्रकाशकांसाठी स्वतंत्र लेखन वा अनुवादकीय काम करतात. यातून इतर भाषेतील नवनवीन विषयांचे ज्ञान मराठी वाचकाला मिळते; पण याद्वारे मराठीला किती बळ मिळते, याचा कुणीही विचार करत नाही. मराठीतील दर्जेदार साहित्यकृती तिकडे नेण्याचा ते मात्र प्रयत्न करीत नाही.. साहित्यरुपाने मराठी बोली व प्रमाण भाषेने समृद्ध आहे. मराठी भाषेला मोठे करण्यात संत, पंत आणि तंत यांचे योगदान मोठे आहे. तसेच महाराष्ट्रातील साहित्यिकांचा जसा मोलाचा वाटा आहे तसाच सर्वसामान्यांचाही आहे. जागतिकीकरणात मराठी भाषा ताठमानेने कायम उभी राहील, यासाठी शासन स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे.अशा पद्धतीने प्रयत्न केल्यास मराठी भाषा जागतिकीकरणात आपले अस्तित्व अनंत कालपर्यंत टिकवू शकेल शेवटी मराठी भाषेविषयी म्हणावे वाटते कवी सुरेश भट यांच्या शब्दांत..

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी। जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी।

धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी। एवढ्या जगात माय मानतो मराठी।।

संदर्भ सूची:

1. मराठी भाषा आज आणि उद्या – अनिल गवळी दर्या प्रकाशन जून २०१८
2. मराठी भाषा उगम व विकास – कृ. पा कुलकर्णी मेहता पब्लिशिंग हाऊस ,पुणे २०१७
3. जागतिकीकरण समाज आणि मराठी भाषा विजय प्रकाशन, पुणे २०१७
4. जागतिकीकरण मराठी साहित्य – संपा डॉ. शरद गायकवाड स्नेहवर्धन प्रकाशन ,पुणे २००९
5. मराठी कादंबरीचे अंतरंग नलिनी महाडीक स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे २००९
6. मराठी समीक्षेची सद्य;स्थिती, पॉप्युलर प्रकाशन मुंबई २०११

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

संशोधन आणि संशोधन कार्यात साधनांचा उपयोग

सुभाष एकनाथ निकम[1], डॉ. दादासाहेब आर. पवार[2]
[1]संशोधक, शिक्षणशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
[2]मार्गदर्शक, ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
सोयगाव जिल्हा, छत्रपती संभाजीनगर
Corresponding Author- सुभाष एकनाथ निकम
Email: subhashnikam83@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.11178345

गोषवारा:

संशोधन कार्यात माहिती मिळवण्यासाठी अनेक साहित्याचा, घटनांचा, गतसंशोधने व जे संशोधन कार्यास निगडीत आहे त्यांचा उपयोग संशोधन कार्यात केला जातो. संशोधन हे व्यापक असते. संशोधन हि सतत चालणारी प्रकिया आहे. जसजसा आपण एखाद्या समस्याचा शोध घेऊन माहिती मिळवत असतो. संशोधन कार्यात सर्वात महत्वाचा भाग म्हणजे संशोधन कार्यासाठी माहिती मिळवणे, गोळा करणे होय. संशोधक संशोधन कार्यासाठी विविध साधनांचा, साहित्यांचा वापर करीत असतो. त्यामध्ये प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण, अनुसूची, समाजमिती तंत्र, पदनिश्चयन क्षेणी व इतर संशोधन साधनाद्वारे माहिती संशोधन कार्यात घेण्यात येते.

प्रस्तावना:

संशोधन हि सतत चालणारी प्रक्रिया आहे. संशोधन कार्यासाठी संशोधकला अनेक साधनांचा उपयोग करावा लागतो. संशोधन प्रकियेमध्ये एखादी समस्या निवडून त्या समस्येसाठी लागणारे साधने, साहित्य यांचा अभ्यास संशोधकाला करावा लागतो. संशोधनामध्ये संशोधकाला आपल्या संधोधन समस्या विषयाची माहिती मिळवण्यासाठी विविध साधनांची माहिती विविध ठीकानावून गोळा करावी लागते. संशोधन कार्यासाठी डेटा मिळवण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची, पदनिश्यन श्रेणी, पडताळसूची, शोधिका, निरीक्षण तंत्र, प्रक्षेपण तंत्र, समाजमिती तंत्र, व इतर साधनाद्वारे माहिती संकलित केली जाते. त्यामुळे या साधनांचा उपयोग संशोधन कार्यात करण्यात येतो.

संशोधन :

शोध या शब्दाला इंग्रजीत Discovery आणि Invention हे दोन शब्द वापरतात. या दोन्ही शब्दांचा अर्थ शोध लावणे हा आहे. Discovery म्हणजे जी वस्तू अस्तित्वात आहे परंतु इतरांना ती माहित नाही. असी वस्तू शोधून काढणे होय. Invention म्हणजे जी वस्तू अस्तित्वात नाही व इतरांना सुद्धा माहित नाही अशी वस्तू नव्याने शोधून काढणे होय. संशोधन म्हणजे पुनःपुन्हा शोधून काढणे किंवा सर्व दिशांना जाणे होय. संशोधनास इंग्रजीत Research असे म्हणतात. Re म्हणजे पुनः आणि Search म्हणजे शोधणे यावरून Research म्हणजे पुन्हा शोधने.

संधोधन संकल्पना :

संशोधनाच्या व्याख्या :

Tuckman B. W. - " प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांच्या निराकरणाची पद्धतशीर प्रक्रिया म्हणजे संशोधन होय."

मौले, जॉर्ज जे. - " संशोधन म्हाणजे यथार्थ परिभाषित समस्येच्या सामाधानाकरिता केकेला सुव्यावस्थित, वस्तुनिष्ठ आणि अचूक असे संशोधन होय."

जॉन. डब्ल्यू. बेस्ट : " संशोधनातून अधिक प्रमाणात शास्त्रीय पद्धतीचे उपयोगी नियमबद्धता, क्रमबद्धता आणि त्यातील सुप्त एकीकरनाचे विवेचन असून त्या अंतर्गत संशोधनासाठी एक व्यवस्थित संरचना असते कि, ज्यामुळे अध्ययन प्रक्रियेमध्ये त्यांच्या परिणामाच्या निष्कर्षाचे एक प्रकारच्या नियम बद्धतेच्या प्रतिवेदनेचा अभिलेख असतो."

शॉर्ट ऑक्सफोर्ड इंग्लिश डिक्शनरी - " वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी एखाद्या विषायचा बारकाईने केलेला समीक्षात्मक अभ्यास किंवा वैज्ञानिक चिकित्सा म्हणजे संशोधन होय."

"कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्वे शोधण्यासाठी आणि जुनी तत्वे परीक्षणासाठी तयार

केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास म्हणजे संशोधन होय.''

संशोधनांची साधने :

संशोधनामध्ये साधनांना खूप महत्व आहे. संशोधन हि एक वैज्ञानिक प्रकिया आहे. संशोधन समस्या जाणून घेण्यासाठी, संशोधकाला समसेच्या मुळापर्यंत खोलात खोल जाऊन माहिती मिळवण्यासाठी विविध साधनांचा उपयोग करावा लागतो. संशोधनातील माहिती संकलनासाठी निवडलेली साधने व तंत्रे जेवढी अचूक तेवढी संशोधन माहिती व्यवस्थितपणे मिळते.

संशोधन साधनांचे दोन प्रकार आहे :

1. **प्राथमिक साधने –**
2. **द्वितियक साधने -**

प्राथमिक साधने :

१) **निरीक्षण :**

ज्ञान प्राप्तीचे एक प्रमुख साधन म्हणजे निरीक्षण होय. व्यक्ती व व्यक्ती समूहाला प्रत्यक्ष पाहून त्यांच्या वर्तनाचे विश्लेषण व नोंदी करण्याची व्यवस्थित पद्धती म्हणजे निरीक्षण होय. कोणतेही शास्त्र निरीक्षनापासुनच सुरु होते. व शेवटी त्यांच्या वैधतेसाठी परत निरीक्षनाकडेच वळते. निरीक्षणासाठी व्यक्तीची सावधानता, ज्ञानाच्या कक्षा, आवडी, हेतू इत्यादीवरूनच तिच्या निरीक्षनाच्या मर्यादा व स्वरूप ठरते. निरीक्षण करण्यासाठी कार्यक्षम, ज्ञानेंद्रिय, सावधानता, अचूकता, तत्परता, अनुमान क्षमता, दोन बाबीची तुलना करून फरक समजण्याची आणि पूर्वग्रहीत व अचूक माहिती घेण्याची क्षमता निरीक्षकास असणे आवश्यक आहे.

२) **प्रश्नावली :**

संशोधन कार्यात माहिती मिळवण्यासाठी प्रश्नावली हे एक महत्वाचे साधन आहे. सामाजिक संशोधनात प्रश्नावली या साधनाला खूप महत्व आहे. प्रश्नावली पद्धतीत संशोधन कर्ता उत्तरदात्यांना प्रत्यक्ष प्रश्न विचारत नाही. तर त्याच्याकडे प्रश्नावली देतो व माहिती भरून घेतली जाते.

प्रश्नावलीचा अर्थ व व्याख्या :

१) एका विषयाच्या संदर्भात व्यक्तीकडून माहिती मिळवण्यासाठी तयार केलेली प्रश्नाची एक क्रमबद्ध सूची म्हणजे प्रश्नावली होय.

२) **लुंडबर्ग :** " मुलभूत स्वरुपात प्रश्नावली हि एक प्रेरणांचा असा समूह आहे कि जी शिक्षित लोकांपुढे या प्रेरनेच्या अंतर्गत त्यांच्या मौखिक व्यवहारांचे निरीक्षण करण्यासाठी प्रस्तुत केली जाते.''

३) **विल्सन गी :** " विस्तृत क्षेत्रात मोठ्या संख्येने पसरलेल्या अथवा एखाद्या निवडलेल्या लहान क्षेत्रात पसरलेल्या लोकांकडून मर्यादित प्रमाणात तथ्थे संकलित करण्याची सरळ पद्धत म्हणजे प्रश्नावली होय.''

प्रश्नावलीचे प्रकार :

१) संवरचित प्रश्नावली
२) असंवरचित प्रश्नावली
३) बंदिस्त
४) मुक्त प्रश्नावली
५) चित्रमय प्रश्नावली
६) मिश्रित प्रश्नावली

मुलाखत :

संशोधन कार्यात मुलाखतीला खूप महत्व आहे. मुलाखतीच्या माध्यमातून संशोधन समस्येची अचूक माहिती या साधनाद्वारे मिळवता येते. मुलाखतीचे व्यक्तीच्या जीवनामध्येपण खूप महत्व आहे. प्रत्यक्ष व्यक्ती समोर असल्यामुळे व्यवस्थित माहिती घेता येते.

मुलाखतीच्या व्याख्या :

१) **श्री. यंग** " ज्या क्रमबद्ध विधीच्या योगे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या आंतरिक जीवनात कमी अधिक प्रमाणात प्रवेश करते ती मुलाखत होय.''

२) **हेडर आणि लिन्डमन** : मुलाखतीत दोन किंवा व्यक्तीमध्ये संवाद अथवा मौखिक पद्धतीची प्रश्नोत्तरे होतात.

३) **गुड आणि हट** : मुलाखत हि मूलतः सामाजिक आंतरक्रियेची प्रक्रिया आहे

मुलाखतीचे प्रकार :

निदानात्मक मुलाखत : समस्येचे निदान करणे आणि त्यांची करणे जाणून घेणे.

उपचारात्मक मुलाखत : सामाजिक समस्या सोडविण्यासाठी काही उपयंचा शोध घेण्यासाठी.

संशोधनात्मक मुलाखत : सामाजिक विषय व घटनांचा, संबधांचा शोध घेण्यासाठी.

औपचारिक मुलाखत : या मुलाखतीत अनुसुचीचा उपयोग करून प्रश्न विचारले जातात.

अनौपचारिक मुलाखत : या मुलाखतीत प्रश्न विचारण्याच्या संदर्भात मुलाखतकर्त्यावर कोणतेही बंधन नसते.

व्यक्तिगत मुलाखत : ज्या मुलाखतीत एकावेळी एकाच व्यक्तीची मुलाखत घेतली जाते.

सामुहिक मुलाखत : एकावेळी अनेक व्यक्तीची मुलाखत घेतली जाते.

पथक मुलाखत : या मुलाखतीत मुलाखतकार एक असून प्रतिसादक एक अथवा अधिक असतात.

अनुसूची :

संशोधन कार्यात अनुसुचीला महत्वाचे स्थान आहे. अनुसूचीमध्ये अध्ययन समस्या विषयाशी संबधित प्रश्नाची एक सूची असते. म्हणून त्याला अनुसूची असे म्हणतात.

अनुसूचीची व्याख्या :

गुड आणि हट : अनुसूची एक प्रकारची प्रश्नावली असून ती मुलाखत घेणारा संशोधक प्रतिसादकास प्रश्न विचारून इतर व्यक्तीसमोर भरण्याचे काम करतो.

बोगार्डस - अनुसूची हि अशी तथ्थे प्राप्त करणाऱ्या औपचारिक पद्तीचे प्रतिनिधित्व करते की, जे वस्तुनिष्ठ स्वरुपात आणि सहजतेने ओळखण्यासाठी आहेत. संशोधनकर्ता स्वत: अनुसूची भरतो.

अनुसुचीचा उद्देश : अनुसुचीचा महत्वाचा उद्देश म्हणजे प्रश्नाच्या उत्तरांच्या

माध्यमातून संशोधन विषया संबंधीची वस्तुनिष्ठ माहिती संकलित करणे होय.

अनुसुचीचे प्रकार :

१. **मुलाखत अनुसूची :** मुलाखत अनुसूचित संशोधक व संशोधनाचे एकक यांच्यात समोरासमोर संबंध येतो. संशोधक पूर्वनियोजित प्रश्नावालीनुसार प्रश्न विचारत जातो व त्याची उत्तरे अनुसूचित भरली जातात.

२. **प्रलेख अनुसूची :** प्रलेख अनुसूची हि अनुसूचीतील एक महत्वाची पद्धती आहे. प्रलेखीय अनुसुचीचा उपयोग हा स्वकथा, दैनदिनी, शासकीय आणि अशासकीय रेकोर्ड व इतर लिखित स्रोतापासून माहिती संकलित करण्यासाठी केला जातो.

३. **अवलोकन अनुसूची / निरीक्षण अनुसूची** : या अनुसुचीचा उपयोग एखाद्या घटनेचे निरीक्षण करताना होतो. निरीक्षण अनुसूचित संशोधकाला आपल्या क्षेत्रात जाऊन प्रश्न विचारून तथ्य संकलन करावे लागत नाही. तर तो स्वतः जाऊन घटनांचे निरीक्षण करून स्वतः तथ्य संकलित करतो व ती अनुसूची लिहतो.

४. **मूल्यांकन अनुसूची** : ज्यावेळी एखादी घटना किंवा वास्तूशी संबंधित विषयाबाबत उत्तरदात्याच्या अभिवूर्ती, मत, विचार, आवड इत्यादी सांख्खीकीय मापन करायचे असते, त्यावेळी या अनुसूचीचा वापर केला जातो.

५. **संख्यात्मक सर्वेक्षण अनुसूची :** या प्रकारच्या अनुसुचीचा उपयोग धर्म, कुटुंब, विवाह इत्यादीच्या विशिष्ट पैलूचे अध्ययन करण्यासाठी केला जातो.

समाजमिती तंत्र :

जेकोब एल. मोरेनो : यांचा Who Shall Surview ? हा ग्रंथ १९३४ मध्ये प्रसिद्ध झाला. या ग्रंथात मोरेना यांनी सामाजमितीच्या मुलभूत सिद्धांत आणि तंत्राचा सर्वप्रथम उल्लेख केला. मोरेनो हे एक ऑस्ट्रियन मानसशास्त्र म्हणून नावाजलेले आहे.

समाजमितीच्या व्याख्या :

युरी ब्रोनफेन ब्रित्रर : समाजमिती हि समूहातील व्यक्तीमध्ये असणारे पारस्पारिक आकर्षण विकर्षणाच्या मर्यादा आणि विस्तार मापनाचे व त्यावरून सामाजिक स्थिती, संरचना आणि विकास शोधण्याचे व त्याचे मुल्यांकन करण्याचे एक साधन आहे.

जे. जी. फेन्ज - "समुहातील सदस्यामध्ये असलेल्या पारस्पारिक आकर्षण आणि विकर्षणाचे मापन करून सामाजिक आंतरक्रियाच्या समग्रचा किंवा समुच्याचा शोध लावण्याची आणि त्याच बरोबर अशा संबंध समग्रास हाताळण्याची पद्धत म्हणजे समाजमिती होय."

समाजमिती तंत्राचे प्रकार :

१. **ळखा बरे ? तंत्रओ - The guess who ? Technique:** या तंत्रामध्ये काही विधाने दिलेली असतात. प्रत्येक विधान विध्यार्थ्यांना लागू पडेल असे असते.

२. **नामनिर्देशन तंत्र – (Nomination Technique):** वर्गातील एखादा विद्यार्थी त्याच्या गुणामुळे सर्वांनाच आवडतो. तर दुसरा आवडत नाही. गटाने एखादे काम करावयाचे असते तेव्हा या तंत्राचा फार चांगला उपयोग होऊ शकतो.

३. **पदनिश्यन तंत्र (Rating Scale) :** या तंत्रात एक निश्चित समूहातील सर्व विद्यार्थ्यांचे पदनिश्यन करण्याची सूचना देण्यात येते.

४. **सामाजिक आंतर मापन क्षेणी (The Social Distance Scale) :** एखादी व्यक्ती अथवा गट किती प्रमाणात दुसऱ्या व्यक्तीकडून अथवा गटाकडून स्वीकारली जाते अथवा हे सामाजिक अंतर मापन क्षेणी विशेषत: पाच बिंदू क्षेणी व सात बिंदू क्षेणीचा वापर करण्यात येतो.

पदनिश्चयन क्षेणी (Rating Scale):

पद निश्चयन क्षेणी माहितीच्या नोंदीचे हे गुणात्मक साधन आहे. एखादी वस्तू, परिस्थिती व्यक्ती, यांच्या बद्दल अभिप्राय निर्णय घेण्यासाठी पदनिश्यन हे साधन वापरले जाते.

पदनिश्चयन क्षेणीची व्याख्या :

बार डेविस आणि जॉन्सन " एखद्या स्थितीचे, वस्तूचे अथवा व्यक्तीच्या गुणांच्या संबंधविषयाचे मत अथवा निर्णय दर्शविणाऱ्या पद्धतीला पदनिश्यन क्षेणी असे म्हणतात."

जॉन बेस्टने " पदनिश्यन क्षेणी कोणत्याही व्यक्तीच्या गुणांचे किंवा वस्तूच्या मर्यादित वैशिष्ट्यांचे गुणात्मक विवरण प्रस्तुत करते."

पदनिश्यन क्षेणीचे प्रकार :

1. **प्रमाणित पदनिश्यन क्षेणी** : या प्रकारात विशिष्ट घटक दिलेले असतात. त्या घटकांचे काही नमुने देण्यात येतात. अशा नमुन्यापैकी कोणत्या घटकांच्या प्रकारशी तो मिळता जुळता आहे ते ठरविण्यात येते. त्यानंतर प्रतिसादकांना त्या क्षेणी विषयी विचारणा केली जाते.

2. **सक्तीची निवड पदनिश्यन क्षेणी** : या पदनिश्यन क्षेणीत विशिष्ट आशयाच्या अनुशंगाने दोन मते दिलेली असतात. त्या दोन मतांपैकी पदनिश्ययकास एकमत निवडण्यासाठी सूचना करण्यात येते.

3. **संस्थात्मक / संख्यांकित पदनिश्यन क्षेणी** - या पदनिश्यन क्षेणीत केवळ आकडे देण्यात येतात. उदा. अंक एक ते पाच , अंक एक ते सात अथवा अंक एक ते नऊ

4. **वर्णनात्मक पदनिश्यन क्षेणी** : या पदनिश्यन क्षेणीत क्षेणी दिलेली असते. व त्या क्षेणीचे वर्णन केलेले असते. त्यानुसार क्षेणीतील परिमाणे ठरविण्यात येतात. व्यक्तीच्या वैशिष्ट्यांच्या बाबतीत किंवा त्यांच्या व्यक्ती महत्व गुणांच्या अनुशंगाने शब्दाचे वर्णन देलेले असते. त्यानुसार अशा व्यक्तीचे पद ठरविण्यात येते.

5. **क्षेणी रेखित पदनिश्यन :** एका आडव्या रेषेवर विशिष्ट वैशिष्ट्याचे परिणाम दर्शवून रेखित क्षेणी तयार करतात.

पडताळा सूची :

एखाद्या संस्थेचे, प्रक्रियेचे किंवा व्यक्तीचे विविध घटक, विशिष्ट गुण प्रतिसादकाकडून जाणून घ्यावयाचे असल्यास पडताळा सूचीचा उपयोग केला जातो. एखादी व्यक्ती प्रकिया वा संस्था इत्यादी बद्दल विधानांची तयार केलेली यादी म्हणजे पडताळासूची.

पडताळा सूचीचे प्रकार :

पडताळा सूचीमध्ये विधानाची सत्यता पडताळून पाहता येते. त्यात अपेषित योग्य अथवा अयोग्य वर्तन, विशिष्ट कृती करण्याकरिता आवश्यक असलेली कौशल्य अथवा कल्पना यांच्या अनुशंगाने पडताळासूचीत काही विधाने दिलेली असतात.

१) परस्थितीच्या घटकांची माहिती विचारण्यासाठी तयार केलेली पडताळासूची
२) कृतीच्या क्रमाची पडताळासूची
३) कल्पना संचाची पडताळासूची
४) माहिती उपलब्ध करण्याची पडताळासूची
५) समस्या सूची

मानसशास्त्रीय कसोट्या / चाचण्य :

मानसशास्त्रीय कसोट्या आथवा चाचण्याचा उपयोग शैक्षणिक संशोधन कार्यासाठी तसेच मानसशास्त्रातील संशोधनासाठी केला जातो. संशोधन कार्यासाठी तज्ञांकडून तयार केलेल्या प्रमाणित केलेल्या चाचण्याचाही उपयोग संशोधनात केला जातो.

व्याख्या :

गे Gay " एखाद्या व्यक्तीच्या अथवा गटांच्या ज्ञानाचे कौशल्याचे, भावनांचे, बुद्धीचे अथवा अभियोग्यतेचे मापन करण्याचे साधन म्हणजे कसोटी होय.''

क्रोनबँक " विशिष्ट वेळी दोन अथवा अधिक व्यक्तीची अथवा अधिक व्यक्तीची अथवा निरनिराळयांपैकी एक अथवा अधिक व्यक्तींची पद्धतशीरपने त्यांच्या वर्तनांची तुलना करण्याची पद्धती म्हणजे कसोटी होय.''

जॉन डब्ल्यू.बेस्ट " मानवी वर्तनाचे वर्णन आणि मापन करणे ज्या साधनाद्वारे सोपे जाते त्यास मानसशास्त्रीय कसोटी असे म्हणटले जाते."

मानसशास्त्रीय चाचण्यांचे प्रकार :

१. **अप्रमाणित अथवा अध्यापकाद्वारे तयार केलेल्या चाचण्या :**

२. **प्रमाणित चाचण्या :**

३. **निर्मित चाचण्या :**

अध्यापक निर्मित अथवा अप्रमाणित चाचण्या यात प्रमाणीकरणीकरणाची प्रक्रिया करण्यात येत नाही. या चाचणीची सप्रमानता आणि विश्वसनीयता सामान्य दर्जाची असते. ती उच्च दर्जाची असत नाही.

प्रमाणित चाचण्या :

प्रमाणित चाचण्याचा शैक्षणिक संशोधनात अधिक वापर करण्यात येतो. प्रमाणित चाचण्या या अध्यापकांनी तयार केलेल्या चाचणीपेक्षा अलग स्वरूपाच्या नसतात. यातील ज्ञानक्षेत्रे, निर्मिती, प्रक्रिया, प्रश्नांचे प्रकार प्रमाणित चाचण्यातहि असतात.

प्रमाणित चाचण्यांचे प्रकार :

१. **अभियोग्यता / अभिक्षमता चाचणी:**

या चाचण्यामध्ये शालेय आणि व्यवसायिक अभियोग्यता चाचण्यांचा समावेश करण्यात येतो.

2. **संपादन / प्रक्रिया चाचणी :**

पाठ्यक्रमावर आधारित अशी हि संपादन चाचणी असते. **फ्रीमेन यांच्या मते,** शेक्षणिक संपादन चाचणी हि विशिष्ट पाठ्यक्रमाची उद्दिष्टे विद्यार्थ्यांना संपादन केलेले ज्ञान व त्याचे आकलन त्यांच्या मते, विकसित केलेली कौशल्य व मूल्य एखाद्या विद्यार्थ्याने अथवा विद्यार्थी वर्गाने कितपत यशस्वीपणे संपादित केलेली आहेत, हे पाहत असते.

प्राविण्य चाचणीचे प्रकार :

१) **तोंडी चाचणी :**

२) **निबंधात्मक चाचणी -**

३) **वस्तुनिष्ठ चाचणी -**

बुद्धिमापन चाचणी -

व्यक्तिगत, सामुहिक, लेखी इत्यादी स्वरुपात बुद्धिमापन चाचण्या उपलब्ध आहेत. या चाचण्या प्रमाणित सुद्धा आहेत. या चाचण्यांचा सर्वत्र वापर करण्यात येतो. या चाचण्याचे एक छापील पत्रक असल्याने अशा चाचण्यांचे आयोजन करणे अगदी सोपे असते.

व्याख्या :

टर्मन- अमूर्त कल्पना विषयी विचार करण्याची क्षेमता म्हणजे बुद्धी होय.

वेक्षर- बुद्धी, व्यक्तीच्या शक्तीचा असा एक समुदाय आहे कि त्याची उद्दिष्टपूर्ण क्रिया विवेकशील चिंतन आणि वातावरणात प्रभावीपणे समायोजन करण्यात सिद्ध होते.

सारांश:

अशाप्रकारे संशोधन म्हणजे काय? संशोधनाचा अर्थ, संकल्पना, व्याख्या तसेच संशोधन कार्याची माहिती संकलित करण्यासाठी विविध साधनांचा उपयोग संशोधन कार्यात केला जातो. संशोधन कार्यासाठी लागणारे विविध साधनांचा अभ्यास या पेपर मध्ये करण्यात आला आहे.

संदर्भसूची :

1. संशोधनशास्त्र आणि पद्धती - डॉ. सुहास पाठक
2. शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे - प्राचार्य डॉ. के.यु. घोरमोडे , डॉ. कला कृष्णा घोरमोडे
3. अध्यापन व संशोधन अभियोग्यता संपूर्ण मार्गदर्शक - डॉ. शशिकांत अत्रदाते / स्वाती शेटे
4. शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे - प्रा. रा. शं. मुळे, प्रा. वि. तु. उमाठे
5. संशोधन पद्धती, प्रक्रिया,अंतरंग - डॉ. दु.का.संत

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

भारत में स्त्री शिक्षा की स्थिति

डॉ. कुमारी प्रेमलता
असिस्टेंट प्रोफेसर, इतिहास विभाग,
सुंदरवती महिला कॉलेज, भागलपुर, बिहार, तिलकामांझी भागलपुर विश्वविद्यालय, बिहार
Corresponding Author- डॉ. कुमारी प्रेमलता
ईमेल: prem.bgp19@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.11178365

शोध सार:

मानव सभ्यता के विकासक्रम में आरंभ से लेकर अब तक जहाँ सामाजिक, आर्थिक, राजनीतिक, सांस्कृतिक स्थितियों में निरंतर विकास एवं बदलाव आया वहीं भारतीय स्त्री के जीवन में भी काफी बदलाव के बावजूद शिक्षा के अभाव के चलते उनकी स्थिति निरंतर दयनीय होती चली गई। भारत में वैदिक काल में स्त्री की छवि सम्मानजनक थी। उन्हें समाज में अत्यंत प्रतिष्ठापूर्ण स्थान प्राप्त था एवं वे शिक्षा ग्रहण कर सकती थी। सर्वाधिक महत्वपूर्ण बात तो यह थी कि उन्हें स्वैच्छिक रूप से विवाह या विवाह योग्य वर का चयन करने का अधिकार भी प्राप्त था। प्राचीन भारतीय परम्परा में स्त्रियों को पृथ्वी पर समस्त दैवीय गुणों का प्रतीक बताया गया है, यथा सोम ने अपनी समस्त पवित्रता नारियों को प्रदान की है, तो गन्धर्वों ने उन्हें अपनी मृदु वाणी प्रदान की है तथा अग्नि ने उन्हें अत्यंत आकर्षक बनाने के लिए अपनी समस्त चमक उन पर न्यौछावर कर दी है। इस बात को सहर्ष स्वीकार किया गया है कि सम्पूर्ण मानव जीवन का कोई भी क्षेत्र ऐसा नहीं है जो स्त्रियों के बिना पूर्ण हो। परन्तु मध्यकाल में मुगलों तथा उसके पहले के मुस्लिम आक्रमणकारियों के शासनकाल में महिलाओं की दशा में अत्यधिक गिरावट आई। शिक्षा का अधिकार भी उनसे छिन लिया गया एवं उनकी स्वतंत्रता पर प्रतिबंध लगा दिया गया। इस काल में अशिक्षा एवं विभिन्न तरह की बंदिशों जैसे, पर्दा प्रथा, विधवा विवाह पर रोक, बाल-विवाह आदि के कारण स्त्रियाँ घरों की चहारदीवारी में कैद होती गईं। ईस्ट इण्डिया कंपनी के शासन में स्त्री शिक्षा की कोई व्यवस्था नहीं थी। परन्तु ईसाई मिशनरियों ने बालिकाओं की शिक्षा के लिए कुछ विद्यालय अवश्य खोले। आधुनिक काल में ब्रिटिश भारत के अन्तर्गत उन्नीसवीं सदी के पूर्वार्द्ध में भारत के कुछ महान समाज सुधारकों जैसे राजा राममोहन राय, स्वामी विवेकानंद, ईश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी दयानंद सरस्वती, केशवचंद्र सेन आदि के सतत् प्रयास से स्त्री जीवन पर लगी कई तरह की पाबंदियाँ हटीं। उन्हें समाज में बराबरी का स्थान मिलना आरंभ हुआ। आजादी के बाद सरकार ने निरंतर कानूनी बदलाव कर स्त्रियों की स्थिति एवं उनकी शिक्षा में सुधार करने का प्रयास किया। शिक्षा किसी भी व्यक्ति, समाज एवं राष्ट्र के विकास की धुरी होता है। इस कारण स्त्री शिक्षा के द्वारा पारिवारिक विघटन को रोका जा सकता है, लगातार बढ़ती आबादी पर प्रभावी रोक लगायी जा सकती है एवं कई प्रकार की सामाजिक समस्याओं को सुलझाया जा सकता है। हमें आज देश और समाज की उन्नति एवं विकास के लिए स्त्रियों की शिक्षा को बढ़ावा देना ही होगा। जिससे भारत की स्त्रियाँ सशक्त एवं आत्मनिर्भर बन सकें।

विशिष्ट शब्द: स्त्री शिक्षा, समाज, राष्ट्र, आत्मनिर्भरता एवं स्त्री सशक्तिकरण।

प्रस्तावना:

शिक्षा मनुष्य के विकास का मूल साधन है। शिक्षा मनुष्य में नए कौशल के साथ नवीन बातों एवं विचारधारा का विकास करके उसे योग्य एवं सुसंस्कृत नागरिक बनाती है। शिक्षा के द्वारा मनुष्य अपनी समस्याओं का समाधान करता है तथा जीवन को आनन्दमय बनाता है। प्राचीन भारत के इतिहास के पृष्ठ भारतीय स्त्रियों की गौरवमयी कीर्ति से भरे पड़े हैं। स्त्री का त्याग और बलिदान भारतीय संस्कृति की अमूल्य निधि है। स्त्री शिक्षा के विषय में नेपोलियन ने अपने विचार इन शब्दों में व्यक्त किए हैं कि "मुझे सुशिक्षित माताएँ दो, मैं एक सुशिक्षित राष्ट्र का निर्माण कर दूंगा।" हमें यह याद रखना चाहिए कि स्त्रियों की स्थिति उनके समाज के सभ्यता-स्तर का प्रतिबिंब होती है। हमें पुरुषों के साथ स्त्रियों को समान शैक्षिक अवसर सुलभ कराने चाहिए। जैकवेलाइन केबॉड (1970) ने यूनेस्को द्वारा प्रकाशित अपनी पुस्तक 'द एजूकेशन एंड एडवांसमेंट ऑफ वुमेन' में ठीक ही लिखा है, प्रौद्योगिक तथा वैज्ञानिक सभ्यता के द्वार तक स्त्रियों को न पहुंचाने वाला शिक्षा तंत्र विश्व की आधी मानवता को विश्व से पृथक् कर देगा। यह जीवन की एक सतत् आवश्यकता है एवं मानव समुदाय की प्रगति की निर्धारक है। देश के सम्पूर्ण मानव जनसंख्या के

लगभग आधे भाग की शिक्षा की उपेक्षा कर हम देश के भविष्य को खतरे में नहीं डाल सकते।

हमें स्त्रियों की शिक्षा एवं उनको आत्मनिर्भर बनाने के लिए न केवल अधिक अवसर उपलब्ध कराने होंगे बल्कि बदलते परिवेश में इनकी उपयोगिता के विषय में पुरुष वर्ग को भी समझाना होगा। इस विषय में राधाकृष्णन आयोग के प्रतिवेदन में सही उल्लेखित है की "यदि स्त्रियों तथा पुरुषों में से केवल एक के लिए सामान्य शिक्षा उपलब्ध करानी हो तो यह अवसर निःसन्देह स्त्रियों को प्राप्त होना चाहिए क्योंकि तब शिक्षा आवश्यक रूप से अगली पीढ़ी को मिल जाएगी।" इस प्रकार यदि हमें अपनी अगली पीढ़ी को शिक्षित करना हो तो स्त्रियों को उचित शिक्षा प्रदान कर उन्हें सशक्त बनाना ही होगा। देखा जाए तो हमारे देश की स्त्रियों की अनेकों समस्याएँ हैं। उन्हें अपने जीवन में काफी कुछ सहन करना पड़ता है परंतु उनमें एक भी समस्या ऐसी नहीं है जिसे शिक्षा के द्वारा हल न किया जा सके।

तथ्य विश्लेषण:

भारत में वैदिक काल में स्त्रियों को समाज में समानता का दर्जा प्राप्त था। उन्हें पुरुषों के समान शिक्षा का अधिकार दिया गया था। प्राचीन काल में मैत्रयी, अपाला, घोषा, विश्ववारा, शची, पौलोमी, गार्गी, घोषा आदि जैसी अनेकों स्त्रियों ने अपनी विद्वता, त्याग एवं समर्पण का उदाहरण प्रस्तुत किया था। उत्तर वैदिक काल में भी महिलाओं को समाज में गरिमामय स्थान प्राप्त था। उसे सहधर्मिणी और सहचरी माना जाता था। आरंभ में धार्मिक तथा सामाजिक कार्यों में ही नहीं बल्कि रण-क्षेत्र में भी स्त्रियाँ अपने पति को सहयोग देती थीं। स्मृति काल में नारी को शक्ति का स्वरूप मानकर उसकी आराधना की जाती थी। जैसा कि याज्ञवलक्य स्मृति में स्पष्टतः वर्णित है, 'स्त्रियाँ पृथ्वी पर समस्त दैवीय गुणों की प्रतीक हैं, सोम ने अपनी समस्त पवित्रता नारियों को प्रदान की है, तो गंधर्व ने उन्हें अपनी मृदु वाणी प्रदान की है तथा अग्नि ने उन्हें अत्यंत आकर्षक बनाने के लिए अपनी समस्त चमक उन पर न्यौछावर कर दी है।' प्राचीन भारत में स्त्री शिक्षा के कारण नारी चेतना अपने उत्कर्ष पर थी। इसके उपरांत धीरे-धीरे स्त्रियों की दशा में गिरावट होनी आरंभ हो गयी।

मध्यकालीन भारत में मुगलों तथा उसके पहले के मुस्लिम आक्रमणकारियों के शासन काल में स्त्रियों की दशा में अत्यधिक गिरावट आई। स्त्रियाँ अपनी आर्थिक और सामाजिक सुरक्षा के लिए पुरुषों पर ही आश्रित थीं। उनके बीच शिक्षा का काफी अभाव था। अशिक्षा एवं विभिन्न तरह की बंदिशों जैसे, पर्दा प्रथा, विधवा विवाह पर रोक, बाल-विवाह आदि के कारण स्त्रियाँ घरों की चहारदीवारी में कैद होती गईं। पर्दा प्रथा, बाल विवाह तथा बहु-विवाह जैसी कुरीतियों ने स्त्रियों के जीवन को दयनीय बना दिया। मुस्लिम शासन काल में स्त्रियों की शिक्षा का अधिकार भी उनसे छिन लिया गया। उन पर अनेकों अत्याचार किए जाने लगे तथा उनकी स्वतंत्रता पर प्रतिबंध लगा दिया गया। आधुनिक काल में ईस्ट इंडिया कंपनी ने भारत में जब अपना शासन स्थापित किया, तब कंपनी सरकार के शासन में स्त्री शिक्षा की कोई व्यवस्था नहीं की गयी थी। उन्होंने स्त्री शिक्षा के प्रति उपेक्षा की नीति अपनाई। इस काल में ईसाई मिशनरियों ने बालिकाओं की शिक्षा के लिए कुछ विद्यालय अवश्य खोले। ईसाई धर्म प्रचारकों ने इस क्षेत्र में महत्वपूर्ण कार्य किए एवं 1819 ई. में स्त्री शिक्षा के लिए कलकत्ता में 'तरुण स्त्री सभा' की स्थापना हुई। इस तरह कंपनी शासन के दौरान स्त्री शिक्षा का प्रसार के प्रयास अवश्य आरंभ हुए।

सर्वप्रथम डब्लू. बेथ्यून द्वारा स्त्री शिक्षा के क्षेत्र में महत्वपूर्ण योगदान दिया गया। उन्होंने 7 मई, 1849 ई. को भारत में कलकत्ता में प्रथम बालिका विद्यालय की स्थापना की। जिसे कालांतर में 'बेथ्यून कॉलेज' के नाम से जाना जाता है। इसे एशिया का सबसे पुराना महिला कॉलेज माना जाता है। 1854 ई. के वुड डिस्पैच में स्त्री शिक्षा के महत्व को स्वीकार किया गया तथा स्त्री शिक्षा की आवश्यकता पर विशेष ध्यान दिया गया। इस घोषणा पत्र में कहा गया कि 'भारतीय जन-जीवन में पाश्चात्य सभ्यता एवं संस्कृति का बीजारोपण तभी हो सकेगा जब स्त्रियों में शिक्षा का प्रसार होगा।' घोषणा पत्र में स्त्री शिक्षा के लिए विद्यालयों को सहायता अनुदान देने की सिफारिश की गई, इससे स्त्री शिक्षा को बहुत प्रोत्साहन मिला। वहीं 1882 ई. के हंटर कमीशन में स्त्री शिक्षा पर काफी ज़ोर दिया गया।

ब्रिटिश भारत के अंतर्गत उन्नीसवीं सदी में कुछ महान समाज सुधारकों जैसे राजा राममोहन राय, स्वामी दयानन्द सरस्वती, ईश्वर चंद्र विद्यासागर, केशवचंद्र सेन, स्वामी विवेकानंद आदि ने अत्याचारी सामाजिक व्यवस्था के खिलाफ आवाज उठाई। इन्होंने तत्कालीन ब्रिटिश शासन के समक्ष स्त्री-पुरुष समानता, स्त्री शिक्षा, सती प्रथा पर रोक, बाल विवाह तथा बहू विवाह पर रोक के लिए आवाज उठाई। इसी के परिणामस्वरूप सती प्रथा निषेध अधिनियम, 1829 ई. में, हिन्दू विधवा पुनर्विवाह अधिनियम, 1856 ई. में, बहू विवाह रोकने के लिए नेटिव मैरिज एक्ट, 1872 ई. में, एज ऑफ कंसेंट बिल, 1891 ई. में पास हुआ। इन महत्वपूर्ण प्रयासों से आने वाले समय में स्त्री संगठनों का सूत्रपात हुआ तथा महिला शिक्षा की माँग की गई। स्त्री शिक्षा के लिए ज्योतिबा फूले और उनकी पत्नी ने पूना में लड़कियों के लिए एक स्कूल खोला। 1901 ई. में रवीन्द्र नाथ टैगोर ने शांति निकेतन में स्त्री शिक्षा विभाग की स्थापना की। वहीं आर्य समाज ने भी स्त्री विद्यालयों की स्थापना स्वीकार करते हुए 'कला गुरुकुल' खोले। इसके अतिरिक्त आर्य समाज ने प्रत्येक नगर में आर्य कन्या पाठशालाएँ खोलीं। महान समाज सुधारक प्रोफेसर डी. के. कर्वे ने 1906 ई. में बंबई में प्रथम 'भारतीय महिला विश्वविद्यालय' की स्थापना की तथा दिल्ली में इसी वर्ष प्रथम महिला चिकित्सा

विश्वविद्यालय के रूप में लेडी हार्डिंग मेडिकल कॉलेज स्थापित किया गया।

20वीं शताब्दी तक भारत कि स्त्रियाँ स्वयं अपने अधिकारों के लिए आगे बढ़ीं। धीरे-धीरे स्त्रियों में शिक्षा के विकास के साथ-साथ राजनीतिक चेतना का भी उद्भव हुआ। परिणामस्वरूप, भारत में 1919 ई. के अधिनियम द्वारा स्त्रियों को भी मताधिकार का अधिकार प्राप्त हुआ। नारी मुक्ति के लिए 1927 ई. में 'अखिल भारतीय महिला संघ' की स्थापना हुई। इसके द्वारा स्त्रियों की स्वतंत्रता एवं समानता के लिए कड़ा संघर्ष किया गया। 1929 ई. में हार्टोंग समिति ने स्त्री शिक्षा संबंधी अनेकों सुझाव दिये। समिति द्वारा इस बात पर विशेष ज़ोर दिया गया की बालक एवं बालिकाओं की शिक्षा को समान महत्व दिया जाए। इसके लिए अधिक संख्या में ग्रामीण क्षेत्रों में बालिका विद्यालयों की स्थापना, उच्च शिक्षा प्राप्त करने के लिए बालिकाओं को प्रोत्साहन देना, ग्रामीण क्षेत्रों में कार्यरत शिक्षिकाओं को आकर्षक वेतन एवं सुविधाएँ देना इत्यादि कार्य किये जायें। इस प्रकार स्वतंत्रता पूर्व सरकारी प्रयत्नों के फलस्वरूप स्त्री शिक्षा की कुछ प्रगति अवश्य हुई एवं भारत में धीरे-धीरे सह शिक्षा को प्रोत्साहन मिला। 1937 ई. की वर्धा योजना में स्त्री उपयोगी पाठ्यक्रम के विकास एवं गृह शिल्प कला की व्यवस्था करने की संस्तुति की गई। 1944 ई. के शिक्षा के सार्जेंट योजना में 6 - 11 वर्ष तक के बालक एवं बालिकाओं के लिए व्यापक निःशुल्क एवं अनिवार्य शिक्षा की व्यवस्था की अनुशंसा की गयी थी। इन प्रयासों के कारण स्त्रियाँ शिक्षित होने के लिए प्रेरित हुईं।

स्त्री शिक्षा की वर्त्तमान स्थिति:

भारत की स्वाधीनता प्राप्ति के पश्चात् स्त्रियों की सामाजिक तथा शैक्षिक स्थिति में अनेकों क्रांतिकारी परिवर्त्तन हुए। भारत के विभिन्न पंचवर्षीय योजनाओं में स्त्री शिक्षा को पर्याप्त महत्व देने के प्रयास किए गए। किसी भी समाज की खुशहाली का आधार उस समाज में महिलाओं के स्तर एवं उन्हें प्राप्त सम्मान से आँका जा सकता है। इतिहास गवाह है कि जिन समाजों में महिलाओं को बराबरी का दर्जा प्राप्त है, वे विकास एवं प्रगति की दौड़ में अपने समकालीनों से बहुत आगे रहे हैं। महात्मा गाँधी ने अपनी पुस्तक 'हिन्द स्वराज' में लिखा है, 'जब तक आधी मानवता की आँख में आँसू है, मानवता पूर्ण नहीं कही जा सकती।' स्वतंत्रता के उपरांत स्त्री शिक्षा के मार्ग में आने वाली बाधाओं का समाधान प्रस्तुत करने हेतु अनेक समितियों तथा आयोगों का गठन किया गया। इनमें कुछ प्रमुख आयोगों तथा सिफारिश समितियों के सुझाव निम्नलिखित हैं-

विश्वविद्यालय शिक्षा आयोग

(1948-49) डॉ. राधाकृष्णन की अध्यक्षता में नियुक्त इस आयोग ने स्त्री शिक्षा पर विशेष बल दिया। स्त्री शिक्षा के विषय में इस आयोग ने कई सिफारिश की। जिनमें मुख्य यह है की शिक्षण संस्थानों का पाठ्यक्रम ऐसा होना चाहिए जिससे स्त्रियाँ सामान्य समाज में अपना सम्मानजनक स्थान ग्रहण कर सकें।

माध्यमिक शिक्षा आयोग

(1952) इस आयोग द्वारा बालक तथा बालिकाओं के पाठ्यक्रम में विभिन्नता लाने पर विशेष ज़ोर नहीं दिया गया, परंतु बालिकाओं को गृह विज्ञान के अध्ययन की विशेष सुविधा प्रदान करने की बात की गई। इसके अतिरिक्त ग्रामीण क्षेत्रों में कार्यरत शिक्षिकाओं को आकर्षक वेतन एवं सुविधाएँ देने का सुझाव दिया गया।

दुर्गाबाई देशमुख समिति

(1958) स्त्री शिक्षा की समस्या एवं इसके समाधान करने पर विचार करने हेतु भारत सरकार ने दुर्गाबाई देशमुख की अध्यक्षता में 'राष्ट्रीय महिला शिक्षा समिति' का गठन किया। इस समिति ने यह सुझाव दिया कि लड़कों और लड़कियों कि शिक्षा के बीच शैक्षिक समानता की स्थापना की जाए। समाज में स्त्रियों के समान अधिकार सुनिश्चित करने के लिए संगठन की स्थापना की जाए। इसके साथ ही ग्रामीण क्षेत्रों में स्त्री शिक्षा के प्रसार के लिए विशेष प्रयास किये जाने चाहिये।

हंसा मेहता समिति

(1962) सन् 1962 ई. में राष्ट्रीय महिला शिक्षा परिषद ने विद्यालय स्तर पर बालक तथा बालिकाओं के शैक्षिक पाठ्यक्रम में अंतर होने अथवा नहीं होने की महत्वपूर्ण समस्या पर सुझाव देने हेतु श्रीमती हंसा मेहता की अध्यक्षता में एक समिति का गठन किया। जिसे समिति की अध्यक्षा के नाम पर 'हंसा मेहता समिति' कहा जाता है। इस समिति ने सुझाव दिया कि विद्यालय स्तर पर बालक तथा बालिकाओं के शैक्षिक पाठ्यक्रम में अंतर नहीं होना चाहिए। शिक्षा का संबंध व्यक्तिगत क्षमताओं तथा रुचियों से होना चाहिए न की स्त्री या पुरुष के भेद से।

भक्त वत्सलम् समिति

(1963) राष्ट्रीय स्त्री शिक्षा परिषद द्वारा इस समिति का गठन स्त्री शिक्षा के लिए किया गया। इस समिति के अध्यक्ष मद्रास राज्य के मुख्यमंत्री श्री एम. भक्त वत्सलम् थे। इस समिति ने स्त्री शिक्षा के विषय में कई महत्वपूर्ण सुझाव दिये। इसके द्वारा दी गयी सिफारिशों के अनुसार विवाहित महिलाओं को कम से कम पार्ट टाईम और स्कूल, मदरसा में अध्यापिका के रूप में कार्य करने के लिए प्रोत्साहन देने के लिए और स्त्री शिक्षा के प्रति विरोध समाप्त करने के लिए पर्याप्त प्रचार करने में जनता के सहयोग की माँग की गई। इसके साथ ही सभी प्राथमिक विद्यालयों में शिक्षिकाओं की नियुक्ति अधिक से अधिक एवं अनिवार्य रूप से की जाए। इससे बालिकाओं को विद्यालय भेजने हेतु अभिभावकों को प्रोत्साहन मिलेगा।

कोठारी कमीशन

(1964-66) भारत सरकार ने प्रो. दौलत सिंह कोठारी की अध्यक्षता में कोठारी कमीशन का गठन किया, जो सभी स्तरों पर शिक्षा के विकास एवं शिक्षा की राष्ट्रीय पद्धति पर अपना सुझाव दे। कोठारी आयोग ने मानव

संसाधनों के विकास, परिवारों की उन्नति तथा बालकों के चरित्र निर्माण में पुरुषों की अपेक्षा स्त्रियों की शिक्षा को अधिक महत्वपूर्ण माना। इस आयोग ने उच्च और प्राथमिक स्तर पर बालिकाओं के लिए अलग-अलग विद्यालय खोलने, निःशुल्क छात्रावास की व्यवस्था करने, स्त्रियों के लिए पृथक कॉलेज खोलने, स्त्री शिक्षा अनुसंधान इकाई खोलने जैसे कई महत्वपूर्ण सुझाव दिये।

राष्ट्रीय शिक्षा नीति

(1986) इस राष्ट्रीय शिक्षा नीति में स्त्री शिक्षा से संबन्धित कई बातें सम्मिलित थीं। इसके अनुसार यह सिफारिश की गयी की विभिन्न पाठ्यक्रमों के अंग के रूप में स्त्री अध्ययनों को बढ़ावा दिया जाए। शिक्षण संस्थानों को स्त्री विकास कार्यक्रम संचालित करने के लिए प्रोत्साहित किया जाए। स्त्री शिक्षा के मार्ग की बाधाओं को निराकरण से संबन्धित प्रयासों को प्राथमिकता देने का प्रावधान किया जाए। इसके अंतर्गत विभिन्न स्तरों पर तकनीकी और व्यावसायिक शिक्षा में बालिका शिक्षा की भागीदारी और लिंग आधारित भेद-भाव को समाप्त करने पर विशेष ध्यान देने की आवश्यकता पर बल दिया गया।

प्रोग्राम ऑफ एक्शन

(1992) इस प्रोग्राम के तहत स्त्री सशक्तिकरण के लिए किए गए प्रयासों में स्त्री के आत्मसम्मान एवं आत्मविश्वास को बढ़ाना, राजनैतिक, सामाजिक एवं आर्थिक क्षेत्रों में स्त्रियों के योगदान को पहचान प्राप्त कराना, शिक्षा, रोजगार आदि का विकास करना प्रमुख है।

राष्ट्रीय महिला सशक्तिकरण नीति

(2001) इस राष्ट्रीय महिला सशक्तिकरण नीति के तहत स्त्रियों एवं बालिकाओं के लिए शिक्षा के समान अवसर, भेद-भाव खत्म करने, शिक्षा को जन-जन तक पहुंचाने, निरक्षरता दूर करने, उच्च शिक्षण संस्थानों में स्त्रियों का नामांकन बढ़ाने इत्यादि के विषय में सुझाव दिये गए। माध्यमिक और उच्च शिक्षा में लिंग भेद को कम करने की ओर ध्यान आकर्षित किया गया।

निष्कर्ष:

आजादी के बाद से ही भारत सरकार के द्वारा महिलाओं के उत्थान के लिए अनेक निर्णय लिए गए एवं स्त्री शिक्षा के लिए अनेक कार्यक्रम घोषित किए गए। जिनमें कस्तूरबा गाँधी बालिका विद्यालय योजना, कन्याधन योजना, बेटी बचाओ-बेटी पढ़ाओ योजना, राष्ट्रीय सशक्तिकरण मिशन, सर्वशिक्षा अभियान आदि योजनाएँ चलायीं। भारत सरकार ने सर्वप्रथम सन् 2001 ई. को महिला सशक्तिकरण का वर्ष घोषित किया। स्त्री शिक्षा की प्रगति को देखकर निष्कर्षतः यह कहा जा सकता है कि 'स्त्री शिक्षा ने विद्रोह की उस कुल्हाड़ी की धार तेज़ कर दी है जिससे सामाजिक जीवन की जंगली झाड़ियों को साफ करना संभव हो गया है।' आज स्त्रियों का कार्य क्षेत्र केवल घर तक नहीं बल्कि राष्ट्रीय जीवन के प्रत्येक क्षेत्र में विस्तृत हो चुका है। स्वाधीनता पूर्व जहाँ स्त्रियों की साक्षरता का प्रतिशत काफी कम था, वहीं अब उनकी साक्षरता का प्रतिशत काफी बढ़ गया है। शिक्षा का महत्व हमेशा सर्वोपरि है। वास्तविकता में शिक्षा के द्वारा ही स्त्रियों का सामाजिक, बौद्धिक, आर्थिक, राजनैतिक एवं सांस्कृतिक विकास संभव है।

संदर्भ ग्रंथ सूची:

1. पाण्डेय, रामशकल एवं मिश्र, करुणाशंकर, भारतीय शिक्षा की ज्वलंत समस्याएँ, अरावली बुक्स इंटेरनेशनल प्राइवेट लिमिटेड, नई दिल्ली 1990, पृ 145
2. अग्निहोत्री, रविन्द्र, भारतीय शिक्षा की वर्त्तमान समस्याएँ, इंटर इंडिया पब्लिकेशन, नई दिल्ली, 1998, पृ 56
3. पाण्डे, मृणाल, परिधि पर स्त्री, राधाकृष्ण प्रकाशन, नई दिल्ली, 1998
4. यादव, राजेंद्र, वर्मा, अर्चना, अतीत होती सदी और स्त्री का भविष्य, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, 2001, पृ 186
5. ग्रोवर, बी. एल., मेहता, अलका एवं यशपाल, आधुनिक भारत का इतिहास: एक नवीन मूल्यांकन, एस. चंद एण्ड कंपनी लिमिटेड, नई दिल्ली, 2018, पृ 260
6. पाण्डे, डॉ॰ वी. पी. एवं प्रकाश, सुधा, शिक्षा में नवाचार तथा आधुनिक प्रवृत्तियाँ, 2002, पृ 450
7. अग्निहोत्री, रवीन्द्र, आधुनिक भारतीय शिक्षा की समस्याएँ और समाधान, राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपुर, 2006
8. गुप्ता, एस. पी. तथा गुप्ता, अलका, भारतीय शिक्षा का इतिहास: विकास एवं समस्याएँ, शारदा पुस्तक भवन, 2008
9. रावत, प्यारे लाल, प्राचीन और भारतीय शिक्षा का इतिहास, भारत पब्लिकेशन्स, आगरा, 1975
10. सक्सेना, एन. आर., शिक्षा का समाजशास्त्रीय आधार, सूर्या पब्लिकेशन, मेरठ, 2006
11. सिंह, कर्ण, भारत में शिक्षा प्रणाली का विकास, लखीमपुर खीरी, गोविन्द प्रकाशन, 2008
12. सिंह, बी. एन. एवं जनमेजय सिंह, नारीवाद, रावत प्रकाशन, दिल्ली, पृ. 407
13. अग्रवाल, गोपाल कृष्ण, भारतीय सामाजिक संस्थाएं, आगरा बुक स्टोर, आगरा, 1995, पृ. 280

14. देसाई, नीरा, भारतीय समाज में नारी, मैकमिलन इंडिया लिमिटेड, दिल्ली, 1982, पृ. 10
15. तिवारी, आर. पी. एवं शुक्ल, डी. पी., भारतीय नारी, वर्तमान समस्याएँ और भावी समाधान, ए. पी. एच. पब्लिशिंग कॉरपोरेशन, 2009.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

परभणी जिल्ह्यातील रेशीम उत्पादनाचा विश्लेषणात्मक अभ्यास

रुपणार प्रतिभा खंडेराव[1], बादाडे अभिजीत राजपाल[2]
[1]महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर
[2]कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव
Corresponding Author- रुपणार प्रतिभा खंडेराव
Email: pratibharupnar1983@gmail.com
Email: abhijeet.badade@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.11178381

सारांश :

रेशीम शेती व रेशीम उद्योग हा जवळ जवळ देशातील सर्व राज्यांमध्ये वाढत चाललेला व्यवसाय आहे. परभणी जिल्ह्यामध्ये हा व्यवसाय सुरू असून सध्या परभणी जिल्ह्याच्या सर्व तालुक्यांमध्ये हा व्यवसाय केला जातो. पारंपारिक पिकांसोबत घेतल्या जाणाऱ्या रेशीम उद्योगाचे जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या लोकांच्या विकासामध्ये नक्कीच योगदान ठरत आहे. याचाच आढावा घेण्यासाठी प्रस्तुत शोध निबंधामध्ये या जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या रेशीम शेती व रेशीम उद्योगात मिळणाऱ्या उत्पादनाचा आढावा घेतला आहे. रेशीम शेतीचा सूक्ष्म अभ्यास करण्यासाठी परभणी जिल्ह्यातील एकूण नऊ तालुक्यातून प्रत्येकी दोन गावे अशी एकूण 18 गावे निवडण्यात आली आहे. या गावातून प्रत्येकी पाच रेशीम शेतकऱ्यांची यादृच्छिक पद्धतीने निवड करण्यात आली आहे. एकूण 90 रेशीम उत्पादक शेतकऱ्यांचा सूक्ष्म अभ्यास करून रेशीम शेतीचे आर्थिक विश्लेषण करण्यात आले आहे.

बीज सज्ञा : रेशीम शेती, कृषी उद्योग, सामाजिक आर्थिक विकास, तुती शेतकरी इत्यादी.

प्रस्तावना :

रेशीम शेती हा एक कृषी पूरक उद्योग आहे. ज्याचे अंतिम उत्पादन रेशीम आहे. रेशीम हे रेशीम किड्याद्वारे तयार केलेल्या प्राण्यांच्या अवयवांचे तंतुमय प्रथिन आहे. रेशीम धाग्याला स्वतःची एक नैसर्गिक चमक आणि रंग आहे. हे वजनाने हलके, मऊ आणि टिकाऊ असते. या वैशिष्ट्यांमुळे रेशीमला वस्त्रांची राणी असे संबोधले जाते. भारत हा जगातील एकमेव देश आहे. जेथे चारही प्रकारचे रेशीम उत्पादन घेतले जाते. रेशीम शेती हा मुळात कृषीवर आधारित ग्रामीण उद्योग आहे. ज्यामध्ये शेती आणि उद्योग दोन्हीही समाविष्ट आहेत. रेशीम शेती उद्योगामध्ये लाखो लोकांसाठी उच्च रोजगार क्षमता व उच्च परताव्यासह कमी भांडवलाची आवश्यकता लागते. वाढत्या लोकसंख्येमुळे संपूर्ण देशात रोजगाराची समस्या उपलब्ध होत आहे. याला परभणी जिल्हा सुद्धा अपवाद ठरत नाही त्यामुळे रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून शाश्वत विकास साधने ही बदलत्या काळाची गरज आहे. रेशीम उद्योगामध्ये ती क्षमता आहे. याचाच आढावा घेण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधामध्ये परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या रेशीम शेती व रेशीम उद्योगातील शेतकऱ्यांच्या मिळणाऱ्या उत्पादनाचा अभ्यास केला आहे.

उद्देश :

1. तुती लागवड व रेशीम आळी संगोपनासाठी येणाऱ्या खर्चाचा अभ्यास करणे.
2. परभणी जिल्ह्यातील रेशीम उद्योगातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अभ्यास करणे.

माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती :

परभणी जिल्ह्यातील रेशीम उत्पादनाचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यासाठी जिल्ह्यातील एकूण नऊ तालुक्यातून प्रत्येकी दोन गावे अशी एकूण 18 गावे निवडण्यात आली आहेत. या गावातून प्रत्येकी पाच रेशीम शेतकऱ्यांची यादृच्छिक पद्धतीने निवड करण्यात आली आहे. एकूण 90 रेशीम उत्पादक शेतकऱ्यांची सूक्ष्म अभ्यासासाठी निवड करण्यात आली आहे. सन 2017-18 या कलावधीत परभणी जिल्ह्यातील रेशीम शेतीचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना रेशीम शेतीसाठी येणाऱ्या खर्चाचा व मिळणाऱ्या उत्पन्नाचा प्रत्यक्ष मुलाखत घेऊन प्रश्नावलीच्या माध्यमातून अभ्यास केला आहे.

अभ्यास क्षेत्र :

परभणी जिल्हा महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे भौगोलिक निर्देशांकानुसार परभणी जिल्हा 18^0 45' उत्तर ते 20^0 01' उत्तर अक्षांश व 76^0 13' पूर्व ते 77^0 39' पूर्व रेखांश या भौगोलिक पट्ट्यामध्ये वसलेला आहे. परभणी

जिल्ह्याच्या उत्तरेस बुलढाणा व हिंगोली पश्चिमेस बीड आणि जालना दक्षिणेस लातूर तर पूर्वेस नांदेड व हिंगोली या जिल्ह्यांच्या सीमारेषा येतात. जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 6511 चौरस कि.मी. इतके आहे.

विषय विवेचन :

परभणी जिल्ह्यातील रेशीम शेतीचा तुती लागवड, रेशीम आळी संगोपन व कोष उत्पादन खर्चाचा तपशील तक्ता क्र. 1 मध्ये दर्शविण्यात आला आहे.

तक्ता क्र. 1. रेशीम शेतीचा वार्षिक तुती लागवड व कोष उत्पादन खर्चाचा तपशील

तपशील	एकक	प्रथम वर्ष	द्वितीय वर्ष
अ) तुती बाग जोपासना खर्च (सरासरी मध्ये)			
तुती लागवड क्षेत्र	एक एकर	एक एकर	एक एकर
जमीन मशागत नांगरणी/वखरणी/सऱ्या पाडणे	रुपये	2000	1500
शेणखत (सेंद्रिय खत) प्रती एकरी 8 टन रु. 400 प्रमाणे	रुपये	3200	3200
रासायनिक खते	रुपये	2500	5000
तुती बागेचा देखभाल खर्च	रुपये	2500	4000
सिंचन व्यवस्था खर्च	रुपये	1200	1200
एकूण	**रुपये**	**11400**	**14900**
ब) रेशीम आळी संगोपन खर्च (सरासरी मध्ये)			
प्रति 100 अंडीपुंजास रु 100/-(25 टक्के) प्रमाणे पहिल्या वर्षी 400 व दुसऱ्या वर्षापासून 1200 अंडीपुंज प्रमाणे होणारा खर्च	रुपये	400	1200
रेशीम आळी संगोपनाकरिता मजुरी खर्च	रुपये	6204	18612
निर्जंतुकीकरणाकरिता औषध, कोष विक्री व्यवस्था व इतर खर्च	रुपये	1400	3500
एकूण		**8004**	**23312**
एकूण (अ+ब)		**19404**	**38212**
क) उत्पादन तपशील (सरासरी मध्ये)			
प्रति एकरी तुती पाला उत्पादन	कि.ग्रॅम	4000	12000-15000
संगोपन होणारे अंडीपुंज	संख्या	400	1200
प्रति 100 अंडीपुंजास 70 कि. ग्रॅम कोष उत्पादन	कि.ग्रॅम	280	840
प्रति कि. ग्रॅम कोषास सरासरी दर रु. 300 प्रमाणे	रुपये	84000	252000
तुती बेणे विक्रीपासून उत्पादन (पहिल्या वर्षी प्रति एकरी 3 मे. टन रु. 1200 प्रमाणे)	रुपये	3600	7200
एकूण उत्पादन	**रुपये**	**87600**	**259200**
एकूण निव्वळ उत्पन्न (क-अ+ब)	**रुपये**	**68196**	**220988**

संदर्भ: प्राथमिक स्त्रोत

रेशीम उद्योगामध्ये येणाऱ्या खर्चाचा व उत्पन्नाचा अभ्यास सरसरीमध्ये केला असून तक्ता क्रमांक-1 मध्ये मांडण्यात आला आहे. मुलाखतीमधून मिळालेल्या माहितीनुसार परभणी जिल्ह्यातील रेशीम शेतकऱ्यांनी एक एकर ते दोन एकर शेती क्षेत्रावर तुती लागवड केलेली आढळते. एकूण तुती बाग जोपासना खर्च पाहिल्या वर्षी 11400 इतका येतो. तर दुसऱ्या वर्षी 14900 इतका येतो. त्यापैकी जमीन मशागत/नांगरणी/वखरणी व सऱ्या पाडण्यासाठी पाहिल्या वर्षी 2000 रु. खर्च येतो. तर दुसऱ्यावर्षी 1500 रु. खर्च येतो, शेणखत (सेंद्रिय खत) प्रती एकरी 8 टन (रु. 400 प्रमाणे) पहिल्या व दुसऱ्या वर्षी प्रत्येकी 3200 रु. खर्च येतो. पहिल्या वर्षी रासायनिक खतांसाठी 2500 रु. तर दुसऱ्या वर्षी 5000 रु. खर्च येतो. तुती बागेचा देखभाल खर्च पहिल्या वर्षी 2500 रु. येतो तर दुसऱ्या वर्षी 4000 रु. येतो. पहिल्या व दुसऱ्या वर्षी सिंचन व्यवस्था खर्च प्रत्येकी 1200 रु. येतो. रेशीम अळयांच्या संगोपनासाठी पहिल्या वर्षी 8004 रु. इतका खर्च येतो. तर दुसऱ्या वर्षी 23312 रु. इतका खर्च होतो. यापैकी रेशीम आळी संगोपनाकरिता मजुरी खर्च पहिल्या वर्षी 6204 व दुसऱ्या वर्षी 18612 रु. येतो. निर्जंतुकीकरणाकरिता औषध, कोष विक्री व्यवस्था व इतर बाबींसाठी पहिल्या वर्षी 1400 रु. तर दुसऱ्या वर्षी 3500 रु. इतका खर्च येतो.

तुती पाला उत्पादन पहिल्या वर्षी 4000 कि.ग्रॅम होते व दुसऱ्या वर्षी 12000 ते 15000 कि.ग्रॅम इतके होते.

प्रति 100 अंडीपुंजास 70 कि. ग्रॅम कोष उत्पादन हे प्रमाण आहे. पहिल्या वर्षी 280 कि.ग्रॅम कोष उत्पादन होते व दुसऱ्या वर्षी 840 कि.ग्रॅम कोष उत्पादन होते. प्रति कि. ग्रॅम कोषास सरासरी दर रु. 300 प्रमाणे पहिल्या वर्षी 84000 रु. चे कोष उत्पादन होते. तर दुसऱ्या वर्षी 252000 रु इतके कोष उत्पादन होते. तुती बेणे विक्रीपासून (पहिल्या वर्षी प्रति एकरी 3 मे. टन रु. 1200 प्रमाणे) पहिल्या वर्षी 3600 रु. उत्पादन तर दुसऱ्या वर्षी 7200 रु. इतके उत्पादन होते. रेशीम उद्योगामध्ये तुती लागवड खर्च व रेशीम आळी संगोपन खर्च पहिल्या वर्षी 19404 रु. इतका होतो व दुसऱ्या वर्षी 38212 रु. इतका खर्च होतो. कोष उत्पादन व तुती बेणे विक्रीमधून पहिल्या वर्षी प्रती एकरी 87600 रु. व दुसऱ्या वर्षी 259200 रु. इतके उत्पादन झाल्याचे दिसून येते. अशाच प्रकारे पूर्णा व मानवत या दोन तालुक्यांचा अभ्यास करताना चौधरी (2021) यांनी प्रती हेक्टरी तुती लागवड खर्च 130680.20 रु. इतका होत असून निव्वळ उत्पन्न 132502.3 रु. इतके होत असल्याचे संगितले आहे.[1]

निष्कर्ष :

परभणी जिल्ह्यातील रेशीम उत्पादनाच्या अभ्यासातून असे दिसून येते की, तुती बाग जोपासना व रेशीम आळी संगोपन खर्च वगळता एक एकर तुती लागवड क्षेत्रातील तुती बेणे विक्री व कोष उत्पादनातून पहिल्या वर्षी 68196 रु. व दुसऱ्या वर्षी 220983 रु. इतका रेशीम शेतकऱ्यांना निव्वळ नफा मिळालेला आहे.

संदर्भ :

1. Choudhari D. S., Latpate C.B., Mhetre A.V.(2021): “Analysis of sericulture production in parbhani district,” The Pharma Innovation Journal SP-10(1): pp.207-208

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

भारतातील निवडणूक रोखे - एक विश्लेषण

डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, आझाद महाविद्यालय, औसा जि. लातूर
Corresponding Author- डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर
ई-मेल: dilipkumarkshirsagar321@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.11178398

प्रस्तावना:

26 जानेवारी 1950 रोजी भारतीय गणराज्याचे संविधान अमलात आणून त्या दिवशी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर औपचारिकरित्या भारताने आधुनिक संस्थात्मक चौकट असलेल्या संसदीय लोकशाहीचा स्वीकार केल्यापासून आजपर्यंत सर्वसाधारणपणे 75 वर्षाचा काळ लोटला आहे. 15 ऑगस्ट 1947 रोजी ब्रिटिशांच्या पारतंत्र्यातून स्वतंत्र झालेल्या भारताने 26 जानेवारी 1950 रोजी प्रजासत्ताक होऊन प्रौढ मतदारांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीची संसदीय शासन प्रणाली स्वीकारलेली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने स्वीकारलेल्या संसदीय शासन प्रणालीला आज 75 वर्षांचा काळ लोटला आहे आणि अनेक गुणदोषासह भारतातील संसदीय लोकशाहीचे अस्तित्व टिकून असल्याचे स्पष्ट होते.

भारतीय संसदीय लोकशाहीतील सार्वत्रिक निवडणुकीचे महत्त्व अधोरेखित करणारे पोलाक नामक राज्यशास्त्राचे विद्वान अभ्यासणे संयुक्तिक ठरेल. पोलाक यांच्या मते सार्वत्रिक निवडणुका काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने पार पाडल्या नाहीत तरनुसत्या सार्वजनिक यंत्रणाच कुचकामी ठरत नाही तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते. या विधानावरून भारतीय लोकशाहीसाठी निवडणुकीचे महत्त्व स्पष्ट होते. नागरिकांमध्ये सार्वजनिक जीवन व्यवहारात सहभागी होण्याची भावना आणि राज्यव्यवस्थेविषयीची आत्मीयता निर्माण करण्याचे सर्वात मोठे माध्यम निवडणूका हे आहे. निवडणुकांमधून लोकांनी दिलेले कौल सरकारला आधी मान्यता मिळवून देते. तसेच शांततामय मार्गाने व सुविहितपणे सत्तांतर घडवून आणतो त्यामुळे उत्तम निवडणूक व्यवस्था ही प्रतिनिधी लोकशाही शासनाची आधारशिला असते.

ही व्यवस्था प्रत्यक्षात कशी क्रियान्वीत होते, किती कार्यक्षम व निपक्षपातीपणे कार्य करणे, तिचे सूत्रधार किती, सक्षम प्रामाणिक आणि राजकीय पूर्वग्रहांपासून व दडपणापासून मुक्त असतात यावरच लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते. निवडणुकीचे प्रशासन निवडणूक प्रक्रिये वर भारतीयांचा विश्वास टिकून राहावा व वाढावा. यासाठी पक्षीय सरकारच्या हस्तक्षेपापासून व नियंत्रणापासून मुक्त असलेल्या संविधानाच्या कलम 324 अन्वये स्थापन झालेल्या भारत निवडणूक आयोग या घटनात्मक संस्थेची स्थापना घटनाकारांनी करून निवडणुकीची कार्यवाही निपक्षपातीपणे होण्याची दक्षता घेतल्याचे स्पष्ट होते.

भारत निवडणूक आयोगाने आजवर लोकसभेच्या 17 सार्वत्रिक निवडणुकांसह घटक राज्यांच्या विधानसभांच्या विविध निवडणुकीचे आयोजन केल्याचे दिसून येते असे असले तरी निवडणूक सुधारणा हा आज भारतीय चर्चा विश्वात अत्यंत महत्त्वपूर्ण विषय असल्याचे स्पष्ट होते. भारतीय निवडणूकातील सातत्याने घडत असलेल्या अपप्रवृत्ती व गैरप्रकारांची सार्वत्रिक चर्चा होताना दिसून येते. भारतातील निवडणूक सुधारणासंदर्भात सन 2017 मध्ये केंद्र सरकारने सुरू केलेली निवडणूक रोखे योजना भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या घटनापिठाने दिनांक 15 फेब्रुवारी 2024 रोजी एका ऐतिहासिक निर्णयाद्वारे असे या संविधानिक ठरवून रद्द केली. त्यामुळे भारतीय निवडणूक सुधारणाविषयी सन 2017 पासून सुरू केलेल्या निवडणूक रोखे योजनेचा संक्षिप्त अभ्यास करण्यासाठी “भारतातील निवडणूक रोखे एक विश्लेषण” या लेखाची पुढील प्रमाणे मांडणी केली आहे.

निवडणुकांमधील बेहिशोबी आर्थिक उलाढाल:

भारतीय निवडणुकांमधील एक महत्त्वपूर्ण सुधारणा म्हणून आर्थिककारणाशी संबंधित सुधारणांचा समावेश होतो. निवडणूक सुधारणांची चर्चा जेथे होते. तेथे सर्वप्रथम निवडणुकांमध्ये होणाऱ्या बेहिशोबी आर्थिक उलाढालीचा मुद्दा अग्रक्रमाने येतो. सन 1964 मध्ये संथानाम समितीने केलेल्या शिफारशीत बेहिशोबी काळा पैसा, बेसुमार प्रमाणात देशात असून तोच येथील भ्रष्टाचाराचा मूळस्त्रोत आहे असे नमूद करून पुढे स्पष्ट केले की, राजकारणाच्या उच्च स्तरावरील भ्रष्टाचाराचे प्रमाण प्रचंड आहे. या जनतेच्या समजुतीला राजकीय पक्ष निवडणुकांसाठी गोळा करत असलेल्या निधीचा आकार पाहता बळकटी मिळते आणि त्यामुळेच राजकीय पक्षांनी निवडणूक उत्पन्न व खर्चाचे हिशोब चोख ठेवणे अत्यंत आवश्यक ठरते. पुढे सन १९७३ मध्ये नेमलेल्या वांछू समितीने सादर केलेल्या शिफारसीमध्येही या विषयावर भर देताना म्हटले आहे की, व्यक्तीश: उमेदवाराच्या प्रचाराचा खर्च सरकारने करावा, राजकीय पक्षांचे सर्व हिशोब त्यांच्या लेखापरीक्षण विभागाने तपासावेत आणि लोकांच्या तपासणीसाठी प्रकाशित करावेत, लोकशाही शासनप्रणालीत राजकीय पक्षांना प्रचंड खर्च करावा लागत असून निवडणुकांचा हा अफाट खर्च सगळयांनाच मान्य आहे. भारतीय लोकप्रतिनिधित्व कायद्यातील तरतुदींनुसार सर्व उमेदवारांनी निवडणुकीत केलेल्या खर्चाचा संपूर्ण हिशोब ठेवावा आणि निवडणूक आयोगाला सादर करावा. ठराविक मुदतीत ठराविक नमुन्यात हीशोब सादर न करणाऱ्या उमेदवाराला अपात्र घोषित करण्याचा अधिकार भारत निवडणूक आयोगाला असल्याचे दिसून येते. भारतातील राजकीय पक्षांना निवडणूक निधी पुरविण्यासंदर्भात सन 1998 मधील इंद्रजीत गुप्ता समितीने काही महत्वपूर्ण शिफारशी केल्याचे स्पष्ट होते. कमी आर्थिक संसाधने असलेल्या राजकीय पक्षांना समान स्पर्धा करता यावी यासाठी निवडणूकामध्ये विविध राजकीय पक्षांना सरकारी निधी देण्यात यावा. निवडणूक चिन्ह असलेल्या राजकीय राजकीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांनाच सरकारी निवडणुका निधीचे वाटप करावे. अपक्ष उमेदवारांना सरकारने निवडणूक निधीचा फायदा देऊ नये. सरकार समोरील आर्थिक अडचणी मान्य करताना या समितीने संपूर्ण सरकारी निवडणूक निधीऐवजी अंशिक सरकारी निवडणूक निधीचा शिफारस केली होती.

भारतातील राजकीय पक्षांना मिळणाऱ्या निवडणूक निधी संदर्भात प्रमुख मुद्दे म्हणजे निनावी देणग्या हा पहिला मुद्दा होय. राजकीय पक्षांना मिळणाऱ्या प्रमुख देणग्यामधील निनावी रोखे देणग्यांचे प्रमाण 70% इतके आहे. या देणग्यामुळे राजकीय पक्षांना आयकरात सवलत आहे. या देणग्यांमुळे काळया पैशाला उत्तेजन मिळते. निवडणूक निधी संदर्भातील दुसरा प्रमुख मुद्दा म्हणजे राजकीय पक्षांकडून निवडणुकीतील प्रचारादरम्यान मोफत वस्तूंचे वाटप सर्रास मार्गाने निवडणूक काळात येतो. यामुळे निवडणूक आयोगाने निवडणूक निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च राजकीय पक्ष व उमेदवार करताना आढळतात. अशाप्रकारे भारतातील निवडणूक निधीमधील गैरप्रकार रोखून राजकीय पक्षांच्या निवडणूक निधीत पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने सन 2017 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने निवडणूक रोखे योजना सुरू केल्याचे स्पष्ट होते. या निवडणूक रोखी योजनेची माहिती पुढील प्रमाणे स्पष्ट केली आहे

निवडणूक रोखे योजना प्रारंभ:

भारतातील राजकीय पक्षांना मिळणाऱ्या निवडणूक निधीतून पारदर्शकता आणण्याच्या प्रमुख उद्देशाने केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटलीने सन 2017-18 वार्षिक अर्थसंकल्प निवडणूक रोखे योजना जाहीर केली होती. भारतीय स्वातंत्र्याला 70 वर्ष होऊनही भारतातील राजकीय पक्षांना अर्थ पुरवठा करण्यासाठीचे पारदर्शक माध्यम निर्माण करू शकले नसल्याने निवडणूक रोख योजना सुरू करून एक स्वतंत्र्य व निपक्ष निवडणूक होण्यासाठी निवडणूक निधीची निवडणूक रोखे योजना केंद्र सरकारने सुरू केल्याचा युक्तिवाद तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी केल्याचे स्पष्ट होते. सन 2017-18 केंद्रीय अर्थसंकल्पना जाहीर केलेली निवडणूक रोखे योजना दिनांक 2 जानेवारी 2018 रोजी केंद्र सरकारच्या अर्थमंत्र्याच्या अधिसूचनेद्वारे सुरू झाली होती. दिनांक 2 जानेवारी 2018 रोजी या निवडणूक रोखे योजनेचा सर्व तपशील जाहीर केला होता. 2 जानेवारी 2018 रोजी केंद्रीय अर्थमंत्री यांनी निवडणूक रोख्याबाबत संसदेत घोषणा करून भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा 1951 कलम 29 (अ) अंतर्गत भारतीय भारतातील नोंदणीकृत व मान्यता प्राप्त राजकीय

पक्षांना या निवडणूक रोख्यांची उपलब्धता झालेली आहे. भारतात राजकीय पक्षांना निधी वैयक्तिक किंवा संस्थांमार्फत मिळतो. आयकर अधिनियमात 1961 परकीय मदत नियंत्रण अधिनियम 1974 द्वारे हा निधी नियंत्रित केला जातो. सन 2017 संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली सर्वप्रथम निवडणूक रोखे योजनेची घोषणा केली होती. निवडणूक रोखे योजना जाहीर करताना भारतीय संसदेने सन 2017 अर्थसंकल्प कायद्याद्वारे लोकप्रतिनिधित्व कायदा 1951, आयकर कायदा 1961 आणि कंपनी कायदा 2013 या कायद्यात दुरुस्त्या केलेल्या आहेत. राजकीय पक्षांना निनावी देणग्या प्राप्त करण्यासंबंधी परवानगी देणारी निवडणूक रोखे योजना राबविण्याची जबाबदारी भारतीय स्टेट बँकेकडे सोपविण्यात आली होती. भारतीय स्टेट बँकेच्या निवडक शाखांमधून जानेवारी, एप्रिल, जुलै आणि ऑक्टोबर या चार महिन्यांमध्ये प्रत्येक दहा दिवसांसाठी 1000, 10000, 100000, किंवा 1 कोटी रुपयाचे निवडणूक रोखे विकत घेता येत होते. एखादी भारतीय नागरिक व्यक्ती आणि हिंदू अविभक्त कुटुंब एकट्याने किंवा इतर व्यक्तींसोबत संयुक्तपणे आणि भारतामध्ये स्थापन झालेली कंपनी किंवा फर्म निवडणूक रोखे खरेदी करू शकत होती. या निवडणूक रोख्यांवर देणगीदाराचे नाव नमूद केले जात नसले तरी निवडणूक रोखे भारतीय स्टेट बँकेमधून खरेदी करताना केवायसी कागदपत्रे सादर करावी लागत होती. हे निवडणूक रोखे देणगीदाराला जारी केल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसापर्यंत वैध होते. खरेदीनंतर 15 दिवसात हे रोखे नोंदणीकृत राजकीय पक्षांना देता येत होते. हे रोखे पात्र राजकीय पक्षांना केवळ पूर्वी जाहीर केलेल्या बँक खात्यामध्येच ते जमा करता येत होते. भारत सरकारना स्टेट बँक ऑफ इंडियाच्या भारतातील 29 शाखांमध्ये ही निवडणूक रोखे योजना अंमलात आणली होती.

निवडणूक रोखे स्वीकारण्यासाठी अटी:

भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा 1951 कलम 29 (अ) अंतर्गत नोंदणीकृत राजकीय पक्षांनी मागील सार्वत्रिक लोकसभा किंवा विधानसभेच्या मागील सार्वत्रिक निवडणुकात वैद्य मतांपैकी एक टक्के मते प्राप्त करणे आवश्यक होते. केंद्र सरकारने नमूद केल्याप्रमाणे जानेवारी, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर महिन्यात प्रत्येकी 10 दिवसाच्या कालावधीसाठी भारतीय भारतातील कोणत्याही नागरिकांकडून हे रोखे खरेदीसाठी भारत स्टेट बँक च्या 29 शाखा उपलब्ध करून दिले जात होते. तसेच लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूक वर्षात निवडणूक रोखे खरेदीसाठी केंद्र सरकारकडून 30 दिवसांचा अंतिम अतिरिक्त कालावधी आणि राज्य व केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वर्षात 15 दिवसाच्या आत अतिरिक्त कालावधी देण्याची तरतूद होती. या निवडणूक रोख्याद्वारे केलेल्या राजकीय देणग्यांना 100% आयकारात सूट दिलेली होती.

निवडणूक रोख्यांना निवडणूक आयोगाचा विरोध:

भारतातील विविध राजकीय पक्षांना निवडणूक निधी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने सन 2017-18 आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात अधिवेशनात जाहीर केलेल्या निवडणूक रोख्यांना दिनांक 27 मार्च 2019 रोजी सर्वोच्च न्यायालयात भारतीय निवडणूक आयोगाने विरोध करीत राजकीय पक्षांना दिल्या जाणाऱ्या निधीतील पारदर्शकतेवर निवडणूक रोख्यांचा गंभीर परिणाम होणार असल्याचा युक्तिवाद करीत निवडणूक रोखे योजनेला विरोध केल्याचे स्पष्ट होते. निवडणूक आयोगाने पुढील मुद्द्याच्या आधारे निवडणूक रोख्यांना विरोध केल्याचे दिसून येते. निवडणूक रोखे लागू करण्यासाठी भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा 1951, कंपनी कायदा 2013 तसेच विदेशी योगदान नियमन कायदा 2010 मध्ये दुरुस्ती केलेली होती. निवडणूक रोखे योजना कायदा 2017 द्वारे लोकप्रतिनिधित्व कायद्यात दुरुस्ती करीत राजकीय पक्षांनी निवडणूक रोख्यांच्याद्वारे मिळालेल्या देणग्यांची माहिती भारतीय निवडणूक आयोगाला सादर करण्याची अट रद्द केली होती. या दुरुस्तीमुळे राजकीय पक्षांना परदेशी स्त्रोतव्दारे राजकीय देणग्या मिळणार होत्या. त्यामुळे निवडणूक रोख्यांच्याद्वारे मिळणाऱ्या देणग्यांची माहिती जर भारतीय निवडणूक आयोगाला राजकीय पक्षांनी सादर न केल्यास भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा मधील कलम 29 (ब) उल्लंघन झाल्याचे सिद्ध करणे कठीण झाले होते. याशिवाय निवडणूक रोखे योजना लागू करण्यासाठी आयकर कायद्यातील दुरुस्तीमुळे अनामित देणग्यांना परवानगी मिळून 20000 रुपये यापेक्षा कमी देणग्या देणाऱ्यांची व्यक्तींची नाव पत्ता व पॅनक्रमांक देण्याची आवश्यकता नव्हती. निवडणूक आयोगांच्या मतानुसार

अनेक राजकीय पक्षांच्या देणग्या 20000 रुपयांपेक्षा कमी होत्या.

विदेशी योगदान नियम कायद्यातील दुरुस्तीमुळे भारतीय कंपन्यांमध्ये बहुसंख्य सहभाग आलेल्या परदेशी कंपन्यांनी दिलेल्या देणग्या राजकीय पक्षांना स्वीकारता येत नव्हत्या. निवडणूक रोख्यांसाठी करण्यात आलेल्या विविध कायद्यातील दुरुस्त्या हे एक प्रतिगामी पाऊल असल्याचे मत व्यक्त करीत भारतीय निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांना निवडणूक रोख्यांद्वारे मिळणाऱ्या देणग्या परदेशी स्रोतांकडून किंवा अवैध मिळाल्या आहेत किंवा नाही हे तपासण्याचा कोणताही मार्ग नसल्याचा दावा केला होता. याशिवाय निवडणूक लोकांसाठी विविध कायद्यांमध्ये केलेल्या दुरुस्तीमुळे राजकीय देणग्यामध्ये शेल कंपण्याच्या माध्यमातून काळया पैशाचा शिरकाव होणार असल्याची शक्यता निवडणूक आयोगांनी सर्वोच्च न्यायालयात व्यक्त केली होती.

निवडणूक रोखे वित्त अधिनियम 2017 मधील कलम 154 अन्वये कंपनी कायदा 2013 कलम 182 (1) दुरुस्ती अन्वये कंपन्या किंवा व्यक्तीद्वारे राजकीय पक्षांना दिल्या जाणाऱ्या राजकीय देणग्यावरील 7.5% नफ्यापर्यंतची मर्यादा उठवण्यात आली. निवडणूक रोखे योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने लोकप्रतिनिधित्व कायदा 1951, कंपनी कायदा 2013, प्राप्तिकर कायदा 1961, विदेशी योगदान नियमन कायदा 2010 इत्यादी कायद्यात बदल केले होते. सन 2017 मध्ये केंद्र सरकारने वित्त विधेयकाच्या मंजुरीद्वारे निवडणूक रोखी योजना सुरू केली होती. 14 सप्टेंबर 2017 रोजी असोसिएशन फॉर डेमोक्रोस्तिक रेफॉर्मन्स या स्वयंसेवी संस्थेने निवडणूक रोखे योजनेला विरोध करीत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 3 ऑक्टोबर 2017 रोजी या स्वयंसेवी संस्थेच्या जनहित याचिकेची दखल घेत केंद्रशासन व भारत निवडणूक आयोगाला सूचना जारी केली होती. असे असूनही 2 जानेवारी 2019 रोजी केंद्र सरकारने एका अधिसूचनेद्वारे ही योजना लागू केली होती. दिनांक 07 नोव्हेंबर 2022 रोजी केंद्र सरकारने या योजनेत सुधारणा करण्याचा अधिसूचना जारी केली. नवीन सुधारणा नुसार राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वर्षात अतिरिक्त 15 दिवसांसाठी निवडणूक रोख्यांची विक्री करण्यास परवानगी दिली होती. या अधिसूचनापूर्वी निवडणूक रोखे केंद्र शासनाने निर्विष्ठ केल्यामुळे प्रत्येक वर्षी जानेवारी, एप्रिल, जुलै आणि ऑक्टोबर महिन्यामध्ये प्रत्येक 15 दिवसाच्या कालावधीत रोखी खरेदी करताना येत असत, तसेच लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वर्षात निवडणूक रोख खरेदीसाठी केंद्र सरकारकडून 30 दिवसांचा अतिरिक्त कालावधी निर्विष्ठ करण्याचीही तरतूद होती. हे सुधारित अधिसूचनाप्रमाणे केंद्र सरकारला 09 नोव्हेंबर 2022 पासून निवडणूक रोखे जारी करण्यासाठी अतिरिक्त कालावधी मिळण्याची तरतूद केली होती. स्टेट बँक ऑफ इंडिया हे रोखे जारी करण्यासाठी आणि ते रोखे रकमेत बदलून देण्यासाठीची अधिकृत बँक होती. दिनांक 16 ऑक्टोबर 2023 रोजी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती डी वाय चंद्रचडांच्या अध्यक्षतेखाली 05 न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे ही याचिका सोपवण्यात आली होती. तर पुढे 31 ऑक्टोंबर 2023 रोजी या याचिकेवर सुनावणी झाली होती. याचिकेवरील निकाल राखून ठेवले. पुढे दिनांक 15 फेब्रुवारी 2024 रोजी 05 सदस्यांची घटनापिठाने एकमताने माहितीच्या अधिकाराच्या उल्लंगणामुळे ही योजना रद्द केली.

राजकीय पक्षाकडून पाच वर्षात 22217 रोखे खरेदी:

भारतातील राजकीय पक्षांनी एक एप्रिल 2019 ते 15 फेब्रुवारी 2024 या साधारणपणे पाच वर्षाच्या दरम्यान एकूण 22,217 निवडणूक रोखे खरेदी केल्याची माहिती भारतीय स्टेट बँकेने बुधवार दिनांक 13 मार्च 2024 रोजी सर्वोच्च न्यायालयात सादर केली होती. त्यापैकी 22030 निवडणूक रोखे वाठविण्यात आल्याचे आढळून आले. भारतीय स्टेट बँकेने सर्वोच्च न्यायालयात एक अनुपालन प्रतिज्ञापत्र सादर करून त्यात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार निवडणूक रोख्यासंदर्भातील सर्व तपशील निवडणूक आयोगाला दिनांक 12 मार्च 2024 रोजी सादर करण्यात आला. यात प्रत्येक निवडणूक रोखीच्या खरेदीची तारीख, रोखीने खरेदीदाराचे नाव, रोखे मिळालेल्या राजकीय पक्षाचे नाव, रोख्याचे मूल्य आणि रोखीकरणाची तारीख अशा सर्व प्रकारच्या माहितीचा समावेश होता. 01 ते 11 एप्रिल 2019 दरम्यान एकूण 3346 निवडणूक रोख्यांची खरेदी झाली. या कालावधीत 1609 रोखे वटविण्यात आले. तर दिनांक 12 एप्रिल 2019 ते 15 फेब्रुवारी 2024 दरम्यान 18871 रोख्यांची खरेदी झाली

होती. या कालावधीमध्ये 20421 रोख्यांची रोखीकरण केले गेले होते. एकंदरीत सन 2019 ते फेब्रुवारी 2024 पर्यंत 22217 निवडणूक रोखे जारी केले होते. या रोख्यांद्वारे 22030 राजकीय पक्षांनी पैसे जमा केले होते. तर 01 एप्रिल 2019 ते 11 एप्रिल 2019 या 11 दिवसाच्या कालावधीत 3345 निवडणूक रोख्यांची खरेदी झाली होती. 1609 निवडणूक रोखें मांडण्यात आले. 12 एप्रिल 2019 ते 15 फेब्रुवारी 2024 या कालावधीने एकूण 18171 निवडणूक रोखे खरेदी झाले होते. एकूण 187 रोख्यांचे पैसे कोणत्याही राजकीय पक्षांनी घेतलेले नाहीत. महत्त्वपूर्ण म्हणजे जे रोखे राजकीय पक्षांनी वटविले नाहीत तो पैसा पंतप्रधान मदतनिधीत वर्ग करण्यात आला. राजकीय पक्षांनी निवडणूक रोख्याच्या माध्यमातून निवडणूक निधी गोळा करण्याच्या पद्धतीलाच मध्यंतरी भारतीय निवडणूक आयोगाने बेकायदेशीर ठरविले होते. याबाबतचा सर्व तपशील देखील भारतीय स्टेट बँकेला सादर करण्यास सांगितले होते. 01 कोटी रुपयाचे 12207 रोखे, 10 लाख पर्यंतचे 5366 रोखे, 01 लाख रुपयाचे 2526 रोखे, 10000 हजार रुपयाचे 219 रोख, तसेच 1000 रुपयाचे 103 रोखे भारतीय स्टेट बँकेने विकले आहेत. या निवडणूक रोख्यातून भाजप, काँग्रेस, अण्णा तमुक, भारत राष्ट्र समिती, शिवसेना, तेलगू देसम वायएसआर, काँग्रेस, द्रमुके, राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमुल काँग्रेस, जनता दल संयुक्त, जनता दल धर्मनिरपेक्ष, राष्ट्रीय जनता दल, आम आदमी, समाजवादी पक्ष, जम्मू काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स पक्ष, बिजू जनता दल, गोवा फॉरवर्ड पार्टी, महाराष्ट्रवादी गोमंतक इत्यादी राजकीय पक्षांनी देणग्या मिळाल्या आहेत.

तक्ता क्रमांक 01 निवडणूक रोख्याद्वारे सर्वाधिक देणगी मिळणारे पक्ष

अ.क्र.	राजकीय पक्षाचे नाव	मिळालेले रोखे	दोगी कोटी रूपये	एकुण देणगीतील प्रमाण
1	भारतीय जनता पक्ष	8633	6060.50	47.46%
2	तृणमूल काँग्रेस	3305	1609.50	12.60%
3	भारतीय राष्ट्रीय काँग्रेस	3146	1421.90	11.14%
4	भारत राष्ट्र समिती	1806	1214.70	9.51%
5	बिजू जनता दल	861	775.50	6.07%
6	द्रविड मुनेत्र कळघम	648	639.00	5.00%
7	वायएसआर काँग्रेस पक्ष	472	337.00	2.64%
8	तुलगू देसम पक्ष	279	218.90	1.71%
9	शिवसेना	355	159.40	1.24%
10	राष्ट्रीय जनता दल	149	72.50	0.57%
11	आम आदमी पक्ष	245	65.50	0.51%
12	जनतादल (धर्मनिरपेक्ष)	936	43.50	34.00%
13	सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा	निरंक	36.50	29.00%
14	राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष	121	30.50	24.00%

वरील तक्ता क्रमांक एकचे अवलोकन केल्यास असे स्पष्ट होते की, सध्या केंद्रात सत्तेत असलेल्या भारतीय जनता पक्षाला एकूण निवडणूक रोख्यांपैकी सर्वाधिक रक्कम प्राप्त झालेली आहे. केंद्रीय तपास संस्था अंमलबजावणी संचालनालय, केंद्रीय अन्वेष ब्युरो आणि आयकर विभागाद्वारे तपास सुरू असणाऱ्या अनेक कंपन्यांनी निवडणूक रोखे खरेदी केलेले असून या कंपन्यांनी एकत्रितपणे 4787.3 कोटी रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केलेले असून त्याचे मूल्य एकूण देण्याच्या 39% पेक्षा जास्त आहे. तसेच निवडणूक रोख्यांच्या आकडेवारीतून पुढे आलेली धक्कादायक बाब म्हणजे विविध कंपन्यांनी आपल्या नफ्यापेक्षा जास्त रक्कम निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून राजकीय पक्षांना दान दिलेली आहे.

निवडणूक रोखे योजना असमवैधानिक म्हणून रद्द केली:-

दिनांक 15 फेब्रुवारी 2024 रोजी एका ऐतिहासिक निकालाद्वारे सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या

घटनापिठाने एकमताने निवडणूक रोखे योजना आणि वित्त कायदा 2017 द्वारे आणलेल्या संबंधित दुरुस्त्या असंविधानिक म्हणून रद्द करण्याचा निर्णय दिला. भारतीय राज्यघटनेच्या कलम 19 (1) (अ) अंतर्गत माहितीच्या मूलभूत अधिकाराचे निवडणूक रोखे योजनेमुळे उल्लंघन झाले असल्याने निवडणूक रोखे योजना रद्द करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिल्याचे स्पष्ट होते. सर्वात सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाद्वारे केंद्र सरकारने निवडणूक रोखे योजना अमलात आणण्यासाठी संमत केलेल्या निवडणूक रोखे योजना आणि वित्त कायदा 2017 द्वारे लोकप्रतिनिधित्व कायदा 1951, आयकर कायदा 1961, कंपनी कायदा 2013 या कायद्यातील सुधारणासुद्धा असंविधानिक ठरवत या कायद्यांची आधीची स्थिती पण स्थापित करण्याचा निर्णय घोषित करण्याचे स्पष्ट होते. सर्वोच्च न्यायालयाने यापुढे निवडणूक रोखे जारी करणे ताबडतोब थांबविण्यासह 12 एप्रिल 2019 पासून 15 फेब्रुवारी 2024 या कालावधीत विविध राजकीय पक्षांनी खरेदी केलेल्या रोख्यांचा तपशील भारतीय निवडणूक आयोगाला सादर करण्याचे आदेश सुद्धा दिल्याचे दिसून येते. या तपशिलात प्रत्येक रोखे खरेदीच्या तारीख, रोखे खरेदी करणाऱ्याचे नाव आणि खरेदी केलेल्या रोख्यांची मूल्य अशी सर्व माहिती 13 मार्च 2024 पर्यंत भारतीय निवडणूक आयोगाला सादर करण्याचा आदेश दिला. भारतीय स्टेट बँकेने भारतीय निवडणूक आयोगाला निवडणूक रोख्यासंबंधी सादर केलेली सर्व माहिती भारत निवडणूक आयोगाने त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित करण्याचे प्रभुत्व मानले होते. या निकालाद्वारे सर्वोच्च न्यायालयाने वैधता कालावधीतील परंतु राजकीय पक्षाद्वारे रोखे न झालेले निवडणूक रोखे हे जारी करण्याच्या बँकेद्वारे खरेदीदारांना परताव्यासह परत करण्याचे आदेश दिले.

निष्कर्ष:

भारतातील केंद्र सरकारने सन 2017 मध्ये अमलात आणलेली निवडणूक रोखे योजना नावाची जी अपारदर्शक, माहितीच्या अधिकाराची उल्लंघन करणारी, तसेच अनेक गैरप्रकारांना चालना देणारी आणि भारतातील भांडवलदारांचे हीतसंबंध जोपासणारी योजना 15 फेब्रुवारी 2024 रोजी सर्वोच्च न्यायालयाने एका निर्णयाद्वारे घटनाबाह्य ठरवीत रद्द करण्याचा ऐतिहासिक निकाल दिला. राजकीय पक्षांना उद्योगधंद्यांनी निधी देण्यासाठीच्या उद्देशाने यंत्रणात्मक स्वरूप देताना सर्वात वादग्रस्त ठरलेली योजना म्हणजे केंद्र सरकारने 2017 मध्ये लागू केलेली निवडणूक रोखे योजना होती. ही योजना भारतातील बड्या उद्योग समूह आणि राजकीय पक्षांमध्ये परस्परांचे हितसंबंधाला पोषक होती. त्यामुळे साटयालोट्याच्या निवडणूक रोखे योजनेमुळे विरोधी पक्ष्यांपेक्षा सत्ताधारी राजकीय पक्षांना या योजनेतून अधिक प्रमाणात निवडणूक निधी मिळाल्याचे स्पष्टपणे जाणवते. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 32 अन्वये निवडणूक रोखे योजनेच्या घटनात्मक वैद्यतेला सर्वोच्च न्यायालयात सन 2017 मध्येच असोसिएशन फॉर डेमोक्रॉसिक रिफार्म्स या स्वयंसेवी संस्थेने याचिका दाखल करीत वित्त कायदा 2017 च्या तरतुदींनाही असे आव्हान दिले होते. निवडणूक रोखे देणगीदारांचा तपशील गोपनीय ठेवणे हे उघडपणे पारदर्शकतेच्या तत्वाला मुरड घालणारे होते. निवडणूक निधी आणि निवडणुकीचे राजकारण यापेक्षाही भारताची लोकशाही महत्त्वाची आहे असे स्पष्ट करीत सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोख्ये योजना रद्दबातल करण्याचा निकाल ते या योजनेच्या संदर्भात केलेल्या कायदेशीर दुरुस्त्या भारतीय लोकशाहीच्या आदर्शांना पायदळी तुडवतात हे स्पष्ट केले. निवडणूक खुल्या व न्याय वातावरणात पार पाडणे आवश्यक असते. परंतु या योजनेत सत्ताधारी पक्षाला मिळालेला निवडणूक निधी विरोधी पक्षांपेक्षा कितीही तरी पटीने जास्त आहे.

भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा, कंपनी कायदा मध्ये निवडणूक प्रक्रिया राजकीय पक्षांना मिळणारा निधी याविषयी भारतीय मतदारांना माहिती मिळणे आवश्यक होते. असे असताना केंद्र सरकारने सन 2017 मध्ये केलेल्या निवडणूक रोखे योजनेमुळे पारदर्शकतेला हरताळ फासला गेला होता. भारतीय निवडणूक मध्ये सर्व राजकीय पक्षांना समान संधी असणे अत्यंत आवश्यक आहे. अपारदर्शक निवडणूक रोख्यांमुळे ही समान संधी नाकारली जात होती. निवडणूक रोखे कोणी खरेदी केले, कोणास दिले, कोणाला कोणत्या राजकीय पक्षाने ते वटवले हा सत्ताधाऱ्यांना तपशील सरकारी भारतीय स्टेट बँकेच्या माध्यमातून सातत्याने कळत होती. परंतु विरोधी पक्षांना ही माहिती मिळत नव्हती. त्यामुळे ही असमानता निवडणूक रोखे योजना रद्द झाल्याने संपल्याचे स्पष्ट होते. एकंदरीत भारतातील राजकीय पक्षांना निवडणूक निधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सन 2017 मध्ये अमलात आलेली

निवडणूक रोखे योजना सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्यानंतर भविष्यात पारदर्शक समान संधी देणारी राजकीय निधीची योजना अमलात आणणे ही भारतातील आर्थिक निवडणूक सुधारणांसाठीचे महत्त्वपूर्ण पाऊल असेल.

सारांश:-

निवडणूक रोखे योजना सर्वोच्च न्यायालयाने असंविधानिक घोषीत केल्यामुळे राजकिय पक्षांना निवडणूक निधी उपलब्ध करून देणारी परदर्शक, निपक्षपाती पर्यायी योजना केंद्रसरकारने अंमलात आणणे हि तातडीची गरज आहे. कारण निवडणूकातील प्रचंड आर्थिक व्यवहार नियंत्रीत करण्यासाठी आणि राजकिय पक्षांना त्यांची आर्थिक निकड पुर्ण करण्यासाठी अशी योजना अंमलात आणणे अत्यंत आवश्यक आहे.

संदर्भ सुची:-

1. N.N. Ojha (Edited) July 2019, Civil Services Chronical, Page 96, Chronical Publications Pvt. Ltd. Noida.
2. तांबे रूपाली, शिंदे अपुर्वा, शेडगे कोमल, सहामाही परिक्रमा भाग- 1, जानेवारी ते जून 2019, प्रष्ठ 11 व 12, पृथ्वी ॲकॅडमी पब्लीकेशन्स, पुणे.
3. पाटील विश्वनाथ जयसिंग (संपादित), जानेवारी 20243 व एप्रिल 2024, यशाची परिक्रमा (मासिक) पृष्ठ 7 ते 9, पृथ्वी पब्लीकेशन्स, पुणे.
4. राक्षेभूषण (संपादित), प्रथमावृत्ती जानेवारी 2019, सकाळ इयरबुक 2019, पृष्ठ 48 व 49, सकाळ प्रकाशन पुणे.
5. N.N. Ojha (Edited) April 2020, Civil Services Chronical, Page 95, Chronical Publications Pvt. Ltd. Noida
6. गोडबोले माधवराव (अनुवाद गोडबोले सुजाता) प्रथमावृत्ती मे 2012, भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्नीपरीक्षा, पृष्ठ 224 ते 230, राजहंस प्रकाशन पुणे.
7. Chaturvedi Suchita (Edited) Sepember 2020, Yojana (Monthly) New Delhi, N. Gopal Swami's Article on Public Funding of Elections.
8. विघे प्रशांत, तेलगोटे धमेंद्र, प्रथमावृत्ती 24 एप्रिल 2019, लोकशाही निवडणूक प्रक्रिया आणि सुशासन, पृष्ठ 161 ते 165, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपुर.
9. सुरणे बालाजी, महाले-सुरणे दिव्या, सिंपलीफाईड चालू घडामोडी डायरी, 01 जानेवारी ते 15 मार्च 2024, सिंपलीफाईड पब्लीकेशन्स म्हाडा, पृष्ठ 13 ते 15.
10. दिव्यकिर्ती विकास (संपादित) एप्रिल 2024, करंट अफेअर्स टुडे, पृष्ठ 12 ते 14, दृष्टी पब्लीकेशन्स दिल्ली.
11. काश्यप सुभाष (अनुवाद चर्तुर्वेदी ध्रुवनाथ) व्दितीय परिवृध्दित संस्करण 2017, पृष्ठ 264 ते 274, भारतीय संविधान और आम आदमी.
12. Kashyap Subhash, 2012, Our Political System, National Book Trust India, New Delhi, Page 257 to 271.
13. कश्यप सुभाष (अनुवाद पाटील न.ब.), 2015, आपली संसद, पृष्ठ 1 ते 16, नॅशनल बुक ट्रस्ट नवी दिल्ली.
14. दैनिक लोकसत्ता, दैनिक सकाळ, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, द हिंदू, इंडिय एक्सप्रेस, टाईम्स ऑफ इंडिया, फेब्रुवारी, मार्च 2024.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

जैन ग्रंथांतील स्त्री विषयक दृष्टिकोण एक अभ्यास

डॉ. एस. वाय. गवळी[1], प्रा. वाय. ए. गांगुर्डे[2]
[1]उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, दहिवेल ता - साक्री जि. धुळे.
[2]कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कळवण (मानूर) ता- कळवण जि- नाशिक.
Corresponding Author- डॉ. एस. वाय. गवळी
ई-मेल: _yogeshgangurde9579@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.11178406

प्रस्तावना:

प्राचीन काळापासूनच्या इतिहासाचा अभ्यास करत असताना अनेक घटना नजरेसमोर येतात. प्राचीन काळापासून आजपर्यंत पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये पुरुषांचे अस्तित्व दिसत असले तरी स्त्रिया या कुठेही कमी नव्हत्या. परंतु त्यांना राजकारण, समाजकारण व धर्मकारण या सत्तेच्या चढाओढीमध्ये दूर ठेवले गेल्याचे दिसून येते. जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा तेव्हा स्त्रियांनी स्वतःला सिद्ध करून दाखविले आहे व समाजमनावर स्वतःच्या कार्याची एक वेगळी प्रतिमा उमटवली आहे. सदर शोधनिबंधात आपण जैन धर्म ग्रंथांतील स्त्री विषयक दृष्टिकोनाचा अभ्यास करणार आहोत.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१. जैन स्त्रियांचे कौटुंबिक स्थान याबाबत अभ्यास करणे.

२. जैन विवाह संस्थेचा अभ्यास करणे.

३. जैन परिवारातील पती-पत्नी व इतर सदस्यां बरोबर असणाऱ्या संबंधांचा अभ्यास करणे.

४. स्त्रियांवर असणाऱ्या जबाबदारीचा अभ्यास करणे.

गृहितके :-

१. जैन स्त्रीच्या वर्तनामुळे एकत्र कुटुंब व्यवस्था टिकून राहिली.

२. स्त्रियांचे स्थान हे दुय्यम ठेवले आहे.

संशोधनाचा विश्लेषणात्मक आढावा :-

स्त्रियांचे शिक्षण :-

स्त्री शिक्षण हा मुद्दा प्राचीन काळापासून सर्व धर्मांमध्ये कमीअधिक प्रमाणात चर्चेत आहे. स्त्री शिक्षणाकडे कोणत्याही धर्मात मोठ्या प्रमाणात लक्ष देण्यात आले नाही असेच दिसून येते. त्याला जैन धर्म सुद्धा अपवाद नाही. परंतु जैन धर्मात मुलींच्या जन्माचा आनंदोत्सव साजरा केला जात असल्याचे अनेक संदर्भ सापडतात.[१] नाव ठेवण्यासाठी देखील महोउत्सव साजरा केला जात असे. परंतु मुलींचा उपनयन संस्कार केल्याचे उल्लेख मिळत नाही. असे असले तरी मुलींनी चौसष्ट कलांमध्ये पारंगत असावे असे संदर्भ आहे. या शिक्षणाचा उद्देश पुढे जाऊन सांसारिक जीवनामध्ये मुलींना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये असा होता. पण हे शिक्षण कसे आणि कुठे दिले जात असे यासंदर्भात कोणत्याही ग्रंथांमध्ये उल्लेख आढळून येत नाही.

वरील बाजूचा विचार केला तरी अविवाहित मुली (कुवारी) यांनी जैन धर्माची दीक्षा घेऊन तीर्थंकर पदवी प्राप्त केल्याचे संदर्भ मिळतात.[२] सामान्य मुलीकडून असे केल्याचे ठोस प्रमाण मिळत नाही.

मुली प्रति असणारी आई वडिलांचे प्रेम :-

आई-वडिलांचे आपल्या मुलींवर असणाऱ्या प्रेमामुळे आपल्या मुलींना मुलाप्रमाणे सांभाळत असे. आपल्या मुलीवर असणाऱ्या अपार प्रेमामुळे आपल्या मुलीच्या विवाहा नंतर होणारा वियोग ते सहन करू शकत नसे. म्हणून आपल्या मुलीसाठी ते सुयोग्य घरजावई शोधत असत.[३] यामागील त्यांची भावना आयुष्यभर आपली मुलगी आपल्या नजरेसमोर, आपल्याच घरी राहावी ही होती. क्वचित असे ही संदर्भ सापडतात आपल्या मुलीला जावयाकडून जर काही त्रास होत असेल तर त्याला घरातून काढून दिले जात असे.[४] याशिवाय काही मुली स्वतःच्या अंगी असणाऱ्या उणिवांमुळे, सौंदर्याच्या अभावामुळे विवाहास योग्य नसे. त्यामुळे त्या आपले संपूर्ण आयुष्य आपल्या आई वडिलांच्या घरी राहत असे. आई-वडील देखील त्यांचा योग्य सांभाळ करत असत.

विवाह पद्धती :-

विवाह संस्कार मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाचा संस्कार मानला आहे. जैन धर्मात देखील विवाहाला महत्त्वाचे स्थान आहे. आपली मुलगी उपवर झाल्यानंतर आई-वडिलांच्या मनात आपल्या मुलीचा विवाह योग्य मुलाबरोबर करून द्यावा ही इच्छा असे. त्यासाठी ते योग्य मुलाचा शोध घेत. विवाह हा दोन्ही पक्षाकडून त्यांचे आई-वडील, वडीलधारे किंवा पालक ठरवत असे. वर पक्षाची मंडळी वधू पक्षाच्या घरी वरात घेऊन जात असे. वधू पक्षाच्या घरी वऱ्हाडी मंडळींना दिल्या जाणाऱ्या जेवणाला जैन आगम ग्रंथांमध्ये आलेल्या उल्लेखाप्रमाणे "पहेण" असे म्हणत असे. हा सोहळा विधीपूर्वक संपन्न केला जात असे. नववधूला विवाहनंतर पती घरी आणले जात असे . वराच्या घरी याप्रसंगी असणाऱ्या संबंधित सर्व नातेवाईकांना जे जेवण दिले जात असे त्यास "आहेणी"[५] असे म्हणत. या विवाहाची आधारशिला ही भावनात्मक नसून वडीलधाऱ्यांच्या इच्छेवर आधारित होती. त्यामुळे पती-पत्नीचे भावनात्मक संबंध जुळण्यासाठी उशीर होत असे. जैन आगम ग्रंथात यासंदर्भात अनेक उल्लेख आले आहे की अनेक विवाहित स्त्रिया या सांसारिक जीवनाला कंटाळून किंवा त्याचा त्याग करून जैन धर्माची दिक्षा घेत असे.[६] याशिवाय अनेक जैन ग्रंथांमध्ये विवाह संबंधी विविध पद्धती असल्याचे दिसून येतात.

पती-पत्नी संबंध :-

पती जर घरातील कर्ता पुरुष असेल तर पत्नी ही गृहस्वामिनी[७] म्हणून स्थान प्राप्त करीत असे. असे उल्लेख जैन आगम ग्रंथात दिसून येतात. पत्नीला आपल्या मर्यादा सांभाळून विनम्रतापूर्वक वर्तन करावे लागत असे. पती बरोबरच परिवारातील इतर सदस्यांसोबत असणाऱ्या सर्व कार्यामध्ये सक्रीय सहभाग घ्यावा लागत असे. पतीच्या इच्छेप्रमाणे कार्य करण्यावर पत्नीला अधिक भर द्यावा लागत असे. पतीला खुश ठेवण्यासाठी तिचा नेहमी प्रयत्न असे, पती साठी पत्नी म्हणजे प्रिय, कांता, वल्लभ, मधुरा असे. पत्नीला धैर्य, विश्वास व घरामध्ये स्थान पती मिळवून देत असे. त्याबरोबरच पत्नीसाठी विविध आभूषणे, वस्त्रे, अलंकार घेत असे. हे संबंध प्रेमयुक्त व भावनात्मक रित्या तयार होण्यासाठी पती-पत्नी दोघेही प्रयत्न करत असे. परिवारामध्ये शब्द, स्पर्श, रूप, गंध आणि रस या पाच प्रकारांमध्ये काम भोगा सोबत सुख पूर्ण जीवन पत्नी व्यतीत करत असे.[८]

पत्नीचे कार्य :-

प्राचीन काळापासून भारतात एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. एकत्र कुटुंब पद्धती बरोबरच बहुपत्नीत्व प्रथेचे अनेक उदाहरणं दिसून येतात. या एकत्र कुटुंब पद्धतीत स्त्रियांच्या कार्याचे विभाजन केले जात असे. जैन कुटुंब पद्धतीमध्ये ही विभाजन श्रेष्ठतेच्या आधारावर नसून प्रामुख्याने गुण, चातुर्य, विवेक यावरच आधारित असल्याचे दिसून येते. कार्य विभाजन करत असताना या गुणांबरोबरच त्यांची मनोवैज्ञानिक परीक्षा देखील घेतली जात असे. मग त्या स्त्रीच्या अंगी असणाऱ्या गुणांच्या आधारावर क्रमशः त्यांना गृहसंचालिका, कोषागार नियंत्रक, घुसलखाना प्रमुख (स्वयंपाकघर प्रमुख), आणि साफ-सफाईचे काम यात विभाजन केले जात असे.[९]

स्त्रियांची प्रतिष्ठा :-

जैन ग्रंथांमध्ये महिलांच्या प्रति विशेष उल्लेख आलेले आहे. तिला चक्रवती च्या 14 दागिन्यांपैकी एक दागिना मानले आहे. स्त्री ही कशी असावी याविषयी वर्णन करताना जैन ग्रंथांमध्ये म्हटले आहे. अतिसुंदर, प्रसन्न, दर्शनीय, मधुरवाणी अशी असावी. ती कशी नसावी या संदर्भात देखील वर्णन आले आहे. अतिस्थूल, अतिसूक्ष्म, वार्निश, अतिकुरूप, अतिकृष्णवर्णीय, अतिपांढरी इ. नसावी. अशा प्रकारचा उल्लेख "समवाओ" या ग्रंथात सापडतो.

तिचा स्पर्श लोकर आणि कापसाच्या स्पर्श सारखा असून हिवाळयात तिचे शरीर गरम असावे तर उन्हाळयात थंड असावे. चंदनाचा वास तिच्या शरीरातुन फुटत राहो. चक्रवती झोपल्यानंतर तिने झोपावे चक्रवती उठण्यापूर्वी तिने उठावे. अशा स्त्रिया घराची कुलाची प्रतिष्ठा वाढवत व स्वतःचे स्थान त्या घरांमध्ये निश्चित करतात. स्त्रियांनी विविध भूमिका पार पाडाव्या असे संदर्भ जैन ग्रंथात सापडतात उदाहरणार्थ आदर्श पुत्री, आदर्श बहीण, आदर्श पत्नी, आदर्श माता, आदर्श पुत्रवधू म्हणून तिने जीवन जगावे अशी अपेक्षा केली जात असे. अशी अपेक्षा करणाऱ्या सर्व समाजात स्त्रियांची एक दुःखद बाजू सुद्धा जैन ग्रंथांमध्ये मांडली आहे. स्त्रियांविषयी अत्यंत निंदनीय शब्दात वर्णने केलेली दिसून येतात.

स्त्रीविषयक दुसरी बाजू मांडताना स्त्रियांच्या दुःखाचे कारणे जैन ग्रंथात मांडली गेली आहे. स्त्रियांची

निंदा करताना म्हटले आहे तिच्या अंतकरणात वेदना असतात. त्यांची छाती उकळती असते, तिच्या अंगी बरीच वासना असते, अशा स्त्रिया पुरुषांना मोहात अडकून त्यांना गुलाम करतात. अति सूड, अति उग्रपणा संदिग्धता हा त्यांचा स्थायी स्वभाव असतो. अशा स्त्रियांचे प्रेम हे हळदीच्या रंगाप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपाचे असते. या स्त्रिया जेव्हा प्रेमात येतात तेव्हा उसाच्या रसा प्रमाणे मादक दिसतात. परंतु या स्त्रिया जेव्हा रागावतात तेव्हा त्या कडुलिंबाहूनही अधिक कडू होतात. अत्यंत ज्ञानी लोक जे गंगेची वाळू, समुद्राचे पाणी आणि हिमालयाची विशालता यांचा अंदाज करू शकतात, असे ज्ञानी लोक देखील स्त्रियांच्या मनाचा हृदयाचा अंदाज बांधू शकत नाही. इतक्या त्या गुढ स्वरूपात वावरत असतात. त्या कुठल्याही विद्वान पुरुषाला आपले हावभाव गुप्त अंगांचे प्रदर्शन करून पदभ्रष्ट करू शकतात. अशा प्रकारचा उल्लेख "उत्तराध्यानसुत्र"(नेमिचान्द्र टीका) या ग्रंथात सापडतो.

त्यामुळे खास करून साधू, विद्वान, तीर्थंकर, श्रमण धर्माचे पालन करणारे यांनी स्त्री पासून दूर राहावे. आपले निवासस्थान देखील अशा ठिकाणी असावे जेथे स्त्रियांचा वावर किंवा निवास नसेल. तीर्थंकर, यांच्या निवासस्थानाला संदर्भात वर्णन करताना जैन ग्रंथात असे उल्लेख आहे की, ज्याठिकाणी मांजरीचा वावर आहे तेथे उंदरांनी आपले निवासस्थान करू नये.[१०]

स्त्रियांच्या व्यभिचाराचे स्वरूप :-

जैन ग्रंथ व आगामी काळातील ग्रंथांमध्ये स्त्रियांच्या व्यभिचाराची वर्णन करताना म्हटले आहे. ज्या स्त्रियांचा स्वभाव हा दुर्बल आणि व्याभिचारी आहे. त्या स्त्रियांच्या मनामध्ये भिक्षू आणि तीर्थंकर यांना बघितल्यानंतर कामवासणा जागृत होऊन त्यांच्यावर त्या भाळतात व मनात विचार करतात श्रमण भगवान असून गुणवान, संयमी, शीलवान, शांत व ब्रह्मचारी असल्यामुळे त्यांच्यासोबत मैथुन (शारीरिक) संबंध ठेवल्यामुळे आपल्याला जो पुत्र प्राप्त होईल तो तेजस्वी, रूपवान, प्रभावशाली, प्रतिभाशाली, ओजस्वी यशस्वी आणि शूर वीर होईल या भावनेने त्या आकृष्ट होतात. अशा स्त्रिया व्याभिचारी असल्याचे मत जैन ग्रंथांमध्ये दिसून येते. मग अशा स्त्रिया पासून श्रमण व तीर्थंकर यांनी दूर राहावे असे सांगितले आहे. या स्त्रियांची निंदा निर्भत्सना केली आहे.[११]

असा व्यभिचार परिणाम हा कधीच योग्य नसतो, दुष्परिणाम होतो. अनेक जैन ग्रंथांमध्ये त्याच्या दुष्परिणामाचे वर्णन दिसून येतात अशा परपुरुषावर मोहीत होणारी स्त्री आपले हावभाव व कटाक्ष यांच्या माध्यमातून त्या पुरुषाला आपल्या मोहपाशात अडकवतात व नंतर त्यांच्या सोबत पळून देखील जातात. अशा स्त्रियांची कुळहीन म्हणून निंदा केली आहे. याशिवाय तिला घरातून काढून दिले जात असे, पती तिची हत्या देखील करत असे. "विपाक सूत्र" या ग्रंथात अशा आशयाचे संदर्भ आले आहे.[१२]

स्त्रियांचे दासी स्वरूप :-

भारतामध्ये आलेल्या अनेक परकीय प्रवाशांच्या वर्णनावरून असे दिसून येते की, भारतात दासी प्रथा अस्तित्वात नव्हती. असे असले तरी त्यांनी भारतात असणाऱ्या दासांची तुलना ही युरोपातील दासांबरोबर केली म्हणून त्यांना असे वाटते, कारण रोम, युनान व अमेरिका इत्यादी देशांमध्ये हे दासांबरोबर अत्यंत क्रूरपणे वागवले जात असे. तसे भारतात होत नसे. भारतीय दास हे आपल्या घरातील एक सदस्य आहे. या स्वरूपात त्यांच्यासोबत वर्तन केले जात असे. घरातील अंतर्गत कामांबरोबर बाहेरील कामांमध्ये देखील हे दास आपल्या स्वामीची मदत करत असत.[१३]

जैन आगम ग्रंथांमध्ये श्रमणानी दास ठेवू नये असा संदेश देण्यात आला आहे. परंतु राजा, जमीनदार, श्रीमंत वर्ग व घरांमध्ये देखील दास ठेवण्याची परंपरा दिसून येते. इतर भोग्य वस्तू प्रमाणे दास हे उपभोगाची वस्तू समजली जात असे. महावीरांनी देखील दासांच्या संदर्भात उपदेश दिला आहे. ते म्हणतात दासांना जरी हीन समजले जात असले तरी विवाह सारख्या प्रसंगी व इतर शुभ कार्याच्या वेळी दास घरातील सदस्य असल्याचे सांगतात. "स्थानांग सूत्र" या ग्रंथात दासाचे सहा प्रकार सांगितले आहे.

१. जन्मदास:- जन्माने असणारा दास.

२. खरेदी केलेला दास.

३. दिलेले कर्ज फेडेपर्यंत असणारा दास.

४. अन्नावाचून वंचित असणारी व्यक्ती तिचा दास म्हणून केलेला स्वीकार.

५. शिक्षा दिलेला दास (दंड)

६. कर्ज परत न फेडू शकणारा दास.

याव्यतिरिक्त युद्ध दास इ. दासांचे प्रकार आहेत.[१४]

स्त्री दासींचे कार्य :-

जैन आगम ग्रंथांमध्ये दासींनी घरातील कामांमध्ये तत्पर असावे असा उल्लेख आहे. घरातील कामांमध्ये सर्वात जास्त उपयोग दासींचा होत असे. त्याबरोबरच जनावरांचे शेण काढणे, साफसफाई करणे, अंगणात सडा टाकणे, धुणं-भांडी करणे, मालक व मालकिणीच्या आंघोळीची तयारी करणे, देवपूजेची तयारी करणे, त्यांच्या मुला-मुलींची काळजी घेणे, त्यांना खेळविणे, सांभाळणे, जेवण भरविणे, त्यांचे मनोरंजन करणे, अशी घरगुती कामे करावी लागत असे. याशिवाय राजघराण्यामध्ये स्त्रिया अंगरक्षकांची नियुक्ती असल्याचे उल्लेख सापडतात. मालकाच्या आजारपणात त्यांची सेवा सुश्रूषा करण्यासाठी दासींचा मोठा उपयोग केला जात असे. तसेच अत्यंत महत्त्वाचा व जोखमीचा संदेश हा आपल्या विश्वासू दासी मार्फत पाठविला जात असे.[१५]

गणिका व वेश्या :-

जैन काळात विशेष आगम काळात गणिका यांना सन्मानाने बघितले जात असे. गणिका यांचा उदय कधी झाला याविषयी जैन ग्रंथांमध्ये संदर्भ दिसून येतात. भरत चक्रवर्ती राजा आपल्या राज्याच्या दौऱ्यावर असताना त्याच्या अधिपत्याखाली असणाऱ्या राजांनी भरतला आपल्या मुली उपहार म्हणून भेट स्वरूपाने दिल्या. परंतु भरत जेव्हा राजवाडयात परत आला तेव्हा राणीला ही गोष्ट आवडली नाही. राणी खूप नाराज झाली. परिणाम स्वरूप भरतने या सर्व मुली आपल्या गणांना देऊन टाकल्या पुढे जाऊन याच मुली गणिका म्हणून नावारूपास आल्या. या गणिका आगम काळात आपले स्थान प्रस्थापित करून राजकीय व्यवस्थेचे एक प्रमुख अंग बनल्या.

आज याच गणिका वेश्या नावाने ओळखल्या जातात,[१६] त्यांच्याकडे तिरस्काराने बघितले जात असले तरी तत्कालीन समाजात गणिका एक संस्था रूपाने विकसित असून सन्माननीय होती. ज्या आपल्या अंगी असणाऱ्या कला, गुण आणि सौंदर्यामुळे राजाकडून सन्मानासाठी पात्र ठरत असत. त्या विविध कलागुणां मध्ये पात्र असत. त्यांच्याकडून या कला शिकून घेण्यासाठी त्यांची विनवणी देखील केली जात असे. मथुरा अभिलेखा मधून संदर्भ मिळतो की गणिका व नृत्यांगना केवल जैन धर्माचा स्वीकार करत नव्हत्या तर जैन मूर्तींची पूजा देखील करत असत. (शिलालेख संग्रह, भाग २, अभिलेख संख्या 8)

वरील उल्लेख केल्याप्रमाणे गणिका नगराची, राजधानीची शोभा असे. पुढे जाऊन गणिकेला समानार्थी शब्द 'वेश्या'असल्याचा उल्लेख दिसतो. परंतु वेश्या व गणिका या दोन्ही शब्दांची सरमिसळ आहे. वेश्या या शब्दाचा उल्लेख जैन ग्रंथांमध्ये फार क्वचित सापडतो. गणिकाचे स्थान नंतरच्या काळात वेश्या समुदायाचे नेतृत्व करणारी म्हणून पुढे आले. त्यांच्या राहण्याच्या ठिकाणाला वेश्या घर म्हणून उल्लेखले गेले. असे असले तरी ही वेश्या घरे राज वैभवाचे एक प्रमुख अंग बनली.

गणिकांच्या विशेष गुणांची चर्चा करताना जैन ग्रंथात पाच इंद्रियांनी निपुण परिपूर्ण शरीराची मालकीण असे तिला म्हटले आहे. चंद्राप्रमाणे शीतल, सुंदर म्हणजे गणिका असा देखील तिचा उल्लेख आहेत. गणिकाच्या अंगी 72 कला, 64 कुशल गुण, 29 विषयांमध्ये कोणत्याही व्यक्तीला रममाण करणारी व 21 प्रकारच्या रती गुणांनी युक्त असणारी असे म्हटले आहे.[१७] विशेष करून पाटलिपुत्रच्या गणिकांच्या विषयी हे वर्णने आली आहे. त्यांचे शरीर म्हणजे जणू काही शृंगाराचे घर असून गीत, संगीत, वाद्य, नृत्य, मधुर हास्य, बोलणे चालणे व्यवहार यात गणिका निपुण असत.

वरील गुणांच्या जोरावर गणिका प्रचंड संपत्तीच्या मालकीण होत असत. त्यांची स्वतःची प्रचंड अशी चल व अचल संपत्ती असे. याशिवाय गणिका यांची नियुक्ती थेट पत्नी म्हणूनही केल्याचे संदर्भ आढळतात. परंतु पत्नी म्हणून स्वीकार केल्यानंतर तिच्याकडून पतिव्रत्त धर्माचे पालन करण्याची अपेक्षा केली जात असे. तिने तसे केले नाही तर राजाच्या परवानगीने तिची हत्या देखील केली जात असे. वरील सर्व मते गणिका यांच्याबाबतीत चांगली असली तरी तिच्याकडे उपभोगाची वस्तू या दृष्टीनेच बघितले जात असे.

निष्कर्ष :-

विविध जैन ग्रंथांच्या माध्यमातून स्त्रियांचा विचार केल्यानंतर स्त्री ही परिवाराची कुलाची प्रतिष्ठा असे. आचरणात ती व्यभिचारी, निंदनीय असे वर्णन आले असले तरी ती पुरुषापेक्षा कुठेही कमी दिसून येत नाही. मुलीच्या जन्माच्या संदर्भात केल्या जाणाऱ्या संस्कारांमध्ये कुठेही लिंगभेद संस्कार आपल्याला जैन ग्रंथांमध्ये दिसून येत नाही. उलट मुलीच्या जन्माचा आनंद उत्सव साजरा केला जात असे. मुलीचे नाव ठेवताना महोउत्सव साजरा करून शुभलक्षणी असे नाव ठेवले जात असे. रोज सकाळी वडिलांचे दर्शन घेण्यासाठी आल्यानंतर वडील तिला आपल्या कुशीत उचलून घेत असे. तसे मुलाच्या बाबतीत फारसे घडत नसे. वडील आपल्या मुलाला आपल्या खुर्चीच्या बाजूला बसून घेत असत. कदाचित हा राजकीय वारसा हक्काचा परिणाम असावा.

संदर्भ ग्रंथ :-

1. ज्ञातृधर्मकथा अध्ययन ८, सूत्र ३०,३१.
2. ज्ञातृधर्मकथांगसूत्र, १/8/१८२, पृ.२७७.
3. कित्ता, १/१६/४२,पृ.४०७.
4. अन्तकूतदशांगसूत्र, ३/२३, पृ.७८.
5. आचारांगसुत्र,२/१/३४८, पृ.४१.
6. ज्ञातृधर्मकथांगसूत्र, १/१४/२८, पृ. ३६७.
7. निशिथचूर्णी,१, पृ.१५.
8. ज्ञातृधर्मकथांगसूत्र, १/२/११, पृ.११२.
9. कित्ता, १/३/२०, पृ.२०५.
10. महानीशीथ, २ सूत्र २३ पृ.३६.
11. डॉ. हिराबाई बोरदिया, जैनधर्म की प्रमुख साध्वियाँ एंव महिलाएँ, पार्श्वनाथ विद्याश्रम शोध संस्थान, वाराणसी, १९९१ प्रथमावृत्ती, पृ. २७
12. डॉ. हिराबाई बोरदिया, जैनधर्म की प्रमुख साध्वियाँ एंव महिलाएँ, पार्श्वनाथ विद्याश्रम शोध संस्थान, वाराणसी, १९९१ प्रथमावृत्ती, पृ. २७.
13. ज्ञातृधर्मकथांगसूत्र, १/१/९६, पृ.४७.
14. कित्ता, १/७/२०, पृ.२०५.
15. कित्ता, १/१८/8, पृ.४९६.
16. अमरकोश, २/६/१८, पाइअ, पृ. २८६.
17. विपाकसूत्र, १/२/२ पृ.६२.
18. कित्ता, ४/१२/ पृ.६२.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 14 Mar- Apr 2024

भारताचे 'पूर्वेकडे पहा आणि कृती करा' धोरण

डॉ. कीर्तिकर वाल्मीक भीमराव
राज्यशास्त्र विभाग प्रमुख छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर
Corresponding Author- डॉ. कीर्तिकर वाल्मीक भीमराव
DOI- 10.5281/zenodo.11178415

गोषवारा:

1992 मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी आसीयान देशाशी संबंध दृढ करण्यासाठी 'लूक ईस्ट धोरण' जाहीर केले. या धोरणालाच भारताचे 'पूर्वेकडे पहा धोरण' असेही म्हणतात. भारताचे पूर्वेकडे पहा हे धोरण आसीयान चे सर्व सदस्य राष्ट्रे तसेच याशिवाय इतर शेजारी देशांच्या आर्थिक सबलीकरणावर भर देते. तसेच या धोरणाद्वारे पूर्व व दक्षिण आशियाई देशांसोबत सामूहिक सुरक्षितता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जावे यासाठी हे धोरण आहे. या धोरणाचा दुसरा टप्पा म्हणजे 'ॲक्ट पॉलिसी' हा होय. भारताचे विद्यमान पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी 'लूक ईस्ट' धोरणाच्या पुढच्या टप्प्याच्या रणनीतीला 'ॲक्ट ईस्ट' असे नाव दिले आहे. लूक ईस्ट धोरणांतर्गत भारताने आसीयान देशांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता कालमर्यादेत केली नाही. चीनने या गोष्टीचा फायदा घेऊन आसीयान देशांशी आपले संबंध दृढ केले म्हणून भारताच्या आश्वासनाची कालबद्ध मर्यादेत पूर्तता करण्यासाठी 'ईस्ट पॉलिसी' घोषित करण्यात आली आहे.

हिंदी महासागरातील चीनचा हस्तक्षेप झुगारणे, आशिया खंडातील सत्ता संतुलनात भारताची महत्त्वाची भूमिका बजावणे, हिंदी महासागरात भारताची स्वतःची भूमिका स्पष्ट करणे हे या धोरणाचे महत्त्वाचे तत्त्व आहे.

उद्दिष्टे:

1. हिंदी महासागरातील भारताच्या भूमिकेचा अभ्यास करणे
2. भारताचे पूर्वेकडे पहा आणि कृती करा या धोरणाची प्रासंगिकता अभ्यासणे

1962 च्या भारत-चीन युद्धानंतर चीन आणि भारत, दक्षिण आणि पूर्व आशिया आशियात राजकीय स्पर्धेतील स्पर्धेक म्हणून ओळखले जात होते. दरम्यानच्या काळात चीनने भारताचा शेजारी देश पाकिस्तान सोबत व्यापारी आणि लष्करी संबंध निर्माण केले तसेच नेपाळ आणि बांगलादेश ला प्रभावित करण्यासाठी भारतासोबत चीन नेहमी स्पर्धकाच्या भूमिकेत राहिलेला दिसून येतो याशिवाय आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे शियाऑपिंग हे चीनचे सत्ताधीश बनल्यानंतर चीनच्या विस्तारवादी धोरणात त्यांनी बदल करून आशियाई देशांसोबत व्यापार आणि आर्थिक विकासाचे धोरण स्वीकारलेले याच दरम्यान आंतरराष्ट्रीय राजकारणात एक महत्त्वाची घटना घडली ती अशी की, 1991 ला शीतयुद्धाची समाप्ती झाली.

भारताचे 'पूर्वेकडे पहा आणि कृती करा' या धोरणाचा उदय व विकास :

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक राजकारणात अनेक बदल झालेले दिसून येतात त्यामध्ये प्रामुख्याने अमेरिका केंद्रित एकध्रुवीय युगाची सुरुवात झाली होती अशातच भारताने जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरणा चे धोरण स्वीकारले या दरम्यानच्या काळात भारताचे तत्कालीन प्रधानमंत्री श्री. नरसिंह राव यांनी 1992 ला भारताचे 'पूर्वेकडे पहा धोरण' घोषित केले.

भारताचे पूर्वेकडे पहा धोरणाचा उद्देश: दक्षिण-पूर्व आशियाई (भारत पाकिस्तान बांगलादेश श्रीलंका

अफगाणिस्तान भूतान मालदीव) देशांसोबत आर्थिक-सामाजिक संबंधाचा विकास करणे. जेणेकरून एक क्षेत्रिय शक्ती म्हणून भारताला आपली स्थिती आशिया खंडात मजबूत करता येईल. तसेच चीनच्या एकतर्फी राजकीय प्रभावाचा सामना करता येईल. कारण चीन आशिया खंडात आपली ताकद वाढविण्याचा प्रयत्न सातत्याने करीत आहे याशिवाय आशियातील सत्ता संतुलनात महत्त्वाची भूमिका पार पाडणे या उद्देशाला अनुसरून भारताने 'पूर्वेकडे पहा आणि कृती करा' हे धोरण स्वीकारलेले आहे या धोरणाचा विकास विविध टप्प्यामध्ये झालेला दिसून येतो. या धोरणाबाबत भारताचे माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग म्हणतात, "पूर्वेकडे पहा हे धोरण म्हणजे भारताचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची आणि जागतिक अर्थव्यवस्थेत भारताला स्थान मिळविण्याची खुण आहे."

भारताचे 'पूर्वेकडे पहा आणि कृती करा' या धोरणाचा विकास क्रम:

1. प्रधानमंत्री नरसिंहराव- (1992 ते 1996) नरसिंहराव यांनी आपल्या शासन काळात पूर्वेकडे पहा या धोरणाला विकसित आणि अधिनियमित केले.
2. अटल बिहारी वाजपेयी- (1998 ते 2004) आणि डॉ. मनमोहन सिंग (2004 ते 2014) या दोन्ही पंतप्रधानांनी या धोरणाच्या उद्देशाला अनुसरून प्रशासकीय पातळीवर अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला.
3. श्री. नरेंद्र मोदी- (2014 ते 2022)

आशियातील भू-राजकीय गुंतागुंत:

जगातील इतर देशांच्या तुलनेत अतिशय विशाल अशा भूप्रदेशावर वसलेला भारत देश आहे. भारताची भौगोलिक रचना वैविध्यपूर्ण आहे. भौगोलिकदृष्ट्या भारताच्या विविध राज्यांमध्ये भौगोलिक विविधता दिसून येते. भारतातील ईशान्येमधील सर्व राज्ये भारताच्या मुख्य प्रवाहापासून यामुळेच दुर्लक्षित राहिलेली आपल्याला दिसून येतात. किंबहूना ईशान्येकडील राज्यांची सांस्कृतिक रचना ही चीन, म्यानमार, भूतान, बांगलादेश, नेपाळ या शेजारील राष्ट्रांशी कमी-अधिक प्रमाणात मिळतीजुळती असल्याचं दिसून येतं

उपरोक्त देशांनी वेढलेल्या या ईशान्य भारतीय राज्यांचे जवळपास 5436 कि.मी. एवढी आंतरराष्ट्रीय सीमा आहे. तर सिलिगुडीजवळील केवळ 20-25 किलोमीटर रुंदीच्या चिंचोळ्या (चिकन- नेक) मार्गाने ही राज्य भारताच्या मुख्य भूमीशी जोडली गेली आहे. या सगळ्या भौगोलिक रचनेचा आणि वैशिष्ट्यांचा परिणाम आंतरराष्ट्रीय संबंधावर होणे अगदी स्वाभाविक आहे. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये ईशान्य भारत हा राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. नुकतेच भारतीय सुरक्षा दलांनी 'ऑपरेशन मॅनमार' पार पडल्यानंतर ईशान्य भारताची सुरक्षा स्थिती आणि तेथील चीनचा वाढता प्रभाव किती धोकादायक आहे हे लक्षात येते.

भारताचे 'पूर्वेकडे पहा आणि कृती करा' धोरण:

भारताचे पूर्वेकडे पहा हे धोरण दक्षिण आशियाई देशाची संघटना असलेली आसीयानधील देश इंडोनेशिया, मलेशिया फिलिपाईन्स, सिंगापूर, थायलंड यांच्या आर्थिक एकीकरणावर लक्ष केंद्रित करते. कारण तुलनात्मकदृष्ट्या विचार केल्यास भारत देश 1996 ला आसीयानचा फक्त संवाद भागीदार होता, 2002 ला भारत आसीयानचा शिखरस्तरीय भागीदार बनला. आणि 2012 ला भारताचे आसीयान सोबतचे संबंध राजकीय भागीदारीमध्ये बदललेले दिसून येतात.

1992 मध्ये जेव्हा भारताने 'पूर्वेकडे पहा' या धोरणाची घोषणा केली होती तेव्हा आसीयानसोबत भारताचा व्यापार 2 बिलियन अमेरिकी डॉलर इतका होता. 2010 मध्ये भारताने आसीयानसोबत मुक्त व्यापार धोरणावर स्वाक्षरी केली त्यानंतरच्या काळात या व्यापारात वृद्धी होऊन 72 बिलियन डॉलर (2017- 18) इतकी वृद्धि झाली यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, भारताच्या 'कृती करा धोरणाला'

आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठ्या प्रमाणात यश आले आहे.

लूक ॲक्ट पोलिसी :

भारताचे विद्यमान पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी 'लुक ईस्ट' धोरणाच्या पुढच्या टप्प्याच्या रणनीतीला 'ॲक्ट ईस्ट' असे नाव दिले आहे. 'लुक इस्ट' धोरणांतर्गत भारताने आशियाई देशांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता कालबद्ध मर्यादेत केली नाही, चीनने याचा अचूक फायदा घेऊन आशियाई देशांशी आपले संबंध दृढ केले. भारताच्या आश्वासनांची कालबद्ध मर्यादित पूर्तता करणे हाच 'ॲक्ट ईस्ट' चा मुख्य गाभा आहे तसेच आशियाई देशातील भू- राजकीय डावपेच यांमध्ये संपर्क क्षमतेचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे तसेच ईशान्यमध्ये दळणवळणांच्या साधनांचा विकास करणे ही 'ॲक्ट ईस्ट' च्या यशस्वीतेसाठी ची पूर्वअट आहे.

लूक ॲक्ट पॉलिसी ही आशियान देशाच्या 'आर्थिक एकीकरणावर' तसेच पूर्व आशियाई देशाच्या 'सुरक्षा आणि सहकार्य' यावर आधारलेली योजना आहे. भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी 'लुक ॲक्ट' पॉलिसीच्या अंमलबजावणीसाठी **4C** वर भर दिला आहे.

1. **Culture- संस्कृती:** रशियन आणि इतर दक्षिण व पूर्व आशियाई देशांच्या संस्कृतीमध्ये आदान प्रधानाला प्राधान्य दिले आहे
2. **Commerce-वाणिज्य:** तसे पाहिले तर भारताच्या परराष्ट्र धोरणात 2014 नंतर जो महत्त्वाचा बदल झाला तो असा की, व्यापार विषयक धोरणात आपण मोठ्या प्रमाणामध्ये बदल केले आहे. या अंतर्गत भारताने आंतरराष्ट्रीय राजकारणात व्यापार वाढीचे प्रयत्न सुरू केलेले आहेत.
3. **Connectivity-कनेक्टिव्हिटी:** शेजारील देशांसोबत कनेक्टिव्हिटी वाढविण्यासाठी भारत आणि बांगलादेश यांच्यामध्ये प्रयत्न केले जात आहेत त्यात पुढील प्रयत्नांचा समावेश होतो.

भारत आणि बांगलादेश यांच्यामध्ये आगरतळा- अखैरा रेल्वे लींक योजना, मॉडेल परिवहन संपर्क- भारत आणि बांगलादेशच्या माध्यमातून आंतरदेशीय जलमार्गाची योजना, कलादान मल्टी मॉडेल ट्रान्झिट ट्रान्सपोर्ट योजना, म्यानमार, थायलंड, भारत या तीन देशांना भारताच्या नॉर्थईस्टला जोडली जाणारी त्रिपक्षीय राजमार्ग योजना.

याशिवाय भारत-जपान ॲक्ट ईस्ट फोरम 2017 ला स्थापना करण्यात आल आहे. महत्त्वाचा उद्देश असा की, भारताची एक्ट ईस्ट पॉलीसी आणि जपानची "फ्री अंड ओपन इंडो पॅसिफिक रणनीती" यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करणे.

4. **Capacity Building- क्षमता निर्माण:**

Quad ची भूमिका :

हिंदी महासागरात आलेल्या सुनामी नंतर नैसर्गिक अपत्ती तून एकमेकांना मदत करण्यासाठी अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान व भारत या चार देशांनी औपचारिक संघटनेची स्थापना केली या संघटनेमध्ये जगातील चार मोठ्या आर्थिक महासत्ताचा समावेश होतो. 2007 मध्ये चीनचे पंतप्रधान सीजो आंबे यांनी या संघटनेची औपचारिक घोषणा केली.

2017 मध्ये या संघटनेला पुन्हा पुनर्जीवित करण्यात आले आणि चीनचा आशिया खंडाला असलेला धोका लक्षात घेऊन जपान आणि भारत या दोन देशाने पुढाकार घेतला. आशियाई- प्रशांत महासागरात चीनची वाढती दादागिरीला काबूत ठेवण्यासाठी अमेरिका, जपान ऑस्ट्रेलिया व भारत हे देश सामूहिक प्रयत्न करतील असे ठरवण्यात आले.

निष्कर्ष:

भारताचे 'पूर्वेकडे पहा आणि कृती करा' या धोरणाचा महत्वाचा उद्देश हा आहे की, आशियान देशाच्या आर्थिक एकीकरणावर तथा पूर्व आशियाई देशांसोबत सामूहिक सुरक्षिततेवर भर देणे तसेच सुरक्षित भारत निर्मितीसाठी आणि हिंदी

महासागरातील चीनचा हस्तक्षेप झुगारण्यासाठी आशियाई तसेच इतर देशांच्या मदतीने चीनची दादागिरी संपविण्यासाठी प्रयत्न करणे यासाठी या धोरणाची निर्मिती व अंमलबजावणी करण्यात येत आहे.

संदर्भ:

1. Madan,Gopal, India as a world Power: Aspects of foreign Policy,New Delhi
2. S.R. Morkhandikar: India's foreign Policy
3. डॉ. शैलेंद्र देवळाणकर: समकालीन जागतिक राजकारण, प्रमुख प्रश्न, विद्या बुक पब्लिषेर औरंगाबाद.
4. डॉ. वासंती रासम डॉ. करीअप्पा खापरे: आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण
5. बिपिनचंद: इंडिया आफ्टर इंडिपेंडेंस- स्वातंत्र्योत्तर भारत के सागर पब्लिकेशन, पुणे जानेवारी, 2004
6. दैनिक: सकाळ, लोकसत्ता, दिव्य मराठी, इंडियन एक्सप्रेस

Chief Editor
P. R. Talekar
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur(M.S), India

Editorial & Advisory Board

Dr. S. D. Shinde	Dr. M. B. Potdar	Dr. P. K. Pandey
Dr. L. R. Rathod	Mr. V. P. Dhulap	Dr. A. G. Koppad
Dr. S. B. Abhang	Dr. S. P. Mali	Dr. G. B. Kalyanshetti
Dr. M. H. Lohgaonkar	Dr. R. D. Bodare	Dr. D. T. Bornare